म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ७५६

REFBK-0006266

गोट्या काटकर प्रकाशन

# अत्रे उवाच

ना. क्र. ६२६६

लेखक

आचार्य प्र. के. अत्रे

REFBK-0006266

[redacted]

[ किंमत दोन रुपये

प्रकाशक :

वासुदेव गणेश काटकर,

श्रीरामनिवास, दक्षिण सदर बझार,

हाउसिंग सोसायटी, सोलापूर.

मुद्रक :

श्रीपाद रघुनाथ राजगुरु,

# 'वटवट'च्या आधींची 'कटकट'

आमच्या सोलापूरच्या वाचनालयांतील गोष्ट आहे ही. रविवारीं सकाळीं [redacted] चाळण्यासाठीं गेलों असतां, दोन सभासद अगदीं [redacted] भांडत होते; आणि जवळजवळ [redacted] हस्तगत केला. त्याच्या जवळ जाऊन पाहिलें तर तो अंक 'नवयुग'चा होता असं मला दिसलं आणि जो दुसरा खिडकीडीत बुटकेलेसा होता तो चेहरा टाकून तेथून निघून गेला. असा प्रकार त्याच रविवारीं झाला असं नाहीं तर तो दर रविवारीं होतो. मी मात्र असल्या भानगडींत पडत नाहीं. एखादा खवचटपणें विचारील तुम्ही कसे स्वस्थ बसता? तर त्याला माझं असं सांगणं आहे कीं, 'बाबा' मी 'नवयुग'चा वर्गणीदार आहे!

तो अंक हस्तगत करून त्या सभासदानं काय केलं तुम्हांला माहीत आहे? त्यानं टेबलावरचा दुसऱ्या एका साप्ताहिकाचा अंक घेतला (तो त्याला विनासायास मिळाला) आणि त्या साप्ताहिकाच्या आंत 'नवयुग'चा अंक ठेवून तो खुशाल एकीकडे जाऊन वाचत बसला. अशा रीतीनं तें साप्ताहिक [redacted] मोठी गंमत वाटली आणि मी अगदीं [redacted]जवळ जावयाला धजावला नाहीं.

कित्येक वेळा अंक तडी मारल्यामुळें ते वेळेवर–कधींकधीं मुळींच वाचावयास मिळत नाहींत यामुळें पुष्कळांची [redacted] सोईसाठीं मीं हा संग्रह काढावयाचं ठरविलं.

आत्रेय साहित्याविषयीं असणारी आसक्ति आणि त्यांच्याविषयीं असणारा उत्कट आदर व्यक्त करण्याची संधि या निमित्तानं मिळाली म्हणून मला आनंद होत आहे.

अतिक्रम, किंवा आक्रमण करतांना काटेरी तारेमुळें जर अंगावरचा कपडा फाटला तर तो दोष त्या कुचक्या फडक्याचा आहे असं माझ्या बालबुद्धीला वाटतं.

यावर अधिकारयुक्तपणें ( म्हणजे काय ? ) बडे नि जाडे ( रडे आणि वेडे यांचा समावेश करूं का ? ) साहित्यिक लिहूं किंवा बोलूं शकतील.

शेवटीं जातां जातां एवढंच सांगायचं आहे कीं, संग्रहांत उल्लेखिलेल्या सर्व व्यक्तींविषयीं माझ्या ठिकाणीं संपूर्णपणें आदराची भावना आहे. या-उपरही त्यांच्या मनांत 'कांहीं' असल्यास [redacted]

'श्रीरामनिवास', द. सदर बझार<br>हौसिंग सोसायटी, सोलापूर.<br>२३-१-१९४२, गडकरी स्मृतिदिन.

गोट्या काटकर

'नवयुगां'त दर आठवड्याला मी जें बोलतों त्यांतील कांहीं उक्तींचा संग्रह ह्या पुस्तकांत केलेला आहे. हीं 'लेखी भाषणें' ज्या वेळेला आणि ज्या प्रसंगाला अनुसरून केलेलीं आहेत ती वेळ आणि ते प्रसंग, हे कदाचित् तात्पुरत्या महत्त्वाचे आहेत असें कोणाला वाटण्याचा संभव आहे. तथापि, ह्या नैमित्तिक 'वक्तव्यां'त तरुणांच्या विचारांना आणि भावनांना स्फूर्ति देण्यासारखा थोडाफार मालमसाला आहे असें कोणाला आढळून आल्यास ही 'वटवट' कांहीं तरी सार्थकीं लागली असें समजण्यास हरकत नाहीं. जें मनाला वाटलें, जें सुचलें, जें स्फुरलें तें बोलून गेलों! मनांत मागें कांहींच शिल्लक राहिलें नाहीं. ऐकणाराला इच्छा असल्यास ऐकतां येईल, इच्छा नसल्यास हे शब्द वाऱ्यावर विरून जातील!

१७ जानेवारी १९४२

प्रल्हाद केशव अत्रे

# अत्रेउवाच

दा. क्र. ६२९६

## के. गडकरी यांच्या आठवणी

१

आज एकवीस जानेवारी १९४० ! राम गणेश गडकरी ह्यांची एकविसावी पुण्यतिथि ता. २३ जानेवारी १९४० रोजीं येते ! गडकऱ्यांच्या मरणाला इतकीं वर्षे झालीं ! ए-क-वी-स ! माझ्या आठवणींत ही गोष्ट अगदीं काल-परवां घडली असा भास होतो ! गडकऱ्यांची मूर्ति अजून डोळ्यांसमोर आहे असें वाटतें ! गडकऱ्यांचें तें अरुंद जिन्याचें तीन मजल्यांचें कसबा पेठेंतील डगमगतें घर डोळ्यांसमोर दिसूं लागतें ! एक ना दोन— गडकऱ्यांच्या अनेक आठवणी या प्रसंगीं मनांत जाग्या होतात !— आणि अंतःकरण क्षणभर विकल होतें !

* * *

गडकरी ज्या वेळीं वारले, त्या वेळीं मी फर्ग्युसन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत शिकत होतों. 'ज्ञानप्रकाश' छापखान्यासमोरील एका जागेंत त्या वेळीं मी राहत होतों. गांवांत जेवून मी संध्याकाळीं वसतीच्या ठिकाणीं चालत

चालत येत असें! गडकऱ्यांच्या निधनाची वार्ता त्या दिवशीं संध्याकाळीं मला कळली. मनाला केवढा मोठा धक्का बसला ह्याची कल्पनाहि आतां देतां येत नाहीं! वसतिस्थानाकडे रात्रीं येतांना लकडीपुलावर उभा राहून पलीकडच्या स्मशानांत जळणाऱ्या एका भीषण चितेकडे पाहत मी किती तरी वेळ उभा होतों! —आणि तशा स्थितींत मीं गडकऱ्यांच्या निधनावर एक कविताहि रचून टाकली!

* * *

एक-दोन दिवसांनीं किर्लोस्कर नाटकगृहांत गडकऱ्यांच्या मृत्यूबद्दल शोकप्रदर्शनासाठीं जी जाहीर सभा भरली होती, त्या सभेंत ही कविता माझे मित्र 'गिरीश' यांनीं गाऊन दाखविली! जाहीर काव्यगायन करण्याची मला त्या वेळीं हिंमतच नव्हती. ह्या पहिल्या शोकसभेची आठवण झाली, कीं एका अत्यंत तिरस्करणीय नि अप्रिय अशा गोष्टीची मला आठवण होते! गडकऱ्यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शन करण्यासाठीं हजारों लोक जमलेले पाहून अध्यक्षांच्या मागें कवि 'रेंदाळकर' उभे होते ते चमत्कारिक स्वरांत 'अनंततनय' कवींना म्हणाले, "आपण मेल्यानंतर आतां नक्की गर्दी जमणार बरं का!" अनंततनयांनीं हसून त्याला साद दिली. बिचारे रेंदाळकर आणि अनंततनय! काळाच्या पडद्याआड कधीं गेले त्याची किती थोड्यांना स्मृति असेल! गडकऱ्यांचें स्मरण मात्र महाराष्ट्राला आहे तसेंच आहे.

* * *

गडकरी आपले थोरले बंधु श्री. विनायकराव गडकरी वकील, ह्यांच्या घरीं सावनेर येथें वारले. त्यांची प्रकृति त्यापूर्वी दोन वर्षे ढासळूं लागली होती. गडकऱ्यांच्या मृत्यूची वार्ता त्यांच्या हयातींतच मुंबईच्या 'इंदुप्रकाशां'त प्रसिद्ध झाली होती. त्याचें असें झालें, गडकरी फार आजारी होते. हवापालट करण्यासाठीं ते परगांवीं गेले म्हणून पुण्याचें त्यांचें घर बंद होतें. खालीं मारवाड्याचें दुकान असे. मुंबईहून गडकऱ्यांची चौकशी करण्यासाठीं कोणी तरी आलें आणि त्यानें विचारलें, 'गडकरी कुठं आहेत?' मारवाडी म्हणाला, 'ते गेले!' ह्या शब्दांचा भलताच अर्थ घेऊन त्या गृहस्थानें गडकऱ्यांच्या मृत्यूची वार्ता वर्तमानपत्रांत जाहीर केली. गडकऱ्यांनीं स्वतःचा मृत्युलेख वाचला तेव्हां

ते म्हणाले, "मी मेल्यानंतर लोक काय म्हणतील हें निदान मला पाहायला तरी मिळालें!"

* * *

गडकरी मित्रांचे अतिशय चाहते असले तरी, तिऱ्हाइत माणसांचा आणि त्यांना आवडत नसलेल्या माणसांचा ते कधीं अपमान करतील त्याचा नेम नसे! तिसऱ्या मजल्यावरच्या खिडकींत ते नेहमीं बसलेले असायचे. खालून कोणी मनुष्य त्यांना येतांना दिसला, कीं ते वरतून बहुधा ओरडायचे, "अहो, सध्यां मी कामांत आहे, उद्यां या!" ह्या बाबतींत ते कोणाहि माणसाचा मुलाहिजा ठेवायचे नाहींत! त्यामुळें अनेक चांगल्या चांगल्या लोकांचा त्यांच्यावर गुस्सा झालेला होता. खालीं जिन्यावर त्यांची एक पाटी नेहमीं लागलेली असे—'गडकरी कामांत आहेत. संध्याकाळीं या!" संध्याकाळीं गडकरी कधींच घरांत नसायचे. एकदां एक खप्पी गृहस्थ त्या पाटीची पर्वा न करतां तसाच वर शिरला. गडकरी त्या वेळीं एकटेच विडी ओढीत बसले होते. ह्या गृहस्थाला पाहतांच ते रागावून म्हणाले, "काय हो, मी कामांत आहे हें दिसत नाहीं का तुम्हांला?" तो गृहस्थ म्हणाला, "तुम्ही विडी ओढीत बसलां आहांत; कामांत तर कांहीं दिसत नाहीं!" त्यावर गडकरी चटकन् म्हणाले, "लोकांना ज्या वेळीं मी कामांत नाहीं असें वाटतें त्या वेळींच मी खरा कामांत असतों!"

* * *

एकदां खालून श्री. नाथमाधव जात होते. नाथमाधव हे पायांनीं पांगळे होते. त्यांच्या कादंबरी-लेखनाबद्दल गडकऱ्यांना फारसा आदर नसे. त्यांना पाहतांच गडकरी शेजारच्या एका मित्राच्या कानांत कुजबुजले, "अरेरे, तो गृहस्थ दोन्ही बाजूंनीं कीं हो अधू आहे!" तात्या नेमिनाथ पांगळ आणि दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी या नांवांची गडकरी नेहमीं थट्टा करीत. असलीं भयंकर नांवें धारण करून ही मंडळी कशी जगूं शकतात ह्याचें त्यांना आश्चर्य वाटे! एकदां पुणें स्टेशनवर 'राक्षसी महत्त्वाकांक्षे'चे कर्ते वीर वामनराव जोशी येत होते. त्यांना पाहतांच गडकरी शेजारच्या मित्राला म्हणाले, "पळा-पळा, तो महत्त्वाकांक्षी राक्षस इकडे येऊं लागला आहे!" नांवावर कोट्या करण्याचा गडकऱ्यांना फार हव्यास असे!

* * *

त्या त्या वेळच्या अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींवर गडकऱ्यांनीं अनेक विनोदी ओव्या रचल्या होत्या. त्या आतां उपलब्ध नाहींत. त्या मिळाल्या तर खूपच गमतीचें वाङ्मय वाचकांना वाचावयाला मिळेल. एका एका ओवींत त्या त्या व्यक्तीचें स्वभाववैशिष्ट्य चितारण्याचा गडकऱ्यांनीं प्रयत्न केला होता, माझ्या स्मरणांत फक्त दोनच ओव्या आहेत.

नमूं म्हणूं तरी अच्युत कोल्हटकर ।
त्याचें घरावर जप्ती सदा !
नमूं म्हणूं तरी कृष्णा प्रभाकर ।
गंधर्वाचा पदर आड येतो ।

* * *

पुण्यांतील पुस्तकांचे एक दुकानदार श्री. अनंतराव बापट (रा. ए. पी. बापट) ह्यांच्यावर गडकऱ्यांचा फार लोभ असे. तथापि त्यांची थट्टाहि ते करावयाला मागेंपुढें पाहत नसत. मागील लढाईच्या वेळेला अमक्याचें कसें होईल, तमक्याचें कसें होईल अशा तऱ्हेच्या अनेक प्रश्नांनीं श्री. अनंतराव बापट ह्यांनीं गडकऱ्यांना एकदां भंडावून सोडलें. तेव्हां गडकरी चिडून त्यांना म्हणाले, "अंत्या, लेका, जगाचें काय होणार ह्याची तुला काळजी कां?" ह्या विषयावर त्यांनीं 'चिंतातुर जंतू' ही व्यंजनापूर्ण कविता लिहिली.

'देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी,'
ह्या चिंतातुर जंतूला एकदां मुक्ति द्या परी ! !

असा त्या कवितेचा शेवट आहे. 'चिंतातुर जंतू' म्हणजे 'चिंतातुर अंतू' हें पुष्कळांना माहीत नसेल.

* * *

गडकरी कवितालेखन फार झपाट्यानें करीत असत. बहुतेक कविता चतकोर कागदावर पेन्सिलीनें लिहीत असत, आणि त्याखालीं दिवस वेळ, स्थळ आणि मोडी सही करीत. 'घांस' ही त्यांची सुप्रसिद्ध कविता त्यांनीं लिहिली त्या वेळीं मी त्यांच्या जवळ होतों, कागदाच्या एका बाजूला 'विदुर-कण्या', 'सुदामा-पोहे', 'द्रौपदी-थाळी' असे त्रोटक शब्द त्यांनीं लिहिलेले होते. कविता तयार झाल्यावर मला त्यांनीं ती म्हणावयास सांगितली—मींहि ती वेड्या-

वाकडया आवाज़ांत म्हणून दाखविली. बालगंधर्वांच्या गळयांतून तो 'घास' जेव्हां बाहेर पडला तेव्हां माझ्या गळयांतून प्रथम बाहेर पडलेल्या 'घासा'ची मला आठवण झाली आणि जेवतांना माझा घासच गळयांत अडकला!

'राजहंस माझा निजला' ही त्यांची अत्यंत लोकप्रिय कविता त्यांनीं सकाळीं ११ ते १२ चे दरम्यान अत्यंत झपाट्यानें रचली. अंगांत कसला तरी संचार व्हावा अशी त्यांची ह्या वेळीं स्थिति झाली होती. एका एक्सरसाईज बुकावर झपाट्यानें एकामागून एक ते कडवीं लिहीत गेले. मुळांत पुष्कळच जास्त कडवीं होतीं. तीं प्रसिद्ध झालेल्या प्रतींत कमी करण्यांत आलीं. कवितालेखन चालू असतां त्यांच्या भावानें त्यांना जेवावयाला हाक मारली. तेव्हां गडकरी वरून ओरडून म्हणाले, "थांब जरा! जगाच्या वाङ्मयांतील एका अत्यंत श्रेष्ठ काव्याला मी जन्म देतों आहे!" आणि हें त्यांचें भाकित पुरेपूर खरें ठरलें.

* * *

गडकऱ्यांच्या इतका कोटिबाज, विनोदी आणि प्रत्युत्पन्नमति संभाषक माझ्या आढळांत अद्यापिहि आलेला नाहीं. एक गृहस्थ त्यांच्याशीं रस्त्यानें भांडत होता. तो गडकऱ्यांच्यावर चिडून अखेर म्हणाला, "तुमच्यासारख्या मूर्ख माणसाशीं यापुढें बोलायचें नाहीं असें मीं ठरवलें आहे!" गडकरी शांतपणें म्हणाले, "मीं अजून असें ठरवलें नाहीं, कारण मी तुमच्याशीं बोलायला तयार आहे."

* * *

लकडीपुलापाशीं पूर्वी म्युनिसिपालिटीचा एक घासलेटी कंदील व त्याच्याशेजारींच एक ग्यासच्या बत्तीचा खांब होता. म्युनिसिपालिटीचा कंदील आणि गॅसची बत्ती इतक्या शेजारीं कशीं आलीं असावीं याबद्दल जाणारे येणारे अचंबा व्यक्त करीत असत. गडकरी तिकडून हिंडायला जात असतांना त्यांना तो प्रकार कोणी तरी दाखविला आणि विचारलें हें कसें? त्यावर गडकरी गंभीरपणें म्हणाले. "हें बरोबर आहे. गॅसची बत्ती लागली कीं नाहीं हें पाहायला शेजारीं कंदील ठेवलेला आहे!"

* * *

गडकऱ्यांच्या धाकट्या भावाच्या डोक्याखालीं विंचू निघाला. ती बातमी त्यांना कोणीं सांगितली कीं, "मास्तर, मंजूच्या डोक्याखालीं विंचू निघाला!" त्यावर गडकरी ताबडतोब म्हणाले, "दगडाखालीं विंचू सापडायचाच!"

* * *

किर्लोस्कर नाटक मंडळींतले एक नट चिंतोपंत दिवेकर एकदां रागावले व म्हणाले, "कित्येक वेळां डोक्यांत राख घालून कुठं तरी जावं असं वाटतं!" या दिवेकरांचे केस पांढरे होते. तेव्हां गडकरी म्हणाले, "चिंतोपंत, तुम्हीं डोक्यांत राख घातली तर ती दिसणार कोणाला!"

* * *

पुण्यांतील कांही गोष्टींचा गडकऱ्यांना अत्यंत अभिमान असे. लोकमान्य टिळक आणि गीतारहस्य; नामदार गोखले आणि सर्व्हंट्स ऑफ इंडिया संस्था; रँग्लर परांजपे आणि फर्ग्युसन कॉलेज हे त्यांच्या अभिमानाचे विषय होत. रँग्लर परांजपे ह्यांच्या गणिती ज्ञानाबद्दल त्यांना अतिशय आदर असे. रँग्लरांच्या मिशांच्या आकड्यांची त्या वेळीं जहाल पक्षांतील लोक थट्टा करीत. त ऐकून गडकरी नेहमीं चिडून म्हणायचे, "रँग्लरांच्या मिशांच्या आकड्यांशीं ह्या लोकांना करायचें काय? त्या टोचत असल्याची तक्रार ह्यांना ह्यांच्या 'घरांतून' थोडीच येते?"

* * *

'फर्ग्युसन कॉलेज' म्हटलें म्हणजे गडकऱ्यांच्या भावना उचंबळून येत! आपल्या मृत्यूनंतर आपली समाधि फर्ग्युसन कॉलेजच्या वळणावर बांधली जावी अशी त्यांची इच्छा होती. म्हणजे जाणाऱ्या येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पायधुळीनें तरी आपण पुनीत होऊं असें त्यांना वाटत असे! ही त्यांची इच्छा कधीं तृप्त होईल का?

* * *

नाटककार, विनोदपंडित आणि कवि म्हणून गडकऱ्यांचें नांव तर अजरामर झालेलेंच आहे; पण त्याहिपेक्षां त्यांचें व्यक्तिमत्व हें अद्भुतरम्य आणि अपूर्व होतें हें त्यांना प्रत्यक्ष ओळखणाऱ्यांविना इतरांना क्वचितच ठाऊक असेल!

# मी काय होऊं शकलों असतों?   २

परवांच्या महाराष्ट्र विरुद्ध बडोदा क्रिकेटच्या सामन्यांत विजय हजारे ह्यांनीं तीन शतकांचे वर धावा करून अद्‌भुत पराक्रम केला ह्यांत संशय नाहीं! सामान्यतः धावांचें एक शतक गाठलें म्हणजे पराक्रमाची परिसीमा केली असें समजलें जातें! पण हजारे यांनीं एक शतक नव्हे—दोन शतकेंच नव्हे—तर तीन शतकांचा पल्ला गाठला; आणि हिंदी क्रिकेट-सृष्टींत आपलें नांव अजरामर केलें. ह्या त्यांच्या पराक्रमाचा कोणालाहि हेवा वाटल्याशिवाय राहणार नाहीं; निदान मला तरी त्यांचा हेवाच वाटला! कारण क्रिकेट हा लहानपणापासून माझा ऐच्छिक विषय आहे असें म्हटलें तरी हरकत नाहीं. मला जेव्हांपासून कळूं लागलें (किंवा कोणी म्हणेल अजूनहि कळतें कीं काय?) तेव्हांपासून मी क्रिकेट खेळतों आहे. लहानपणची आठवण झाली कीं त्या आठवणी क्रिकेटच्या सामन्यांनीं अगदीं बहरून गेलेल्या आढळतात. शाळेमध्यें मोठ्या कष्टानें माझा शील्ड-टीममध्यें मीं अंतर्भाव करून घेतला होता. कारण क्रिकेटच्या टीममध्यें गेलें, कीं बटाट्याची भाजी, पुरी आणि शिरा मधल्या सुट्टींत खावयाला मिळतो हें आकर्षण क्रिकेटच्या खेळापेक्षां माझ्या

मनावर जास्त पकड धरून होतें. म्हणून 'शील्ड टीम'मध्यें प्रवेश मिळविण्याकरितां मीं नाना तऱ्हेचे वशिले लावून शेवटीं त्यांत यश मिळवलें होतें; पण ऐन वेळीं त्या वर्षीं प्लेग उद्भवला आणि क्रिकेटचे सामने तहकूब झाले! बटाट्याची भाजी, पुरी, शिरा दुर्दैवानें माझ्या हातचा हिरावून नेला! जाऊं द्या, तो विचारच आतां असह्य होतो! कॉलेजमध्यें गेल्यावर काव्य आणि क्रिकेट या दोन नादांनीं मीं माझ्या अभ्यासाची वाताहत करून घेतली. क्रिकेटची मॅच चालू असली कीं, वर्ग चालू असतां बाकाखालून सरपटत सरपटत वर्गाबाहेर पडण्यांत मी वाकबगार होतों. कॉलेजमध्यें क्रिकेटच्या संघांत प्रवेश मिळवणें ही गोष्ट मला अशक्यप्रायच होती. तेव्हां क्रिकेटचे सामने पाहण्यांतच मला माझ्या क्रिकेटभक्तीचें समाधान करून घ्यावें लागलें! अशा तऱ्हेनें धड क्रिकेटहि नाहीं आणि धड अभ्यासहि नाहीं, अशी माझी स्थिति झाल्यास नवल नाहीं!

*   *   *

मीं क्रिकेटकडे लक्ष दिलें नसतें तर मी सर्व विश्वविद्यालयीन परीक्षांत उच्चांक मोडला असता असें मला अजूनहि वाटतें! आणि तसें झालें असतें तर मी काय वाटेल तें होऊं शकलों असतों! आय्. सी. एस्., कलेक्टर, कमिशनर नाहीं तर किमानपक्षीं पुण्यांतल्या कॉलेजांतला प्राध्यापक तरी! मीं नुसते क्रिकेटकडेच लक्ष दिलें असतें तर–तर–बोलूंच का?—तर आज मेजर नायडू, प्रो. देवधर, विजय मर्चंट, विजय हजारे, ह्यांचीं नांवें तरी कोणी घेतलीं असतीं का? पंचरंगी सामन्यांत हिंदु टीमचा कॅप्टन बहुतेक मीच असतों आणि मेजर नायडूंच्या बाबतींत कप्तानपद त्यांनाच द्यावें कीं नाहीं हा जो वाद सुरू झाला होता, तसा वाद माझ्या बाबतींत सुरू होण्याची सुतराम्‌देखील शक्यता उद्‌भवली नसती! उत्तम बॅटस्मन होण्यास कोणते गुण लागतात? भरपूर उंची आणि धिप्पाड शरीर! मग ह्या बाबतींत मे. नायडू माझ्या पासंगाला तरी पुरतील का? एक वेळ लांबून मी मेजर नायडूंसारखा दिसतो असें मला लोक म्हणत! पण शारीरिक क्षेत्रफळाच्या वाढीबरोबर पुढें पुढें अनुक्रमें रामजी, अमरसिंह आणि अखेर महंमद निसार ह्यांच्याशीं माझें साम्य असल्याचे आरोप माझ्यावर येऊं लागले! कांहीं असलें तरी आज मी क्रिकेटच्या क्षेत्रांत असतों तर एक

बिनजोड क्रिकेटपटु म्हणून माझी खात्रीनें प्रख्याति झाली असती ह्याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं! वर्षांतून एखादे वेळीं मी अजूनहि क्रिकेट खेळत असतों—चुकून-माकून एकाद-दुसरी ओव्हर-बाउंडरीहि मी मारूं शकतों. तथापि चार तासांचा खेळ अन् पांच दिवसांचें लंगडणें अशी सध्यां स्थिति होते. कांहींहि असो, मी क्रिकेटकडे द्यावें तितकें लक्ष न दिल्यानें महाराष्ट्र एका सवाई ब्रॅडमनला मुकला आहे हें वारंवार माझ्या मनांत येतें आणि ह्या महाराष्ट्राच्या दुर्दैवाबद्दल मला हळहळ वाटते!

* * *

उत्तम क्रिकेटपटु होण्याचें शक्तिगर्भत्व जसें माझ्यांत आहे, तसें उत्तम गवई होण्याचीहि साधनसामुग्री निसर्गानें मला दिलेली होती! माझा आवाज अतिशय चांगला आ—(कै० हाय) होता असें मीं जीव तोडून सांगितलें तरी त्याच्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं हें माझें दुर्दैव आहे कीं नाहीं! लहानपणीं शाळेंत बक्षिस-समारंभाचे वेळीं नमनाचीं गाणीं म्हणण्यांत—मेळ्यामधें टिपऱ्यांच्या तालावर रस्त्यारस्त्यांतून राष्ट्रीय गाणीं गात फिरण्यांत माझा हात धरणारा कोणी नव्हता. शाळेंतील आयुष्याच्या उत्तरार्धांत तर मी मरहूम खांसाहेब अबदुल करीमखां यांच्या वर्गांत माझें नांव दाखल केलें! त्या वर्गांत मी अदमासें एक वर्ष होतों. तथापि मला शिकवण्याचें भाग्य या काळांत खानसाहेबांना लाभलें नाहीं. याबद्दल मला राहून राहून वाईट वाटतें! यमन-कल्याण आणि भैरवी ह्या दोनच रागांमधील सुरांच्या उलट्यापालट्या कसरती करण्यांत माझें वर्ष कधींच संपून गेलें. पण खानसाहेबांची आणि माझी समोरासमोर गाठ अशी कधींच पडली नाहीं. खानसाहेबांनीं आपली विद्या मला त्या वेळीं खरोखरच दिली असती तर कपिलेश्वरीबुवा, सुरेशबाबू, आणखी ज्यांचीं नांवें आठवत नाहींत असे अनेक खानसाहेबांचे शिष्य ह्यांचीं नांवेंहि आज कुणी घेतलीं नसतीं. नामुष्कीची गोष्ट आहे, कीं हे सारे लोक खानसाहेबांचे उत्तमोत्तम शिष्य म्हणून आज महाराष्ट्रांत मोठ्या गौरवानें वावरत आहेत आणि खानसाहेबांचा एक भिकार शिष्य म्हणून मला अज्ञातवासांत दिवस कंठावे लागत आहेत. व्याख्यानबाजीच्या परिश्रमानें शतधा विदीर्ण झालेल्या माझ्या एक वेळच्या मधुर आवाजाला आतां 'काव्यगायन' एवढीच

एक समाधानाची जागा उरली आहे! आश्चर्य मात्र हें कीं, माझें 'काव्यगायन' शांतपणें ऐकून घेणारे सहनशील श्रोते अद्यापि मिळतात!

* * *

तसें म्हणाल तर मग मी नटहि उत्तमच झालों असतों! नट होण्यास लागणारीं इतर साधनें मला अनुकूल नसलीं तरी, नाटकांत काम करण्याची माझ्याइतकी जबरदस्त हौस फारच थोड्यांना असेल! प्रो. काळे यांच्या 'विक्षिप्तरावां'तील चिकटंभटापासून तों देवलांच्या 'संशयकल्लोळां'तील फाल्गुनरावापर्यंत सर्व भूमिका मी माझ्या खेडेगांवांतील रसिक प्रेक्षकांपुढें करून त्यांच्याकडून वाहवा मिळविलेली आहे. आतां बोला! पुण्यास आल्यानंतर शाळेंतील संमेलनांच्या प्रसंगीं होणाऱ्या नाटकांत उमेदवार नट म्हणून मी स्वतःस दाखल करून घेण्यास गेलों; पण वशिल्याच्या आणि सकृद्दर्शनीं दिसणाऱ्या गुणांच्या अभावीं मात्र माझी डाळ कोठेंहि शिजेना! शेवटीं 'झुंझारराव' नाटकांत 'सारजे'ची स्त्री-भूमिका करण्याचें मीं मान्य केलें तेव्हां मला प्रवेश मिळाला! मीं एका वेळीं स्त्री-भूमिका केलेली आहे ही गोष्ट एखाद्याला 'Fairy Tale' प्रमाणें अद्‌भुत (रम्य कांहीं म्हणतां येणार नाहीं!) वाटल्याशिवाय राहणार नाहीं. (आणि माझे मित्र दे. भ. शंकरराव देव ह्यांनींहि माझ्या आधीं एक वर्ष माझ्याच शाळेंत त्याच नाटकांत स्त्री-भूमिका केली होती हें जर मीं सांगितलें तर ती गोष्ट अरबी भाषेंतल्या सरस आणि सुरस गोष्टींप्रमाणें अत्यंत रोमहर्षण वाटल्याशिवाय राहणार नाहीं!) माझी ही स्त्री-भूमिका पाहून त्या वेळीं प्रेक्षकांचेवर काय परिणाम झाला असेल ह्याचा मला आजच्या स्थितींत तर्क करतां येत नाहीं. पण एक गोष्ट खरी, कीं एका नाटक मंडळीचे मॅनेजर (नांवच सांगतों, 'चित्ताकर्षक नाटक मंडळी'चे मॅनेजर श्री. वामनराव गोखले हे बहुधा आतां जिवंत नसावेत!) मला आपल्या नाटक मंडळींत पळवून नेण्यासाठीं माझे मागें कित्येक तरी दिवस लागले होते! आणि समजा, त्या वेळीं मी नाटक मंडळींत पळून गेलों असतों तर—तर कल्पने, कल्पने अशी उद्दाम धावूं नकोस!—तर—आज एका मोठ्या नाटक मंडळीचा संस्थापक आणि मालकहि होऊन बसलों असतों! मात्र नारायणराव राजहंसाप्रमाणें मीं आरंभापासून तों अखेरपर्यंत स्त्री-भूमिका करण्याचा अविचारी हट्ट धरला नसता—अर्थात्

माझ्या शारीरिक मर्यादेमुळें तें मला शक्यहि झालें नसतें ही गोष्ट निराळी ! बाकी मी स्त्री-भूमिका करणारा नट झालों असतों तर माझा अगदींच 'गोहरबाबा' खास झाला नसता असें मला वाटतें !

कार्लाइलनें आपल्या एका लोकोत्तर ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें A hero is a hero at all points या वचनाचें तत्त्व मला माझ्यापुरतें तरी मान्य आहे. मीं काय वाटेल तें होऊं शकलों असतों. उत्तम टांगेवाला, उत्तमोत्तम मोटार ड्रायव्हर, सर्वोत्कृष्ट एंजिन ड्रायव्हर—पण ही यादी सांगायलाच पाहिजे का ? मला काय म्हणायचें तें तुमच्या ध्यानांत आलेंच असेल ! पण तुम्हीं जर मला असाच प्रश्न केला कीं, "आपण 'हीरो' आहांत ही गोष्ट गृहीत धरून चालतां !" तर मात्र माझ्या कल्पनेचा कुतुबमिनार कोलमडल्याशिवाय राहणार नाहीं ! मी वाटेल तें होऊं शकलों असतों असें माझ्यापुरतें जरी मला वाटत असलें तरी मला एक गोष्ट मात्र कधींहि होतां आली नसती— ती म्हणजे 'पहिलवान !' माझ्या शरीराकडे पाहून पुष्कळ लोक मला आदरानें विचारतात कीं, 'लहानपणीं तुम्ही तालीम केली असली पाहिजे.'

मी किंचित् स्मित करून दुसराच विषय काढतों ! झाकली मूठ उघडा कशाला ?

— —

# विवस्त्र स्नानाची समाजास जरूरी ३

## आंघोळ आणि नीति :

मागें एकदां मी एका उर्दू प्राथमिक शाळेंत तपासणीसाठीं गेलों असतां मीं मुलांना सहज विचारलें कीं, तुम्ही आंघोळ रोज करतां का? त्यावर त्यांनीं मला उत्तर दिलें कीं, आम्ही आठवड्यांतून एकदां शुक्रवारीं आंघोळ करतों. तें ऐकून मला चांगलाच धक्का बसला म्हणून मी हेडमास्तरांना विचारलें. त्यावर 'मी देखील आठवड्यांतून एकदांच आंघोळ करतों!' असें त्यांनीं मला उत्तर दिलें. तेव्हां मीं सचैल सर्द झालों! मुलांना एक वेळ सांगतां येईल, पण मास्तरांना काय सांगायचें? उष्ण हवेंत आठवड्यांतून एकदां आंघोळ करणाऱ्या माणसाच्या स्वच्छतेच्या कल्पनेविषयीं अचंबा करीत मी तेथून बाहेर पडलों. आपण हिंदु लोक रोज आंघोळ करतों ह्याबद्दल मला अभिमान वाटला आणि मी रस्त्यानें पुढें जाऊं लागलों तों एका घराच्या अंगणांत एक ब्राह्मण गृहस्थ बादलीभर पाणी बारक्याशा लोटीनें डोक्यावर ओतीत असल्याचें माझ्या दृष्टीस पडलें! कमरेला धोतर तसेंच चिकटलेलें. तेव्हां त्या भागाच्या स्वच्छतेविषयीं बोलण्याची आवश्यकताच नाहीं. वरच्या

अंगाला काय थोडेंसें पाणी लागलें असेल तेवढेंच! आठवड्यांतून एक वेळ आंघोळ करणारा मुसलमान आणि रोज अशा तऱ्हेनें आंघोळीचें सोंग करणारा ब्राह्मण ह्यांमध्यें तत्त्वतः कांहींच फरक नाहीं. सवस्त्र स्नान करणें आणि आंघोळ अजीबात न करणें ह्यांत फारच थोडा फरक आहे. विवस्त्र किंवा नग्नस्नान करण्याची पद्धति आपल्या देशांत केव्हां रूढ होणार? असा साहजिकच विचार मनांत येतो. युरोपमध्यें 'स्नानपात्रां'चा (Tub) शोध फार उशीरा लागला. जपानमध्यें मात्र स्त्री-पुरुष एकत्र व विवस्त्रच स्नान करतात. आपल्या देशांत स्वतंत्र आणि बंदिस्त अशीं स्नानगृहें नसल्यानें विवस्त्र स्नान करणें सामान्यतः अशक्यच होय. म्हणून उघड्यावर अंगावर वस्त्र ठेवून गाळीव पाण्यानें स्नान करण्याची पद्धति आपल्याकडे प्रचारांत आली आहे. ही पद्धति शारीरिक आरोग्याच्या दृष्टीनें जितकी घाणेरडी, तितकीच मानसिक आरोग्याच्या दृष्टीनें किंवा नैतिक दृष्टीनेंहि घाणेरडी आहे. नग्नता ही आपल्या समाजांत अश्लील, निषिद्ध आणि तिरस्करणीय समजली जाते ह्याचें कारण स्वतःचें नग्न शरीर सवस्त्र स्नान-पद्धतीमुळें पाहण्याची आपणाला सवय नसते. त्यामुळें नग्नतेच्या नुसत्या दर्शनानेंहि दृष्टीला आणि मनाला धक्का बसतो, 'ओलेती'च्या चित्राबद्दलचें पूर्वीं वादळ झालें, किंवा नग्न आणि अर्धनग्न चित्रें मासिकांत प्रसिद्ध झालीं असतां सामान्यतः सनातनी वाचकवर्गांत जी प्रतिकाराची चळवळ सुरू होते ह्याचें कारण विवस्त्र स्नानपद्धतीच्या अभावीं नग्नता ही समाजाला परिचयाची नाहीं. ही स्नानपद्धति जर समाजांत प्रचलित झाली—विशेषतः सनातनी मंडळींनीं जर ह्या पद्धतीचा अवलंब केला—तर समाजाची प्रकृति आणि नीति जास्त आरोग्यपूर्ण होईल अशी आशा करावयाला हरकत नाहीं.

* * *

## हजामत आणि सुधारणा

मागें पुण्यांतील समस्त सलूनवाल्यांची संघटना व्हावी ह्या हेतूनें एक जाहीर सभा भरलेली होती. त्या प्रसंगीं मला अध्यक्षस्थानीं नियुक्त करण्यांत आलें होतें. बरेचसे सलूनवाले माझ्या परिचयाचे असल्यानें त्यांच्या विनंतीचा मीं जर अव्हेर केला असता तर त्यांनीं माझी बिनपाण्यानें शोभा केली असती. न्हावी

ऊर्फ नाभिक जात ही शंकराच्या नाभीपासून निर्माण झाली. अर्थात् शंकराचा जो वार सोमवार त्या दिवशीं 'सलूनें' बंद करण्यांत यावींत अशासारखी थोडीशी चर्चा ह्या सभेंत झाली. न्हावी लोकांनीं आपल्या कलेंत, साहित्यांत आणि स्वच्छतेंत सुधारणा करावी याविषयींहि सभेंत एकमत झालें. तथापि प्रतिगामी समाजाची सुधारणा करणें हें न्हावी लोकांच्या हातांत आहे हा मुद्दा मीं प्रामुख्यानें त्यांच्यापुढें मांडला. न्हाव्याचें काम डोक्याचें मुंडन करण्याचें आहे का डोक्याची केशभूषा करण्याचें आहे ?

मनुष्याचें सौंदर्य त्याच्या केसांवर प्रामुख्यानें अवलंबून असतें. मनुष्याचा धर्म, त्याची अब्रू आणि त्याचें महत्त्वहि त्याच्या केसांतच सामावलेलें आहे. शेंडीच्या किंवा दाढीच्या एका केसासाठीं प्राण देणारीं माणसें समाजांत आहेत. अशा केसांचें संगोपन नि संवर्धन करण्याचें काम न्हाव्याकडे आहे. डोक्याचें मुंडन करून मनुष्याला कुरूप बनवल्याशिवाय त्याचें षड्रिपूंपासून संरक्षण होणें शक्य नाहीं, किंवा त्याची आध्यात्मिक उन्नति होणार नाहीं, ह्या आतांपर्यंत रूढ असलेल्या तत्त्वज्ञानामुळें डोक्याची हजामत करण्याची पद्धति प्रचारांत आली. न्हावी म्हणजे कुरूप बनविणारा एक इसम असा पर्यायच बनला. आणि त्यामुळें न्हावी हा एक समाजांतला तिरस्करणीय आणि निषिद्ध मनुष्य ठरला. 'न्हावी हा केस काढणारा नसून केस राखणारा आहे, तो नुसता केश-कर्तक नसून केशभूषक आहे, तो मनुष्याला कुरूप करून त्याला मोक्षाचा मार्ग दाखवणारा एक इसम नसून, त्याला सुंदर बनवून त्याचें ऐहिक जीवन सुखा-वह करणारा एक कलावंत आहे, अशा नवीन दृष्टीनें जर न्हावी लोकांकडे पाहिलें, तर समाजाच्या प्रगतीचा बराचसा वाटा त्या लोकांना उचलतां येईल. तरुण लोकांच्या जीवनांत तरतरीतपणा आणि प्रसन्नता निर्माण करण्याचें काम जसें न्हावी लोकांना करतां येईल तसें मुंडनवाल्या सनातनी वृद्धांना सुधारक बनविणें हेंहि अवघड कार्य न्हावी लोकांना करतां येईल. विधवा स्त्रियांचें वपन करण्याचें काम नाकारून पुष्कळ न्हाव्यांनीं समाजसुधारणेस अप्रत्यक्षपणें मदत केलेली आहे, तसें कोणत्याहि सनातन्याची हजामत करण्याचें गलिच्छ काम आपण करणार नाहीं असें जर न्हावी मंडळींनीं संघटितपणें ठरविलें, तर सर्व सनातनी मंडळींना नाइलाजानें डोक्यावर केस ठेवावे लागतील. आणि सुधारणेचा बाह्य गणवेष सनातनी लोकांवर जर अशा रीतीनें लादला गेला

तर त्यांच्या मानसिक सृष्टींत सुधारणा घडून आल्याशिवाय राहणार नाहीं! एवंच, समाजांतल्या सनातनी रूढीचा एक कुरूप आचार नाहींसा करून, समाजांत सुधारणा घडवून आणण्याचें काम न्हावीलोकांना करतां येण्यासारखे नाहीं काय? पण, त्या लोकांत ही संघटना पाहिजे! नाहीं तर त्यांच्यांतदेखील खुंटावर बसणारे कांहीं सनातनी न्हावी सापडावयाचे!

---

# हिंदी स्त्रियांच्या केशकर्तनासाठीं 'सलून्स' उघडा ४

गेल्या अंकीं मीं न्हाव्याबद्दलचा एक नवीन दृष्टिकोन पुढें मांडला कीं न्हावी हा निव्वळ केशकर्तक नसून केशविभूषक आहे. ह्या दृष्टीनें जर अधिक विचार केला तर न्हावी आणि स्त्री हें द्वंद्व जें आजपर्यंत अशुभ आणि अमंगल समजलें जातें तें यापुढें तसें मानलें जाणार नाहीं अशी आशा करावयाला काय हरकत आहे? केसांमुळें मनुष्य सुंदर दिसतो. केस हा डोक्याचा अलंकार आहे. हा अलंकार भादरण्यासाठीं मनुष्याला दिलेला नसून तो सुंदर तऱ्हेनें डोक्यावर बाळगण्यासाठीं दिलेला आहे. गेल्या पिढींतल्या मुंडन केलेल्या डोक्याच्या पुरुषापेक्षां, डोक्यावर केसांचा संजाब राखणारी हल्लींची पुरुषांची पिढी अधिक आकर्षक, निदान प्रेक्षणीय तरी आहे असें म्हणायला हरकत नाहीं. (अर्थात् एखादी स्त्री ह्या विषयावर जास्त अधिकारवाणीनें बोलूं शकेल हें मला माहीत आहे!) पुरुषांच्या बाबतींत जर केस हें सौंदर्याचें साधन निर्विवादपणें ठरूं शकतें, तर स्त्रीच्या बाबतींत तें किती तरी पटींनीं जास्त सौंदर्याचें भूषण ठरूं शकेल याची कोणालाहि कल्पना करतां येईल.

आधुनिक स्त्रियांना आपली केशभूषा सुंदर तऱ्हेनें करण्याची समाजानें आज कोणती सोय केलेली आहे? पूर्वींच्या पेडाच्या वेण्यांची जोंपर्यंत फॅशन (!) होती तोंपर्यंत घरांतल्या घरांत दोन स्त्रिया एकमेकींच्या साहाय्यानें आपापल्या केशभूषा करीत असत. पेडाच्या वेण्या जाऊन बुचडे आले—अंबाडे आले—मुलींना शेपटें फुटलीं! जी ती स्त्री आतां आपापली केशभूषा घरोघर करूं लागली. परंतु पाश्चात्य देशांतील स्त्रियांच्या केशभूषेच्या निरनिराळया पद्धति आणि प्रकार पाहिले तर, आपल्या देशांतील स्त्रियांचे तेच तेच ठराविक अंबाडे, बुचडे अन् शेपटें पाहून आम्हां पुरुषांच्या डोळयांना किती त्रास होतो हें स्त्रियांना कसें सांगायचें? ह्या कंटाळवाण्या ठराविकपणांत वैचित्र्य, विविधपणा, नावीन्य कधीं येणार? आणि आमच्या स्त्रियांचे केशसौंदर्य अधिकाधिक आकर्षक कधीं होणार? स्त्रियांचे केस कुरळे करण्याची, त्या केसांना लाटांच्या आकाराचीं किंवा वर्तुळाचीं वळणें देण्याचीं शास्त्रीय साहित्यें आणि उपकरणें आज उपलब्ध झालेलीं आहेत. त्यांचा उपयोग आमच्या स्त्रियांना केव्हां करतां येणार? वयोमानानें किंवा बाळंतपणामुळें स्त्रियांचें केश गळून पडतात किंवा कमी होतात; पांढरे होतात किंवा डोक्यांना कधीं कधीं टक्कल पडतें. केसांच्या ह्या व्याधींवर उत्तम तऱ्हेचीं औषधें आणि उपाय आहेत. पण त्यांची माहिती दुर्दैवानें आमच्या स्त्रियांना मिळूं शकत नाहीं. किंवा ज्या ठिकाणीं हे सर्व केशोपचार होऊं शकतील अशा तऱ्हेचीं स्त्रियांचीं 'केशभूषणालयें' आमच्याकडे अद्यापहि नाहींत! पुरुषापेक्षां स्त्रिया अधिक द्रुतगतीनें वृद्ध होतात. त्यांचें शरीर निसर्गतःच नाजुक आणि दुर्बल असतें आणि मातृत्वाच्या जबाबदारीमुळें त्यांची शारीरिक नासधूस जास्त होत असते. एवढ्यासाठीं स्त्रियांनीं आपलें सौंदर्य कृत्रिम साधनांनीं का होईना, पण तें अगदीं कसोशीनें टिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आमच्याकडच्या कित्येक प्रौढ स्त्रिया आपल्या गळलेल्या केसांचा चिमुकला अंबाडा बांधून आणि त्याच्यावर जिवाला हौस म्हणून एखादें लहानसें गुलाबाचें (खरें किंवा सोन्याचें) फूल घालून रस्त्यानें जातांना दिसतात. हें दृश्य मला तरी अत्यंत केविलवाणें दिसतें. एवढ्यासाठीं स्त्रियांचीं 'केशभूषणालयें' किंवा 'सलूनें' पुणें, मुंबई किंवा इतर शहरीं अवश्य निघावयाला पाहिजेत असें मी म्हणतों. बायकांसाठीं सलूनें उघडण्याच्या मताचा मी आहे या गोष्टीचा

सनातनी लोकांकडून विपर्यास केला जाईल ह्याची मला जाणीव आहे; आणि हा अत्रे आतां आमच्या सौभाग्यसंपन्न बायकांना न्हाव्याकडे जावयाला सांगतो असाहि त्याचा विपर्यास केला जाईल! तथापि तिकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. स्त्रियांसाठीं जर केशभूषणालयें निघालीं, तर अर्थातच न्हाव्याला 'केशभूषक' असेंच नांव मिळेल आणि त्यामुळें स्त्रियांच्या दृष्टीनें 'न्हावी' ह्या शब्दाला आलेला अमंगळ अर्थ खात्रीनें नाहींसा होईल. कोणी एखादा कल्पक केशभूषक 'न्हावी' ह्या सूचनेकडे लक्ष देईल काय?

* * *

सुप्रसिद्ध ख्रिश्चन मिशनरी डॉ. स्टॅन्ले जोन्स ह्यांचें परवां मद्रास येथें एक जाहीर व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत त्यांनीं हिंदी स्त्रियांच्या रंगीबेरंगी साड्यांची खूप स्तुति केली. साडीसारखा सुंदर पोषाक जगांत नाहीं असें ते म्हणाले. पॅरिसच्या बदलत्या फॅशनप्रमाणें हिंदी स्त्रियांनीं आपली ही साडीची पद्धति बदलूं नये अशी त्यांनीं विनंति केली. 'हिंदुस्थानच्या क्षितिजावर चमकणाऱ्या स्त्रिया ह्या तारका आहेत!' असे त्यांनीं उद्गार काढले. खरोखरच आपल्या स्त्रियांच्या चित्रविचित्र रंगांच्या साड्या आणि पातळें डोळयांना अतिशय आकर्षक आणि मनोहर वाटतात, ह्यांत शंका नाहीं. एखाद्या सार्वजनिक, राजकीय सभेच्या वेळीं जमणाऱ्या हजारों स्त्रिया एकत्र बसल्या म्हणजे तो विभाग एखाद्या इंद्रधनुष्यासारखा दिसतो. तथापि ह्या बाबतींत महाराष्ट्रीय स्त्रियांपेक्षां गुजराती आणि पार्शी स्त्रियांच्या साड्या जास्त आकर्षक आणि रंग सुंदर असतात हें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. महाराष्ट्रीय स्त्रियांमध्यें रंगीबेरंगी पातळें आणि साड्या नेसण्याची पद्धति आतां रूढ होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. तथापि लुगडीं नेसणाऱ्या स्त्रियांची संख्या देखील फारच मोठी आहे! हातमागावर तयार होणारीं सुंदर सुंदर लुगडीं आतां नाहींशीं झालीं ही देखील मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. तथापि नऊ-दहावारी लुगडीं अतिशय तलम अन् भारी असल्याशिवाय तीं चापूनचोपून नेसतां येत नाहींत. सामान्यतः मध्यमवर्गीय स्त्रिया ज्या तऱ्हेनें लुगडीं नेसतात ती तऱ्हा फारशी आकर्षक नाहीं. त्यांत ठाकठिकीऐवजीं बोंगेबाजपणाच जास्त असतो. शिवाय रोज हीं लुगडीं धुवावीं

लागत असल्यानें त्यांचा रंग नाहींसा होतो आणि तीं विटकीं होतात. आपल्याकडे घरांत नेसण्याचीं लुगडीं आणि बाहेर जाण्यासाठीं नेसण्याचीं लुगडीं ह्यांमध्यें फरक केला जात नाहीं. ह्यामुळें बहुतेक महाराष्ट्रीय स्त्रिया विटक्या किंवा उदासवाण्या रंगाचीं लुगडीं नेसून रस्त्यानें वावरतांना दिसतात. लग्नसमारंभाचे वेळीं तर ह्याच लुगड्यांवर धुरकटलेले जुनाट जरीचे शालू पांघरून स्त्रिया रस्त्यांनीं जेव्हां जातात तेव्हां, तें दृश्य करुणरसपूर्णच जास्त दिसतें. गुजराती स्त्रियांनीं ह्या बाबतींत अभिनंदनीय प्रगति केलेली आहे. काळबादेवी किंवा भुलेश्वर ह्या भागांतील स्त्रिया आपापल्या विविध रंगांच्या सुंदर साड्या नेसून वावरतांना पाहिल्या म्हणजे तें दृश्य किती नयनमनोहर दिसतें हें सांगावयाला नको. महाराष्ट्रीय महिलांनीं आपली वस्त्रभूषा अधिक सुंदर रीतीनें आणि रंगसंगतीची दृष्टि ठेवून सजविली पाहिजे. अर्थात् ह्या बाबतींत प्रौढ महिलांपेक्षां तरुण स्त्रिया आणि मुली यांच्याकडे जास्त आशेनें आम्ही पाहतों.

* * *

गेल्या आठवड्यांत स्त्रीविषयक प्रश्नावर निरनिराळ्या अधिकारी व्यक्तींनीं मतप्रदर्शन केलेलें आहे तिकडे वाचकांनीं आवश्यक लक्ष द्यावयास हवें. म्हैसूर येथें ना. श्रीनिवास शास्त्री ह्यांनीं ह्याबाबत फारच मार्मिक आणि उद्बोधक भाषण केलेलें आहे. ते म्हणतात, "आज स्त्रियांना विवाहाचें मोठेंच बंधन होऊन राहिलेलें आहे. पुरुषानें स्त्रीला आपल्या मालकीची असें म्हणण्याची कल्पना आल्यामुळें स्त्रीला स्वातंत्र्याच्या कल्पना सोडून द्याव्या लागल्या आहेत." हिंदु विवाहामुळें स्त्रीला क्वचित् प्रसंगीं जे असह्य क्लेश सोसण्याची पाळी येते त्यांतून सोडविण्यासाठीं 'घटस्फोट हवा आहे' असें त्यांचें मत आहे. त्याप्रमाणें स्त्रियांवर लग्न करण्याची जी सक्ती करण्यांत येते त्याच्या ते विरुद्ध आहेत. पुरुष जसे लग्नविरहित राहूं शकतात तसें स्त्रियांनीं राहण्यास काय हरकत आहे? संततिनियमनासहि ना. शास्त्री अनुकूल आहेत. ह्या देशांतील चतुर्थांश लोकसंख्येला पोटभर अन्न खाण्यास मिळणें अशक्य असतां उगीच प्रजोत्पादन व्हावें हें बरें नाहीं. कारण त्यामुळें स्त्रियांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतात असें त्यांचें मत आहे. मुंबईला

इलाखा महिला मंडळाच्या वार्षिक सभेच्या वेळीं देवी सरोजिनी नायडू म्हणाल्या कीं, "स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें जगाच्या संस्कृतीची निर्मिति आणि संवर्धन करण्यासाठीं सेवावृत्तीनें आणि बरोबरीच्या नात्यानें पुढें आल्या आहेत. आतां पुरुषांकडून दाक्षिण्याची स्त्रियांना अपेक्षा नसून कोणत्याहि प्रकारची मेहेरबानी नसलेल्या समानतेचा दर्जा पाहिजे." मुंबईला ट्रॅममधून आणि बसमधून जाणाऱ्या पुरुषांनीं हें वाक्य लक्षांत ठेवावें. आतां स्त्रियांना बसावयाला जागा करून देण्यासाठीं पुरुषांना आपापल्या जागा सोडून उभे राहण्याची दाक्षिण्यवृत्ति दाखविण्याचें कारण नाहीं. एखादी स्त्री जर चिडलीच तर तिला हें सरोजिनीबाईंचें सुभाषित ऐकवावें.

## स्त्रियांचें सांसारिक जीवन व समाजसेवा ५

दिल्लीच्या 'महाराष्ट्र-क्लबां'त 'सांसारिक जीवन स्त्रियांच्या ध्येयाच्या आड येतें काय?' ह्या विषयावर फारच मनोरंजक आणि उपयुक्त अशी चर्चा झाल्याचें वृत्त परवां वाचलें. 'स्त्री ही पुरुषाच्या मार्गांतील धोंड आहे काय?' असल्या केवळ रिकामपणच्या वेळीं करमणुकीखातर बोलावयाच्या विषयापेक्षां दिल्लीच्या महाराष्ट्र क्लबानें निवडलेला विषय किती तरी पटींनीं समाजाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आणि जिव्हाळयाचा आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार आज झपाट्यानें होतो आहे. दुय्यम शाळांत आणि कॉलेजांत शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या सध्यां किती तरी पटींनीं वाढली आहे! आमच्या वेळीं कॉलेजांत एखाद्या वर्गांत एखादा आडवा बाक असला तर नशीब! आज कॉलेजांतील पहिल्या वर्षाच्या वर्गांत इतक्या मुली आढळून येतात, कीं मुलांना कदाचित् आडव्या बाकावर बसावयाला सांगायची पाळी आल्यास आश्चर्य वाटावयाचें कारण नाहीं. पूर्वीं पदवीधर स्त्रियांची संख्या मोजावयाला हाताचीं बोटें पुरीं पडत असत; आतां पदवीदानसमारंभाच्या वेळीं पदव्या घेणाऱ्या पदवीधर तरुणींच्या लांबलचक रांगा पाहतां पाहतां प्रेक्षकांची मान मोडावयाची पाळी येते.

शिक्षणाच्या या वाढत्या प्रसारामुळें स्त्रीजीवनांत क्रांति घडून आलेली आहे. स्त्रियांच्या आशा आणि आकांक्षा जागृत होऊन त्या वाढूं लागलेल्या आहेत. 'चूल नि मूल' हा प्राचीन काळापासून स्त्रियांच्या कपाळावर मारला गेलेला शिक्कामोर्तब त्यांना आतां गुलामगिरीच्या निशाणीप्रमाणें मानहानिकारक वाटूं लागला आहे. स्वयंपाकघराचें आणि बाळंतघराचें क्षेत्र स्त्रियांच्या कर्तृत्वाला आणि बुद्धिमत्तेला आतां अपायकारक वाटूं लागलें आहे. ज्ञानदानाच्या, संशोधनाच्या आणि समाजसेवेच्या विस्तीर्ण क्षेत्रामधून संचार करण्यास त्यांची कल्पनाशक्ति आतां आतुर आणि उत्सुक झालेली आहे. आणि पुष्कळच सुशिक्षित स्त्रियांच्या पुढें संसारसेवा का समाजसेवा हा कूट प्रश्न सध्यां तरी उभा राहिलेला आहे. जोंपर्यंत स्त्री ही लग्नाच्या बेडीनें जखडलेली आहे आणि तिला संसाराची सक्तमजुरी सहन करावी लागत आहे, तोंपर्यंत तिला आपल्या बुद्धिमत्तेची वाढ करतां येणार कशी ? किंवा तिनें आपल्या समाजाची सेवा करावी कशी ? पाठीमागें पोराबाळांचें लेंढार लागलेलें असायचें. त्यांची निगा राखणें, दुखणींबहाणीं काढणें, एवढेंहि करून यजमानांची तब्येत राखणें, त्यांची सेवा करणें, त्याशिवाय दोन्ही वेळचा स्वयंपाक, चहापाणी करणें, खरकटीं भांडीं धुणें, केर काढणें, पोतेरें करणें इत्यादि हजार भानगडींच्या खोड्यांत जोंपर्यंत स्त्री सापडलेली आहे तोंपर्यंत, तिला आपली शारीरिक आणि बौद्धिक वाढ करतां येणें मुळीं शक्यच नाहीं ! मग तिच्याकडून आणखी समाजसेवेची अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे ? अर्थात् स्त्रियांना बुद्धि असते ही गोष्ट ज्या पुरुषांना मान्य नाहीं आणि यदाकदाचित् असली असें जर त्यांनीं गृहीत धरलें तर संध्याकाळीं देवळांत जाऊन पुराण आणि कथा ऐकणें यापलीकडे बौद्धिक वाढीचें दुसरें साधन त्यांना नको आहे. वाती वळणें ह्यापलीकडे स्त्रियांना दुसऱ्या 'हस्तव्यवसायाच्या शिक्षणा'ची ( Manual Training ) जरूरी नाहीं असेंच ज्या पुरुषांना वाटतें त्यांना अर्थातच ह्या चर्चेंत कांहीं तथ्य वाटणार नाहीं. पण स्त्रियांच्या सुदैवानें अशा विचाराचे पुरुष दिवसेंदिवस घटत चाललेले आहेत.

दिल्ली येथील ह्या विषयाच्या चर्चेंत निरनिराळया विचारिकेचे (Idealogy) मनोरंजक पडसाद उठले. एक भगिनी म्हणाल्या कीं, स्त्रियांचा सारा वेळ घरांत मुलेंबाळें आणि यजमान ह्यांच्या सेवेंत जातो. त्यामुळें बौद्धिक उन्नति

आणि समाजसेवा करण्यास त्यांना बिलकुल वेळ उरत नाहीं. म्हणून त्यांनीं पुढील युक्ति सुचविली कीं, मुलांबाळांना वसतिगृहांत ठेवावें आणि रोजचें जेवण तयार करण्याचा आणि घरकामाकडे लक्ष देण्याचा त्रास स्त्रियांना पडूं नये म्हणून तिनें नवऱ्यासह एखाद्या हॉटेलमध्यें राहावें. सदर भगिनीनें स्त्रियांच्यापुढें चितारलेलें समाजसेवेचें हें चित्र अत्यंत रम्य आहे यांत शंका नाहीं. सत्यसृष्टींत जर हें चित्र उतरवितां आलें तर समाजाच्या सुखाला पारावारच राहावयाचा नाहीं! मुलांना बोर्डिंगमध्यें ठेवावयाचें आणि स्त्रीनें हॉटेलांत राहून समाजसेवा करावयाची! ह्या पद्धतीनें स्त्रियांच्या हातून समाजसेवा चिकार होईल यांत शंका नाहीं; पण नवऱ्यानें काय करावयाचें? नोकरी करावयाची आणि बोर्डिंगाची अन् हॉटेलाचीं नुसतीं बिलें भरीत राहावयाचें? आणि तसें पाहिलें तर मुलाबाळांना ठेवण्यासारखीं वसतिगृहें कोठें आहेत? वसतिगृहांत राहून पोरें बिघडतात आणि जास्त चैनी आणि खर्चिक होतात असा हल्लींच्या पुष्कळ वसतिगृहांवर पालकांचा आक्षेप आहे. आणि नवराबायकोला सुखानें राहतां येईल अशीं हॉटेलें तरी आज किती आहेत? पतिपत्नीला लागणारा एकान्त आणि निवान्तपणा हॉटेलसारख्या सार्वजनिक जागेंत औषधालासुद्धां मिळावयाचा नाहीं. येतां-जातां हॉटेलच्या पोऱ्यानें आणि गड्यानें दार ठोठवायचें, नवीन येणाऱ्या प्रवाशानें खोलींत जिज्ञासेनें डोकावून पाहावयाचें—छेः! हॉटेलांत राहून संसारहि करतां यावयाचा नाहीं आणि समाजसेवाहि करतां यावयाची नाहीं!

ह्या चर्चेच्या वेळीं एक वक्ते म्हणाले कीं, "ज्या स्त्रियांना समाजसेवेची आवड असेल त्यांनीं संततिनियमन करावें आणि पोराबाळांच्या लेंढरापासून स्वतःची मुक्तता करून घ्यावी. समाजसेवेची हौस पुरी झाल्यावर मग पाहिजे तर संततिनियमन थांबवून मुलाबाळांचा आनंद उपभोगावा." स्त्री-पुरुषांच्या मिश्र सभेंत संततिनियमनाच्या आवश्यकतेची आणि उपयुक्ततेची चर्चा आतां निःसंकोचपणें होऊं लागलेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. ना. श्रीनिवास शास्त्री ह्यांनीं म्हैसूर येथें जें नुकतेंच भाषण केलें आहे त्यांतहि त्यांनीं संततिनियमनाची आवश्यकता निःसंदिग्धपणें प्रतिपादन केलेली आहे. केवळ समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या स्त्रियांनींच नव्हे, तर सामान्यतः प्रत्येक संसारी स्त्रीनें संततिनियमन करणें इष्ट आणि आवश्यक आहे. समाजसेवा चालू आहे

तोंपर्यंत संततिनियमन करीत राहावें ह्या मुद्द्याला दुसऱ्या एका वक्त्यानें असें उत्तर दिलें कीं, उत्तम माता होणें हीच स्त्रियांनीं करण्यासारखी समाजसेवा आहे. स्वतःच्या मुलांना सुदृढ बनविणें, त्यांच्या आरोग्याकडे आणि शिक्षणाकडे लक्ष पुरविणें, त्यांना समाजाचें उत्तम नागरिक बनविणें हीच खरी समाजसेवा आहे. ह्यापेक्षां बाहेरच्या समाजाची जाऊन निराळी सेवा करण्याची स्त्रियांना आवश्यकता नाहीं. तर एका सुवर्णमध्यवाल्या वक्त्यानें असें सांगितलें कीं, स्वतःचा संसार संभाळून राहिल्यासाहिल्या वेळांत स्त्रियांना थोडीफार समाजसेवा करतां येणें शक्य आहे. सौ. सरोजिनी नायडू, लो. टिळक वगैरे श्रेष्ठ देशसेवकांनीं स्वतःचा संसार संभाळून उत्तम प्रतीची देशसेवा केली आहे असा त्यांनीं दाखला दिला. ह्यावर अध्यक्ष सौ. मोटे ह्यांनीं जी टीका केली ती योग्यच होती. त्या म्हणाल्या, "लो. टिळक किंवा सौ. नायडू हे जरी श्रेष्ठ प्रतीचे देशसेवक असले तरी वडील आणि माता ह्या नात्यानें त्यांची किंमत ठरवतांना निराळीच कसोटी लावावी लागेल. लो. टिळक हे आपल्या चिरंजिवांना अधूनमधून शिकवीत असत किंवा त्यांनीं त्यांच्यासाठीं शिक्षणाची आणि उपजीविकेची उत्तम सोय करून ठेवली हें जरी मान्य केलें, तरी टिळक हे आदर्श पिता होते असें निःशंकपणें म्हणतां यावयाचें नाहीं. सौ. सरोजिनीदेवी ह्यांनींहि आपल्या मुलांमुलींकडे योग्य लक्ष पुरवलें असें म्हणण्यास फारसा पुरावा नाहीं.

स्त्रियांपासून कोणत्या प्रकारच्या समाजसेवेची आपण अपेक्षा करतों ह्या एकाच गोष्टीवर ह्या वादाचा निर्णय लागेल. सामान्यत्वें पाहतां स्त्रियांना लग्न करूनहि शिक्षकाची वृत्ति पत्करतां येणें शक्य आहे. गाणें, नृत्य, चित्रकला, शिवणकाम, कशिदाकाम इत्यादि कलांचें शिक्षण त्यांना देतां येईल. त्याशिवाय आरोग्य, गृहशास्त्र ह्या विषयांच्या अध्यापनाचें व साक्षरताप्रसाराचें कामहि त्यांना फावल्या वेळीं करतां येईल. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय चळवळींत स्वयंसेविकांचें किंवा प्रचारकांचें काम करण्यास त्यांना अडचण पडूं नये. तथापि, श्रेष्ठ प्रतीचें सामाजिक वा बौद्धिक कार्य जर त्यांना करावयाचें असेल, तर त्यांना वैवाहिक मोहपाशांचा त्यागच करावयाला पाहिजे—(त्यांनाच काय पण पुरुषांनाहि तसेंच करावयाला पाहिजे) हा अध्यक्षांचा निष्कर्ष चिंतनीय असला तरी तो सर्वांनाच मान्य न होणारा नाहीं. समाजा-

साठीं वैवाहिक मोहपाशाचा त्याग करणें हें ध्येय म्हणून उत्तमच आहे ह्यांत शंका नाहीं; पण हें ध्येय स्त्रियांना सध्यांच्या परिस्थितींत साध्य होण्यासारखें आहे काय? समाजसेवेसाठीं आजन्म अविवाहित राहण्याच्या घोर प्रतिज्ञा करून शेवटीं विवाह होत नाहीं म्हणून निःश्वास टाकणाऱ्या कळयांच्या करुणकथा श्री. विभावरी शिरूरकर ह्यांनीं पूर्वींच सांगितलेल्या आहेत त्यांकडे दुर्लक्ष करण्याइतकी समाजाची आजची परिस्थिति निवळलेली आहे असे वाटत नाहीं!

---

# अरेरे ! भोपटकर क्रिकेट का खेळत नाहींत ? ६

रणजी ट्रॉफी अखेर महाराष्ट्रानें जिंकली ! क्रिकेटमधील महाराष्ट्राच्या कौशल्याची परिसीमा झाली ! आजपर्यंत क्रिकेटच्या क्षेत्रांत महाराष्ट्रानें कमावलेल्या लौकिकाचें सार्थक झालें ! महाराष्ट्रानें मिळविलेल्या ह्या विजयाच्या दुंदुभि आतां महाराष्ट्रभर दुमदुमल्यावांचून राहणार नाहींत. पुण्यामध्यें गेला आठवडाभर मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत, पोरापासून पेन्शनरापर्यंत, ताज्या तरुणापासून तों थकलेल्या थोरापर्यंत, कारकुनापासून तों कलेक्टरापर्यंत, पान-पट्टीवाल्यापासून तों प्राध्यापकापर्यंत—सर्व वयाच्या, सर्व दर्जाच्या—आणि सर्व धंद्यांच्या मंडळींना रणजी ट्रॉफीच्या सामन्यावांचून दुसरें कांहीं सुचत नव्हतें, कीं रुचत नव्हतें ! रमत नव्हते, कीं गमत नव्हतें ! शाळा सकाळच्या झाल्या होत्या, कचेऱ्या सकाळच्या झाल्या होत्या, तथापि मुलांचें आणि मास्तरांचें अभ्यासाकडे लक्ष नव्हतें; कारकुनांचें आणि अधिकाऱ्यांचें कामा-कडे लक्ष नव्हतें. शाळेची घंटा वाजते केव्हां—घड्याळाचा कांटा अकरावर

येतो केव्हां आणि कसेंबसें जेवण उरकून क्रीडांगणावर आपण जातों केव्हां ह्यासाठीं जो तो उतावीळ झाला होता. क्रीडांगणावर जाण्याचे श्रम ज्यांना घेण्याची इच्छा नव्हती किंवा त्यासाठीं पैसे खर्च करण्याचें ज्यांना सामर्थ्य नव्हतें ते ते लोक, तीं तीं मुलें, रस्त्याच्या कोपऱ्याकोपऱ्यावर जमाव करून हॉटेलामधून–सलूनमधून ठेवलेल्या 'आकाशवाणी'तील बॉबी तल्यारखानाची मनोरंजक, चटकदार आणि प्रक्षोभक मल्लीनाथी ऐकत उभीं होतीं. एकंदर गेला सबंध आठवडा पुण्यांत– आणि महाराष्ट्रांत क्रिकेटचा उरूसच भरला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. क्रिकेट हा असा एकच खेळ आहे, कीं जो सबंध महाराष्ट्राला वेड लावूं शकतो, जो महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या भावना हलवूं शकतो; पक्ष, भेद, जाति, वैर ह्यांची जाणीव नाहींशी करून जो सबंध महाराष्ट्राला प्रेमाच्या आणि ऐक्याच्या भूमिकेवर आणूं शकतो.

क्रिकेट हा तरुणांचा खेळ आहे. क्रिकेट म्हणजे तारुण्य! क्रिकेट म्हणजे चैतन्य! क्रिकेट म्हणजे अनावर उत्साह! तरुण लोक क्रिकेट खेळतात असें म्हणण्यापेक्षां क्रिकेट खेळणारे लोक तरुण असतात. जोंपर्यंत ते क्रिकेट खेळतात तोंपर्यंत ते तरुण राहतात—मग वयानें त्यांची चाळिशी उलटलेली असो वा साठी लोटलेली असो. क्रिकेटच्या खेळापुढें काळाची किंमत नाहीं कीं वयाची मिजास नाहीं! केस पिकलेले असोत–डोक्याला टक्कल पडलेलें असो किंवा तोंडाला सुरकुत्या पडलेल्या असोत–क्रिकेटचें नांव काढलें, कीं त्या केसांवर कलप चढतो, टकलावर रोमांच उभे राहतात आणि सुरकुत्यांवर इस्त्री बसते! प्रो. देवधरांची पन्नाशी उलटली ह्याची कोण परवा करतो? त्यांनीं दातांची कवळी बसवलेली आहे याला कोण भीक घालतो? प्रो. देवधर भुई-सरपट जोरदार टोले कसे मारतात, धावांची संख्या भराभर कशी चढवीत नेतात, चेंडूफेक कशी हिकमतीनें करतात, सर्व खेळाडूंचें सहकार्य यशस्वी तऱ्हेनें कसें साधतात इकडे लोकांचें लक्ष असतें. प्रो. देवधर हे जोंपर्यंत क्रिकेट खेळतात तोंपर्यंत ते तरुण आहेत—ते सेवानिवृत्त केव्हां होतील असा प्रश्न विचारणारा माणूस म्हातारा किंवा क्रिकेटचा खेळ न जाणणारा एखादा घर-कोंबडा असावा! म्हणून ज्याला आपल्या तारुण्याचें संगोपन करावयाचें असेल त्यानें क्रिकेटचा खेळ खेळावा—किंवा निदान क्रिकेटचे सामने तरी पाहावे. बालगंधर्व जर आपल्या तरुणपणीं क्रिकेट खेळले असते, तर 'मी म्हातारा

झालों!' असें त्यांच्या तोंडून उद्गार कधीं निघाले नसते. क्रिकेट हें तारुण्याचें थर्मामीटर आहे! ज्याला क्रिकेटचा सामना पाहावयास जाण्याची इच्छा नाहीं, निदान 'आकाशवाणी'तून सामन्याचें रोमहर्षक वर्णन ऐकण्यासाठीं ज्याला आतुरता वाटत नाहीं, क्रिकेटच्या खेळाचें वर्णन निदान दुसऱ्या दिवशीं सकाळीं वर्तमानपत्रांत वाचण्याचेंहि जो विसरतो, तो मनुष्य म्हातारा झाला असें खुशाल समजावें!

तारुण्याचें संशोधन करण्याच्या कामीं क्रिकेट जसें अमोघ साधन आहे, तसें तरुणांच्या अंगांत राष्ट्रीय सद्गुण निर्माण करण्याचेंहि त्या खेळांत सामर्थ्य आहे. आज तरुणांच्या अंगांत कोणते गुण निर्माण व्हावेत असें आपणांला वाटतें? उद्यांच्या राष्ट्राचें नेतृत्व स्वीकारण्याची जबाबदारी आजच्या तरुणांवर आहे. राष्ट्राला उत्तम अनुयायी जसे हवे असतात तसे उत्तम नेतेहि हवे आहेत. आजच्या शिक्षणसंस्थांमधून हें नेतृत्वाचें शिक्षण मिळूं शकत नाहीं. स्वतंत्र बुद्धि, धडाडी, धाडस, प्रसंगावधान, लोकसंग्रहात्मकता, दुर्दम्य आशावाद इत्यादि गुणांची उत्तम नेतृत्वाला आवश्यकता आहे. हे गुण रोज अकरा ते पांचपर्यंत चालणाऱ्या शिक्षणक्रमांत निर्माण होऊं शकत नाहींत. नेतृत्वाखेरीज खेळाडूपणा, सहकार्य, शिस्तपालन आणि चिकाटी ह्याहि गुणांची आजच्या तरुणांना आवश्यकता आहे. हे सर्व गुण निर्माण करण्याचा एक कारखाना म्हणजे क्रिकेटचें क्रीडांगण! आज राष्ट्रामध्यें हजारों पंथ, पक्ष, जाति यांचा सुळसुळाट झालेला आहे. माऱ्यामाऱ्या, भांडणें आणि तंटे यांचें चोहींकडे पीक आलेलें आहे. दुसऱ्याची बाजू काय आहे हें समजावून घेण्याची कोणाचीहि तयारी नाहीं. दुसऱ्याच्या समाधानानें आणि सोयीनें वागण्यास कोणीहि कबूल नाहीं. एका ध्येयासाठीं, सर्वांच्या सुखासाठीं, सर्वांच्या कल्याणासाठीं वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची कोणाचीहि प्रवृत्ति नाहीं—द्वेष आणि तिरस्कार ह्यांनीं वातावरण धुंदकारलेलें आणि कोंदटलेलें आहे. खेळाडूपणा, मनमोकळेपणा, आनंदीपणा ह्यांचा राजकीय वा सामाजिक जीवनांत मागमूसहि दिसेनासा झाला आहे! ह्या सर्वांवर एकच रामबाण उपाय म्हणजे क्रिकेट! निरनिराळ्या राजकीय विचारांचे प्रणेते जर दर महिन्याला आपल्या विरोधी पक्षांशीं क्रिकेटचा सामना खेळत जातील तर त्यांच्यामधील विरोध आणि गैरसमज केव्हांच वितळून जातील! सावरकर,

आंबेडकर आणि जिना हे जर क्रिकेट खेळूं लागतील, तर त्यांच्या विचारांतील निराशाजनक एकांतिकपणा औषधाला देखील राहावयाचा नाहीं. जो क्रिकेट खेळतो तो हिंदुस्थानांत हिंदूंचें साम्राज्य स्थापलें पाहिजे अशी भाषा कधींहि काढावयाचा नाहीं ! जो क्रिकेटचा वेडा आहे तो मी धर्मांतर करणार अशा कधींहि वल्गना करणार नाहीं—आणि जो क्रिकेटचा नादी आहे तो हिंदुस्थानचें मी पाकिस्तान करणार असले दुर्विचार मनांत कधींहि बाळगणार नाहीं ! स्वतःच्या धर्माच्या दृष्टीनें किंवा स्वतःच्या जातीच्या हितानें विचार करण्याची जी अनिष्ट प्रथा देशांत उत्पन्न झाली आहे ती क्रिकेटच्या खेळाशिवाय नाहींशी व्हावयाची नाहीं.

क्रिकेटच्या खेळामध्यें जर राष्ट्रांतील सर्व जातींच्या, धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांत व्यापक ऐक्य निर्माण करण्याचें सामर्थ्य आहे, तर जातीय सामने खेळून क्रिकेटच्या खेळांतील मौलिक सामर्थ्याचा नाश करावा का ? असा साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो. आजपर्यंत हिंदु, मुसलमान, पार्शी किंवा इतर अशा धार्मिक दृष्टीनें पाडलेल्या गटांमध्यें चौरंगी किंवा पंचरंगी सामने खेळले जात असत. अशा तऱ्हेचे सामने खेळणें ही वास्तविक क्रिकेटची नालस्ती होय. खेळाडूपणाच्या उच्च पातळीवर जात आणि धर्म ह्यांचें जोखड घेऊन जाणें खेळाला आणि खेळणारालाहि हानिकारक आहे. रणजी ट्रॉफीसाठीं झालेले सामने आतां इतके यशस्वी झाले आहेत, कीं जातीय सामन्यांऐवजीं प्रांतिक सामने व्हावयाला पाहिजेत अशा तऱ्हेची मागणी चोहोंकडून होऊं लागली आहे, आणि ती योग्यच आहे ह्यांत संशय नाहीं. ह्या मागणीचा पुरस्कार मि. तल्यारखान ह्यांनीं जोरानें केलेला आहे. प्रांतिक सामन्यांत सर्व धर्मांचे आणि सर्व जातींचे खेळाडू खांद्याला खांदा लावून, खेळीमेळीनें एकमेकांबरोबर सहकार्य करावयाला शिकतात. हॅरिस असें म्हणत नाहीं, कीं मी देवधरांच्या बरोबर कसें खेळूं ? हजारे तक्रार करीत नाहीं, कीं मी सोहोनीबरोबर येणार नाहीं ! एका ठिकाणीं खेळलेले हे खेळाडू पुढें सामाजिक आणि राजकीय आयुष्यांत एकमेकांचे शत्रु होतील ही कल्पनाच करणें अशक्य आहे. म्हणून, कॉंग्रेसनें राष्ट्रापुढें आज जें ध्येय ठेवलेलें आहें तें साध्य व्हावें म्हणून प्रांतिक सामनेच ह्यापुढें व्हावयास पाहिजेत !

माझे ज्येष्ठ मित्र दे. भ. अण्णासाहेब भोपटकर हे पट्टीचे खेळाडू आणि

व्यायामप्रेमी आहेत. त्यांना कुस्ती येते, मल्लखांब येतो, ते जोर काढतात, जोडी फिरवतात— पण ते लहानपणीं क्रिकेट खेळले असावेत कीं नाहीं ह्याबद्दल मला शंका वाटते. ते जर क्रिकेट खेळले असते तर त्यांच्या भाषणांत अलीकडे दिसून येणारी घमेंड आणि दमदाटी कधींहि दिसली नसती. परवां सोलापूर येथें अण्णासाहेब जे बोलले—किंवा बडबडले, तें कोणताहि खेळाडू माणूस बोलला नसता! शब्दांच्या वायफट गोलंदाजीपेक्षां अण्णासाहेबांजवळ आतां कांहीं उरलें नाहीं हें स्पष्ट दिसतें. अण्णासाहेब काय म्हणाले, कीं, 'आमच्या पूर्वजांनीं दिल्लीचें तख्त फोडलें— तसें आम्ही लिन्‌लिथगोचें तख्त फोडूं!' आम्हांला अण्णासाहेबांना नम्रपणें विचारावयाचें आहे, कीं लिन्‌लिथगोचें तख्त फोडावयाचें म्हणजे काय सोडा-वॉटरची बाटली फोडावयाची आहे? अण्णासाहेब म्हणतात, आम्हांला वेस्ट मिन्स्टरवर राज्य करावयाचें! वेस्ट मिन्स्टरवर राज्य करावयाचें म्हणजे काय सदाशिव पेठेच्या हौदावर बसून मिशांना पोकळ पीळ चढवायचा! गल्लीच्या कोपऱ्यावर उभें राहून पहिलवान ज्याप्रमाणें उगाच दमदाटी करीत असतात तसला प्रकार अण्णासाहेबांनीं सुरू केलेला आहे!

शेवटीं तर अण्णासाहेबांनीं कहरच केला! कॉंग्रेसचें राजकारण म्हणे 'कासोटा-फेडू' राजकारण आहे—(सनातनी बंधूंनो, श्रीलमार्तंडांनो, आणि कृष्णराव मराठ्यांनो, ऐकलेंत अण्णासाहेबांचें हें मुक्ताफळ!) खरोखर, अण्णासाहेब जर क्रिकेट खेळले असते तर ही कासोटा फेडण्याची गलिच्छ भाषा त्यांच्या तोंडून कदापि निघाली नसती!

# महाराष्ट्रांतील नादी माणसें ७

परवां सहज मला कुणी तरी एका गृहस्थाच्या नादिष्टपणाची गोष्ट सांगितली. सदर गृहस्थ नेहमीं हातांत 'पॅायशा'चा पंप घेऊन फिरत असतो. सबंध जग दूषित जंतूंनीं आणि कृमींनीं भरलेलें आहे असा त्याला भ्रम झालेला आहे. कोणी त्याला जेवावयाला बोलावलें कीं, तो जेवण्याच्या जागीं पॅायशा मारतो आणि मग पाटावर बसतो. नाटकगृहांत किंवा उपाहारगृहांत गेला कीं, तो 'पॅायशा'ची पिचकारी मारल्याशिवाय खुर्चीवर बसत नाहीं. दुकानांतून नवीन सामान आणलें तरी त्यावर पॅायशाचा संस्कार केल्याशिवाय तो त्याचा उपयोग करीत नाहीं. जवळजवळ त्यानें आपलें आयुष्य 'पॅायशा'मय केलेलें आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. माझ्या माहितीचे एक सहस्रबुद्धे नांवाचे बी. एस्सी. झालेले गृहस्थ होते. त्यांचें शास्त्रीय ज्ञान अतिरेकाला गेलें होतें. त्यांना देखील खाद्य पदार्थांत बृहद्दर्शक भिंगाच्या साहाय्यावांचून नानातऱ्हेचे जीवाणू (bacteria) वळवळ करीत असतांना दिसत असत, त्यामुळें अमुक एक पदार्थ खाल्ल्यानंतर विशिष्ट प्रकारचे जीवाणू जास्त प्रमाणांत पोटांत गेले असें त्यांना वाटलें तर, त्या जीवाणूंवर प्रतिक्रिया करण्यासाठीं दुसऱ्या प्रकारचे जीवाणू

पोटांत पाठवलेच पाहिजेत अशा भावनेनें, ते आणखी दुसरे खाद्यपदार्थ खात असत. मनुष्याच्या पोटांत युरोपच्या महायुद्धापेक्षांहि जीवाणूंचें भयंकर युद्ध चाललेलें आहे असें तें भयंकर चेहरा करून सांगत. पुढें ह्या गृहस्थांचें काय झालें हें मला माहीत नाहीं. पण बहुतेक ते एखाद्या जीवाणूला बळी पडले असावेत. बाजारांतून आणलेल्या जिनसा धुऊन घेतल्याच पाहिजेत ह्या नादाच्या अतिरेकानें तूप, तेल, साखर इत्यादि जिन्नस धूत बसलेल्या छांदिष्ट माणसाची गोष्ट सुप्रसिद्धच आहे.

सुप्रसिद्ध आंग्ल पंडित डॉ. जॉन्सन् ह्याला रस्त्यानें खांबांना हात लावीत जाण्याचा नाद होता ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. रस्त्यानें जातां जातां घराचे नंबर मोठ्यानें वाचीत जाणारा एक इसम मीं पाहिला आहे. मागें पुण्यांत बहुतेक दुकानांच्या फळयांवर आणि भिंतींवर 'ये भी दिन जाएंगे!' हें सुभाषितवजा वाक्य मोठमोठ्या अक्षरांनीं लिहिणारा कोणी तरी एक प्रेम-विव्हळ मज्नूं येऊन गेला होता. प्रत्येक पावलागणिक तोंडानें 'रॅऽऽम' अशा उच्चारानें रामनामाचा जप करणारा एक सुप्रसिद्ध रामभक्त पुण्यांत होऊन गेल्याचें कित्येकांच्या स्मरणांत असेल. माझ्या माहितीचे रेव्हिन्यू खात्यांतील एक कारकून होते. ते पराकोटीचे गणपतिभक्त होते. हायकोर्ट प्लीडरचे परीक्षेस बसण्याचा त्यांना नाद होता. (पूर्वींच्या काळीं हा नाद पुष्कळांना असे!) सदर कारकून परीक्षेच्या पेपरांत 'गणपति' ह्या अक्षरांखेरीज कांहींच लिहीत नसे. शेंकडा दहांपेक्षां कमी मार्क मिळणाऱ्याला आतां परीक्षाबंदी होते. पण हा नियम त्या वेळीं नव्हता. त्यामुळें परीक्षकांचा आणि गणपतीचा त्यांनीं कायमची परीक्षाबंदी होईपर्यंत अंत पाहिला!

पुष्कळांना बहुधा प्रकृतीचा 'नाद' विशेष असतो. पेन्शनर लोकांना हवा आणि प्रकृति हे चिंतेचे निरंतर विषयच आहेत. हवेमधें नेहमीं फरक हे होत असणारच! कारण बोलूनचालून हवाच ती! तथापि हवा विशेष चमत्कारिक झाल्याशिवाय तुमच्या-आमच्यासारख्या माणसांचें तिकडे लक्ष जात नाहीं; पण हवा एकसारखी बिघडत चाललेली आहे याच नादानें पुष्कळ वृद्धांना पछाडलेलें असतें. (आणि समाजाची नीति बिघडत चाललेली आहे—पोरांनीं आणि पोरींनीं तर ताळ सोडला आहे हाहि त्यांचा एक नाद असतोच!) "काय गणपतराव, आज हवा जरा चमत्कारिक आहे!" असें एक पेन्शनर

दुसऱ्या पेन्शनराला म्हणाला नाहीं असा क्वचितच एखादा दिवस जात असेल. प्रकृतीबद्दलदेखील तोच नाद! 'आज पोटांत कांहीं तरी होतं आहे!' ह्या बाधेनें पुष्कळ म्हाताऱ्यांना पछाडलेलें असतें, परवां मला एक मित्र भेटले. त्यांना 'लिंबा'चा नाद लागला आहे. पुरंदर किल्ल्यावर आम्ही गेलों होतों. गड चढतांना पुष्कळांची धांदल उडाली. साहजिकच शरीराचें वजन कमी करण्याबद्दल गप्पा निघाल्या, तेव्हां सदर मित्रानें 'रोज सकाळीं कागदी लिंबू घेत जावें!' म्हणून सांगितलें. प्रथमतः त्यांच्या ह्या उपदेशाचें कांहीं वाटलें नाहीं; तथापि पुढें सबंध दिवसभर प्रत्येक व्याधीवर 'कागदी लिंबू' हा एकच रामबाण उपाय आहे असें सांगण्याचा जेव्हां ज्यांनीं सपाटा लावला तेव्हां त्यांच्या नादाचें स्वरूप लक्षांत आलें!

सदर मित्रांना जसा लिंबाचा नाद आहे तसा महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध डॉक्टर कै. वामन बाजी रुईकर ह्यांना मिठाचा नाद लागला होता. पोटांत दुखतें—मीठ! कपाळ दुखतें—मीठ! अंग खाजतें–मीठ!! ठेच लागली—मीठ! कांहीं झालें तरी मीठ! शेवटीं सदर डॉक्टरांनीं संन्यास घेतला व 'लवणानंद' हें नांव धारण केलें आणि मरणानंतर स्वतःला मिठांत पुरून घेतलें! पुण्याचे किनरे ह्यांना एनिमाचा नाद लागला आहे. आजपर्यंत त्यांनीं एनिमावर शेंकडोंशें लेख लिहिले असतील. त्यांच्याकडे जो जाईल त्याला ते एनिमाचा दिव्य संदेश देत असतात! मानवी सुखाच्या अभिवृद्धयर्थ परमेश्वरानें एनिमाचें भांडें हें पृथ्वीतलावर पाठवलें आहे अशी त्यांची समजूत आहे. प्रवासाला जातांना 'थर्मास'पेक्षां 'एनिमा' घेऊन जाण्याची जास्त जरूरी आहे असें ते प्रतिपादितात. अलीकडे डॉ. भागवत नांवाचे गृहस्थ 'पूर्णान्ना'चा संदेश देत हिंडत असतात. कोठलाहि खाद्य पदार्थ न सोलतां, न कापतां, न कुटतां, किंवा न दळतां आहे त्या नैसर्गिक स्थितींत एकत्र शिजवून खाल्ला म्हणजे प्रकृति चिरेबंदी होते असे हे 'पूर्णान्न' भागवत सांगत असतात.

केडगांवचे नारायणमहाराज आणि चौंडेमहाराज ह्यांना 'सत्यनारायण' करण्याचा नाद लागला आहे! सेनापति बापट ह्यांना शहरसफाईचा नाद लागला आहे! देशदास रानडे ह्यांना उपासाचा नाद लागला आहे! संबंध असो अगर नसो–प्रत्येक सभेंत जाऊन आगंतुकपणें बोलण्याचा नाद पुण्याच्या न. का. ना लागलेला आहे! समाजशास्त्री गो. म. जोशी ह्यांना आंग्ल ग्रंथ-

कारांचीं भरमसाट अवतरणें लेखांत आणि भाषणांत घुसडून देण्याचा नाद लागलेला आहे आणि आमचे कृष्णराव मराठे यांना अश्लीलतासंशोधनाचा आणि संस्कृतिसंरक्षणाचा नाद लागलेला आहे. मराठी वाङ्मयांत निर्माण होणारें प्रत्येक अश्लील वाक्य नि शब्द वह्यांत टिपून ठेवण्यांत कृष्णराव जागरूक असतात. त्यांच्या घरांतल्या कपाटांत महाराष्ट्रांतील सर्व अश्लील वाङ्मयाचा साठा भरलेला असावा. कृष्णरावांचा खाजगी वेळ किती मौजेंत जात असावा ह्या कल्पनेनें कोणालाहि त्यांचा हेवा वाटण्यासारखा आहे. भालाकर भोपटकर ह्यांना शिऱ्याचा आणि नवीन शब्द बनविण्याचा नाद लागलेला आहे, तर त्यांचे बंधु दे. भ. अण्णासाहेब ह्यांना अलीकडे लिनूलिथगोचें तख्त फोडण्याचा नाद लागलेला आहे! बर्फाच्या दुकानांत बर्फाचा मोठा खडा दुकानदार जसा आवेशानें फोडीत असतो तसें अण्णासाहेब एक दिवस दिल्लीला जाऊन लिनूलिथगोचें तख्त लाठीनें फोडून शतखंड करणार असें चित्र माझ्या कल्पनेला दिसूं लागलेलें आहे. सावरकरांचें हिंदुस्थानचें आणि जिनांचें पाकिस्तानचें वेड ह्यापैकींच आहे! सावरकरांचें भाषण ऐकल्यानंतर सबंध हिंदुस्थानांत शेंड्यांचें दंडकारण्य माजलेलें आहे असा देखावा दिसतो; तर जनाब जिनांचा फतवा वाचल्यानंतर साऱ्या देशांत उसाच्या शेतांत दिसून येणाऱ्या पांढऱ्या तुऱ्यांप्रमाणें दाढ्या फडफडत आहेत असें चित्र दिसूं लागतें.

प्रत्येक माणसाला कमीजास्त प्रमाणांत कसला ना कसला तरी नाद हा असतोच—आणि तो असलाच पाहिजे! नादामधून शोध लागतात आणि जगाची प्रगति होते. तथापि नाद असला तरी नादिष्टपणा नसावा! छंद असावा पण छांदिष्टपणा नसावा! नादिष्टपणा आणि छांदिष्टपणा हीं मनाच्या, बुद्धीच्या आणि शरीराच्या प्रतिगामित्वाचीं लक्षणें आहेत. ग्रामोफोनच्या तबकडींत चिरा पडला म्हणजे सुई तेथेंच अडकून राहते आणि गाण्याचें तेंच तेंच कडवें पुनरावृत्त होतें. तसा बुद्धीच्या तबकडींत चिरा पडला, कीं छांदिष्टणाची कंटाळवाणी बडबड सुरू होते. पॉयशाचें वेड, ऐनिमाचा नाद, अश्लीलतासंशोधनाचा छंद एथपासून तों लिनूलिथगोचें तख्त फोडण्याची घोषणा किंवा भारतवर्षाचें हिंदुस्थान पाकिस्तान करण्याच्या गर्जना– ह्या डोक्यांत कोठें तरी चिरा पडल्याच्या द्योतक आहेत, दुसरें काय!

---

# महाराष्ट्राला बागवान पाहिजेत ८

पुण्यामध्यें जीं जीं कांहीं मनोहर आणि रम्य स्थळें आहेत त्यांत खडकीचें 'वनस्पति-उद्यान' (Botanical Gardens) अत्यंत रमणीय आहे. तथापि पुण्यापासून चार-पांच मैलांवर असें सुंदर उद्यान आहे हें पुण्यांतल्या किती लोकांना ठाऊक असेल? गर्द-गार झाडी, द्राक्षांचे मळे, घनदाट आंबराई, वनविहारासाठीं छायाशील प्रशस्त जागा, आणि बागेच्या मागून वाहणारी आणि पाण्यानें सदैव भरलेली नदी, असें ह्या बागेचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. शनिवारीं आणि रविवारीं वनविहारासाठीं आणि जलविहारासाठीं (म्हणजे प्राकृत भाषेंत पोहण्यासाठीं) पुण्यांतील पुष्कळ पार्शी, ख्रिस्ती आणि युरोपिअन मंडळी येथें येत असतात. हिंदु कुटुंबांतले लोक आणि शाळेंतलीं मुलें अलीकडे अलीकडे या बागेंत यावयाला लागलीं आहेत. आठवड्यांतून एखादा दिवस शहराच्या कंटाळवाण्या रहादारीपासून दूर एखाद्या सुंदर निवान्त स्थळीं जावें आणि मनाची रिझवणूक करून घ्यावी अशी इच्छा किती थोड्या लोकांना होत असते! पुण्याच्या परिसरांत किती तरी सौंदर्यस्थळें (Beauty Spots) आहेत. त्यांची माहिती करून

घेण्याचा प्रयत्न केला आहे कोणी? आणि त्याची आवश्यकता वाटते आहे कोणाला? गांवांतल्या गांवांत रस्त्यांतून आणि बोळांतून विनाकारण गर्दी करून एकमेकांना धक्के देत हिंडणें, हाच पुणेकरांचा जास्तींत जास्त व्यायाम झाला आहे! नाहीं तर नव्या पुलाच्या भिंतीवर रोज संध्याकाळीं बसून चणेमुरमुरे आणि काकडया खाणें म्हणजे अगदीं जिवाची मुंबई केल्यासारखें पुणेकरांना वाटतें! पुण्यांतील साहित्यिकांचीं वार्षिक संमेलनें अलीकडे नैसर्गिक सौंदर्यानें नटलेल्या मोकळया जागेंत भरूं लागलेलीं आहेत. ह्या उपक्रमाची सुरुवात खडकीच्या 'वनस्पति-उद्याना'पासूनच झाली. चार भिंतींच्या आंत एखाद्या कोंदट आणि अंधाऱ्या खोलींत बसून फुलांवर, झाडांवर आणि पाखरांवर काव्य करणाऱ्या कवींनीं जेव्हां खरोखरीचाच सुंदर बाग पाहिला तेव्हां काव्य लिहिण्याच्या आधीं काव्य जगण्याचें महत्त्व त्यांना पटून आलें.

खडकीच्या वनस्पति-उद्यानांत सुंदर वनस्पति आहेत, सुंदर झाडें आहेत, सुंदर फुलें आहेत नि सुंदर मुलें पण आहेत. आजपर्यंत मी ह्या ठिकाणीं किती तरी वेळां गेलों आहे आणि तेथील सौंदर्याचा आस्वाद पण घेतला आहे. तथापि ह्या बागेंत एक सुंदर संस्था आहे ह्याची मला आजपर्यंत माहिती नव्हती. तो शोध मला परवां लागला. ह्या बागेंत फुलांचें आणि फळांचें शास्त्र मुलांना शिकविणारी एक शाळा आहे! बागबगीचा कसा करावा ह्याची सांगोपांग माहिती देऊन उत्तम बागवान तयार करण्याचें काम ह्या शाळेंत होत असतें. त्याशिवाय फळांचे मोरंबे आणि पाक तयार कसे करावेत, मधु-संचय कसा करावा ह्याचेंहि शिक्षण ह्या ठिकाणीं दिलें जातें. इतकें गोड आणि सुंदर काम करणारी एक संस्था त्या बागेंत आहे ह्याची मला कल्पना नव्हती. हिंदुस्थानच्या अत्यंत दूरदूरच्या विभागांतून आणि संस्थानांतून आलेले सत्तर-ऐंशी विद्यार्थी ह्या शाळेंत शिक्षण घेत आहेत. ह्या मुलांनीं आपल्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं मला अध्यक्ष म्हणून पकडून नेलें आणि म्हणूनच मला ह्या संस्थेचा शोध लागला. त्या मुलांना वाटलें, कीं मुलांच्या शाळेंतला हा शिक्षक फुलांच्या शाळेंत देखील चालूं शकेल! फुलांफळांवर कविता करणारा हा वेडा कवि फुलांफळांच्या शास्त्रावर देखील बोलूं शकेल!

कवि या नात्यानें मीं फुलांवर पुष्कळच कविता केल्या आहेत. (आतां याबद्दल मला पश्चात्ताप होतो आहे!) फळांवर कविता केल्या जात नाहींत! 'उमलणारा गुलाब' या विषयावर कविता करण्याची प्रथा आहे, पण 'पाडाला आलेला आंबा' किंवा 'आंबरस ओरपतांना' अशा मथळ्याची कविता कोणीं वाचली आहे का? कां कोण जाणे, फळावर कविता करण्याचा संकेतच वाङ्मयांत नाहीं! 'तूं कर्म म्हणजे कविता करीत जा—फळाची आशा धरूं नकोस!' असें भगवंतांनीं जे उद्गार काढलेले आहेत ते कवि लोकांना उद्देशून काढले आहेत कीं काय कोणास ठाऊक! कानांला गोड लागणाऱ्या मंजुळ गाण्यावर किंवा सुरावर काव्य होऊं शकतें, हाताला मृदुमृदुल होणाऱ्या स्पर्शावर आणि त्या स्पर्शानें सर्वांगावर उठणाऱ्या रोमांचांवर काव्य होऊं शकतें. नाकाला प्रतीत होणाऱ्या सुगंधावर काव्य केलें जातें. ओठांना होणारा गोड गोड स्पर्श आणि मिळणारा अमृतानुभव हाहि काव्यविषय होऊं शकतो; तथापि नानातऱ्हेच्या रसांची आणि रुचींची प्रचीति देणारी जीभ ही कांहीं काव्याचा विषय होऊं शकत नाहीं! म्हणून त्या शाळेंतल्या फळांच्या शास्त्रावर काव्यमय असें मला बोलतां येण्यासारखें कांहींच नव्हतें आणि फुलांवर तरी काव्यापलीकडे आपल्याला काय करतां येण्यासारखें आहे? आपल्या आयुष्यांत फुलांचा संबंध येतो कुठें? देवाला वाहण्यासाठीं आणि साहेबाच्या गळ्यांत हार घालण्यासाठींच फक्त आपल्याला फुलांची जरूरी वाटते. केवळ स्वतःच्या विलासासाठीं फुलें विकत घेऊन त्यांच्या सुगंधाचा मनसोक्त आस्वाद घेणारे रसिक मजनूं आपल्या समाजांत किती आहेत? मुली आणि तरुणी स्वतःच्या डोक्यांत फुलें घालीत असतील; पण वासापेक्षां शोभेसाठींच ही पुष्पभूषा असते हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. फुलांच्या वेडाचा ज्यांनीं कायमचा मक्ता घेतलेला आहे त्या कवि लोकांना फुलांची आवड तर बाजूलाच राहो—पण फुलांचीं नांवें तरी माहीत आहेत का? ज्या फुलाचें नांव माहिती नाहीं त्याची 'विलायती फूल' म्हणून विल्हेवाट लावून टाकण्याची पद्धत जाहीरच आहे. फुलांचें प्रेम, फुलझाडांची आवड, रंगवैचित्र्याचा नाद आपल्या इकडे लोकांना जवळ जवळ नाहींच असें म्हणावयास हरकत नाहीं.

फुलें म्हणजे काव्य—फुलें म्हणजे सौंदर्य—फुलें म्हणजे आनंद—फुलें म्हणजे हर्ष—फुलें म्हणजे तारुण्य—फुलें म्हणजे शृंगार—इथें गाडी थांबली. सुंदर गोष्टीचा

संबंध शृंगारापर्यंत येऊन ठेपतो म्हणून सनातनी तत्त्वज्ञानांतून आणि आयुष्यांतून सुंदर गोष्टींची हकालपट्टी केलेली आढळते. जीवन हें स्वप्न आहे, आयुष्य ही माया आहे. ऐहिक संपत्ति आणि ऐश्वर्य नश्वर आहे. शारीरिक वा भौतिक सौंदर्य हा मोह आहे. मेल्यानंतर मोक्ष मिळविणें हें जीवनाचें ध्येय आहे आणि ह्या मोक्षप्राप्तीच्या वाटेंत इंद्रियांस आनंद देणाऱ्या, इंद्रियांस भूषविणाऱ्या, सौंदर्य-शृंगारादि गोष्टी वर्ज्य आहेत. या तत्त्वज्ञानाचा पगडा आमच्या लोकांच्या विचारावर आणि आचारावर पडला असल्यामुळें, आमच्या जीवनांतून काव्य, सौंदर्य, संगीत, कला, विनोद, शृंगार ह्यांची हकालपट्टी झाली आहे; आणि संसाराला वैराग्याच्या आयुष्याची कळा आली आहे. आम्हांला काव्य म्हणजे मूर्खपणा वाटतो. सौंदर्य काय आहे हें कळत नाहीं. सौंदर्य काय असतें हें दिसत नाहीं, संगीताची गोडी आम्हांला उमगत नाहीं. उत्तम गाणें ऐकून माना डोलवावयाच्या आधींच झोपेच्या गुंगीनें आम्ही माना डोलवूं लागतों. आमची चित्रकला तर अद्यापि प्राथमिक अवस्थेंत आहे. नागनरसोबाचीं आणि जिवत्यांचीं चित्रें येथपासून आमच्या चित्रकलेला प्रारंभ झालेला आहे. देवादिकांच्या ठराविक निर्जीव आणि भडकरंगी चित्रांनीं आमचीं चित्रसमीक्षा दुबळी होऊन बसलेली आहे. विनोद आम्हांला ग्राम्य, प्राकृत आणि अश्लील वाटतो. नवरसांचा राजा जो शृंगार तो तर आम्हांला तरुणतरुणींचें चारित्र्य बिघडवून टाकणारा, त्यांना वाममार्गाला लावणारा, एखादा चंगीभंगी मवाली वाटतो! गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें, बोलपट हें सारें ललितवाङ्मय आम्हांला अधम कोटींतलें वाटतें! भूमिति, त्रिकोणमिति, सूपशास्त्र, स्थापत्यशास्त्र ह्या विषयांवरील वाङ्मय म्हणजेच तेवढें उच्च वाङ्मय असें समजणारी शिष्ट मंडळी आमच्याकडे निर्माण झालेली आहेत!

आमच्या सौंदर्यदृष्टीची अशी दुर्दशा उडालेली आहे. अशा परिस्थितींत फुलांचें आणि फळांचें शास्त्र शिकून तयार झालेल्या बागवानाचा बहुजनसमाजाला काय उपयोग आहे? पाश्चात्य देशांत बागेवांचून घर नसतें. बाग ही घराची शोभा समजली जाते. इकडे आधुनिक पद्धतीचे नवनवीन बंगले, टुमदार घरें बहुतेक सर्व शहरांतून अलीकडे बांधलीं जात आहेत. तथापि बंगले जरी पाश्चात्य पद्धतीवर बांधले गेले, तरी बंगल्याच्या बाहेर गच्चीवर धोतरें, लुगडीं नि दुपटीं वाळत टाकलेलीं पाहिलीं, आणि दिवाणखान्याच्या भिंतीला

ठोकलेल्या लाकडी खुंट्यांवर सदरे आणि कपडे लोंबत असतांना दृष्टीस पडले म्हणजे, बंगल्याच्या मालकाची सौंदर्यदृष्टि काय किंमतीची असावी ह्याची उत्तम कल्पना येते! असे बंगल्यांचे मालक आपल्याभोंवतीं सुंदर बाग लावण्यासाठीं तज्ज्ञ बागवान नेमतील अशी कल्पनाहि करण्याचें कारण नाहीं. श्रीमंत लोकांच्या बंगल्यांभोंवतीं सुंदर बागा असतात. पण 'येथील फुलझाडांना हात लावूं नयें' अशा भीषण पाट्या बागेवर लावलेल्या असतात. फुलांना हात लावायचा नाहीं, तर काय त्या फुलांच्या निर्बुद्ध आणि गलेलठ्ठ मालकांना हात लावायचा? 'फुलें तोडूं नयेत' असें म्हटलें तर एक वेळ चालेल, पण फुलांना हात लावून, फुलांना जवळ घेऊन त्यांचा परिमल हुंगावयाला काय म्हणून सरकत असावी? कसेंहि असो, खडकीच्या 'वनस्पति-उद्यानां'त बागवान तयार करण्याची शाळा ही एक निःसंशय सुंदर संस्था आहे. फुलांच्या सहवासांत ज्याचें सबंध आयुष्य जाणार आहे, त्याला आपलें तारुण्य, आपला आनंद, आपली सौंदर्यदृष्टि शाबूत ठेवण्यास निराळें असें कांहींच करावयास नको! मला तर बागवान होण्याइतका सुंदर धंदा दुसरा एकहि दिसत नाहीं. महाराष्ट्राच्या सौंदर्यदृष्टीची जोपासना करणारे, महाराष्ट्रामध्यें फुलांची आणि बागेची आवड उत्पन्न करणारे आणि महाराष्ट्राची आयुष्याबद्दलची रसिकता वाढवणारे बागवान आज महाराष्ट्राला हवे आहेत! तुम्हांला नाहीं असें वाटत?

---

# मी जिवंत आहे १

गेल्या पंधरवड्यांत मी माझ्या कामासाठीं पुण्याहून एका सकाळीं निघालों. प्रथम नाशिकला आलों. मी बहुशः सारा प्रवास मोटारीनेंच करतों. त्याप्रमाणें ह्याहि वेळीं मी मोटारनेंच प्रवास करीत आहे. नाशिकला येऊन मी बारा तास देखील झाले नाहींत, तोंच माझ्या अनुपस्थितींत माझ्याविषयीं पुण्यांत भयंकर हलकल्लोळ उडाला. नाशिकला येतांना माझ्या मोटारीस भयंकर अपघात होऊन त्यांत मी ठार झालों अशी बातमी दुसऱ्या दिवशीं तीन वाजतां कोणी तरी पुण्यांत आणून सोडली! प्रत्येक वर्तमानपत्राच्या कचेरींत कोणी तरी टेलिफोन करून ह्या बातमीचा भयंकर प्रसार केला. एका तासाच्या आंत 'नवयुग' साताहिकाच्या कचेरींत शेंकडों टेलिफोन्स आले. अनेक लोक प्रत्यक्ष येऊन विचारणा करूं लागले. माझ्या घरासमोर मित्रांचीं आणि हितचिंतकांचीं मोठमोठीं टोळकीं जमूं लागलीं. पुष्कळांना मी कसा अकालीं मेलों म्हणून वाईट वाटल्यासारखें दिसलें. माझ्या कुटुंबीय मंडळींची काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पनाच करणें बरें. कोणाला कांहींच माहिती नाहीं. जो तो एकमेकाला विचारतो आणि स्वतःच्या कल्पनेची भर त्यात घालून 'ऐकलीत का एक भयंकर बातमी?' अशा प्रस्तावानें दुसऱ्याला

ती सांगतो. ससून इस्पितळांत माझे अवशेष आणले गेले आहेत अशीहि एक बातमी त्यांत उठली. त्याबरोबर तिकडेहि कांहीं मंडळी गेली. सायंकाळीं नाशिक येथें फोन आला आणि माझ्या अस्तित्वाबद्दल विचारणा झाली तेव्हां बातम्यांच्या पुराला उतार पडला! तथापि दुसऱ्या दिवशीं पुण्याहून पत्रें आलीं तेव्हां मला तेथें उडालेल्या ह्या गोंधळाची कल्पना आली. तिसऱ्या दिवशीं नाशिकला मला एका गृहस्थानें विचारलें, “ तुम्हांला कळलें का ? ” मीं विचारलें, “ काय ? ” “ ते अत्रे म्हणे मेले ! ” गृहस्थ म्हणाला. मी म्हणालों, “ असं का ? ” आम्हां दोघांनाहि थोडेसें वाईट वाटल्यासारखें दिसलें. कल्याण स्टेशनवर ज्यांना ही बातमी कळली असे एक माझे मित्र मला जेव्हां भेटले तेव्हां डोळे रोखून ते माझ्याकडे पाहत म्हणाले, “ बरे भेटलांत, आम्हीं तुमच्याविषयीं जी बातमी ऐकली ती खरी आहे का खोटी आहे हें आतां तुम्हांलाच विचारलेलें बरें ! आतां सांगा, तुम्ही जिवंत आहांत का मेलां आहांत ! ” मी म्हणालों, “ पुण्याहून आलेलीं पत्रें वाचल्यानंतर मला स्वतःलाच हा भ्रम पडलेला आहे ! जरा विचार करून सांगतों ! ” एकूण काय, तर आठ-दहा तासपर्यंत मी पुण्यामध्यें मेलेला होतों. माझे मित्र, स्वकीय माझ्यासाठीं रडले— मला जाणणारे लोक माझ्यासाठीं हळहळले, न जाणणाऱ्या लोकांच्या कल्पनेला व्यायाम मिळाला—आणि विरोधकांना घटकाभर मौज झाली ! म्हणून सर्वांच्या माहितीसाठीं मला फिरून सांगावें लागत आहे कीं, ‘ मी जिवंत आहे ! ’

माझ्या अपघाताची आणि मृत्यूची काल्पनिक बातमी उठवणारा उपद्यापी प्राणी कोण असावा ह्याची मला कल्पनाच होत नाहीं ! जनवार्तेचा जन्म इच्छेच्या पोटीं होत असतो असा एक नियम आहे. माझ्या मरणाची इच्छा करणारा माझा मित्र असणें शक्यच नाहीं. अर्थात् हा सगळा खटाटोप सकारण वा अकारण बनलेल्या माझ्या एखाद्या हितशत्रूचा असावा असा तर्क करण्यास हरकत नाहीं. दुसऱ्यांच्या मरणाच्या बातम्या उठवून त्यामध्यें आनंद मानणें—दुसऱ्याच्या यातना बघून त्यांत समाधान मानणें ही मनुष्यप्राण्यांत एक वृत्ति असते, ह्याला मानसशास्त्रीय परिभाषेंत Sadism असें म्हणतात. अशाच कोणा तरी एखाद्या ‘परदुःखानंदी’ इसमानें हा खटाटोप केला असावा. माझ्याच बाबतींत असा प्रकार झालेला आहे असें नाहीं. मागें नाशिक येथें कविसंमेलन

भरलेलें होतें तें होऊं नये अशा मनाच्या एका दुष्ट माणसानें 'गिरीश' कवि पुण्याला वारल्याची बातमी उठवून, कवि-संमेलनांत कांहीं काळ गोंधळ उडवून दिलेला होता. लहानांबरोबर मोठ्यांचे दाखले देण्याचें पातक जर केलें तर गडकरी, दादाभाई नौरोजी, सर रामकृष्ण भांडारकर, श्रीमंत सयाजीराव-महाराज ह्यांच्या हयातींत त्यांच्या मृत्यूच्या बातम्या उठलेल्या होत्या; त्यांच्या मृत्यूवर दुःखप्रदर्शक लेखहि आलेले होते—अन् कांहीं वेळां शाळांना सुट्टयाहि दिल्या गेल्या होत्या!—तथापि ही मंडळी वृद्ध किंवा व्याधिग्रस्त तरी होती. त्यांच्या मरणाच्या बातम्या ऐकावयाला लोकांच्या मनाची तयारी होती. व्याधि किंवा वार्धक्य ह्या दोन गोष्टींची माझ्या बाबतींत शक्यता नसल्यामुळें मोटारीच्या अपघाताच्या बैठकीवर माझ्या मृत्यूची वार्ता उभारली जावी हें क्रमप्राप्तच होतें.

ज्या कोणा महाभागानें हा सारा उपद्व्याप केला त्याला हें करून काय मिळालें? मरणाची चेष्टा करणाऱ्या माणसाला काय म्हणावें? दुसऱ्याच्या दुःखांत जो आनंद मानतो त्याला 'सैतान' अशी पदवी एका फ्रेंच नाटककारानें दिलेली आहे. मी अशा माणसाला सैतान म्हणणार नाहीं! मला हा माणूस भ्याड वाटतो. जो मरणाला भितो तो भ्याड! मृत्यु म्हटल्याबरोबर ज्याच्या अंगाचा थरकाप उडतो तो भ्याड! जगांतील सर्व आपत्तींत मृत्यु ही अत्यंत भीषण आपत्ति आहे असें जो समजतो तो भ्याड! ह्या भ्याड माणसाला मृत्यूचें भय वाटत असलें पाहिजे. आपल्या स्वतःच्यावरून तो माझीहि तशीच कल्पना करीत असला पाहिजे. त्याची अशी कल्पना, कीं माझ्या मृत्यूची बातमी उठवली म्हणजे मी घाबरून जाईन! माझा जीवना-बद्दलचा विश्वास—माझी जगण्याची धडपड पांगळी पडेल--अन् मी हतबल होऊन कांहीं काळ तरी निष्क्रिय होईन! मूर्ख बिचारा-त्यानें मला ओळखलेंच नाहीं अजून! संकटांना मी भीत नाहीं, दुःखानें मी डगमगत नाहीं आणि मरणाला मी डरत नाहीं! ज्यानें आयुष्यांत कांहीं केलें नाहीं त्यानें मरणाला भ्यावें! ज्याला आयुष्यांत कांहीं करावयाचें नाहीं त्यानें मरणाला भ्यावें! जगण्याचे हेतु ज्यानें साध्य केले नाहींत त्यानें मृत्यूला घाबरावें! जगण्याचा अर्थ ज्याला कळला नाहीं त्यांनीं मृत्यूला भिऊन पळावें! "आम्ही शूर मर्दं क्षत्री! नाहीं भिणार मरणाला" अशी माझी वृत्ति आहे!

माझ्या बुद्धीच्या मानानें मीं पुष्कळच साधलें, माझ्या कर्तृत्वाच्या मानानें मीं पुष्कळच केलें, माझ्या योग्यतेच्या मानानें मला पुष्कळच मिळालें— माझ्या आयुष्यानें माझें फारच कोडकौतुक केलें! मीं जीवनाशीं कृतज्ञ आहे म्हणून मरणाचें मला भय वाटत नाहीं! अंतःकरणानें मी पुष्कळच तृत आहे. त्यामुळें माझ्या मनाची कोणत्याहि गोष्टीसाठीं तयारी आहे!

हें मी अगदीं एखाद्या पेन्शनर म्हाताऱ्याप्रमाणें बोललों असें कोणी म्हणेल! जीवनांत ज्याला कृतकृत्यता वाटूं लागते त्याचा अवतार संपला असें नक्की म्हणावयास हरकत नाहीं! मला तशी कृतकृत्यता किंवा कृतार्थता मुळींच वाटत नाहीं! मीं अजून काय केलें आहे? अजून मला किती तरी डोंगर ओलांडून जावयाचे आहेत! अजून किती तरी पहाड चढून जावयाचे आहेत. आजपर्यंत जेवढें केलें किंवा साधलें त्याच्या मानानें किती तरी अजून करावयाचें आहे! किती तरी अजून साधावयाचें आहे! आतांपर्यंत मीं फक्त आठच नाटकें आणि आठच बोलपट लिहिले आहेत; निदान पंचवीस नाटकें आणि पन्नास बोलपट तरी मला लिहावयास नकोत का? दहा पांच 'ब्रह्मचारी' तरी अजून मला निर्माण करावयाचे आहेत! किती तरी काव्यें आणि विडंबनें रचावयाचीं आहेत! किती तरी व्याख्यानें झोडावयाचीं आहेत! किती तरी प्रतिपक्षांना लोळवून शिवाजी आखाडे गाजवावयाचे आहेत! हास्यरसाच्या महापुरांत महाराष्ट्राला बुडवून टाकण्याची माझी आकांक्षा आहे! म्हणून मी माझ्या पिंडासाठीं टपून बसलेल्या ह्या अज्ञात कावळ्याला सांगूं इच्छितों कीं, "बाबा, इतक्यांतच मला मारूं नकोस!—अन् मी तसा मरणें शक्य नाहीं! निदान मला मारावयाचें असेल तर मोटारच्या अपघातांत तरी मारूं नकोस! शिवाजी आखाड्यांत हजारों लोकांपुढें व्याख्यान देत असतांना मी मेलों किंवा लोकांना हसवितां हसवितां हसत हसत मी मेलों!" अशी तरी बातमी उठव, म्हणजे निदान तें मरण तरी अपमानास्पद वाटणार नाहीं!

उत्तम नटानें बाबाजीराव राण्यांप्रमाणें नाटकांत काम करतां करतां मरावें, उत्तम लेखकानें गडकऱ्यांप्रमाणें लिहितां लिहितां मरावें, उत्तम गवयानें हंसपक्ष्याप्रमाणें गातां गातां आणि तान मारतां मारतां मरावें, उत्तम कवीनें काव्याच्या ललकाऱ्या देत देत थंडगार व्हावें! प्रेमवेडया माणसाला आपल्या प्रियतम व्यक्तीच्या बाहुपाशांत मृत्यु यावा! पेन्शनर लोकांना पहिल्या

तारखेला पेन्शन पदरांत पडल्यानंतर मरण यावें--तसें विनोदी लेखकाला हास्यरसाच्या कल्लोळांतच मरण यावें तरच मरणाला मौज येईल! तेव्हां माझ्या मरणाची वार्ता निर्माण करणारा माझा सुतकी दोस्त फारच अरसिक, गंभीर आणि गद्य दिसतो आहे. संस्कृति-संरक्षण-मंडळाचा सभासद होण्यास तो योग्य असावा असा माझा कयास आहे. मला मोटारीच्या अपघातांत मारणारा हा माणूस खरोखरच स्वतःचें उपरणें एखाद्या मोटार लॉरीच्या चाकांत अडकून मेल्यास मला आश्चर्य वाटणार नाहीं! पण तो मरावा अशी माझी इच्छा नाहीं! कारण तो कोण आहे हें मला काय किंवा कोणालाच ठाऊक नाहीं! ज्याच्या जन्माचा पत्ता नाहीं त्याच्या मरणाची कोणाला पर्वा आहे! माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे, कीं माझा हा अज्ञात मित्र पुष्कळ वर्षेपर्यंत जगावा. कमी पडलें तर माझें आयुष्य त्याला मिळावें! तो मरायचाच असेल तर म्हातारपणानेंच मरावा आणि त्याचा 'गृह्यसंस्कार' केसरीमध्यें प्रसिद्ध व्हावा--म्हणजे तो कोण आहे हें मेल्यानंतर तरी लोकांना कळेल. मी पाहिजे तर त्याचा 'गृह्यसंस्कार' आधींच लिहून ठेवतों--"श्री......वय वर्षे ८५ हे काल रोजीं अखेरशेवटीं संग्रहणीनें मरण पावले. ह्यांना दुसऱ्यांच्या मरणाच्या बातम्या उठविण्याचा फार नाद होता. अर्थात् ही मात्र त्यांच्या मरणाची खरी बातमी आहे. ईश्वर आतां तरी त्यांच्या आत्म्याला शांति देवो!"

माझ्या मरणामुळें जे माझे अनेक मित्र हळहळले, ज्यांनीं माझ्यासाठीं अश्रुसिंचन केलें व ही बातमी खोटी ठरल्यानंतर माझें दीर्घायुष्य चिंतून पेढे वाटले; आणि 'चांगला मनुष्य गेला!' म्हणून एकदां तरी तोंडांतून उद्गार काढले त्या सर्वांचा मी आभारी आहे! त्या सर्वांचे वैयक्तिक आभार मानणें शक्य नाहीं म्हणून त्यांचे मी जाहीर आभार मानतों आणि त्यांच्या माहितीसाठीं कळवतों, कीं अजून मी जिवंत आहे--आणखीहि पुष्कळ वर्षे जिवंत राहण्याची माझी इच्छा आहे--अर्थात् कर्ताकरविता परमेश्वर आहे! माझ्या मरणासाठीं टपलेल्या थोडयाशा मंडळींना मी जिवंत आहे हें वाचून मरणप्राय दुःख होईल! पण त्याला माझा नाइलाज आहे. पण माझ्या मृत्युपत्रांत मीं त्याच्यासाठीं कांहीं एक ठेवलेलें नाहीं हें त्यांना कळविलें म्हणजे त्यांना माझ्या मरणाबद्दल फारशी उत्कंठा वाटणार नाहीं.

---

# म्हाताऱ्याच्या तावडींत मी १०

मी परवां एका वृद्ध गृहस्थाला भेटायला गेलों होतों. सदर गृहस्थाची आणि माझी जुनी ओळख होती. त्यांची आणि माझी भेट झाल्याला किती तरी वर्षें झालीं असतील! पेन्शन घेऊन ह्या गृहस्थाला आतां पुष्कळ वर्षें झालीं आहेत. गांवाच्या अगदीं एका बाजुला एका अरुंद गल्लींत ह्या गृहस्थानें एक नवें घर बांधलें आहे. तेथें त्यांचा शोध काढीत काढीत मी गेलों. संध्याकाळची वेळ होती. हळूहळू अंधार पडूं लागलेला होता. भोंवतालचें वातावरण अगदींच विषण्ण असें दिसत होतें. रस्त्यांत पुष्कळच घाण पडलेली होती आणि तेथें उघडींवागडीं पोरें आरडाओरड करीत खेळत होतीं. आणि त्यामुळें आजूबाजूला धूळ खूपच उधळलेली होती. माझें मन दिवसाच्या दगदगीनें आधींच थकून गेलेलें होतें. घरीं परत जाण्यापूर्वीं ह्या गृहस्थाला भेटण्याचा प्रयत्न करावा म्हणून तशा थकलेल्या मनःस्थितींत शोध घेत घेत मी त्या घरापर्यंत तर जाऊन पोंहोचलों. आजूबाजूचा देखावा बघून मन अधिकच उदास झालें आणि मनांत विचार आला कीं, आतां हा गृहस्थ भेटूंच नये. शिवाय संध्याकाळचे वेळीं तो घरांत सापडणें शक्य नाहीं

अशी शंका मनाला वाटत होती ती निराळीच. पण इतकें माझें सुदैव कोठून असणार! मी आलों आहे असा आंत निरोप पाठवितांच तो वृद्ध गृहस्थ माझ्या नांवानें ओरडत ओरडत बाहेर आला. त्यांनीं अत्यंत प्रेमानें माझें स्वागत केलें आणि तो मला आपल्या खोलींत घेऊन गेला.

त्याच्या खोलींत जास्तच अंधार होता तरी त्यानें विजेचा दिवा लावला नाहीं. उलट त्यानें मला हसून विचारलें, "काय तुमची दृष्टि अजून ठीक आहे ना?"

मीं अदबीनें म्हटलें, "माझं तसं कांहीं अजून वय झालं नाहीं!"

"माझं किती वय आहे हें ओळखा!" म्हाताऱ्यानें हसून तावडतोब माझ्यापुढें कूट प्रश्न टाकला. त्याला वाटलें कीं पहिल्या प्रश्नांतच आपण या गृहस्थाला चीत करणार!

सदर वृद्ध गृहस्थ पेन्शनींत केव्हां गेला हें मला माहीत होतें. त्यानंतर किती वर्षें झालीं होतीं हेंहि मला माहीत होतें. साधी बेरीज करून मला त्याच्या वयाचा आंकडा त्याच्यापुढें टाकतां आला असता! पण— पण तसें करण्याची मला छाती झाली नाहीं. मी म्हाताऱ्याच्या चेहऱ्याकडे लाजून पाहिलें, आणि 'नाहीं मी बोलत आतां!'चा अभिनय करून भीत भीत म्हणालों, "कठीण आहे सांगणं! असेल जवळ जवळ त्रेसष्ट—"

"त्रेसष्ट!" म्हातारा गरजला, "टाळी द्या! गेल्या महिन्यांत मला बहात्तरावं वर्ष पूर्ण झालं!"

ह्या उत्तरानें मी चाट झालों असें दाखविलें. मी ज्या कामासाठीं आलों होतों त्या कामाचें सूतोऽवाच कसें करावें हें क्षणभर मला कळेना.

"आपली प्रकृति खरोखरच उत्तम आहे!" कांहीं तरी बोलावयाचें म्हणून मी बोललों!

"उत्तम आहे? अहो, गेल्या जानेवारींत मी जवळ जवळ मेलोंच होतों. परमेश्वराची कृपा होती म्हणून वांचलों!"

"म्हणजे–काय झालं बुवा!" भयंकर आश्चर्य वाटल्याचें प्रदर्शन करीत मी म्हणालों. मनांतल्या मनांत मी परमेश्वराला शिव्या देण्याच्या बेतांत होतों.

"त्याचं असं झालं—म्हणजे तशी माझी प्रकृति फारच दणकट. जन्मांत मी कधीं आजारी पडलों नाहीं; पण मूत्राशयाची मला थोडीशी व्यथा होती—

मी १८९७ सालीं सिंधमधें होतों. तिथें पाण्यांत रेतीचे बारीक कण असतात म्हणतात. त्या वेळीं कांहीं लक्षांत आलें नाहीं माझ्या. पण पेन्शन घेतलं मी– १७ ऑक्टोबर १९२२ ! अजून स्मरणशक्ति धड आहे आमची—"

म्हाताऱ्याच्या स्मरणशक्तीला मीं मनांतून लाखोली वाहिली.

" अन् अजून दांत देखील आमचे उत्तम आहेत—म्हणजे कवळी बसविली आहे तशी मी. पण ती अलीकडे पांच-सात महिन्यांपूर्वीं. तुमचा पुण्याचा तो कोण डॉक्टर आहे ना लष्करांतला—उत्तम आहे बरं का !

मला काय उत्तर द्यावें तें कळेना. जीव अगदीं गुदमरतो आहे असें वाटलें.

" हो— तर सांगत मी काय होतों—हो—तें ऑपरेशनचं. इकडे या." म्हातारा उभा राहून एकदम माझ्याकडे चालत आला. मला कल्पना होईना हा काय करतो तें !

" I will show you if it is not indecent !" तो म्हातारा म्हणाला आणि त्यानें आपला सदरा उचलून ऑपरेशन केलेला पोटाचा खालचा भाग दाखविला. कातड्यावर दोन मोठ्या खुणा होत्या.

" अरे बाप रे, काय भयंकर आहे ! " मीं पाहिलें न पाहिल्यासारखें करून म्हणालों.

" वंडरफुल ऑपरेशन ! देवाची खैर म्हणून वांचलों. आंतून डॉक्टरनें केवढा मोठा खडा काढला म्हणतां ! अरे कोण आहे तिकडे—" आंतून एक नोकर आला.

" त्या कपाटांतली ती बाटली काढ पाहूं—मीं अजून जपून ठेवला आहे तो—" म्हातारा म्हणाला.

नोकरानें बाटली काढली आणि माझ्या हातांत दिली. मी त्यांच्या बाटलींतल्या खडयाकडे भयंकर चेहरा करून पाहूं लागलों.

" तुम्ही तो खडा हातावर घेऊन पाहा. अगदीं अंडयाएवढा मोठा आहे–" म्हातारा म्हणाला.

" हो, तें दिसतें आहे खरें !" मी ती बाटली घाईघाईनें नोकराच्या हातीं देत म्हणालों, " आपण ह्या ऑपरेशनमधून वाचलांत ह्याबद्दल मला खरोखर

आनंद होतो आहे!" मी विचकून म्हणालों. मनांतून मला वाटत होतें कीं मी कांहीं तरी बोलतों आहे.

म्हाताऱ्यानें माझ्या सदिच्छेचा हसून स्वीकार केला.

"फार दिवसांनीं तुम्ही आलांत, तुम्हांला आतां आमचें घर दाखवतों."

"मीं पाहिलें आहे बाहेरून; उत्तम आहे! सबंध गल्लींत असें घर नाहीं!"

पण माझ्या बोलण्याकडे त्याचें लक्ष होतें कोठें?

"या माझ्यामागून!" असें सांगून तो उठला आणि चालूं लागला. मी एखाद्या निर्जीव पुतळ्याप्रमाणें त्याच्यामागून चालत गेलों. घराचा प्रत्येक भाग न् भाग मला त्यानें दाखवला. मधून मधून मी 'छान आहे!' 'सुंदर आहे!' 'ग्रँड!' असे उद्गार असहायपणें काढीत होतों. पण त्यामुळें माझे हाल जास्तीच वाढत गेले.

"इकडे या!" म्हातारा म्हणाला.

"तिकडे काय आहे?" मी निर्दोष बालकाच्या अज्ञानानें विचारलें.

"संडास! तुम्हीं आजपर्यंत पुष्कळ संडास पाहिले असतील; पण आमचा हा संडास अगदीं निराळा आहे! म्हणून मुद्दाम तुम्हांला दाखवतों–Excuse me अं!"

म्हाताऱ्याच्या मागून मी भीत भीत आंत डोकावलों. मला त्यांत नवीन असें कांहीं दिसेना.

"हा आंत जो कुंडीचा स्लोप आहे कीं नाहीं, तो स्लोप मीं मुद्दाम करवून घेतला! असा स्लोप तुम्हांला दुसऱ्या ठिकाणीं आढळायचा नाहीं; त्यामुळें होतें काय कीं घाण एवढी सुद्धां राहत नाहीं!"

एका भयंकर स्लोपवरून मी गडगडतों आहे असें मला वाटलें. पुन्हा तळमजल्यावर कसा आलों तें मला कळलेंच नाहीं!

"आतां बोला!" खालीं आल्यावर म्हातारा म्हणाला, "किती खर्च यावा ह्या घराला?"

म्हाताऱ्यानें पुन्हा भयंकर कूट प्रश्न टाकला.

"पंचवीस हजार!" मी भीत भीत म्हणालों.

" पंचवीस!--टाळी द्या--पंधरा हजारांत आवरलें सारें!" म्हातारा विकट हास्य करीत म्हणाला. त्या वेळीं मात्र त्यानें कवळया बसविल्या आहेत हें दिसून आलें. " पण स्वतः सहा महिने रात्रंदिवस उभा राहून मीं काम करून घेतलें हं! उगाच नाहीं! आतां तुम्ही म्हणाल कीं- ह्या गल्लींत तुम्हीं घर कां बांधलें?"

आतां मला असह्य झालें. खोकल्याची उचळ आल्यासारखें केलें आणि मी उठलोंच.

" कां, निघालांत? आम्हीं एक पुस्तक लिहिलें आहे! मला दाखवायचं होतं कोणाला तरी तें! तुम्ही बरे आलांत—तुमच्याशिवाय त्यांतली मौज कुणाला कळायची नाहीं." असें म्हणून म्हातारा उठलाच.

" मेलों--मेलों--धांवा!" असा एकदम हंबरडा फोडावा असें मला वाटलें. तोंच म्हातारा कपाटांतून एक जाडें पुडकें घेऊन आला.

" बोला--आम्हीं काय लिहिलें असावें तें! टाळी द्या, तुम्हांला सांगतां येणें शक्य नाहीं तें! आम्हीं भगद्गीतेवर एक नाटक लिहिलें आहे!"

मीं भगवान् कृष्णाचा धावा केला!

" अरेच्या, मी दिवा लावावयाचें विसरलोंच!"

तें भयंकर नाटक वाचावयास सुरुवात करण्याचे वेळीं म्हातारा शुद्धीवर आला. " म्हणजे मघांपासून आपण अंधारांतच बोलत आहोंत: कीं काय! भले, तुम्ही तरी सुचवायचें! आमचें हें असें होतें कधीं कधीं."

म्हातारा दिव्याचा स्विच् दाबायला उठला तसा मनाचा शेवटचा हिय्या करून मी उठलों आणि दरवाजांत जाऊन उभा राहिलों.

" येतों मी; मला जरूरीचें काम आहे--"

" अस्सें! बरें-पण-उद्यां दुपारीं चहालाच या आमच्याकडे--"

मीं चहा सोडला आहे अलीकडे!" मी मधेंच म्हणालों.

" मग जेवायला या- उद्यां नाहीं तर परवां-पण सकाळीं मात्र कळवा अं-म्हणजे हें तुम्हांला वाचून दाखवतों! तुमच्यासारखे लोक आमच्याकडे येतात कुठें नेहमीं!"

मीं तशीच दरवाजांतून बाहेर धाव घेतली.

"अहो–पण!" म्हातारा मागाहून म्हणाला, "तुम्ही आलां होतां कशाला तें सांगितलें नाहीं!"

"तें मी उद्यां आलों-म्हणजे सांगेन!" मी मागें वळून न पाहतां तसाच पसार झालों.

पुन्हा त्या गल्लीकडे अद्यापि मी फिरकलों नाहीं.

---

## सवगोलंकारी ब्राह्मण-संमेलन हवें ११

अलीकडे जातीय आणि धर्मीय चळवळीला जी भरती येऊं लागली आहे ती पाहून कोणाहि राष्ट्रीय विचाराच्या माणसाला दुःख झाल्याशिवाय राहणार नाहीं. जनाब जिनांनीं तर लाहोरला 'सोन्याचा कळस'च केला. मुसलमानांसाठीं हिंदुस्थानचा निराळा तुकडा पाडून त्यांनीं मागितला, तसा मद्रासला ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनींहि ब्राह्मण ज्यांत औषधालाहि सापडायचा नाहीं असा निर्भेळ ब्राह्मणेतरांचा प्रांत आम्हांला पाहिजे अशी मागणी केली आहे. डॉ. अरुंडेल म्हणाले त्याप्रमाणें हिंदुस्थानचे दोन तुकडे झाले कीं, त्याचे लौकरच वीस तुकडे होणार ह्यांत शंका नाहीं. कांहीं दिवसांपूर्वीं आमच्या मराठे बंधूंनीं 'मुस्लिम लीग'च्या चालीवर 'मराठा लीग' स्थापन केली. दहा हजार मराठे नाशिक येथें गोदावरीच्या कांठावर जमले आणि त्यांनीं ब्रिटिश साम्राज्याशीं एकनिष्ठ राहण्याच्या शपथा घेतल्या व आपल्या ज्ञातींत 'शिवाजी' निर्माण करावयाचेंहि ठरवलें! ब्रिटिश साम्राज्याला एकनिष्ठ राहणारा हा नवीन शिवाजी मराठे लोकांमध्यें केव्हां निर्माण होतो आहे इकडे आमचे डोळे लागून राहिले आहेत.

'मराठा लीग'च्या मागून पुण्यास 'चित्तपावन लीग' स्थापन झाली. आणि ह्या चित्तपावन मंडळींनीं राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्नांचा व्यापक दृष्टीनें विचार करण्याऐवजीं तिकडे आपल्या कोंकणस्थी घाऱ्या डोळयांनींच पाहावयाचें ठरविलें. सबंध हिंदुस्थानला ज्यांच्या क्रिकेटपटुत्वाबद्दल आदर वाटतो त्या प्रो. देवधरांचें ते 'चित्तपावन' आहेत म्हणूनच अभिनंदन करावयाचें, चित्तपावनांत आचाऱ्यापासून आचार्यापर्यंत लोक आहेत म्हणून थोरवी मिरवायची, जहाल, मवाळ, सुधारक, दुर्धारक वगैरे प्रत्येक क्षेत्रांत चित्तपावन अग्रेसर आहेत अशा फुशारक्या मारायच्या आणि चित्तपावन महिलांत १८१ व्यक्ति बेकार आहेत, ४०३ पेन्शनर आहेत आणि १८ वर्षांवरील ३४४ मुली अविवाहित आहेत अशी खानेसुमारी करीत बसावयाचें म्हणजे जातीय विचारसरणीची पराकाष्ठा झाली.

ह्याच्याहि पलीकडे 'आपटे' घराण्यांतील मंडळींचें 'संमेलन'; लिमये लोकांचें संमेलन, ढेकणे मंडळींचा वनविहार ह्या कौटुंबिक संमेलनांनीं महाराष्ट्राला आधींच बेजार केलेलें आहे. आपटे मंडळी एकत्र बसून काय ठरवणार? एक आपटे दुसऱ्या आपट्याला म्हणणार, कीं तूं हरि नारायण आपटे आहेस आणि दुसरा पहिल्याला म्हणणार कीं तूं नारायण हरि आपटे आहेस! लिमये लोक एके ठिकाणीं येऊन कसली चर्चा करणार? तसेंच चित्तपावन लोक आपली स्वतंत्र लीग स्थापन करून काय राष्ट्रीय कार्य करणार? आपला गोरा रंग आणि घारे डोळे हे कसे टिकवावयाचे ह्याचा ते विचार करणार? कीं आपल्यांतला पिढीजाद चिक्कूपणा जास्त कसा वाढत जाईल याबद्दल ते विचार करणार? चित्तपावनसंमेलन भरवण्याची कल्पना कोणत्या चित्तपावनाच्या चित्तांत प्रथम आली तें कांहीं कळत नाहीं. पण त्याचें 'चित्त' खास 'पावन' नसलें पाहिजे!

ब्राह्मणसमाज शिक्षणांत आणि विद्येंत पुढारलेला समाज आहे; इतर जातीला मार्गदर्शन देण्याची जबाबदारी ह्याच समाजावर आहे. जातिभेदानें हिंदु समाजाचें अपरिमित नुकसान केलेलें आहे. राजकीय, सार्वजनिक आणि सामाजिक जीवनांतून धर्म, पंथ आणि जात ह्यांची हकालपट्टी केल्याशिवाय एकराष्ट्रीय वृत्ति निर्माण होणार नाहीं. जात राहावयाचीच असली तर ती

एक वैयक्तिक गोष्ट म्हणून राहावी. कोणी कोणाला जात विचारूं नये आणि कोणी ती कोणाला सांगू नये. ह्या सर्व गोष्टी ब्राह्मण लोकांना, विशेषतः ब्राह्मणांत अग्रेसर असलेल्या चित्तपावन ब्राह्मणांना ठाऊक का नाहींत? जें प्रत्येक सुशिक्षित माणसाला सहज कळतें तें का मुद्दाम सांगावयाला पाहिजे? असें असून 'आम्ही चित्तपावन ब्राह्मण आहोंत! आमच्यांत आचारी आहेत आणि आचार्य पण आहेत,' असें चव्हाट्यावर एकत्र जमून लोकांना सांगावयाचें ह्यांत कोणता शहाणपणा आहे? मराठे लोक मागासलेले आहेत. त्यांनीं 'मराठा लीग' काढली ही गोष्ट एक वेळ क्षम्य म्हणून समजतां येईल. न्हावी लोक आपली 'नाभिक परिषद', भरवतात किंवा भंगी लोक आपलें संमेलन भरवितात हेंहि आम्हांला समजतें. म्हणून त्याच ब्राह्मण लोकांनीं 'चित्तपावन संमेलन', 'शुक्लयजुर्वेदीय संमेलन', 'देशस्थ ऋग्वेदी संमेलन' भरवीत सुटावें ह्याला कांहीं अर्थ आहे काय? ही ब्राह्मण ज्ञातीची प्रगति का परागति? ब्राह्मण लोक आपल्या ब्राह्मण्याची आठवण दुसऱ्याला जितकी कमी करून देतील तितकी आज पाहिजे आहे! आधींच अब्राह्मणांचा त्यांच्यावर अविश्वास आहे. 'ब्राह्मणांचे येथें कांहीं नाहीं काम! द्यावें हाकलून जोती म्हणे!' ह्या महात्मा ज्योतिरावांच्या अभंगाचे पडसाद अजून महाराष्ट्रांत ऐकूं येत आहेत.

अशा परिस्थितींत ब्राह्मण्याच्या भूमिकेवर ब्राह्मणसमाजाची संघटना करणें हें ब्राह्मणांच्या दृष्टीनें आणि राष्ट्रीय दृष्टीनेंहि घातुक आहे. श्री. शंकरराव लवाटे चित्तपावन संमेलनांत म्हणाले कीं, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांकडे पाहतांच तो धर्मानें आणि जातीनें कोण आहे हें ओळखूं येत नाहीं. ब्राह्मणाची पोषाकावरून ओळख पटत नाहीं. स्त्रियांनीं मात्र लाज राखली आहे. कारण त्या बरोबर असल्या म्हणजे नवऱ्याची जात ओळखली जाते." हल्लीं विद्यार्थ्यांची किंवा सामान्यतः कोणत्याहि माणसाची पोषाकावरून जात ओळखतां येत नाहीं ही गोष्ट भूषणीय आहे का दूषणीय आहे? लवाटे ह्यांचें म्हणणें काय कीं हल्लीं सारे विद्यार्थी डोक्यावर केस राखतात, गंध लावीत नाहींत, धोतरें न नेसतां चोळणे घालतात; त्या ऐवजीं प्रत्येकानें हजामत करून आणि डोक्याला गंध लावून रस्त्यानें जावें, म्हणजे अमुक एक माणूस कोंकणस्थ ब्राह्मण आहे, का सोनार आहे, का महार आहे, हें रस्त्यावरून

जाणाऱ्या येणाऱ्याला कळेल! जेथें सोनार, शिंपी, तेली, महार, चांभार अशीं जातिवाचक आडनांवें नसावींत येथपर्यंत विचाराची प्रगति झाली, तेथें माणसाची जात ओळखली जावी असा त्यानें पोषाक करावा असें सांगणें म्हणजे प्रतिगामित्वाची परिसीमा झाली.

जातीय संमेलनें भरलीं म्हणजे तेथें आकुंचित आणि प्रतिगामीच विचार व्हावयाचे हें क्रमप्राप्त आहे. 'चित्तपावन संमेलन' ह्या नियमाचें उत्तम उदाहरण आहे. राष्ट्रापुढें सध्यां कोणता घोर प्रसंग आहे त्याविषयीं एक 'ब्र' देखील ह्या ब्राह्मणांनीं काढला नाहीं. उद्यां महात्माजींनीं सत्याग्रहाचा लढा सुरू केला तर त्यांत 'चित्तपावनां'नीं कोणता भाग घ्यावयाचा ह्याचा उल्लेखदेखील तेथें झाला नाहीं; उलट धार्मिक भावनांचा होत असलेला ऱ्हास टाळण्याचा चित्त-पावनांनीं प्रयत्न केला पाहिजे, असा ठराव लवाटे ह्यांनीं ह्या संमेलनापुढें मांडून तो पास करून घेतला. हल्लीं चित्तपावनांची धार्मिक अवनति होत चालली आहे, चित्तपावन पोरें इराण्याच्या हॉटेलांत जातात, त्यांची जात ओळखूं येत नाहीं; ते इंग्रजी ग्रंथ फार वाचतात असें पेन्शनरी तक्रारींचें ठराविक चऱ्हाट रा. लवाटे ह्यांनीं वळलें. रा. लवाटे ह्यांना समाजाचें आणि जीवनाचें काय ज्ञान आहे? त्यांना वाटतें ब्राह्मणांनीं शेंड्या राखाव्यात, जानवीं घालावींत, दोन्ही वेळां स्नानसंध्या करावी, देवदर्शनाला जावें, सोवळ्यानें जेवायला बसावें. रा. लवाटे ह्यांच्या बेचाळीस पिढ्या खालीं उतरल्या तरी आतां 'आधुनिक ब्राह्मण' हा मागें फिरावयाचा नाहीं!

इराण्याच्या हॉटेलांत ब्राह्मण मुलें कां जातात हें रा. लवाटे ह्यांना कसें समजणार? तेथें अंड्यांचा 'ऑम्लेट' नांवाचा पदार्थ मिळतो, लज्जतदार मटनाचे पदार्थ मिळतात हे त्या दाढीवाल्या म्हाताऱ्या ब्राह्मणाला काय ठाऊक असणार? ज्यांची धर्माची कल्पना केवळ बाह्य स्वरूपावर, पोषाकावर आणि खाण्याच्या पदार्थांवर आहे, असल्या रा. लवाटे ह्यांच्यासारख्या आउट ऑफ डेट बुद्रुक लोकांनीं सुशिक्षित आणि सुधारलेल्या समाजापुढें व्याख्यान देणें हा निवळ जुलूम आहे! हेंच व्याख्यान रा. लवाटे ह्यांनीं शनिवारवाड्यापुढें दिलें असतें तर त्यांच्या दाढीचा एक केस शिल्लक राहिला नसता—पण जातीय संमेलनें भरलीं म्हणजे तेथें भिक्षुकी वृत्तीच्या म्हाताऱ्यांची गर्दी

व्हावयाचीच. संमेलनेंच भरविण्याची जर ब्राह्मणांना हौस असेल तर त्यांनीं सवगोलंकारी वृत्तीच्या ब्राह्मणांचें संमेलन भरवावें. जें ब्राह्मण ब्राह्मण्याची कोणतीहि बाह्य उपाधि ( शेंडी, जानवें इ. ) पाळीत नाहींत, जे चुकून देवळांत जात नाहींत, आहारासंबंधीं ज्यांना फ़ाजील सोवळेपणा नाहीं, जे जातिभेद मानीत नाहींत, अस्पृश्यता पाळीत नाहींत, अशा राष्ट्रीय वृत्तीच्या आधुनिक ब्राह्मणांचें एक संमेलन भरावावयास हवें. मला वेळ असता तर मीं असें एक संमेलन भरवलें असतें !

---

# बायांनो, आपले कासोटे घट्ट ठेवा १२

हे भयंकर शब्द कोण बोलले ? हे शब्द माझे नाहींत ! वाचक हो, लक्षांत ठेवा, हे शब्द माझे नाहींत. हे भयंकर शब्द 'चित्तपावन संमेलना'च्या सभ्य स्त्री-पुरुषांच्यापुढें मुंबईच्या दाबके नांवाच्या एका चित्तपावनाच्या मुखांतून निघाले ! चित्तपावनांचा धार्मिक ऱ्हास होतो आहे अशा कल्पनेनें बावचाळलेल्या भाऊसाहेब लवाट्यांनीं तद्विषयक जो एक ठराव चित्तपावनांपुढें मांडला त्या ठरावावर लवाट्यांपासून तो न. का.पर्यंत जो शिकारखाना बोलावयास उठला त्या शिकारखान्यांत मुंबईचा दाबके नांवाचा एक प्राणी घुसला आणि डोळ्यांत पाणी आणून अंतःकरण सद्गदित करून, कोपरापर्यंत हात जोडून तो आपल्या चित्तपावन भगिनींना म्हणाला, " भगिनींनो, आपली महाराष्ट्रीय संस्कृति जर टिकवावयाची असेल तर आपले कासोटे घट्ट ठेवा ! " दाबक्यांच्या तोंडून उफाळलेली ही भीषण वाणी ऐकून चित्तपावन संमेलनांतील सभ्य स्त्री-पुरुषांनीं काय केलें ? त्यांनीं हे शब्द अगदीं शांतपणें ऐकून घेतले काय ? हे शब्द ऐकल्यानंतर त्या चित्तपावनांचीं चित्तें कुलपी मलाईसारखींच थंडगार राहिलीं काय ? नाहीं— उलट त्यांनीं टाळ्यांचा गजर केला आणि एकदम गंभीर चेहरे केले ! बस,

एवढेंच ! अरेरे, चित्तपावनांनीं हें काय केलें ? हें चित्तपावनांनीं फार वाईट केलें ! "बायकांनो, तुम्ही आपले कासोटे संभाळा !" असें चित्तपावन भगिनींच्या तोंडावर एक इसम बिनमुर्वतखोरपणें सांगत असतां 'चित्तपावनां'चे कणखर हात केवळ टाळ्या वाजविण्याकडेच वळूं शकले ! ज्याच्या हाताच्या त्या क्षणींच त्वेषानें मुठी वळल्या असा एकहि स्वाभिमानी चित्तपावन त्या सभेंत हजर नव्हता ? "दाबके, आपल्या बहिणींना कासोटे संभाळा म्हणतां ? आधीं आपलें तोंड संभाळा ! तुम्ही आमच्या बहिणींना काय समजतां ? का स्वतःवरून दुसऱ्याची कल्पना करतां ?" असें खाडकन् सांगून दाबक्यांचें तोंड दाबणारा एकहि तेजस्वी चित्तपावन तेथें नव्हता काय ? सबंध चित्तपावन भगिनींचा हा अपमान आहे अशी जाणीव एकाहि चित्तपावन भगिनीला त्या वेळीं कशी बरें झाली नाहीं ! "दाबके, ही सभ्य स्त्रीपुरुषांची सभा आहे, बायकांच्या कासोट्याबद्दल बोलायला तुम्हांला शरम कशी वाटत नाहीं !" असें भर सभेंत दाबक्यांना बजावणारी एखादी तडफदार सरस्वतीबाई शिंत्रे किंवा सत्यवतीबाई बापट तेथें नव्हती काय ? मराठी भाषेंतील अश्लील भाषणावर आणि लेखनावर जागरूकपणें पहारा करणारे आमचे चित्तपावन कृष्णराव मराठे त्या वेळीं काय आपल्या खुर्चींत वामकुक्षी करीत होते ! 'ब्रँडीच्या बाटलीं'तला 'एकच चान्स' ऐकून ज्या कृष्णरावांची बेचाळीस पिढ्यांची संस्कृति एकदम जागी झाली, ती 'बायकांच्या कासोट्या'बद्दलची ही जाहीर चर्चा ऐकतांना काय डोक्यावर बर्फाचा डोंगर ठेवून बसली होती ? का अत्रे चित्तपावन नाहीं म्हणून त्या बिचाऱ्याला ठोका; आणि दाबके चित्तपावन आहे म्हणून त्याच्या ओंगळ संस्कृतीच्या प्रदर्शनाचें मात्र संरक्षण करा, असा वाङ्मयांत चित्तपावनी पंक्तिप्रपंच करावयाचा असें कृष्णरावांनीं ठरवलें आहे काय ? कुठें आहेत ते आहिताग्नी राजवाडे ? त्यांच्या अग्यारींत अजून ह्या कासोट्याचे पडसाद कसे उमटले नाहींत ? बोला, आहिताग्नी, तुमच्या अग्निहोत्राची शपथ आहे तुम्हांला ! तुम्ही ह्यासाठीं निषेधाची सभा केव्हां बोलवणार ?

## जातीय संमेलनें भरविणाऱ्यांचीं कुजकट मतें

जातीय संमेलनें आणि सभा भरविणाऱ्या लोकांचीं मतें किती आकुंचित, क्षुद्र, आणि कुजकट होतात याचे अनेक पुरावे ह्या 'चित्तपावन संमेलना'नें

दिले. पण ह्या सर्व कुजकट आकुंचितपणावर 'भगिनींनो, कासोटे संभाळा!' ह्या दाबके ह्यांच्या 'आकाशवाणी'नें कळस केला! ही भाषा एका चित्तपावनानें दुसऱ्या चित्तपावनापुढें केली म्हणूनच ती शांतपणें ऐकून घेण्यांत आली. कारण कोणी कांहीं बोलला तरी तो आपलाच आहे; त्याला आपण संभाळून घेतलें पाहिजे अशा आकुंचित अभिमानाच्या दृष्टीनें त्या सभेंतील प्रत्येक मनुष्य एकमेकांकडे पाहत होता! समजा, अखिल महाराष्ट्रीय हिंदु समाजाच्या एकाद्या सामाजिक संमेलनापुढें हेच दाबके जर असेच बोलले असते कीं, 'भगिनींनो, आपले कासोटे घट्ट ठेवा!' तर दाबक्यांची स्थिति काय झाली असती? (आधीं त्यांना असली भाषा तोंडांतून काढावयाची छातीच झाली नसती, ती गोष्ट निराळी.) मुंबईला परत जावयाला दाबके ह्यांच्या अंगावर एक वस्त्र तरी शिल्लक राहिलें असतें काय? (मग कासोट्याची गोष्टच नको!) त्या श्रोत्यांत, जर मंडईतली एखादी माळीण असती तर खाडकन् पायांतली चप्पल काढून ती ओरडली असती, 'ए बामना, फिरून आमच्या कासोट्याबद्दल बोलशील तर ही चप्पल भिरकावीन!' त्या सभेंत जर अडाणी, अशिक्षित कामकरी नि शेतकरी असते तर ते म्हणाले असते कीं, हीं बामनं आमी वंगाळ बोलतों म्हून आमास्नी नाकं मुरडत्यात, अन् आपन मात्र खुशाल बायकांच्या कासोट्याच्या गोष्टी करत्यात!" चित्तपावन संमेलन हें जातीय संमेलन होतें म्हणूनच तेथें अशी घाणेरडी आणि कुजकट भाषा बोलली गेली; आणि लोकांनींहि ती कानांवर हात ठेवून ऐकून घेतली.

## दाबके ह्यांना कासोट्याचें लुगडें नेसवा

"काँग्रेसचें राजकारण कासोटाफेड्र आहे!" ही भयंकर घोषणा अण्णासाहेब भोपटकर ह्यांनीं केल्यापासून मराठी भाषेंत 'कासोटावाङ्मय' वाढीला लागलेलें आहे. त्याच्या आधीं 'तेलिण मारी सोटा, बापु गोखल्या संभाळ कासोटा!' असा एकच कासोट्याचा उल्लेख मराठी साहित्यांत झालेला आमच्या ध्यानांत आहे. 'काँग्रेसचें राजकारण कासोटाफेड्र आहे' ह्या अण्णासाहेबांनीं काँग्रेसवर केलेल्या आरोपाचा अर्थ आम्हीं निराळ्या दृष्टीनें घेत होतों; पण दाबके ह्यांनीं अण्णासाहेबांच्या त्या भयंकर शब्दावर निराळाच प्रकाश पाडलेला आहे. ते म्हणाले, "आमच्या महाराष्ट्रीय महिलांची कासोटा नेसण्याची पद्धत

फार चांगली आहे. पण अलीकडे विकच्छ नेसण्याची पद्धत रूढ होत चाललेली आहे हें वाईट आहे. हा विकच्छ नेसण्याचा प्रघात १९३०च्या चळवळीमध्यें देश-सेविका केशरी नेसूं लागल्या तेव्हांपासून सुरू झाला आहे. तेव्हांपासून महाराष्ट्रीय महिलांच्या नेसण्यांतील कासोटा नष्ट झाला आहे!" म्हणजे महाराष्ट्रीय महिलांचा कासोटा कॉंग्रेसनें सोडला असा भयंकर आरोप दाबके ह्यांनीं कॉंग्रेसवर केलेला आहे! पुण्या-मुंबईला किंवा महाराष्ट्रांतील कोणत्याहि शहरांत सध्यां मुली आणि तरुणी बिनकासोट्याचीं पातळें नेसून फिरत असतात ही काय कॉंग्रेसची कामगिरी आहे? गेल्या पंचवीस वर्षांत स्त्री-पुरुषांच्या पोषाकांत जी आमूलाग्र क्रान्ति झाली आहे, ती कोणी केली? तरुणांनीं धोतरें सोडलीं अन् चोळणे घातले, स्त्रियांनीं लुगडीं टाकलीं अन् पातळें घेतलीं ह्याचें श्रेय कोणाला? ही काळाची प्रगति आहे. हा सोइस्कर आणि समंजस सुधारणेचा समाजजीवनावरील परिणाम आहे! हिंदुस्थानचें राजकारण ब्रिटिश सरकारशीं लढविणाऱ्या कॉंग्रेसचा आणि ह्या वेषभूषेच्या क्रान्तीचा संबंध काय? नऊवारी लुगडें जड असतें, त्याचा रंग धुऊन तावडतोब मळकट आणि कळकट होतो, नेसतांना त्याचा बोंगा होतो. त्यापेक्षां पातळ हलकें, सुटसुटीत, रंगीत आणि आकर्षक असतें म्हणून, हल्लींच्या मुली आणि तरुणी विकच्छ पातळें नेसतात हें न कळण्याइतकें दाबके निर्बुद्ध आहेत काय? पातळ नेसण्याचें सुख आणि सोय काय असते हें दाबके ह्यांच्या घरांतली एखादी चिमुरडी पोरदेखील सांगूं शकेल! असें असतांना लुगड्याचं अवजड जडजोखीम स्त्रियांनीं अंगावर कां घ्यायचें—तर त्या पद्धतीनें कासोटा घेतां येतो म्हणून! रा. दाबके ह्यांना हें कासोट्याचें लुगडें नेसवून काळबादेवी रस्त्यावर एक दिवसभर हिंडवायला पाहिजे म्हणजे कळेल त्यांना कासोट्याची गंमत!

## वेलणकरांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार

ह्याच 'चित्तपावन संमेलनां'त सांगलीच्या 'गजानन मिल्स'चे मालक श्री. वेलणकर हजर होते. महाराष्ट्रांत पातळें अत्यंत स्वस्त, सुंदर आणि लोकप्रिय करण्याचें श्रेय वेलणकर ह्यांना आहे. दाबके ह्यांचे हे शब्द ऐकून पातळांचे पुरस्कर्ते वेलणकर यांचा अभिमान कसा पातळ पडला! "दाबके, तो लुगड्याचा आणि कासोट्याचा काळ गेला; आतां हें विसावें शतक आहे

मेहेरबान!" अशा कानपिचक्या वेलणकर ह्यांनीं दाबके ह्यांना त्या सभेंत कां दिल्या नाहींत! पण तें शक्य नव्हतें! कारण दोघेहि पडले चित्तपावन! दोघांचीं चित्तें अत्यंत पावन होतीं, म्हणून कोणीहि कोणाला कांहींच बोललें नाहीं! चित्तपावन भगिनींनीं कासोट्याचीं लुगडीं नेसावींत असा प्रसार करण्यासाठीं 'चित्तपावन संमेलना'नें जर एखादी पोटकमिटी नेमली असती तर त्या कमिटीचें अध्यक्षस्थान पातळांचे पुरस्कर्ते रा. वेलणकर ह्यांनीं आनंदानें स्वीकारलें असतें! त्यांची 'गजानन मिल' इकडे हजारों पातळें निर्माण करीत असतांना, तिकडे रा. वेलणकर ह्यांनीं त्या पोटकमिटीचे अध्यक्ष ह्या नात्यानें आपल्या भागिनींना सांगितलें असतें कीं, "भगिनींनो, कासोटे घट्ट घालतां यावेत म्हणून तुम्ही लुगडींच नेसा!" केवळ 'चित्तपावन संमेलनां'त भाग घेतला म्हणून रा. वेलणकर ह्यांना हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागला असता! म्हणूनच आम्ही 'जातीय संमेलनें' अनिष्ट म्हणतों! दाबके म्हणतात कीं, कॉंग्रेसनें महाराष्ट्रीय महिलांच्या कासोट्यावर प्रहार केला आणि ती प्रथा मोडली. नुसतें उत्तराला उत्तरच द्यावयाचें म्हटलें तर आम्हांलाहि असें म्हणतां येईल कीं, "दाबके, हा उद्योग कॉंग्रेसनें केलेला नाहीं." हा उद्योग तुमच्याच एका चित्तपावन बंधूनें– पातळांचा महाराष्ट्रांत प्रचंड प्रसार करणाऱ्या गजानन मिलसचे रा. वेलणकर ह्यांनींच–केलेला आहे. अण्णासाहेब भोपटकर म्हणतात, "कॉंग्रेसचें राजकारण कासोटाफेड्र आहे!" आम्ही म्हणतों "वेलणकरांचा व्यापार कासोटाफेड्र आहे!" म्हणून चित्तपावन संमेलनांत जशा अनेक पराक्रमी चित्तपावनांचीं अभिनंदनें झालीं तसा ह्याहि 'पराक्रमी' चित्तपावनाचा निषेध त्याच संमेलनांत व्हावयाला पाहिजे होता.

## बायकांचे कासोटे आणि नीति

वास्तविक कासोट्याचें लुगडें नेसावें का बिनकासोट्याचें पातळ नेसावें हा प्रश्न वैयक्तिक सोईचा, सुखाचा आणि अभिरुचीचा आहे. मला स्वतःला दोन्हीहि पद्धति आवडतात. पण त्याबद्दल एवढें जाहीर अकांडतांडव करण्याचें कांहींच कारण नव्हतें. 'चित्तपावन संमेलनां'त रा. दाबके ह्यांनीं तर चित्तपावन भगिनींना नुसती अशी विनंति केली असती कीं, "आपलीं लुगडीं नेसण्याची कोंकणस्थी घरंदाज पद्धत मला फार आवडते. आपण ह्या दृष्टीनें

विचार करावा!" तर कोणाला कांहींच बोलावयाचें कारण नव्हतें. पण रा. दाबके ह्यांनीं **स्त्रियांच्या नीतीचा आणि कासोट्याचा जो** बादरायण-संबंध **लावला** त्यामुळें त्यांचे हे भयंकर शब्द महाराष्ट्राच्या निदर्शनाला मुद्दाम आणणें हें आमचें कर्तव्य झालें. रा. दाबके म्हणाले, "चांगल्या नीतिमान् माणसास 'कासोट्याचा बळकट' असें म्हणण्याची पद्धति आहे. पुरुषांविषयींची ही गोष्ट, तर स्त्रियांच्यासंबंधीं ही बाबत किती बळकट असली पाहिजे!" म्हणजे बायकांनीं कासोटा घालणें ही केवळ आपली महाराष्ट्रीय पद्धति म्हणून रा. दाबके त्या पद्धतीचें समर्थन करीत नाहींत, तर '**बायकांनीं कासोटा घट्ट घातल्याशिवाय त्यांची नीति बळकट राहणार नाहीं!**' असा जो अर्थ रा. दाबके ह्यांनीं सुचविण्याचा प्रयत्न केला आहे तो अत्यंत अधम-पणाचा आणि क्षुद्र मनाचा आहे! ज्या बायका कासोटा घालीत नाहींत त्यांची नीति सैल असते असें दाबके ह्यांना म्हणावयाचें आहे? आमच्या शेकडों मुलीबाळी, बहिणी, स्त्रिया आज बिनकासोट्याचीं पातळें नेसून वावरतात; त्यांची नीति बळकट नाहीं असें म्हणावयाची रा. दाबके ह्यांची छाती आहे काय? आमच्या लाखों ब्राह्मणेतर भगिनी आज शेंकडों वर्षे बिन-कासोट्याचीं लुगडीं नेसत आल्या आहेत, त्यांची नीति ढिली आहे असें दाबके ह्यांना म्हणण्याचें धैर्य आहे काय? म्हणूनच सुरुवातीला मीं म्हटलें कीं 'दाबके, हे शब्द तुम्ही चित्तपावन संमेलनांत काढले तेंच ठीक झालें. बाहेरच्या हिंदु समाजांत हे उद्गार तुम्हीं काढले असते, तर श्रोत्यांनीं तुमचा कासोटा शाबूत ठेवला नसता!'

## मिशांचा आणि पौरुषाचा संबंध काय?

दाबके ह्यांच्यासारख्या जीर्ण आणि प्रतिगामी विचारसरणीची सनातनी मंडळी महाराष्ट्राच्या दुर्दैवानें अजून पुष्कळच हयात आहेत. आहाराचा, वस्त्राचा, पोषाकाचा आणि बाह्यसाधनांचा संबंध थेट नीतीशीं आणि धर्माशीं नेमका नेऊन भिडविण्याची ही पद्धति जुनी आहे! शेंडीचा, गंधाचा आणि जानव्याचा हिंदु धर्माशीं काय संबंध आहे? शाकाहाराचें आणि ब्राह्मण्याचें काय नातें आहे? इराण्याच्या किंवा ख्रिस्त्याच्या हॉटेलांत जाऊन अंड्याचीं ऑमलेटें किंवा मटनाचे रुचकर व ताकदवान पदार्थ आम्ही अलीकडचे ब्राह्मण

लोक खातों. डॉ. मुंजे खातात,— दे. भ. अण्णासाहेब भोपटकर खातात,— अन् मी देखील खातों.—आमचें ब्राह्मण्य रा. भाऊसाहेब लवाटे, रा. भाऊसाहेब भोपटकर, धर्मवीर डावरे ह्यांच्या ब्राह्मण्यापेक्षां रतिभर कमी आहे असें स्वप्नांत देखील माझ्या मनांत येत नाहीं. आमच्या पोटांत काय जातें ह्यावरच जो धर्म आणि जी नीति अवलंबून राहते तिची फारशी पर्वा करण्याचें आम्हांला कारण नाहीं! त्याचप्रमाणें कोण कसा पोषाक करतो ह्यावर का त्या स्त्रीची किंवा पुरुषाची नीति अवलंबून असते? कासोट्याचा अन् नीतीचा जर एवढा कार्यकारणभाव असता तर मागील पिढींतल्या बहुतेक सर्व वेश्या कासोट्यांचीं लुगडींच नेसत होत्या, मग त्यांचीं नांवें पंचपतिव्रतांच्या यादींत कुठें आलीं नाहींत तीं? कासोटा घालणारी स्त्री तेवढी नीतिमान् ह्या न्यायानें लंगोट घालणारा पुरुष तेवढा ब्रह्मचारी आणि नीतिमान्; विजारी अन् चोळणे घालणारे पुरुष म्हणजे—नीतीचा निकालच! असेंच समजायला हवें. ज्याच्या ओठावर भरपूर मिशा असतात तोच तेवढा पुरुष! बाकीचे मिशा साफ बोडणारे पुरुष म्हणजे नांवाचेच पुरुष समजायला पाहिजेत! ज्याला भरपूर दाढी आहे तो तेवढा पवित्र आणि सज्जन; आणि ज्याला दाढी नाहीं त्याचा आणि पावित्र्याचा केसभरहि संबंध नाहीं, असेंहि ह्यापुढें जाऊन म्हणायला पाहिजे! एवंच, ह्याच कार्यकारणभावपद्धतीनें जर जीवनाचा आपण विचार करूं लागलों किंवा ह्याच विचारसरणीनें आपण समाजाची पुनर्घटना करूं लागलों, तर ढोंगी आणि भोंदू लोकांनीं समाज बुजबुजून जाईल आणि प्रामाणिक नि सज्जन लोकांना जगांत जगणें अशक्य होईल. कासोट्याचीं लुगडीं नेसून वेश्या समाजांत वावरावयाला लागतील, लंगोटबंद पहिलवान ब्रह्मचर्यावर व्याख्यानें देत हिंडतील व नुसत्या मिशांना पीळ भरून लोक आपल्या पुरुषार्थाचे पराक्रम वर्णन करतील; आणि शुभ्र दाढीच्या आधारावर डाकू लोक दिवसाढवळ्या तुमचे आमचे गळे कापतील! मिशांचा आणि पौरुषाचा किंवा दाढीचा आणि पावित्र्याचा संबंध असता, तर प्रत्येक मिशाळ बोका आणि दाढीवाला बोकड हा पुरुषार्थाचा नि पावित्र्याचा नमुना म्हणून समजला गेला असता, नुसत्या लांबरुंद कासोट्यावर जर नीतीची लांबीरुंदी अवलंबून असती; तर कोणत्याहि पोकळ कासोट्याच्या पायघोळ संतानें आपल्या कासोट्याचें तीर्थ जनतेला सदैव प्यावयाला लावलें असतें. नाहीं—नाहीं—

कासोट्याचा आणि नीतीचा, लंगोटाचा आणि ब्रह्मचर्याचा, मिशांचा आणि पौरुषाचा, खाण्याचा आणि धर्माचा काडीमात्र संबंध नाहीं. महाराष्ट्रांतली ही प्रतिगामी जीर्ण सनातनी वृत्ति नाहींशी झाल्याशिवाय प्रामाणिक आणि समजूतदार नीतीचें वातावरण निर्माण व्हावयाचें नाहीं.

म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, 'भगिनींनो, कासोटे घट्ट ठेवा!' हें म्हणणें निव्वळ ढोंग आहे, हें निव्वळ थोतांड आहे, हा निव्वळ दांभिकपणा आहे! कासोट्याचा आणि नीतीचा कांहीं एक संबंध नाहीं.

# ज्ञातीय संस्था व बेकारी १३

## बेकारीचा बळी

पुण्यांतील अभ्यंकर नांवाच्या एका तरुण वकिलानें परिस्थितीला कंटाळून आत्महत्या केल्याची बातमी कांहीं दिवसांपूर्वी वाचून माझ्या मनाला धक्का बसला. बिचाऱ्या अभ्यंकरांना तरुण पत्नी आणि दोन-तीन चिमुकलीं मुलें आहेत असें म्हणतात! चांगल्या शिकल्यासवरलेल्या लोकांना सध्यांच्या कठीण काळांत असा प्रसंग यावा यावरून सध्यांच्या बिकट परिस्थितीची कुणालाहि कल्पना येईल. आयुष्यांत अपयश मिळालेले दुर्दैवी लोक समाजाला नकोसे असतात कीं काय न कळे! त्यांना पोटभर भाकरी मिळाली नाहीं तरी त्यांची पोटभर चेष्टा करून त्यांना हिणविणारे 'यशस्वी' हरीचे लाल समाजांत अनेक आहेत. सहानुभूतिशून्य वातावरणांत या भाग्यहीन लोकांचें आयुःपथावर कष्टानें पडणारें पाऊल पाहून त्यांच्याशीं समरस होण्याइतके कष्ट समाजांतील खुशालचेंडू लोक घेत नाहींत. परवां येथें चित्तपावन लोकांचें संमेलन झालें त्या वेळीं स्त्रियांच्या घट्ट कासोटयाच्या प्रश्नाच्या कच्छपीं लागणाऱ्या कांहीं निर्लज्ज वक्त्यांनीं

नीतिबाजीवर जें दुष्ट प्रवचन श्रोत्यांना सुनविलें त्यांना परलोकच्या प्रवासाचें अकालीं प्रस्थान ठेवणाऱ्या अभ्यंकरांसारखा भाग्यहीन जीवांचें सोयरसुतक अर्थातच नाहीं असें मला वाटतें. मदतीचा आणि सहानुभूतीचा हात देऊन अकालीं मरणाच्या मगरमिठींतून समाजांतील लाचार लोकांना वांचवून त्यांच्या बायकामुलांचा दुवा घेण्याचें ज्ञातिनिष्ठ संस्थांचें कार्य नाहीं अशी उपरोक्त लोकांची समजूत झाली असल्यास मला नवल वाटायचें नाहीं. ज्ञातिविशिष्ट संघटनेच्या मी विरुद्ध आहे हें आतां तरी सांगण्याचें कारण नाहीं. परंतु अशी संस्था काढण्याची खुमखुम ज्ञातिप्रेमानें अंध झालेल्या लोकांना असेल तर विनाकारण फालतु लंबेचौडे ठराव पास करण्यापेक्षां जातींतील गरिबीचा विचार होऊन त्यावर प्रेमानें फुंकर मारण्याचा प्रयत्न झाला तर भविष्यकालांतील आत्महत्या तरी वांचतील. परंतु कांहीं सुखवस्तु शिष्टांना नीतिबाजीचें वेड लागल्यानें घट्ट कासोट्यापलीकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. मुलींनीं पायांत चप्पल घातली कीं या शिष्टांची तळपायाची आग मस्तकाला जाते. तरुणींनीं पाठीवर शेपटे सोडले तर सौन्दर्याच्या अशा मारेकऱ्यांच्या अंगावरील केस भीतीनें ताठ उभे राहतात. बायकांनीं डोक्यांत ताजीं फुलें घातलीं कीं, अशांच्या तोंडांचें निर्माल्य होतें. नीति! नीति!! नीति!!! जणूं काय आमच्या स्त्रियांना स्वतःची नीतिमत्ता राखतां येतच नाहीं.

## उपाशीपोटीं व्याख्यानें नकोत

उपाशीपोटी असलेल्या समाजाला नीतीवरचीं व्याख्यानें पचणें शक्य नसतें. उरांत धडकी भरण्याइतकी कोणत्याहि समाजाची नीति अद्याप बिघडलेली नाहीं. समाजांतील कांहीं सुखवस्तु शिष्टांनीं गर्भगळित होण्याइतकें बायकांनीं तांळतंत्र आज सोडलेलें नाहीं; परंतु प्रत्येक समाजाची आर्थिक स्थिति मात्र आज इतकी खालावलेली आहे कीं, तिचा विचार समाजांतील शिष्ट लोकांनीं आधीं करायला हवा. गरीबांना प्रत्यक्ष मदत करणें शक्य नसलें तरी समाजानें त्याच्याशीं प्रेमानें आणि सहानुभूतीनें वर्तन ठेवलें तरी, आपल्या लाडक्या बायकामुलांना पृथ्वीतलावर असहाय स्थितींत टाकून त्यांना स्वर्गलोकांत जाण्याची इच्छा होणार नाहीं. परंतु प्रत्येकानें हड्-हड् केलें तर आत्महत्येखेरीज

दुसरा मार्गच गरीबांना उरत नाहीं हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. मरणाची हिंमत नाहीं म्हणून मृतवत् जीवन कंठणारे हजारों लोक आज प्रत्येक समाजांत आहेत. त्यांच्या पोटाचा प्रश्न शिष्टांनीं सोडविला नाहीं तोंपर्यंत नीतीचीं तत्त्वें त्यांना वेळीं-अवेळीं चारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पोटाची आग शमविण्याची ज्या नीतितत्त्वांना आज ताकद नाहीं, त्या तत्त्वांना आग लावा असेंच म्हणण्याची प्रवृत्ति गरीबीनें गांजलेल्या लोकांची झाली तर त्यांत त्यांचा दोष नव्हे. पोटाचा प्रश्न नीट सुटला तर नीति आणि दानत आपोआपच सुधारते, त्यासाठीं व्यासपीठावरून व्याख्यानें देण्याची आवश्यकता खासच नाहीं. आणि समाजाच्या नीतीची सर्व जबाबदारी फक्त स्त्रीवर्गावर टाकून, पुरुषांना मात्र घट्ट कासोट्याचाहि दंडक दाबक्यांनीं ठेवला नाहीं याचें मात्र कुणालाहि आश्चर्य वाटल्यासारखें दिसत नाहीं. विकच्छ पातळ जर अश्लील आणि नीतीला हानिकारक आहे, तर वेळ आल्यावर कमरेचें सोडून डोक्याला झटकन् गुंडाळायला सोईचें असें धोतर तरी श्लील आणि नीतीला पोषक कसें होणार? या सर्व गोष्टींचा नीट विचार करून ज्ञातिनिष्ठ संस्थांनीं आपापल्या समाजांतील गरीबीचा प्रश्न हातीं घ्यावा आणि अडचणींत सापडलेल्या मानी माणसांना मदत करून आत्महत्येचा प्रसंग शक्य तों कुणावरहि येणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी.

## पुण्याची हवा

पुण्याची हवा आजकाल 'केसरी'च्या अग्रलेखाप्रमाणें चमत्कारिक झाली आहे. गेल्या आठवड्यांत नागपूरच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वीं पुण्याच्या हवेचा एकंदर नूर पाहून सध्यांच्या वऱ्हाड-नागपूरच्या दौऱ्यांत फारसा त्रास होईल असें मला वाटत नाहीं. मी नागपूरला पोंचतांच मला माझ्या एका रसिक वऱ्हाडी मित्राचें पुढीलप्रमाणें पत्र आलें. 'वऱ्हाडांतून मी येथें आल्यावर आगींतून निघून फुपाट्यांत पडल्यासारखें मला वाटतें आहे. बाहेरगांवचे लोक या महिन्यांतच हवा 'खाण्यासाठीं' पुण्यांत धडपडत कां येतात याचें मला आश्चर्य वाटतें. एखादा मुकादम इतरांना ज्याप्रमाणें मुका दम देतो त्याचप्रमाणें आकाशांतील ढगांनींहि पुणेंकरांना विनाकारण दमदाटी देण्याचा सपाटा लावला आहे. रमणीच्या मादक स्मिताप्रमाणें विद्युल्लतेची रमणीय

चमक नयनमनोहर भासत असली तरी त्या स्मितप्रमाणें तिनें जीवाची कालवाकालव होण्याचें टळत नाहीं. पुण्याचें निसर्गरम्य सौंदर्य वाढविणारे पुण्याचे विशाल वृक्ष, पुणेकरांप्रमाणें कांहींहि चळवळ न करतां झुंभासारखे हात जोडून उभे आहेत! त्या वृक्षांवरील घरट्यांतील पांखरें आपल्या चिमण्या बाळांना पंखानें वारा घालीत हताशपणें रात्र कंठीत असतील. काव्याची निशा चढलेले कांहीं कवि ढेकणांच्या त्रासामुळें निशाचराप्रमाणें रस्त्यांतून भटकतांना पाहून मला वाचकांची कींव येऊं लागली आहे. 'घर्मबिंदुमाला शोभतसे भाला' अशा थाटांत पुण्यांतील सुवासिनी चैत्रांतील हळदीकुंकवाचे समारंभ पार पाडीत आहेत. आकाशांतील चन्द्राबिंबाप्रमाणेंच तरुणींचे मुखचंद्र निस्तेज झाले आहेत. भोपटकर-सत्कार-समारंभाला जुंपलेली शिवा-कुशांची जोडी घामाघूम होऊन रस्त्यानें पायपीट करीत असलेली परवां पाहिली. पुण्याच्या विद्वत्तेप्रमाणेंच येथील चांगल्या हवेचा जो पद्धतशीर बोभाटा तुम्ही लोक करतां याचें मात्र मला कौतुक वाटतें. येथील टिळक तलावावर स्त्रीपुरुषांची खूप गर्दी होत असते. संस्कृति-संरक्षक-मंडळ आणि कृष्णराव मराठे वगैरे मंडळी हे सर्व प्रकार निमूटपणें कसे पाहूं शकतात याचें मला नवल वाटतें. जेथें थेंबभरहि पाणी नाहीं असा मुंबईचा 'धोबी तलाव' आणि आपल्या या पुण्यांतील 'टिळक-तलाव' पाहिला म्हणजे 'तलाव' या शब्दाला मुंबई-पुण्याकडे कांहीं तरी निराळाच अर्थ आहे असें वाटूं लागतें. शब्दकोशकार यशवंतराव दाते भेटल्यावर या बाबतींत मी त्यांचें मत घेणार आहे..." वगैरे वगैरे. वऱ्हाडांत परत जाण्यापूर्वी पुण्या-बद्दलचें आपलें मत माझा वऱ्हाडी मित्र पूर्णपणें बदलून टाकील असा मला भरवंसा वाटतो.

## निनांवी पत्रें

मला येणाऱ्या पत्रांत बरींचशीं पत्रें निनांवी असतात; यावरून महाराष्ट्रांत सध्यां रिकामटेकडे लोक किती तरी आहेत याची नीटशी कल्पना येते. अशा पत्रलेखकांच्या वेळेला जरी किंमत नसली, तरी पोस्टाचीं तिकिटें जोंपर्यंत फुकट मिळण्याची सोय सरकारनें केली नाहीं, तोंपर्यंत माझ्या या सर्व अज्ञात मित्रांनीं या दिवसांत तरी काटकसर केल्यास अक्षरशः चार पैसे वांचविण्याचें

त्यांना पुण्य लागेल. कांहीं खमंग पत्रलेखक 'नॉट पेड' पत्रें पाठवून मला नसता भूर्दंड भरायला लावतात. परंतु त्या पत्रांच्या पोटांत साठविलेलें रहस्य समजून आल्यावर, झालेल्या करमणुकीची किंमत वाजवी होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. कांहीं पत्रें इतकीं अश्लील असतात कीं, त्यांचें नुसतें ओझरतें दर्शन जरी कृष्णराव मराठ्यांना झालें तर त्यांना खात्रीनें झीट येईल! आचार्य शब्दावर स्वतःच्या बुद्धीला झेपेल अशी एकानें कोटी करून मला त्यानें आपल्या घरीं बोलाविलें आहे. मी त्याची चांगली कणीक तिंबल्यावर मात्र त्याला पश्चात्ताप होईल हें मी जाणून आहे. 'पाक'स्थानाची कल्पना ज्या पत्रपंडितांनीं उचलून धरली असेल त्यांच्याकडे वास्तविक वरील पत्र पाठविण्यांत यावयास हवें अशी माझी माझ्या अज्ञात मित्राला सूचना आहे. एकंदरीनें निनांवी पत्रें फार गमतीचीं असतात यांत शंका नाहीं. माझ्या 'अर्धांगी' बोलपटाबद्दल एका गृहस्थानें सुंदर इंग्रजीमध्यें प्रामाणिक मत माझ्याकडे कांहीं दिवसांपूर्वी पाठविलें होतें. त्यानें आपलें नांव पत्ता कळविण्याची तकलीफ घेतली असती तर मला फार बरें वाटलें असतें. मला आलेल्या निनांवी पत्रांची छाननी केली तर त्या सर्वांची बैठक साधारणपणें विनोदावर असते हें पाहून मला फार आनंद होतो. विनोदाचें लोण महाराष्ट्रांतील सर्व ठिकाणीं पोंचावें अशी माझी फार मोठी महत्त्वाकांक्षा आहे. आणि मला शिव्या देण्याच्या निमित्तानें का होईना, पण हें कार्य सहजासहजीं झालें तर त्याबद्दल मला केव्हांहि अभिमानच वाटेल.

# प्रेमानें जग जिंकतां येतें १४

## नागपूर

मी आज हिंदुस्थानांतील एका अत्यंत गरम अशा शहरांत बसून हा मजकूर लिहीत आहे. मध्यंतरीं पावसाची एक चांगली सर येऊन गेल्यानें येथील हवेची गरम मिजास कांहींशी थंड झाली होती. पण एकंदरीनें येथील उन्हाळ्यांतील आयुष्य कठीण खरेंच. लहानपणीं भूगोल शिकतांना चिवड्यामुळें सोलापूरचें, बोरांमुळें बनारसचें आणि द्राक्षांमुळें काबूल-कंदाहारचें नांव ज्याप्रमाणें माझ्या लक्षांत सहज राहत असे, त्याप्रमाणें संत्र्यासारख्या सरस फळावरून मला नागपूरची तोंडओळख होण्यास पंचाईत पडली नाहीं. नागपूर शहर प्रशस्त असून एकंदरीनें सुंदर आहे. नारायणपेठी संस्कृतीचे अवशेष या इतिहासप्रसिद्ध शहरांत आजहि सापडत असले तरी यापुढें प्रगतिप्रिय पुरोगामी म्हणूनच हें शहर भावी इतिहासांत गाजणार आहे. हिंदी-मराठी संस्कृतींचा गोड संगम या शहरांत दृष्टीस पडतो. येथील तरुण पिढी शरीराप्रमाणें मनानेंसुद्धां धडधाकट आहे. येथें तालमीचें आणि कुस्ती मारण्याचें वेड इतकें आहे, कीं म्युनिसिपल सभांनासुद्धां एखादे वेळीं तालीमखान्याचें स्वरूप येतें असें

म्हणतात ! येथील तरुण पिढीची दिलदार आणि सकस मनोवृत्ति पाहिली म्हणजे मला फार समाधान होतें. 'केशाकर्षणा'नें तरुणांचीं मनें खेचून घेणाऱ्या, पाठीवर शेपटा सोडलेल्या मुली येथें आहेत. प्रणयाच्या चोरबाजारांतील चिजा सनातनी विरोधाला न जुमानतां आत्मसात् करणारी तरुण पिढी नागपुरांत आहे. रमणीवल्लभांना मोकळेपणानें हिंडायला महाराजबाग आहे; तसाच प्रेमभंग झालेल्या दुर्दैवी प्रणयीजनांना उदारपणानें पोटांत घेणारा तेलंखेडी तलावसुद्धां नागपुरांत आहे. ओगले, माडखोलकर, मावकर यांसारखे पट्टीचे पलपांडित या शहरांत आहेत. ( पानपट्टी खाण्याचें व्यसन नागपूरला खूपसें असल्यानें येथील सर्व लोक एका अर्थानें तरी अगदीं 'पट्टीचे' आहेत ! ) बेहेरे, पेंडसे, बनहट्टी, भवाळकर, टेकाडे, भवानीशंकर पंडित, आ. रा. आणि पु. य. देशपांडे, शंकरराव शास्त्री यांसारखे खंदे साहित्यसेवक नागपुरांत आहेत. अण्णाजी बोबडे आणि बुवा उपाध्ये यांसारखे थोर दिवंगत कवि काव्याचा नंदादीप तेवता ठेवून अजरामर झाले. वामनराव कोल्हटकर आणि अच्युतराव कोल्हटकर या सामाजिक आणि राजकीय प्रांतांतील पराक्रमी पिता-पुत्रांची जोडी याच गांवांतली. मोरूभाऊ अभ्यंकरांची मुलुखमैदान तोफ याच नागपुरांत गाजली. मुंजे खरे, केदार, डॉ. हेडगेवार, डॉक्टर चोळकर यांसारखे खंबीर सार्वजनिक कार्यकर्ते आज नागपूरला ललामभूत झालेले आहेत. विमलाबाई बेहेरे, अनसूयाबाई काळे, कुसुमावती आणि विमलाबाई देशपांडे यांच्यासारख्या समाजसेविका आणि लेखिका आज या शहरांत आहेत. चित्रकलेबरोबरच नृत्यकलेचें पाऊलहि येथें पुढें पडत आहे. आधुनिक संस्कृतीला आवश्यक असें वेड्यांचें इस्पितळहि या नागपुरांत असल्यानें त्या शहराच्या संस्कृतीबद्दल प्रश्न करणें म्हणजे शुद्ध वेडेपणाच होय असें मला वाटतें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे नागपूरच्या सुखद आठवणी माझ्या स्मृतिपटलावर कायम राहतील अशी माझी खात्री आहे.

## प्रेमानें जग जिंकतां येतें !

कांहीं दिवसांपूर्वीं एक गरीब मनुष्य दीर्घकारावासानंतर मोकळ्या जगांत वावरण्यासाठीं म्हणून तुरुंगाच्या दारांत आला. तुरुंगांत जातांना त्याला भरल्या डोळ्यांनीं निरोप देणारी त्याची घरधनीण स्मितमुखानें आपल्या

पतीचें स्वागत करायला त्या सुटकेच्या दिवशीं हजर नव्हती. बंदिवासांत जाण्यापूर्वीं त्याच्या पायांत घालण्यांत आलेल्या वज्रासारख्या कठोर शृंखलांबरोबर त्याच्या चार चिमुकल्या लेकरांचे असलेले नाजुक करपाश सुटकेच्या दिवशीं त्याला मुकले होते—अत्यंत गरिबीमुळें त्या सर्वांची वाताहत झाली होती. त्याच्या प्रेमाचें सर्व धन अशा रीतीनें नाहींसें झाल्यावर तो विचारा सुटलेला कैदी कोणत्याहि अर्थानें अक्षरशः निर्धन होऊन समाजांत आला. राहिलेलें आयुष्य प्रामाणिकपणानें घालवावें म्हणून त्या बंधमुक्त माणसानें पोटासाठीं धंदापाणी मिळविण्याची खूप खटखट केली. परंतु त्याचें गतजीवन त्याच्या आड आलें; आणि जीवनासाठीं त्याला पुन्हा चोरी करून तुरुंगांत जाणें प्राप्त झालें. समाजानें त्याचा पदोपदीं अपमान करून त्याचे पाय तुरुंगाच्या दारांत पुन्हा वळण्याची खबरदारी घेतली. जगांत एका चुकीसाठीं समाजानें एखाद्याला इतकी कडक शिक्षा खरोखरीच द्यावी का? दुर्दैवी माणसाचा समाजाच्या सहानुभूतीवर खरोखरीच हक्क नाहीं का? सर्व पापांच्या मुळाशीं गरिबी असते हें समाजाला माहीत नाहीं कां? कांहीं पापें पोटाच्या, तर कांहीं अंतःकरणाच्या तीव्र क्षुधेसाठीं माणसाच्या हातून घडतात. ही सर्व परिस्थिति लक्षांत आणून समाजानें दुर्दैवी लोकांना क्षमा करून त्यांना प्रेमानें जिंकायला हवें. प्रेमानें जग जिंकतां येतें. प्रेमानें निढावलेलें मनसुद्धां सुधारतां येतें. समाजाच्या क्षमेच्या आणि सहानुभूतीच्या अभावीं एखादा मनुष्य तुरुंगांत गेला तर त्याच दुर्दैवी जागेंत त्याला आमरण खितपत पडावें लागतें. तुरुंगाची सुधारणा व्हावी असें समाजाला वाटतें; पण अपराधी लोकांकडे पाहण्याच्या समाजाच्या दृष्टिकोनामध्यें फरक पडायला नको का? तुरुंगाला इस्पितळाचें स्वरूप येऊन बंदिवान लोकांची प्रवृत्ति सुधारावी असें समाजाला वाटतें; पण त्याच बंदिवानासाठीं समाजाचेंसुद्धां कांहीं तरी पवित्र कर्तव्य आहे याची दखलगिरी मात्र समाजाला नसावी याचें मलाहि आश्चर्य वाटतें! दुर्दैवी लोकांनाच प्रेमाची आणि सहानुभूतीची जास्त जरूरी लागते हें समाजानें विसरूं नये.

## आधुनिक संस्कृतीचा शाप

कांहीं दिवसांपूर्वीं माझ्या एका मित्रानें एक वर्तमानपत्र विकत घेतलें,

परंतु त्यांत कांहीं भयंकर आणि चटकदार बातम्या त्याला वाचायला मिळाल्या नाहींत म्हणून त्याची निराशा झाली आणि आपला एक आणा फुकट गेला म्हणून त्याला फार वाईट वाटलें. कांहीं तरी ताजी आणि चटकदार बातमी आपल्याला प्रत्यहीं समजावी हा आजच्या संस्कृतीचा आपल्याला शाप आहे. सकाळीं उठल्यावर एकादें वर्तमानपत्र समोर धरून जगाची उठाठेव केल्याशिवाय आपल्याला जगण्याला हुरूपच येत नाहीं. लढाईतील कामास आलेल्या लोकांच्या ताज्या बातमीनें आपण ताजेतवाने होऊन आपलें कांहीं वेळ तरी काम भागतें; एखादा भयंकर भूकंप वाचून आपण हादरत नाहीं; आणि रेल्वेचा अपघात कळून आपली रोजच्या कार्यक्रमाची गाडी रुळावरून घसरत नाहीं. एखादा थोर गृहस्थ हृदयाच्या विकारानें मृत्युमुखीं पडल्याची वार्ता वाचून त्याला जिवंतपणीं हृदय होतें या कल्पनेनें आपला कलिजा थंड होतो. फार काय, मोटारीच्या अपघातांत मी खतम् झाल्याची बातमी ऐकून कांहीं लोकांना त्या नवीन अनपेक्षित आणि 'चटकदार' बातमीनें थोडेसें समाधान झालें असेल आणि ती बातमी खोटी आहे हें समजल्यावर त्यांची निराशाहि झाली असेल. अशा मनोवृत्तीचे लोक स्वभावतः दुष्ट नसतात; पण सध्यांच्या धावपळीच्या आयुष्यांत ताजेपणा आणण्यासाठीं त्यांना ताज्या बातम्यांची जरूर लागत असते. ताज्या बातमीचें निशापाणी असल्याशिवाय त्यांना चैन पडत नाहीं. म्हणूनच बातम्या पिकविणारे लोक समाजांत लोकप्रिय झालेले दिसतात. मला तर पुष्कळ वेळां असें वाटतें, कीं जगांतलीं वर्तमानपत्रें बंद केलीं तर लढाया, अपघात, आत्महत्या, धरणीकंप वगैरे गोष्टींना पायबंद बसेल. खाजगी पत्रांतूनच वर्तमानपत्रांचा जन्म झाला असावा असें माझा एक मित्र मला नेहमीं सांगत असतो. त्या दृष्टीनें खाजगी पत्रेंसुद्धां कायद्यानें बंद झालीं तर अनेक भल्याबुऱ्या बातम्या आपल्या कानांवर येणार नाहींत; आणि अशानें खळखळणारा आपला आयुःप्रवाह जास्त धीरगंभीरपणानें चालू राहून आपल्याला खरोखरीची शांतता मिळेल.

---

# शांतारामबापू आणि शृंगाराचीं गटारें १५

प्रभातचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक आणि माझे सुपरिचित मित्र श्री. व्ही. शांताराम ह्यांनीं परवां 'झंकार'मध्यें एक मुलाखत दिलेली आहे. त्या मुलाखतींत साहित्य आणि चित्रपट ह्या दोन्ही विषयांसंबंधीं कांहीं महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांनीं आपलीं मतें व्यक्त केलेलीं आहेत. माझ्या माहितीप्रमाणें आणि अटकळी-प्रमाणें शांतारामबापू हे एक अत्यंत कर्तव्यनिष्ठ, महत्त्वाकांक्षी पण अबोल आणि प्रसिद्धिपराङ्मुख कलावंत आहेत. जाहिरातीचे वणवे पेटवल्याशिवाय सामान्यतः चित्रपटाचा धंदा चालत नाहीं, असें असतांहि ह्या प्रसिद्धीच्या भडाग्नीचा प्रकाश आजपर्यंत शांतारामबापूंनीं आपल्या अंगावर कधींहि पाडून घेतलेला नाहीं. क्वचित् कधींमधीं त्यांचा एखादा लेख वा मुलाखत प्रसिद्ध झालेली पाहण्यांत येते. पण सध्यां एखाद्या सिनेमा थिएटरच्या वा बोल-पटाच्या उद्घाटनप्रसंगीं त्यांचीं व्याख्यानें ऐकण्याचाहि योग येऊं लागलेला आहे ही आनंदाची गोष्ट होय. हें कार्य करीत असतां बाहेरच्या जगाची वर्दळ त्यांच्या समाधीचा भंग केल्याशिवाय राहत नाहीं. म्हणून जगाच्या दैनंदिन ठराविक कार्यक्रमाच्या कोलाहलापासून कलावंत जितका दूर राहील

तितकी त्याची कलात्मक एकतानता राहूं शकेल. हें जरी खरें, तरी हिंदुस्थानांतील चित्रपटधंद्याची सद्यःकालीन परिस्थिति पुष्कळच अपवादात्मक आहे. अशा वेळीं शांतारामबापूंसारख्या अनुभवी, तज्ज्ञ आणि दूरदर्शीच्या कलावंतांनीं वेळोवेळीं ह्या धंद्याबद्दल आपापलीं मतें स्पष्टपणें लोकांना सांगणें जरूर आहे असें मला वाटतें. आणि ह्या दृष्टीनें सदर मुलाखतीनें शांतारामबापूंनीं कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर आपलीं मतें व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे ह्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. शांतारामबापूंसारख्या अधिकारी व्यक्तींनीं चित्रपटावरील कोणत्याहि मुद्द्यावर मत व्यक्त केलें तरी तें चिंतनीय ठरेल, पण मीनाक्षीसारखी 'मॅट्रिक फेल' नटी ही जेव्हां 'अर्धांगी'तील वाङ्मयात्मक भागावर आपलें मत व्यक्त करण्याचें धाडस करते किंवा सिनेमांत शिरणाऱ्या नटीच्या कुलीनत्वावर अधिकारपूर्ण वाणीनें बोलूं शकते तेव्हां छातींत धक्का बसल्याशिवाय राहत नाहीं.

## फार हळवे

शांतारामबापूंनीं जीं कांहीं मतें सदर मुलाखतींत व्यक्त केलेलीं आहेत तीं निःसंशय चिंतनीय आहेत पण विवाद्य आहेत; आणि ह्या दृष्टीनें त्या प्रश्नाची दुसरी बाजू विस्तृतपणें मांडतां येणें शक्य आहे. टीकेच्या बाबतींत शांतारामबापू फार हळवे दिसतात. सद्धेतूनें केलेली टीका फार भरीव असेल तर ते वाचतात– आणि दुष्ट हेतूनें केलेली टीका ते शेंगाच्या फोलपटांप्रमाणें दूर भिरकावून देतात असें त्यांनीं आपल्या मुलाखतींत सांगितलें आहे. दुष्ट हेतूनें शांतारामबापूंवर टीका करण्यासारखे त्यांचे आणि माझे संबंध नाहींत हें उघडच आहे. तथापि शांतारामबापूंचा दृष्टिकोन सुधारण्याच्या हेतूनें मी हें लिहीत नाहीं, कारण ती गोष्ट आतां होणें शक्य नाहीं आणि कदाचित् तो माझा अधिकारहि नसेल ! तथापि प्रेक्षक जनतेच्या विचारासाठीं म्हणून मी ह्या वादाला थोडीशी चालना देत आहे.

## जातीचा कलावंत

जीवनाचें वातावरण समजावें व व्यक्तीच्या भावनांची ओळख व्हावी एवढ्याचपुरती कलावंतांनीं जीवनांतील अनुभवांची ओळख करून घ्यावी हें शांतारामबापूंचें मत सामान्यतः मान्य होण्यासारखें आहे. वेश्येचें जीवन

समजण्यासाठीं 'वेश्यागमनच' केलें पाहिजे, किंवा 'एकच प्याल्या'सारखें नाटक लिहिण्यासाठीं मदिरापानच केलें पाहिजे असा आग्रह कोणीच धरूं शकत नाहीं; निदान आजच्या समाजाच्या परिस्थितींत असा आग्रह जाहीरपणें तरी कोणीहि धरूं शकणार नाहीं. कारण तसा आग्रह कोणी धरला तर समाजाच्या संस्कृतीचें संरक्षण करण्यास धावळ्या आणि मुकटे नेसून बसलेली 'नीतीवाले, चारित्र्यवाले आणि कंपनी' अशा इसमाला समाजांतून हद्दपार केल्याशिवाय राहणार नाहीं. एखादा कलावंत खरेंखुरें जीवन समजून घेण्यासाठीं कोणत्या मार्गांचा अवलंब करतो ही त्याची खाजगी आणि वैयक्तिक बाब आहे. समाजाला त्याच्या ह्या वैयक्तिक गोष्टीबद्दल छाती पिटून घेण्याचें कारण नाहीं. वेश्येचें जीवन समजून घेण्यासाठीं एखाद्या कलावंतानें खरोखरच वेश्यागमन केलें तर मला त्यांत गर्ह्य आणि अनुचित कांहींच वाटावयाचें नाहीं. अर्थात् तो खराखुरा कलावंत मात्र पाहिजे. व्यसनाच्या मोहामुळें त्याच्या कलेची समाधि भग्न झाली तर तो कलावंत ठरतच नाहीं. कला ही एक योगसाधना आहे. ह्या योगसाधनेसाठीं कलावंताला विविध साधनांचा उपयोग करावा लागेल. कदाचित् हीं साधनें तत्कालीन समाजाच्या नीतिविषयक कल्पनांना मान्य होण्यासारखीं नसतील; पण त्याला नाइलाज आहे. तथापि सध्यांची सामाजिक परिस्थितीच अशी आहे कीं, ढोंगी आणि मूर्ख लोकांचें मताधिक्य असल्यानें ह्या विषयावर स्पष्टपणें आणि निर्भीडपणें मत व्यक्त करण्यापासून तादृश फायदा होणार नाहीं. म्हणून शांतारामबापूंचा ह्या विषयावरचा दृष्टिकोन व्यावहारिक आणि चालचलाऊ म्हणून मान्य करावयास कांहीं हरकत नाहीं. तथापि शांतारामबापूंच्या विचारसरणींत एक असा दोष आहे कीं, जीवनाच्या बाह्यगोष्टी म्हणजेच जीवन अशी त्यांची बहुधा समजूत असावी. 'माणूस' ह्या बोलपटांत वेश्येच्या वसतीचा भाग दाखवलेला आहे. त्यांच्या त्या माड्या, खिडक्या, जिने, जिन्यावरील म्हातारी, 'एक सिंगल-एक डब्बल' हा शब्दोच्चार हें अगदीं हुबेहुब आहे हें कोणीहि 'तज्ज्ञ' माणूस सांगूं शकेल. तथापि हें वातावरण म्हणजेच वेश्यांचें जीवन असें समीकरण जर शांतारामबापू मांडीत असतील तर तें मात्र चूक आहे. शांतारामबापू जीवनाकडे 'कॅमेरामन'च्या दृष्टीनें पाहतात. चित्रपटकलेच्या दृष्टीनें हें योग्य आहे. कारण छायाचित्त हेंच चित्रपटकलेचें

माध्यम आहे. तेव्हां चित्रणाच्या दृष्टीनें शांतारामबापूंचा दृष्टिकोन योग्य आहे. तथापि विशिष्ट जीवनाच्या मागची जी एक विचारिका ( Idealogy ) असते त्या विचारिकेचें पृथक्करण करण्याच्या दृष्टीनें मात्र शांतारामबापूंचा दृष्टिकोन अपुरा पडतो.

## वेश्येचें जीवन

'माणूस' ह्या बोलपटांत वेश्येच्या जीवनाचा बाह्य देखावा जरी हुबेहुब चित्रित केला असला, तरी वेश्येच्या जीवनाचें मानसशास्त्रीय पृथक्करण वा विश्लेषण करण्याचा कोठेंहि प्रयत्न केलेला नाहीं किंवा तसें करण्याची प्रवृत्ति देखील कोठेंहि दाखविलेली नाहीं. बोलपटाची नायिका ( किंवा नायकीण म्हटलें तरी चालेल ) मैना हिचें खरेंखुरें प्रेम एका पोलीस शिपायावर बसतें. तिला आपल्या निंद्य जीवनाचा वीट आलेला असतो. त्या घाणेरड्या वातावरणांतून बाहेर येण्याची तिची मनापासून इच्छा असते. तिच्या प्रियकराचेंहि तिच्यावर प्रेम असतें. किंबहुना लग्न करण्याचीहि त्याची तयारी असते आणि त्या हेतूनें तो तिला आपल्या घरींहि घेऊन येतो. येथपर्यंत सर्व ठीक आहे. पण येथून पुढचा कथाभाग विचारांत घेतला म्हणजे शांतारामबापूंची विचारसरणी ही प्रतिगामी स्वरूपाची म्हणजे ठराविक, रूढ आणि पारंपरिक साच्याची आहे हें स्पष्ट दिसून येतें. मैनाचें आणि त्या शिपायाचें लग्न कां होऊं शकत नाहीं ? तर जगदंबा देवता क्रुद्ध झाल्यासारखी मैनेला दिसते व पोथीचीं पानें सैरावैरा उडूं लागतात, हेंच कारण काय ? पावित्र्याचा जो ढोंगी बागुलबोवा समाजानें उभा केलेला आहे तो शांताराम-बापू गृहीत धरतात आणि मैनेला त्या घरांतून बाहेर काढतात. म्हणजे एखाद्या वेश्येला आपला उद्धार करण्याची जर इच्छा झाली आणि सन्मान्य संसारांत प्रतिष्ठित होण्याचा जर तिनें प्रामाणिक प्रयत्न केला, तर समाजाच्या आणि कुटुंबाच्या पावित्र्याच्या दृष्टीनें तें शक्य आणि इष्ट नाहीं असा ह्या बोलपटाचा निष्कर्ष निघतो. एवढेंच नव्हे तर, अशा निर्दोष आणि प्रामाणिक वेश्येला प्रेमाची आणि लग्नाची लालूच दाखवून फसवणारा, पर्यायानें तिला काळ्या पाण्यावर पाठविण्यास कारणीभूत होणारा, आणि स्वतः मात्र फिरून

राजरोसपणें संसारांत पडणारा नायक जेव्हां 'जीवन हें जगण्यासाठीं आहे!' अशी घोषणा करतो तेव्हां हास्यास्पदतेची परमावधि होते.

## जीवनाचा सखोल अभ्यास

इतकें विस्तृतपणें विश्लेषण करण्याचें कारण एवढेंच कीं, शांतारामबापू म्हणतात त्याप्रमाणें जीवनाचें नुसतें बाह्य वातावरण समजून घेणें किंवा एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या भावना समजून घेणें म्हणजे जीवनाचा अभ्यास करणें असें जें त्यांचें मत आहे तें बरोबर नाहीं. जीवनाच्या विविध प्रसंगां-मागें वाहणारी जी विचारिका आहे ती अभ्यासानें, अवलोकनानें आणि चिंतनानें जर कलावंतानें समजावून घेतली नसेल तर नुसत्या बाह्य वाता-वरणाच्या अभ्यासानें व अवलोकनानें तत्त्वनिर्णय लावतां येणें शक्य नाहीं.

## प्रेमाची शास्त्रीय माहिती

शांतारामबापूंचीं कला, तंत्र आणि संस्करण जरी अद्ययावत् आणि चक-चकीत असलीं, तरी त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि मात्र पुरोगामी नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. चित्रपटाचे आणि साहित्याचे परस्परसंबंध किती जिव्हाळ्याचे आहेत हें त्यांना माहीत आहे. असें असतां वाङ्मयशास्त्राचीं सर्वसामान्य तत्त्वें त्यांना माहीत नसावींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. साहित्यांत आणि कलेंत स्पष्टपणें तत्त्व वा तात्पर्य सांगणें ही गोष्ट दूषणीय म्हणून समजली जाते. कला ही सूचनात्मक असली पाहिजे हा सर्वमान्य सिद्धान्त म्हणून आज समजला जातो. बंगाली बोलपटांविरुद्ध शांतारामबापूंचें असें मत आहे कीं, (१) त्यांचीं कथानकें प्रेमविषयक असतात; आणि (२) त्यांच्या बोलपटांतील तत्त्वज्ञान संदिग्ध वा अस्पष्ट असतें. कथानक प्रेमविष-यक असणें हा त्या कथानकाचा दोष आहे हा आक्षेप अत्यंत पोरकट आणि हास्यास्पद होय. शांतारामबापूंना प्रेमाचें एवढें कां पथ्य आहे हें कळत नाहीं! 'माणूस' ह्या बोलपटांत त्यांनीं बंगाली प्रेमगीताचें विडंबन करण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न केलेला आहे. (अर्थात् हा बहुधा सद्धेतूनें केलेला असावा असें वाटतें!) जीवनांत प्रेमाचें स्थान काय आहे हें शांतारामबापूंना माहीत नाहीं असें मानण्याइतकें आम्ही मूर्ख नाहीं. अर्थात् त्यांच्या वरकरणी

समजुतीसाठीं पाहिजे असेल तर आम्ही 'प्रेम' ह्या विषयाची शास्त्रीय माहिती त्यांना व्याख्यानरूपानें द्यावयास तयार आहोंत.

## बापूंच्या पोरकट कोट्या

प्रेमाप्रमाणेंच शृंगार हा त्यांचा दुसरा शत्रु आहे असें वाटतें. माझ्या एका मुलखातींत 'चित्रपटांत तरी उपदेशांच्या पाणपोया नकोत; कारण समाजांत निरनिराळ्या ठिकाणीं त्या आधींच उघडल्या गेल्या आहेत!' असें मीं विधान केलें होतें. त्या विधानांतलि 'पाणपोया' ह्या शब्दावर शांतारामबापू ह्यांनीं कोट्या करण्याचा पोरकट प्रयत्न केलेला आहे. ते म्हणतात, 'चित्रपटांत सर्व रसांच्या पाणपोया हव्यात!' मग मीं काय चित्रपटांत आंबरसाच्या पाणपोया असाव्यात असें सांगितलें आहे? शांतारामबापूंचें शेवटचें विधान असें आहे कीं, 'चित्रपटांत शृंगाराचीं गटारें असतां कामा नयेत!' 'शृंगाराचीं गटारें' हा शब्दप्रयोग करणाऱ्या व्यक्तीची मनोभूमिका कुजकट आणि दूषित असली पाहिजे. शांतारामबापू, शृंगाराचें गटार कधींच होऊं शकत नाहीं! शृंगार ही इतकी आरोग्यपूर्ण, पवित्र आणि आनंददायक चीज आहे, कीं तिचें गटार होऊं शकतें असें म्हणणाऱ्या माणसाला 'शृंगार' ह्या शब्दाचा अर्थ आणि व्याप्ति कळली नाहीं असेंच दुःखानें म्हणावें लागतें.

## शृंगार आणि गटार

'शृंगार' हा शब्दच इतका सुंदर आहे, कीं त्याच्या शेजारीं 'गटार' हा शब्द बसविणाऱ्या माणसाला साधी सौंदर्यसमीक्षाशक्ति नसावी असेंच म्हणावें लागेल. बासुंदी आणि बोंबील, प्रो. फडके आणि तारुण्य, वसंतराव मराठे आणि सौंदर्य हे शब्दप्रयोग जितके अशक्य आणि दुष्ट आहेत; तितकाच 'शृंगार आणि गटार' हा शब्दप्रयोग तिरस्करणीय आहे. फुलांचा उकिरडा व काव्याचें खत जर होऊं शकलें, तरच शृंगाराचें गटार होऊं शकेल. 'शृंगाराचीं गटारें चित्रपटांत नकोत!' ही वाणी शांतारामबापूंच्या मुखांतून एखादा कृष्णराव मराठे वा संस्कृतिसंरक्षणवालाच काढीत आहे किंवा काय असें वाटतें. शृंगाराचीं गटारें कोणाच्या चित्रपटांत आहेत? बंगाली चित्रपटांत आहेत? एखाद्या महाराष्ट्रीय चित्रपटांत आहेत? शांतारामबापूंनीं तसा स्पष्ट

आरोप करावा हवा तर, म्हणजे त्याचा योग्य समाचार येतां येईल. अरेरे! प्रेम आणि शृंगार ह्या विषयावर शांतारामबापूंचीं मतें इतकीं प्रतिगामी, सनातनी आणि मागासलेलीं असावींत ह्याबद्दल आम्हांला अत्यंत दुःख होतें. शांतारामबापू थोर आणि कर्तबगार कलावंत आहेत, त्यांच्या कलानैपुण्यानें अखिल भारताला वेड लावलेलें आहे, हें सर्व खरें आहे. तें आम्हांलाहि मान्य आहे. ह्याहीपेक्षां श्रेष्ठ कलाकृति निर्माण करून ते लाखों प्रेक्षकांना आत्मसात् करतील ह्याविषयीं आम्हांला पूर्ण भरंवसा आहे. पण 'प्रेम आणि शृंगार' ह्यांना अस्पृश्य समजून त्यांना आपल्या स्टूडिओबाहेर जोंपर्यंत शांतारामबापू ठेवणार आहेत तोंपर्यंत लाखों तरुणांचीं आणि तरुणींचीं अंतःकरणें तें कधींच काबीज करूं शकणार नाहींत हें त्यांनीं पक्कें समजून ठेवावें.

# 'खेळाडू गुंड व्हा'
# 'सख्याहरी'चा तरुण पिढीला
# तेजस्वी संदेश १६

अखेरशेवटीं 'सख्याहरि' आला! मुंबईचा सख्याहरि पुण्याला आला! आणि आतां महाराष्ट्रांत संचाराला निघाला! साप्ताहिक वृत्तपत्र-सृष्टींत धुमाकूळ उडवून देणारा सख्याहरि आतां साहित्यसृष्टिवर स्वारी करावयाला निघाला! सख्याहरि म्हटलें कीं ढोंगी सनातनी लोकांच्या छातींत धसका बसतो! पेन्शनर लोकांच्या घशांत बेडका अडकतो! तरुण वयांत आत्याबाई आणि काकूबाई बनलेल्या अविवाहित स्त्रिया कावऱ्याबावऱ्या होऊन पाहूं लागतात! पण जगण्यांत ज्यांना आनंद वाटतो अशा हजारों तरुण-तरुणींच्या कानांवर 'सख्याहरि' हें नांव पडतांच त्यांच्या काळजांत हर्षाचा चोरटा आणि तरल रोमांच उठतो! 'सख्याहरि' म्हटल्यानंतर लावणी वाङ्मयांतील शृंगारसंगीताशीं परिचित असलेल्या असंख्य मराठी बहुजन समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा चेहरा प्रफुल्लित झाल्याविना राहत नाहीं! कारण, सख्याहरि म्हणजे तारुण्य! सख्याहरि म्हणजे रंगेलपणा! सख्याहरि म्हणजे मस्ती आणि धुंदी! सख्याहरि म्हणजे उन्माद! सख्याहरि म्हणजे शृंगाराचा बादशाह! सख्याहरि म्हणजे जीवनाच्या जोबनवंतीवर तख्तनशीन झालेला

शहानशहा! सख्याहरीची ही निशा हिंदु मनावर हजारों वर्षांपासून नाचत आहे. कारण, सख्याहरीचा जन्म गोकुळांत झाला. यमुनेच्या कांठावर रासक्रीडा खेळतां खेळतां बेभान झालेल्या व्रजयुवतींनीं धुंद नेत्रांनीं त्या श्यामल कृष्णकन्हय्याला जेव्हां 'सख्याहरि' म्हणून हाक मारली, कुंजवनांतील शिलातलावर मुरलीचे सूर आळवीत बसलेल्या मुरलीधराच्या खांद्यावर बेहोष होऊन मान टाकतांना राधिकेच्या थरथरत्या ओठांतून जेव्हां 'सख्याहरि' असे शब्द निघाले, तेव्हांच आर्यावर्तांत खऱ्या शृंगाराचा जन्म झाला; आणि तेव्हांपासूनच 'सख्याहरी'ला शृंगाराच्या सर्व संबोधनाचें पुढारीपण मिळालें. तेव्हांपासूनच कृष्ण हा तरुणांचा देव झाला व म्हातारे नि पेन्शनर लोक मारुतीची पूजा करावयाला लागले.

म्हाताऱ्यांना वाटतें कीं, श्रीकृष्ण राक्षसांशीं कुस्त्या खेळला आणि शेवटीं कुरुक्षेत्रावर त्यानें धाबळी नेसून भगवद्गीता सांगितली. असें जर कृष्णाचें स्वरूप असतें तर त्याला 'हरि, हरि' कृष्ण असें म्हटलें गेलें असतें. पण कृष्ण हा 'सख्याहरि' आहे. 'हरि-हरि' नाहीं. शृंगारावांचून जीवनांत पुरुषार्थाचे पराक्रम होऊं शकत नाहींत, हा तेजस्वी संदेश आर्यावर्तांतील तरुणांना ह्याच 'सख्याहरी'नें दिलेला आहे. श्रीकृष्ण हा गवळ्यांचा, शेतकऱ्यांचा किंबहुना बहुजनसमाजाचा देव असल्यानें, हजारों वर्षें जनतेच्या ओठांवर खेळत आलेली शृंगारिक कविता ही ह्या 'सख्याहरि' कृष्णाला वाहिलेली आहे. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास 'सख्याहरि हा लावणी वाङ्मयाचा नायक आहे. अडाणी, अशिक्षित कामकरी बहुजन-समाजाला 'सख्याहरि' हा पूर्ण परिचयाचा आहे– मात्र दिवसेंदिवस अधिका-धिक ढोंगी बनत चाललेल्या सुशिक्षित पांढरपेशा वर्गाला 'सख्याहरी'चा चेहरा फारसा ओळखीचा वाटण्याचा संभव नाहीं. ह्या दृष्टीनें 'सख्याहरी'ची ही गद्य आणि आधुनिक अवतारांतील ओळख महाराष्ट्रांतील तथा-कथित 'सभ्य, शिष्ट' आणि संभावित म्हणून स्वतःला समजणाऱ्या पांढरपेशा वर्गाला करून देण्यांत श्री. दत्तु बांदेकर ह्यांनीं जें धाष्टर्य, प्रसंगावधान आणि चातुर्य दाखविलें त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

श्री. बांदेकरांचा हा 'सख्याहरि' जवळ जवळ वर्षापूर्वीं मुंबईच्या 'चित्रा' साप्ताहिकांत अवतीर्ण झाला. तेव्हांपासून महाराष्ट्रांत त्यानें अशी खळबळ

उडवून दिलेली आहे कीं, अच्युतराव कोल्हटकरांच्या वत्सला वहिनीनेंहि एवढी खळबळ त्या वेळीं उडवून दिलेली नसेल. तरुण आणि तरुणी मिटक्या मारीत ह्या 'सख्याहरी'चें दर्शन तर घेतातच, पण म्हातारे लोक शिव्या देत देत उपरण्याच्या आड धरून त्याला न्याहळल्याशिवाय राहत नाहींत. दोन-तीन वृत्तपत्रांतून ह्या 'सख्याहरी'चे नकली नमुनेहि प्रसिद्ध झाले; पण बांदेकरांचा 'सख्याहरि' तो 'सख्याहरी'च राहिला. शृंगाररसाच्या सरोवरांत डुंबून ओलें झालेलें आपलें साहित्य-शरीर आतां वार्धक्याच्या आणि वैराग्याच्या वाळवंटावर उभें राहून 'झंकार'च्या टॉवेलनें पुशीत प्रो. फडक्यांचा ढोंगी विघ्नसंतोषीपणा 'सख्याहरि'नेंच बाहेर काढला. 'सख्याहरी'ची 'चित्रा' साप्ताहिकांतून हकालपट्टी करण्यासाठीं प्रो. फडके ह्यांनीं आटोकाट प्रयत्न केले, त्यांत त्यांना यश आलें. पण 'सख्याहरि' कांहीं नामोहरम झाला नाहीं. तो मुंबईहून अदृश्य झाला, आणि आमच्या 'नवयुग' साप्ताहिकांत अवतीर्ण होऊन आतां प्रो. फडके ह्यांच्या मानगुटीवर राजरोसपणें जाऊन बसला.

अलीकडे महाराष्ट्रांत पांढरपेशा वर्गामध्यें एक ढोंगी पंथ निघालेला आहे. आणि सकृद्दर्शनीं तो बळावत चाललेला आहे असेंहि वाटेल. ह्या पंथांत कांहीं प्रतिगामी वृत्तीचे सुशिक्षित पदवीधर पुरुष आणि स्त्रिया, बरेचसे सनातनी, म्हातारे, भिक्षुक, पेन्शनर, इ० मारुतीचे उपासक सामील झालेले आहेत. साहित्यांत प्रेम, शृंगार, चुंबन, इत्यादि गोष्टी आल्या कीं, हे लोक झीट येऊन पडतात (किंवा तसें पडल्याचें सोंग करतात)! 'कला' हा शब्द त्यांना 'कलावंतिणी'इतका तिरस्करणीय वाटतो. नग्न, अर्धनग्न, किंवा 'ओलेती' चित्रें प्रसिद्ध होतांच समाजांतील नीति, स्वास्थ्य, ब्रह्मचर्य इत्यादि सद्गुणांवर जणूं काय बॉंबगोळा पडला म्हणून हें लोक शंखध्वनि करूं लागतात. तरुणांना जें जें आवडतें तें तें ह्यांना अश्लील, ग्राम्य, पावित्र्यभंजक आणि संस्कृतिविध्वंसक वाटतें. नाटकें, कादंबऱ्या, पटकथा, काव्यें हें ललितवाङ्मय—कीं ज्यामध्यें निर्भेळ हरिदासी थाटाचा उपदेश असूं शकत नाहीं—त्यांना कनिष्ट किंवा अधम दर्जाचें वाङ्मय वाटतें. ह्या पंथाच्या विचारसरणीची वाढ जर दिवसेंदिवस समाजांत होऊं लागली, तर समाज रूक्ष, म्हातारा आणि कर्तव्यशून्य होऊन जाईल अशी भीति मला वाटतें. एवढ्याचसाठीं समाजाचें तारुण्य, चैतन्य, रंगेलपणा, शृंगार,

विनोद आणि पराक्रम जागृत करणारें आणि शाबूत ठेवणारें वाङ्मय महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर निर्माण व्हावयाला पाहिजे अशा मताचा मी आहे. थकलेल्या आणि कुजलेल्या मेंदूला शृंगार म्हणजे अश्लीलपणा वाटतो, विनोद म्हणजे ग्राम्यपणा किंवा पाचकळपणा भासतो. 'संभावित' मनाला वात्रटपणाचें वारेंहि सहन होत नाहीं. ही दुःस्थिति नाहींशी झाली पाहिजे. महाराष्ट्रांत जातिवंत शृंगारिक आणि विनोदी वाङ्मय निर्माण व्हावयाला पाहिजे, तरच महाराष्ट्राचें पराक्रमी तारुण्य जिवंत होईल. शृंगार आणि विनोद ह्यांची महाराष्ट्राला अद्यापि पुरतीशी ओळख झालेली नाहीं. आरंभीच्या ह्या संक्रमणकाळांत एकदम विशुद्ध शृंगारिक किंवा विनोदी वाङ्मय निर्माण होणें कठीण आहे. म्हणून आरंभीं आरंभीं अश्लीलता आणि विनोदाबरोबर ग्राम्यता हीं वाङ्मयांत वाहत आलीं, तर त्यामुळें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. स्वच्छ आणि शुद्ध पाण्याचा झरा लागण्यापूर्वीं सुरुवातीला गढूळ पाणी हें यावयाचेंच. पण त्यामुळें अजीबात हें पाणीच नको म्हणून तो झरा आततायीपणानें बुजवून टाकण्याचा मूर्खपणा करण्याचें कांहींच कारण नाहीं. महाराष्ट्रांतील शृंगारिक आणि विनोदी वाङ्मयांत 'सख्याहरी'नें एक तेजस्वी भर टाकलेली आहे असें मला वाटतें. आणि म्हणून महाराष्ट्रांतील सर्व प्रामाणिक तरुणांच्या आणि तरुणींच्या वतीनें मी 'सख्याहरी'चें अंतःकरण-पूर्वक स्वागत करतों.

मीं वर सांगितलेंच आहे कीं, बांदेकरांचा हा 'सख्याहरि' लावणी वाङ्मयांतील 'सख्याहरी'चा गद्य आणि आधुनिक अवतार आहे. हा 'सख्याहरि' मुंबईच्या एखाद्या मध्यमवर्गीय सामान्य चाळींत राहतो असें दिसतें. आंबेवाडी, कांदेवाडी, चिखलवाडी इत्यादि विभागांतील चाळींचें वातावरण ज्यांना पूर्ण परिचित आहे त्यांना, 'सख्याहरी'ची ओळख ताबडतोब पटल्याशिवाय राहणार नाहीं. विसकटलेल्या केसांच्या झिंज्या कपाळावर आलेल्या, रात्रीं जागरण झाल्यामुळें (किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें) डोळे तारवटलेले, अंगांत थोडासा छिद्रायमान झालेला गंजीफ्रॉक पेहरलेला, गळ्यांत सरीसारखें जानवें घातलेलें, तलम धोतराचा पुढचा सोगा निष्काळजीपणानें खांद्यावर टाकलेला, पायांत फाटलेली वहाण, एका हातांत टमरेल आणि दुसऱ्या हातांत जळकी सिगरेट, तोंडांतून 'तुमने मुझको प्रेम सिखाया'च्या

ललकाऱ्या निघत आहेत अशा थाटांत सकाळीं सातसाडेसातचे सुमारास ही 'सख्याहरी'ची स्वारी चाळीच्या सज्जांतून नळाच्या बाजूला जातांना कोणासहि दिसून येईल; तर गोकुळांतला तो 'सख्याहरि' दिवसभर यमुनेच्या तीरावर मुक्काम करून असे. कारण, पाणी भरावयास येणाऱ्या गवळणींशीं मनमुराद थट्टामस्करी करावयाला त्याला इतकी सोइस्कर जागा दुसरी कुठें मिळणार ? त्याचप्रमाणें विसाव्या शतकांतला हा चाळकरी 'सख्या हरि' चाळींतल्या नळावर बहुधा घुटमळत असतांना दिसेल. डोक्यावर नळाची धार सोडून हा दोनदोन तास तरी आंघोळ करीत बसतो. एवढ्या वेळांत पाणी भरण्याची तो मोठ्या 'औदार्या'नें संधि देत असतो. आणि आपल्या खेळाऊ आणि मनमिळाऊ स्वभावाचे जादा प्रदर्शन करून तो आजूबाजूच्या आपल्या ओळखी वाढविण्याच्या उद्योगांत असतो.

बादेकरांच्या या 'सख्याहरी'चें शिक्षण 'आर्यन एज्युकेशन सोसायटी'च्या किंवा बाळा देशपांड्यांच्या 'मराठा हायस्कूल'मध्यें २ इयत्तांपर्यंत झालेलें असावें. तथापि मुंबईच्या वातावरणांत लहानपणापासून स्वारी मुरलेली असल्यानें त्याच्या शिक्षणाचा अभाव सकृद्दर्शनीं दिसून येण्यासारखा नाहीं. अर्थात् सख्याहरीला कोणीहि नोकरीवर ठेवणें शक्य नाहीं. एका टिकाणीं टिकून राहण्याइतकी निष्ठा आणि चिकाटी त्याच्या अंगीं असत नाहीं. त्यामुळें हा निरनिराळे धंदे करून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न करीत असतो. कधीं कधीं हा फेरीवाला बनतो आणि लुगडीं विकत चाळी-चाळींतून दुपारीं ( म्हणजे जेव्हां तिकडच्या स्वाऱ्या ऑफिसांत गुंतलेल्या असतात ! ) हिंडतो. अर्थात् सुंदर गिऱ्हाइकांकडून हा रोख कधींच घेत नसल्यामुळें ह्याचा हा धंदा लवकरच आंतबट्ट्यांत येतो. खिशांत पैसे नसले तरी हा खुशाल इराण्याच्या हॉटेलांत जातो व पैशाऐवजीं इराण्याला टोपी देऊन एखाद्या कम्यूनिस्टाप्रमाणें बोडक्यानें बाहेर येतो. सुंदर स्त्रियांच्या अंगावर पावसाळ्यांत चिखल उडवतां यावा म्हणून हा मोटार ड्रायव्हर बनण्याच्याहि कधीं विचारांत असतो. खाण्यापिण्याच्याहि बाबतींत 'सख्याहरि' हा पक्का पुरोगामी असतो. अर्थात् तो व्यसनाधीन नसतो. पण केवळ 'गमतीखातर' म्हणून तो वाटेल तें करावयाला तयार असतो. शिवरात्रीच्या दिवशीं हा माधवबागेंत भांग पिऊन जातो, गटारी अमावास्या साग्रसंगीत साजरी

करावयाला त्याची तयारी असते, साहित्यसंमेलनाची सबब सांगून हा रत्नागिरीला जातो आणि कोंकणच्या ताडीची लज्जत चाखून येतो. पुढें गोव्यालाहि एखादी चक्कर टाकून येण्याची ह्याची तयारी असते. इतकेंहि असलें तरी त्याचीं धार्मिक मतें पक्कीं सनातनी असतात. शिमग्याचा सण आला म्हणजे त्याला हिंदु धर्माचा भयंकर उमाळा येतो. अंगांत रंगीत कपडे घालून, हातानें डबा वाजवीत आणि तोंडानें अश्लील कोट्या करीत हा साऱ्या चाळींतून हिंडून येतो. सुंदर सुंदर पोरींकडे हा शिमग्याचें पोस्तहि मागावयाला जातो. रामनवमीच्या दिवशीं हा उपास करतो; आणि ठाकुरद्वारच्या राममंदिराबाहेर पोलिसांनीं हाकून देईपर्यंत घुटमळत असतो. ह्यामुळें तो सनातनी आहे का सुधारक आहे ह्याचा सहजासहजीं कोणालाहि पत्ता लागणें शक्य नसतें. कॉंग्रेसच्या प्रत्येक चळवळींत हा दंगाधोपा करून राहिल्यामुळें, राजकीयदृष्ट्या त्याचीं मतें राष्ट्रीय आहेत असा साहजिकच कोणाचाहि (गैर)समज होणें शक्य आहे. कोणाचें तरी झोन तिकीट उपटून हा रामगडच्या कॉंग्रेसलाहि जाण्याची तयारी करतो. प्रभातफेरी म्हटली म्हणजे 'सख्याहरी'च्या अंगावर रोमांच उठतात! चाळींतल्या प्रत्येक खोलींतल्या पोरींना हा भल्या पहाटे जाऊन स्वतः उठवतो आणि गळ्यांत तबला-पेटी अडकवून आपल्या भसाड्या सुरांत 'उठा बंधुनो, उठा भगिनिंनो' हें पालुपद गात हा ऐन बिनीला चालत असतो.

आतां प्रेमाबाबत 'सख्याहरि' हा आपल्या आराध्यदेवतेला एकनिष्ठच्या वचनानें बांधलेला असतो; आणि त्याबाबत तो बहुधा प्रामाणिकहि असतो. तथापि तो मुंबईच्या मोहमयी वातावरणांत राहणारा एक रंगेल, बेफिकीर आणि वात्रट माणूस असल्यानें अधूनमधून त्याच्या हातून 'गलती' होते. पण त्यामुळें आपल्या प्रेमाच्या एकनिष्ठतेला बाध येतो असा त्याला चुकूनहि संशय येत नाहीं. 'ब्लॅक आउट'चा फायदा घेऊन हा रात्रीं चाळींतून खुशाल हिंडतो. सावरकरांची नेमचाजी ह्याला माहीत नसल्यानें एखाद्या पोरीला उद्देशून मारलेला खडा तिच्या वडिलांना लागून ह्याला चाळींतून पोबारा करावा लागतो. पावसाळ्यांत फूटपाथवरून जातां जातां ज्या बाजूला एखादी सुंदर स्त्री चाललेली असेल तिकडेच नेमकें घसरून पडण्यांत हा मोठा कुशल असतो. इतकेंहि असलें तरी त्याचें आपल्या वल्लभेवरील प्रेम

अढळ असतें. आर्थिक परिस्थितीमुळें त्याला लग्न करणें शक्य नसतें. त्यामुळें त्याला सक्तीचें ब्रह्मचर्य पाळावें लागतें; आणि आपल्या प्रियतमेची गुजराण केवळ थापाथापीवर करावी लागते. त्यांत गांवांतल्या पुष्कळशा तरुण व अक्कडबाज पोरींशीं त्याची दोस्ती असल्यानें त्याच्या प्रियतमेला त्याच्या प्रेमाचा अधून मधून जबर संशय येत असतो. ह्यामुळें त्या दोघांचा कलह एकसारखा चालूच असतो आणि त्या कलहानें त्याच्या प्रियाराधनाची लज्जत एकसारखी वाढतच असते. एकूण बांदेकरांनीं चित्रित केलेला हा 'सख्याहरि' रंगेल, रोमँटिक, वात्रट, क्वचित् फाजील पण प्रामाणिक आणि खेळाडू असा एक गुंड तरुण आहे. त्याचें अगदीं थोडक्यांत वर्णन करावयाचें झाल्यास मी त्याला 'वात्रट आणि खेळाडू गुंड' असेंच म्हणेन. 'सख्याहरि' हा कांहीं उदात्त गुणांनीं कांठोकांठ भरलेला आदर्श नायक नाहीं. पण आजच्या मध्यमवर्गीय समाजांतील तो एक प्रातिनिधिक तरुण आहे. त्याच्या अंगांत पुष्कळसे दुर्गुण आहेत. कदाचित् त्याबद्दल त्याच्या शेजाऱ्यांचें मतहि फारसें चांगलें नसेल! पण तो त्याच्या दोषांसकट सर्वांना आवडणारा, सर्वांच्या उपयोगी पडणारा, दारिद्र्याशीं झगडतां झगडतां आयुष्यांतील मौजा चाखणारा असा एक जिवंत आणि जोमदार तरुण आहे. तथाकथित अभिजात वाङ्मयामध्यें नायक म्हणून वावरण्यास जरी तो कुणाला नालायक वाटला, तरी बहुजनसमाजासाठीं निर्माण होणाऱ्या आजच्या लौकिक वाङ्मयांत तो 'रेकॉर्ड ब्रेकर' नायक म्हणून ठरल्याशिवाय राहणार नाहीं.

वाङ्मयाच्या दृष्टीनें 'सख्याहरी'कडे बघावयाचें झाल्यास एखादा काटेकोर व कुजकट कृष्णराव मराठे 'सख्याहरी'मधून चारदोन वाक्यें अश्लील म्हणून सहज काढून दाखवील. पण प्रत्येक वाक्या-वाक्यांतून वाहणारा तारुण्याचा निरागस प्रवाह आणि खळखळाट व त्यांतून अंगावर उडणाऱ्या वात्रट विनोदाचा थंडगार शिडकावा वाचकांच्या अंगावर आनंदाचे रोमांच निर्माण केल्याशिवाय राहणार नाहीं. रेखीव आणि डौलदार भाषा, कलात्मक लेखनपद्धति, सूक्ष्म अवलोकनशक्ति आणि खुसखुशीत पण खोचक विनोद हें 'सख्याहरी'च्या प्रतिभाशैली लेखकाचें तेजस्वी गुणवैशिष्ट्य आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं शब्दचित्रें इतकीं हुबेहुब रेखाटलीं आहेत कीं, तीं दृश्यें प्रत्यक्ष आपण डोळ्यांनीं पाहतों आहोंत असेंच कोणालाहि वाटेल. इतकें आकर्षक

आणि आरंभापासून अखेरपर्यंत वाचकांना खेळवीत आणि झुलवीत नेणारें मराठी भाषेंत आजच्या घटकेला एकहि पुस्तक नसेल! 'देवळांत आणि हॉटेलांत स्त्रिया आणि छत्र्या नेहमीं हरवल्या जातात', 'बायकांना बरोबर नेल्याशिवाय गर्दींत तिकीट मिळत नाहीं', 'कुरूप वेश्या आणि खोटीं नाणीं रात्रींच चालतात', 'प्रेम हें एखाद्या चित्रपटाप्रमाणें चार-पांच आठवड्यांपेक्षां जास्त काळ टिकत नाहीं', 'स्त्री ही इस्त्रीसारखी आहे; एकदां बिघडली कीं कायमची बिघडली' अशा तेजस्वी सुभाषितांची आल्हाददायक पखरण ठिकठिकाणीं पसरलेली वाचकांना आढळून येईल.

शृंगार व विनोद ह्यांचें गुलाबपाणी प्रत्येक वाक्या-वाक्यावर शिंपडलेलें असल्यानें, त्याच्या सुगंधानें क्षणभर आपलें देहभान विसरल्यासारखेंच कोणालाहि वाटेल आणि डोकें धुंद होईल. विश्रामधामांतील म्हाताऱ्या मंडळींनीं 'जवानमर्द मोदक' खाण्याऐवजीं रोज सकाळीं 'सख्याहरि' वाचण्याचा परिपाठ ठेवला तर हिमालयाची चक्कर वांचून घरबसल्या कायाकल्पाचें पुण्य त्यांच्या पदरीं पडल्याशिवाय राहणार नाहीं.

आतां वाङ्मयाकडे मनोरंजनापेक्षां उपदेशाच्या अपेक्षेनें पाहणाऱ्या वाचकांना 'सख्याहरी'कडून बोध असा काय मिळणार? तथापि, त्याच दृष्टीनें पाहिलें तर पुस्तकी शिक्षणाच्या निष्क्रिय वातावरणांत दुबळ्या होत चाललेल्या आजच्या तरुण पिढीला 'खेळाडू गुंड व्हा!' हा महत्त्वाचा संदेश 'सख्याहरी'नें दिलेला आहे असें आढळून येईल. आणि हा संदेश मोलाचा नाहीं असें कोण म्हणेल?

[ 'सख्याहरि' या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना ]

# ‘समाजांत शृंगाराची सोय नाहीं’ जोशीबुवा बोलले १७

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कथालेखक आणि माझे मित्र श्री. यशवंत गोपाळ जोशी यांनीं परवां मुंबईला ब्राह्मणसभेंत एक साहित्यविषयक व्याख्यान दिलें. जोशीबुवांच्या लघुकथांमधून लेखकांवर, कवींवर, साहित्यावर अप्रत्यक्ष स्वरूपांत चुरचुरीत आणि बोचक अशीं टीकात्मक विधानें अनेक वेळीं वाचावयाला मिळतात. तथापि ‘साहित्य’ ह्या विषयावर सुसंगतपणें आपलीं मतें बोलून दाखवण्याचा प्रयत्न जोशीबुवांनीं आतांपर्यंत केला नव्हता. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन तर करावयाला पाहिजेच, पण त्याहीपेक्षां आजपर्यंत धारण केलेलें मौन सोडून देऊन त्यांनीं जाहीरपणें व्याख्यान देण्याचा हिय्या केला याबद्दल त्यांची पाठ थोपटायला पाहिजे. पुष्कळसे लेखक लेखणीचे बाके आणि जिभेचे दुबळे असतात. जोशीबुवांची लेखणी भारी तिखट असते. वाचकांचें हृदय थोड्याशा शब्दांत कसें अचूक छेदून काढावें ही कला त्यांच्याइतकी फारच थोड्या लेखकांना साधली असेल. हिंदु मध्यम कुटुंबांत अशा पुष्कळ अशिक्षित बायका असतात, कीं दुसऱ्यांना घालूनपाडून कसें बोलावें हें कसब त्यांना सुरेख साधलेलें असतें. एकच शब्द त्या बोलतील पण ऐकणाराच्या

डोळ्यांत टचकन् पाणी उभें करतील. ही बायकी विद्या जोशीबुवांनीं कशी साध्य केली आहे कोण जाणे. पण त्यांचें एक एक वाक्य असें ठेवणींतलें असतें, कीं ऐकणाराच्या स्मरणांतून तें मरेपर्यंत जाऊं नये. 'माझा मुलगा' ह्या बोलपटाच्या मोबदल्याबद्दल जोशीबुवा आणि शांतारामबापू ह्यांच्यामध्यें जो लेखी आणि तोंडी झगडा झाला असें म्हणतात, आणि जो कांहीं भाग विश्वसनीय रीत्या माझ्या कानांवर आला, त्यावरून जोशीबुवा हे लेखणीप्रमाणें वाणीचेहि मोठे बरकंदाज आहेत एवढें मी निश्चितपणें सांगूं शकतों. म्हणून वक्तृत्वाच्या क्षेत्रांत जर जोशीबुवांनीं पदार्पण करण्याचें ठरवलें, तर जिव्हाळ्याचें पण खवचट आणि खोचक बोलणारा एक प्रभावशाली वक्ता कदाचित् महाराष्ट्राला लाभेल अशी आशा करावयाला हरकत नाहीं.

मुंबईच्या ब्राह्मणसभेंत जोशीबुवांनीं जें भाषण केलें त्याचें प्रतिवृत्त दैनिक पत्रांत मला वाचावयाला मिळालें नाहीं. त्यामुळें त्यांच्या बोली व्याख्यानाचा श्रोत्यांवर काय परिणाम झाला हें कळावयाला मार्ग नाहीं. तथापि, त्यांच्या भाषणांतल्या मुद्दयांचा सारांश लेखरूपानें खुद्द जोशीबुवांनीं 'अग्रणी' नांवाच्या एका साप्ताहिकांत नुकताच प्रसिद्ध केलेला आहे तो वाचून मात्र माझी फारच निराशा झाली. आधुनिक साहित्याबद्दलच्या त्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्या त्यांनीं या लेखांत मांडलेल्या आहेत. ज्या आविर्भावानें आणि इरेसरीनें ह्या तक्रारी मांडण्याचा जोशीबुवांनीं आव आणलेला आहे, तो प्रत्यक्ष त्यांच्या तक्रारी वाचल्यानंतर केवळ फुसकट, पोकळ आणि वरपांगी वाटूं लागतो! आणि जोशीबुवांच्या ह्या तक्रारी नसून केवळ तो त्यांचा दुराग्रह आणि त्या त्यांच्या कुरापती आहेत असेंच वाटूं लागतें.

जोशीबुवांची वेषभूषा आणि केशभूषा (यांत त्यांच्या फुगेदार मिशांचाहि समावेश होतो,) जशी बाळबोध वळणाची सनातनी आहे तशी त्यांची साहित्यविषयक दृष्टिहि सनातनी आणि सोवळी आहे ही गोष्ट उघड आहे. मी त्यांना त्याबद्दल दोष देऊं शकत नाहीं. ज्या संस्कृतींत जोशीबुवा वाढले आणि जें शिक्षण त्यांना मिळालें त्याचा हा परिणाम आहे हें उघड आहे. ते 'सदभिरुची'चे पुरस्कर्ते आहेत; मात्र 'सदभिरुचि' म्हणजे काय हें कोडें त्यांनीं कोठेंच उलगडलेलें नाहीं. अश्लीलतेची व्याख्या करतांना 'चार स्त्री-पुरुषांनीं एकत्र बसून वाचतांना ज्यामुळें संकोच उत्पन्न होतो तें अश्लील

मानणें' ही व्याख्या जितकी घोटाळयाची व गोंधळाची आहे, तशीच बाब 'सदभिरुची'ची आहे. कित्येक लोकांना ज्याप्रमाणें चार स्त्री-पुरुषांनीं एकत्र बसून वाचणें हेंच मूलतः अश्लील वाटण्याचा संभव आहे, त्याप्रमाणें 'सदभिरुची'चेहि धिंडवडे निघण्याचा संभव आहे. आधीं अभिरुचि आणि त्यांतून ती सद्! अभिरुचि ही व्यक्तिनिष्ठ ( subjective ) आहे, वस्तुनिष्ठ ( ojbective ) नाहीं. ओठावरच्या मिशा साफ काढून टाकणें ही माझी 'सदभिरुचि' आहे, तर ओठावर मिशांचा लोंबता वेल वाढविणें ही जोशीबुवांची सदभिरुचि आहे. 'ओलेती' चित्र हें कृष्णराव मराठे कंपूला–कदाचित् जोशीबुवांनाहि–हीन अभिरुचीचें द्योतक वाटत असेल; आम्हां लोकांना तो कलेचा अत्युत्कृष्ट नमुना वाटतो. तेव्हां 'सदभिरुची'च्या निकषावर कांहीं वाङ्मयकृतीच्या गुणावगुणांचा निर्णय लागूं शकणार नाहीं.

'सदभिरुचि' हें थोतांड आहे असें मात्र माझें मत नाहीं. पण ती सदभिरुचि वाङ्मयशास्त्राच्या आणि कलेच्या निःसीम अभ्यासानें आणि आसक्तीनें बनलेली पाहिजे. कृष्णराव मराठे कंपूला वाङ्मय आणि कला समजण्याची काय अक्कल आहे ? 'प्रेम' आणि 'चुंबन' हे शब्द छापलेले दिसले आणि एकादें चित्र नागवें पाहायला मिळालें कीं, ही मंडळी अश्लीलतेचा पांचजन्य फुंकायला सुरुवात करतात ! जोशीबुवांची खरी तक्रार आहे ती शृंगाराबद्दलची आहे. जेथें शृंगार आहे तेथें 'सदाभिरुचि' असणें शक्य नाहीं असें समीकरण त्यांनीं मनाशीं बांधून ठेवलें आहे असें दिसतें. 'शृंगारा'विरुद्ध जोशीबुवांनीं जो दावा केलेला आहे त्यांतील मुद्दे वाचल्यानंतर जोशीबुवांच्या बावळटपणाचें हसूं येतें. जुन्नरचा किंवा बारामतीचा एखादा M. वकील—म्हणजे मुखत्यार वकील–मुंबईच्या हायकोर्टांत केस चालवायला गेला ( अशी आपण कविकल्पना केली ) तर तो ज्या तऱ्हेचा युक्तिवाद करील त्याच तऱ्हेचा कोटिक्रम जोशीबुवांनीं केलेला आहे. जोशीबुवांनीं अलंकारिक भाषेंत आपले मुद्दे मांडले आहेत. ( अर्थात् उदाहरण, रूपक किंवा उपमा म्हणजे शाबिती नाहीं हें त्यांना माहीत नाहीं. Illustration is no proof ! ) ते म्हणतात कीं ज्याप्रमाणें शस्त्रबंदीचा कायदा असतांना सशस्त्र बंड करण्याचा उपदेश जर एखाद्या पुढाऱ्यानें केला तर तें जसें हास्यास्पद ठरतें—कारण लोकांच्या हातांत शस्त्रें नाहींत तर बंड कसें करावयाचें ! ( जोशीबुवांचें

राजकारणाचें ज्ञान आणि कल्पनाशक्ति फारच अगाध आहे!)— त्याप्रमाणें जोंपर्यंत वाचकांच्या शृंगाराची सोय समाजांत नाहीं, तोंपर्यंत त्यांचा शृंगार आपल्या शृंगारिक लेखनानें चेतवण्याचा लेखकाला अधिकार नाहीं.]

जोशीबुवांनीं हा कोटिक्रम करून 'ओव्हर-बाउंडरी' मारली आहे. म्हणजे त्यांचें म्हणणें असें—मग तो शृंगार असो किंवा कोठलाहि रस असो—त्याच्या अनुभवाची सोय आधीं समाजांत असल्याशिवाय त्या भानगडींत लेखकांनीं पडतां कामा नये. मग आम्ही सुद्धां जोशीबुवांना विचारतों कीं, समाजांतील दारिद्र्याबद्दल आणि कौटुंबिक अडचणींबद्दल तुम्ही तरी आपल्या लघुकथांमधून एखाद्या दुखणेकऱ्याप्रमाणें कां विव्हळत असतां? जोंपर्यंत समाजांतील दारिद्र्य नाहींसें होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झालेली नाहीं, तोंपर्यंत दरिद्री वाचकांना त्यांच्या दारिद्र्याची आठवण वाङ्मयांतून वारंवार करून देणें हा निव्वळ दुष्टपणा आहे. ह्याच न्यायानें विधवा-पुनर्विवाहाबद्दलहि लिहावयाला नको. कारण एखादा गडकरी विधवा-पुनर्विवाहाचें भेसूर चित्र जर एखाद्या नाटकांतून रंगवायला लागला तर हे जोशीबुवा ओरडत सुटावयाचे आणि म्हणावयाचे कीं, "अहो, विधवेच्या पुनर्विवाहाची समाजांत जोंपर्यंत सोय नाहीं तोंपर्यंत तुम्हांला ह्या विषयावर लिहावयाचा अधिकार नाहीं!" आणि सगळ्याच गोष्टींची सोय समाजांत जर समाधानकारक तऱ्हेनें लागली, तर लेखक कशाला पाहिजे आहेत त्या विषयावर वाङ्मय निर्माण करावयाला! समजा, एखाद्या गुलहौशी वाचकाची शृंगाराची सोय जर शेजारींपाजारीं झाली असली तर तो शृंगारिक वाङ्मय वाचतोय् कशाला? तो प्रत्यक्ष शृंगारच करील! [शृंगारिक वाङ्मयाची लज्जत ही ज्याच्या शृंगाराची व्यावहारिक सोय झाली आहे त्याला वाटत नाहीं—पण ज्याच्या शृंगाराची अजीबात सोय नाहीं त्यालाच वाटते!] सांसारिक माणसापेक्षां 'ब्रह्मचारी' (म्हणजे तथाकथित)च जास्त रंगेल असतात असें मी जें आजपर्यंत ओरडून सांगतों त्याचा अर्थच हा!

शृंगारिक वाङ्मयाच्या वाचनानें शृंगारिक प्रवृत्ति चेतवल्या जात नाहींत; पण त्यांचें आंतरिक समाधान होतें व त्याला मानसिक स्वास्थ्य मिळतें ही गोष्ट जोशीबुवा आणि त्यांच्या विचाराचे लोक विसरतात. दीड रुपयाची फडक्यांची कादंबरी घेतली कीं, ग्रँट रोडवर जाऊन दीड रुपया खर्च करण्याची

एखाद्या अडलेल्या वाचकाला इच्छा होत नाहीं हेंच फडक्यांच्या वाङ्मयाचें थोर यश आहे ! उलट तो दीड रुपया सत्कारणीं लागतो, वाङ्मयाला मदत मिळते आणि त्यांतले निदान बारा आणे तरी फडक्यांच्या खिशांत पडतात हा केवढा फायदा आहे ! " अहो, तुम्ही शृंगारिक वाङ्मय लिहूं नका— कारण आमच्या शृंगाराची सोय नाहीं—आणि आम्हांला 'कसंसं'च वाटतं !" हें म्हणणें म्हणजे हास्यास्पदतेची पराकाष्ठा आहे. एकाद्या मिठाईवाल्यालाहि उद्यां एखादें गिऱ्हाईक म्हणेल कीं " ए, हे तुझे पेढे, बर्फी, जिलेब्या आंत ठेव; त्यांचें असें प्रदर्शन करूं नकोस, कारण आमच्या तोंडाला पाणी सुटतें आणि आमच्या खिशांत दमडीहि नाहीं !" भले जोशीबुवा, खूप डोकें चालविलेंत ! अहो, तुमच्या शृंगाराची जर समाजांत सोय नसेल तर ती करून घ्या; म्हणजे तुम्हांला जरा 'बरं' वाटेल, मनःस्वास्थ लाभेल, आणि 'सदभिरुची'ची ढोंगी भाषा तुमच्या तोंडून पुन्हा कधीं निघणार नाहीं ! तुमच्या दुर्बळतेचें कारण वाङ्मयांतल्या शृंगाराच्या माथीं तुम्ही कां फोडतां ?

आणि खरेंच विचारतों, शृंगाराची सोय समाजांत नाहीं असें तुम्हांला सांगितलें कोणी ? 'शृंगाराची सोय' म्हणजे खिशांत आठबारा आणे घालून 'माडी चढणें' किंवा 'शेजारींपाजारीं एखादें लफडें करणें' असली तुमची घाणेरडी कल्पना आहे कीं काय ? बहुतेक सनातनी लोकांची अशीच गलिच्छ कल्पना असते. गायन, नृत्य, चित्र, शिल्प, साहित्य इतक्या कला समाजांत असतांना आणि कलेच्या अनुभवांत आणि आनंदांतच शृंगाराचा खरा प्रत्यय असतांना शृंगाराची सोय समाजांत नाहीं असा शंखध्वनि करण्याचें तुम्हांला कारण काय ? जोशीबुवा, शृंगाराबद्दलच्या तुमच्या कल्पना अत्यंत हीन आणि कुजकट आहेत. एकाद्या मानसशास्त्रज्ञाकडे ( बिचारा डॉ. गणपुले गेला ! ) जाऊन चांगली ट्रीटमेंट घ्या; ओठावरच्या मिशा आणि डोक्यावरचा घेरा 'कटाप' करून टाका. मन, बुद्धि आणि शरीर सुंदर करा, म्हणजे तुम्हांला शृंगार काय असतो हें कळेल. शृंगार म्हणजे भानगड नव्हे, शृंगार म्हणजे 'अडपझडप' नव्हे, शृंगार म्हणजे लफडें नव्हे, शृंगार म्हणजे तन्मयतेचा, प्रीतीचा, आत्मीयत्वाचा विशुद्ध आणि सात्त्विक आविष्कार ! शृंगार म्हणजे,— पण जाऊं द्या; सध्यां तुम्हांला ह्या गोष्टी कळावयाच्या नाहींत–पुढें आपण बोलूं केव्हां तरी !

---

# अरेरे ! पुण्यांत ब्राह्मण नाहीं ! १८

अरेरे ! हें कोण बोललें, कीं पुण्यांत ब्राह्मण नाहींत ! महाराष्ट्राचें केंद्र जें पुणें, महाराष्ट्राचें नाक जें पुणें, अलम् हिंदुस्थानांतील विद्येचें नामवंत माहेर-घर जें पुणें, पेशवाईच्या काळापासून ब्राह्मणी संस्कृतीचें आणि विद्येचें आद्य-पीठ जें पुणें, गेलीं पन्नास वर्षें शाळा आणि कॉलेजें, मास्तर आणि प्रोफेसर, संशोधक आणि परीक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी, शालेय पुस्तकांचे प्रकाशक आणि मुद्रक ह्यांनीं कांठोकांठ भरून वाहणारें जें पुणें—त्या ह्या पुण्यामध्यें ब्राह्मण नाहींत असें कोण म्हणालें ? ज्या आमच्या पुण्यांत 'लाल शालजोडी जरतारी' पांघरून, मुंडित मुंडावर आणखी एक शालजोडी लपेटून आणि भस्माचे ४" × ३" चे पट्टे सर्वांगावर रंगवून आहिताग्नि शंकरराव राजवाडे आपल्या अग्यारींतला ज्ञानाचा विस्तव फुंकीत चोवीस घंटे मांडी ठोकून बसलेले आहेत, त्या आमच्या पुण्यांत म्हणे ब्राह्मण नाहींत ! ज्या आमच्या पुण्यांत केवळ हिंदुधर्माच्या आणि ब्राह्मण्याच्या पुरश्चरणार्थ तुळशी-बाग आणि बेलबाग हीं दोन देवळें उघडून तेथले पिढ्यान् पिढ्याचे पुजारी हजारों भाविक म्हाताऱ्यांना आणि विधवांना ह. भ. प.च्या कीर्तनांचे आणि

वे. शा. सं.च्या पोथ्यापुराणांचे विद्वत्ताप्रचुर 'डोस' (पै-पैसा घेऊन, तांदुळाचा मोबदला घेऊन का होईना!) आज अनेक वर्षें पाजीत आहेत त्या ह्या पुण्यांत ब्राह्मण नाहींत? ज्या पुणें शहरांत अनेक चित्पावन (चुकलों!) चित्तपावन ब्राह्मणांचे, दे. ऋ. ब्राह्मणांचे शुक्ल का कृष्ण (राम जाणे!), यजुर्वेदी, माध्यंदिन, अपस्तंभ, उपटसुंभ, सोमवंशिय, रामवंशीय अशा चार-दोन डझन प्रकारच्या ब्राह्मणांचे संघ आहेत, ज्या पुणें शहरांत वेदपाठशाळा आहेत, वेदोत्तेजक सभा आहेत, जेथें सालोसाल श्रावण्या आणि शिमगे मोठ्या थाटामाटानें आणि विधिपूर्वक साजरे केले जातात, जेथें मनगटापासून तों करंगळीपर्यंत निरानिराळ्या जाडीचीं मंतरलेलीं जानवीं सनातनी आणि सुधारक ब्राह्मणांसाठीं निर्माण केलीं जातात, त्या पुण्यांत ब्राह्मण नाहींत असें कोण म्हणतें? आणि रोज सकाळ-संध्याकाळ इराण्याच्या हॉटेलांत जाऊन अंड्यावर आणि कोंबडीवर ब्राह्मणाचीं तरुण पोरें (आणि थोड्याशा पोरी देखील!) ताव मारीत असतां, ब्राह्मणांनीं वंशाच्या आणि ब्राह्मण्याच्या शुद्ध्यर्थ शाकाहारी राहिलें पाहिजे एवढ्यासाठीं इराण्याच्या हॉटेलावर पिकेटिंग करण्याच्या भीषण वल्गना प्रो. माटे ज्या पुण्यांत करीत आहेत, सनातनी ब्राह्मणांच्या संस्कृतीचे धाबळी आणि मुकटे शृंगारिक, अश्लील आणि अपवित्र वाङ्मयाच्या वाचनानें अधिक दूषित होऊं नयेत म्हणून ज्या पुण्यांत एंजिनियरिंग कॉलेजच्या वर्कशॉपमधील माजी 'फिटर' श्री. कृष्णराव मराठे हे रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून बसले आहेत, त्या पुण्यांत काय ब्राह्मण नाहींत? ज्या पुण्यांतले थकले-भागलेले पेन्शनर लोक 'हरि-हरि' म्हणत स्वस्थ बसावयाच्याऐवजीं आपल्या वाळलेल्या कमरा उपरण्यांनीं करकचून बांधून ब्राह्मण्याच्या संरक्षणाचें ओझें आपल्या वाकलेल्या पाठीवर घेण्यासाठीं 'विश्रामधाम मंडळें' स्थापण्याचे उपद्याप करीत आहेत, त्या पुण्यांत ब्राह्मण नाहींत? ज्या पुण्यांत वर्णाश्रम-संघवाले धर्मवीर डावरे आहेत, ज्या पुण्यांत हिंदुमहासभेचे कर्णधार कर्मवीर अण्णासाहेब भोपटकर आहेत, ज्या पुण्यांतल्या गायकवाडवाड्यांत एक वेळ हिंदी राष्ट्राचीं सूत्रें हाललीं जावयाचीं आणि आतां मात्र जेथें लोकशाही स्वराज्य पक्षाचें आणि हिंदुमहासभेचें सनातनी धाबळीवालें राजकारण जीव धरून बसलें आहे, त्या पुण्यांत ब्राह्मण नाहींत असें कोण म्हणतो?—आणि विसरलों— ज्यांच्या नांवाचा उच्चार आधींच करावयाला पाहिजे होता ते

सनातन धर्माचे गड्डे– ब्राह्मणी भोजनाच्या पावित्र्याचे कट्टे पुरस्कर्ते आणि 'लोकमान्यां'चे घट्ट, मठ्ठ आणि लठ्ठ शिष्य भालाकार भोपटकर बुजलेल्या सदाशिव पेठेंतल्या हौदाशेजारील आपल्या घरांत रोज सकाळीं चमचमीत शिऱ्याची वाटी मटकावीत बसले असतांना पुण्यांत ब्राह्मण नाहींत असें म्हणावयाची कोणाची छाती आहे ?

हें जरी खरें असलें तरी 'पुण्यांत ब्राह्मण नाहींत' असें भर पुण्यांत, शेंकडों पुणेंकरांच्या तोंडावर 'टिच्चून' श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड, आय्. सी. एस्. यांनीं सांगितलें ! लाड ही व्यक्ति वयानें लहान असली तरी बुद्धीनें आणि व्यासंगानें एखाद्या आहिताग्नीच्या तोंडांत भडकावील इतकी अधिकारी आहे ! बुद्धिसामर्थ्याच्या बाबतींत परमेश्वरानें ह्या लाडांचे भरपूर लाड पुरविले आहेत ! ज्या महाराष्ट्राच्या उज्ज्वल परंपरेंत लोकहितवादी, न्या. तेलंग, न्या. रानडे, लो. बाळ गंगाधर टिळक अशीं तेजस्वी विद्वरत्नें चमकून गेलीं, त्याच परंपरेंत शोभण्याइतकें बुद्धीचें भांडवल, आणि व्यासंगाची एकाग्रता लाडांना लाभलेली आहे. सरकारी नोकरीच्या शृंखला जर लाड तोडून टाकण्याचा पराक्रम दाखवतील तर त्यांच्या बुद्धिमत्तेचें तेजस्वी भांडार महाराष्ट्राच्या जनतेला मनमुराद लुटतां येईल ! पण जाऊं द्या; तो ह्या वेळीं मुद्दा नाहीं. पण अशा ह्या लाडांनीं भर पुण्यांत येऊन पुण्यांतील ब्राह्मणांना कानपिचक्या देऊन त्यांना सांगितलें कीं 'लोक हो, तुमच्या ह्या पुण्यांत ब्राह्मण नाहींत !' अरेरे, लाडांनीं हें काय सांगितलें ! ओंकारेश्वराच्या घाटावर बसलेल्या हें ब्रह्मवृंदांनो, रामेश्वरापासून सोमेश्वरापर्यंत रोज संध्याकाळीं फिरणाऱ्या हे पुरोहितांनो, ऐकलेत हे लाडांचे उद्‌गार ? मग अजून तुम्ही स्वस्थ कसे ? तुमच्या धाबळ्या अन् पागोटीं अजून कशीं फडफडलीं नाहींत ? आहिताग्नीच्या मंदिरांत धुमसत पडलेल्या हे अग्निनारायणा ! अजून तुझ्या निषेधाच्या आणि क्रोधाच्या ज्वाळा सदाशिव पेठेच्या पुण्यभूमीमधून बाहेर कशा उफाळल्या नाहींत ? हें संस्कृतिसंरक्षणमंडळा, नागव्या चित्रावर आणि चुंबनाच्या कवितेवर निषेधाच्या सभा भरविण्याच्या ऐवजीं 'ब्रँडीच्या बाटली'मधील १०२ फुटांचा तुकडा तूं जसा यशस्वी रीतीनें उडवलास, त्याप्रमाणें लाडांच्या जिभेचा निदान पाव इंच तुकडा छाटून काढण्यासाठीं तूं सरकार दरबारीं अजून कशी धाव घेतली नाहींस ! पुण्यांत ब्राह्मण नाहींत हें काय म्हणणें आहे ! मग आजपर्यंत पुण्यांतलि ब्राह्मणांनीं

आपल्या शेंड्या आणि घेरे जे जपून ठेवले, आपलीं जानवीं आणि धाबळ्या ज्या राखून ठेवल्या त्या काय फुकटच? छे, छे! पुण्यांत ब्राह्मण नाहींत हें लाडांचें म्हणणें अगदीं खोटें आहे! लाड हे ब्रह्मद्वेषी आहेत, महात्मा ज्योतिराव फुले ह्यांचा संचार कदाचित् लाडांच्या अंगांत झालेला दिसतो आहे! पुण्यांत ब्राह्मण नाहींत असें कसें होईल?

लाड एवढेंच बोलून थांबले नाहींत, तर ह्या त्यांच्या विघातानें झालेल्या जखमेंत त्यांनीं आणखी मीठहि घालून ठेवलें आहे! ते म्हणाले कीं, खरे ब्राह्मण जर कोठें असतील तर ते विलायतेंतच आहेत. आतां मात्र कमाल झाली! काय म्हणतां खरे ब्राह्मण विलायतेंत आहेत! ज्या विलायतेंत धोतरें नाहींत, ज्या विलायतेंत शेंड्या नाहींत, ज्या विलायतेंत मुकटे अन् धाबळ्या नाहींत, जेथें स्नानसंध्या करायला उदंड पाण्याची सोय नाहीं, त्या विलायतेंत ब्राह्मण आहेत असें म्हणणें म्हणजे धर्मलंडपणाचा अतिरेकच होय! पण लाडांची ब्राह्मणाची व्याख्या अगदीं निराळी आहे! जो शेंडी राखतो, जो जानवें घालतो, जो गंध अन् भस्म लावतो, जो अंडीं अन् कोंबडी खात नाहीं, जो अर्थ न कळतां वेदाची पोपटपंची करतो तो ब्राह्मण; ही ब्राह्मणाची व्याख्या लाडांना मान्य नाहीं! ब्राह्मण्याचा आणि ह्या बाहेरच्या 'मेक-अप्'चा कांहीं एक संबंध नाहीं! जो विद्येची उपासना करतो, जो विद्येचें संरक्षण आणि संवर्धन करतो, जो विद्येचें कुंड अहोरात्र तेवत ठेवतो तो खरा ब्राह्मण! तोच—तोच खरा ब्राह्मण! ही ब्राह्मणाची व्याख्या डोळ्यांपुढें ठेवली म्हणजे मात्र दुःखानें म्हणावें लागतें कीं, 'अरेरे, ह्या पुण्यात ब्राह्मण नाहींच नाहीं—जे ब्राह्मण्याचा आव आणतात तीं नुसतीं भटें अन् भिक्षुकेंच! आहिताग्नींनीं आपल्या अग्यारींत जो विस्तव पेटवीत ठेवला आहे तो ज्ञानाचा विस्तव नाहीं! तो जर ज्ञानाचा विस्तव असता तर त्या अग्नीवर आपल्या प्रज्ञेचे स्फुलिंग पेटवण्यासाठीं महाराष्ट्राची अलम् तरुण पिढी त्या ठिकाणीं जमा झाली असती; आणि आहिताग्नीच्या अग्निहोत्राला ज्ञानसत्राचें पवित्र आणि भव्य स्वरूप आलें असतें! पण आहिताग्नींच्या अग्यारींत कोण जमतें? तर ज्यांच्या तारुण्याचे अन् बुद्धीचे कोळसे झाले आहेत, वार्धक्याची पांढरी राख ज्यांच्या डोक्यावर अन् सुरकुतल्या गालफडांवर जमलेली आहे असे बुढ्ढे त्या ठिकाणीं चकाट्या पिटावयाला जमतात! आहिताग्नी, तुमचा विस्तव

खुशाल फुंकीत बसा तुम्ही! पण खरा ज्ञानाचा विस्तव टेम्स नदीच्या कांठींच आहे हें लाडांचें म्हणणें अगदीं खरें आहे!

आणि पुण्यांत आधुनिक ज्ञानाचीं इतकीं विद्यालयें, अन् पाठशाळा आहेत, इथें इतके प्राचार्य अन प्राध्यापक आहेत, विश्वविद्यालयांत पदव्या मिळवण्यासाठीं हाडांचीं काडें करून परीक्षा देणारीं आणि जाडे जाडे निबंध लिहिणारी इतकी विद्यार्थी मंडळी आहेत, तरी पुण्यांत खरे ब्राह्मण नाहींत असें लाडांचें म्हणणें खरें आहे काय? आमच्या मतें अगदीं खरें आहे! ज्या पुण्यांत रँग्लर परांजपे, रँग्लर महाजनीसारखे सर आयझॅक न्यूटनच्या थोबाडींत मारणारे प्रज्ञावंत गणितज्ञ आपला गणिताचा उद्योग सोडून मवाळांचें बुळबुळीत राजकारण चिवडीत बसले आहेत, त्या पुण्यांत इतर प्राध्यापकांची स्थिति काय असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी! ज्या श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकरांना एखाद्या भाषांतरित कादंबरीच्या आणि पांचपंचवीस चोरलेल्या कवितांच्या आधारावर पुण्यांत प्रोफेसरकी मिळूं शकते, एवढेंच काय पण मराठी भाषा ज्याची मातृभाषा आहे एवढ्याच आधारावर न. का. घारपुरे नामक इसमाला ज्या पुणें शहरांत 'मराठीचा प्राध्यापक' म्हणून मिरवतां येतें, त्या पुणें शहरांत विद्येचे जातिवंत उपासक म्हणजे अर्थात् खरे ब्राह्मण आहेत असें म्हणणें म्हणजे श्रीविद्यादेवीची बदनामी करण्यासारखें आहे! पुण्यांत विद्येचीं दुकानें गल्लोगल्लीं उघडलेलीं आहेत! तेथें एक वर्षांत तीनपासून सात-सात इयत्तांपर्यंतची विद्या दोन-चार रुपयांमध्यें मिळूं शकते! पण हे विद्येचे दुकानदार म्हणजे विद्या विकणारे वाणी होत; हे खरे ब्राह्मण नव्हेत! विद्येचे कारखानदार हेच खरे ब्राह्मण! विद्येचे कारखानदार ब्राह्मण पुण्यांत नाहींत! जे ब्राह्मण म्हणून लाथा खातात ते विद्येचे वाणी तरी आहेत, नाहीं तर तीं निव्वळ भट्टें आणि भिक्षुकें आहेत!

---

# पुण्याचा तेजस्वी ब्राह्मण—
# प्रो. दत्तो वामन पोतदार १९

पुण्यांत ब्राह्मण नाहींत अशी घोषणा श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड ह्यांनीं करून पुण्यपत्तनस्थ ब्रह्मवृंदाला धरणीकंपाचा धक्का दिलेला आहे. विद्येचे उपासक, विद्येचे व्यासंगी, अहर्निश आणि आमरण ज्ञानसाधनाच्या पवित्र कार्याला ज्यांनीं वाहून घेतलेलें आहे, चिंतन, मनन आणि संशोधन ह्यांच्यासाठीं ज्यांनीं आपल्या व्यावहारिक जीविताचा होम केलेला आहे, अशाच विभूतींना ब्राह्मण्याची पदवी प्राप्त होऊं शकते. आईबाप ब्राह्मण म्हणून मुलगा ब्राह्मण ही समजूत आजच्या घटकेला तरी, आईबाप डॉक्टर म्हणून मुलगा जन्मतःच डॉक्टर, आईबाप मास्तर म्हणून मुलगा मास्तर, आईबाप शिंपी म्हणून मुलगा शिंपी, ह्या समीकरणाइतकीच हास्यास्पद आहे. लाडांनीं केलेल्या ब्राह्मण्याच्या व्याख्येच्या चौकटींत बसण्यास लायक असे फारच थोडे ब्राह्मण महाराष्ट्रांत सापडतील. मग पुण्यांत ते कितीसे सापडणार! एवंगुणविशिष्ट पुण्यांतील ब्राह्मणांची नामावळी आठवण्यासाठीं डोक्याला हात लावतांक्षणींच पहिलें नांव

प्रामुख्यानें डोळयांसमोर जें येतें तें म्हणजे **राजवाडे** होय. अर्थात् हे राजवाडे म्हणजे डोक्याचें क्षौर करून आणि वर 'लाल शालजोडी जरतारी' गुंडाळून आपल्या अग्निक्षेत्रांतील विझलेला विस्तव फुगीर गालांनीं फुंकीत बसणारे आहिताग्नी राजवाडे नसून, ज्यांच्या वयाला ऐंशी वर्षें पुरीं होऊन गेलीं आहेत, ज्यांचे चर्मचक्षू अंध झालेले आहेत तरी वैदिक वाङ्मयाच्या ज्यांच्या दीर्घ-तपश्चर्येंत एका क्षणाचाहि खण्ड पडलेला नाहीं आणि सर रामकृष्ण भांडारकर ह्यांच्यानंतर **महाराष्ट्रांचे महर्षि** म्हणून ज्यांना खरोखरच संबोधतां येईल ते प्रो. वैजनाथ काशिनाथ राजवाडे हे होत! 'हॅम्लेट' नाटकांतील भाषा वापरून म्हणावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, कुणीकडे हे राजवाडे आणि कुणीकडे **ते राजवाडे**! महर्षि राजवाडे ह्यांच्यानंतर निदान माझ्यासारख्या 'ब्राह्मणेतरा'च्या डोळयांसमोर दुसऱ्या तेजस्वी ब्राह्मणाचें नांव उभें राहतें तें म्हणजे प्रोफेसर दत्तो वामन पोतदार यांचें!

## सुरेख संगम किती!

दत्तोपंत म्हणजे जुनें आणि नवें यांचा मोठा हृदयंगम संगम आहे! जुन्याचा भरीवपणा आणि नव्याची लकाकी, जुन्याचा पौष्टिकपणा आणि नव्याची लज्जत, जुन्याचा सुगंध आणि नव्याचा सुरंग, जुन्याचें गांभीर्य आणि नव्याचें लालित्य, जुन्याचें सोनें आणि नव्याची नकशी ह्यांचा नयनमनोहर समन्वय म्हणजे दत्तोपंत! दत्तोपंतांइतका शुचिर्भूत आणि प्रसन्न मुद्रेचा ब्राह्मण सबंध महाराष्ट्रांत आढळून यावयाचा नाहीं! मात्र त्यांच्या शुचिर्भूतपणामागें सनातनी रूढीचा ढोंगीपणा नाहीं कीं त्याच्या प्रसन्नतेमागें आधुनिकत्वाचा उथळ छचोरपणा नाहीं! म्हणूनच दत्तोपंतांच्या सनातनी आकाराबद्दल आणि आचाराबद्दल तिरस्कार वाटत नाहीं; किंवा त्यांच्या कल्पनेच्या आणि धडाडीच्या पुरोगामित्वाबद्दल भयहि वाटत नाहीं! शिवाय दत्तोपंतांचें जें 'सनातनी'त्व आहे तें देखील इतकें आधुनिक आणि बुद्धिवादावर आधारलेलें आहे, कीं त्याच्या जीर्णत्वाची शंकाहि कोणाला यावयाची नाहीं! दत्तोपंत डोक्याला रुमाल बांधतात, गळया-भोंवतीं उपरणें लपेटतात, अंगांत गळेबंद शेरवानी घालतात—पण त्यांतहि त्यांची 'दत्तोपंती' फॅशन आहे. रुमाल बांधणारीं आणि उपरणीं गुंडाळणारीं शेंकडों 'पात्रें' पुण्यांतून वावरतांना दिसून येतात; पण रुमालाच्या आणि उपर-

ण्याच्या पिढीजात बावळटपणावर आधुनिकत्वाची 'इस्त्री' फिरवून त्यांत एक प्रकारची ऐट आणि ठाकठिकी केवळ दत्तोपंतांनीं उत्पन्न केलेली आहे! दत्तोपंत डोक्याची हजामत करतात—गोटा करतात आणि त्यांचें बुद्धिमान् गंडस्थळ आणि भालप्रदेश हा नेहमीं चंदनानें चर्चिलेला असतो; आणि त्या चंदनाच्या सुवासांत त्यांच्या बुद्धीचा सुवास मिसळला जातो; त्यामुळें त्यांच्या भोंवतालचें वातावरण सदैव सुगंधमयच असतें! पण त्यांच्या कपाळाला आणि डोक्याला फांसलेलें गंध हें खऱ्याखुऱ्या चंदनाचें असतें. देवघरांत साठविलेल्या सनातनी गंधगोळ्यांचें नसतें! तुम्ही जर त्यांना त्याबद्दल विचारलेंत तर चटकन् त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्मितासह ते सांगतील, "–म्हणजे–अहो, चंदन हे Anti-sceptic आहे—आरोग्यासाठीं म्हणून मी तें लावतों, उगीच लावायचें म्हणून नव्हे!"

## बॅगमध्यें सोवळें-भांडें

भर बारा वाजतां दत्तोपंत जर उन्हांतून जातांना दिसले आणि त्यांच्या हातांत जर खाकी रंगाची एखादी कल्याण बॅग दिसली तर त्या 'बॅग'मध्यें काय असेल अशी तुमची कल्पना आहे? आश्चर्यानें थक्क व्हाल, मीं जर तुम्हांला सांगितलें आंत काय आहे तें! त्या कल्याण बॅगमध्यें दत्तोपंतांचें 'सोवळें भांडें' तुम्हांला आढळून येईल–अन् दत्तोपंत कुठल्या तरी मित्राच्या घरच्या लग्नसमारंभांतील शेवटची पंगत गाठायला चाललेले असतील! कल्याण-बॅगमधून सोवळें-भांडें नेणारा दत्तोपंतांखेरीज दुसरा आधुनिक सनातनी कोणीहि आढळणार नाहीं! जुन्यांतल्या ज्या गोष्टी राखण्यासारख्या आहेत त्या दत्तोपंत निश्चित राखतील; पण त्यांचा निष्कारण बकवा करणार नाहींत; किंवा दुसऱ्याच्या सुधारकी बाडगेपणामुळें आपला सोवळेपणा विटाळण्याची तक्रार ते कधींहि करणार नाहींत. कृष्णराव मराठे जर पंगतीला जेवावयाला बसले तर काटकोन करून बसतील, निदान पाण्याची एक रेघ तरी शेजाऱ्यामध्यें आणि स्वतःमध्यें शिंपडल्याखेरीज ते राहणार नाहींत. जेवण्यास श्रीखंड-पुरीचा बेत असला तर स्वतःला एकादशी किंवा एखादा 'वार' असल्याचा बहाणा करून इतरांपेक्षां निराळे खाद्य-पदार्थ मागवतील पण दत्तोपंतांमध्यें हें ढोंग आढळावयाचें नाहीं. ते पितांबर नेसून पाटलोणवाल्याच्या शेजारीं बसतील! शेजारचा माणूस

मटणाचा रस्सा ओरपीत असला तरी दत्तोपंत अगदीं निःसंकोचपणें आपल्या कढीचे भुरके घेत असतांना तुम्हांला दिसतील. आपल्या मतभेदामुळें किंवा आचारभेदामुळें दुसऱ्याला संकोच वाटेल किंवा अडचण उत्पन्न होईल असें दत्तोपंतांच्या हातून केव्हांहि घडणार नाहीं.

## नैष्ठिक ब्रह्मचारी

दत्तोपंत ब्रह्मचारी आहेत ! अगदीं नैष्ठिक ब्रह्मचारी आहेत ! त्यांच्या ब्रह्मचर्याबद्दल संशय येणार नाहीं ! पण इतर धंदेवाईक ब्रह्मचाऱ्यांप्रमाणें त्यांनीं आपल्या ब्रह्मचर्याचें प्रदर्शन किंवा स्तोम कधींहि केलेलें नाहीं; किंवा आपण आयुष्यांत कांहीं तरी अपूर्व साधलें आहे असा अभिमानहि त्यांच्या अंगांत उत्पन्न झालेला नाहीं. कारण ब्रह्मचर्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदीं व्यावहारिक आणि कोणालाहि पटण्यासारखा आहे. "माझ्यापुढें इतकीं महत्त्वाचीं कामें आहेत कीं लग्नाचा विचार करायला मला वेळच नाहीं !" हें त्यांचें अविवाहित राहण्याचें समर्थन कोणालाहि पटण्यासारखें आहे. आणि खरोखरच त्यांनीं गेलीं अडीच तपें अंगावर घेतलेले कामाचे अजस्र डोंगर बघितले, म्हणजे खरोखरच त्यांच्या डोक्यांत लग्नाचा विचार चुकून देखील येणें शक्य नाहीं अशी कोणाचीहि खात्री होईल. मी पुष्कळ वेळां विनोदानें स्वतःशींच म्हणत असतों, कीं खरोखरच दत्तोपंतांचें लग्न ठरलें असतें तर त्यांच्या कामाच्या गर्दीमुळें स्वतःच्या लग्नालाहि हजर राहायला त्यांना वेळ मिळाला असता कीं काय याची शंका आहे ! त्यांनीं भटजीला असें निश्चित सांगितलें असतें कीं, हें पाहा, आज आमच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचा वार्षिक उत्सव आहे. मला वेळेवर यावयाला मिळायचें नाहीं. तुम्ही आपलें तुमचें मंत्रतंत्र काय तें उरकून टाका. मी शेवटच्या घटकेला येईन ! अन् नाहींच आलों तर संध्याकाळीं तरी येईन ! सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट सांगायची म्हणजे ही कीं, दत्तोपंत ब्रह्मचारी असले तरी स्त्रीपुरुषमिश्रित समाजांत मिसळतांना त्यांना 'कसेंसें'च वाटत असल्याचें कधींहि दिसून येत नाहीं, इतक्या मोकळेपणानें आणि आनंदानें स्त्रियांशीं ते बोलू शकतात. इतर ब्रह्मचाऱ्यांची स्त्रियांशीं बोलतांना जी तिरपीट होते, विशेषतः डोळ्याला डोळा भिडतांना त्यांची जी धांदल होते ती लक्षांत घेतां दत्तोपंतांच्या या सम-

शीतोष्ण वृत्तीबद्दल कौतुक वाटतें. तसेंच त्यांच्या ब्रह्मचर्यामुळें त्यांच्या सांसारिक प्रेमालाहि मुरड बसलेली नाहीं. त्यांच्या धाकट्या बंधूच्या मुलाला 'टोम्या'ला अंगाखांद्यावर खेळवतांना दत्तोपंतांना पाहिलें म्हणजे कोणत्याहि प्रेमळ पित्याच्या वात्सल्यापेक्षां त्यांचें अपत्यप्रेम कांकणभर जास्तच आहे असें आढळून येईल.

## आल्हाददायक मूर्ति

दत्तोपंत म्हणजे शुचिर्भूतता, प्रसन्नता आणि समाधान यांची अत्यंत आल्हाददायक मूर्ति! दत्तोपंतांच्या चेहऱ्यावर मालीन्य, औदासीन्य आणि थकवा औषधाला देखील कधीं सापडावयाचा नाहीं. केव्हांहि तुम्ही त्यांचेकडे जा, मुद्रेवर प्रसाद नुसता नाचतो आहे—कधीं कंटाळा नाहीं—आळस नाहीं—आजार तर नाहींच नाहीं! दत्तोपंत आजारी पडल्याचें मीं कधीं पाहिलें नाहीं—किंवा ऐकलें नाहीं! पडसें, खोकला, पोटदुखी असल्या मामुली तक्रारींनीं त्यांना कधीं तकलीफ दिल्याचें मला कधीं दिसलें नाहीं. केव्हांहि अगदीं सकाळीं जा; स्वच्छ आंघोळ करून, धाबळीचें जाकीट घातलेले, डोक्याला गंध फासलेले, अशी प्रसन्नमुख मूर्ति तुम्हांला आढळून येईल—कदाचित् पावलोणी, टोमाटोची अत्यंत आधुनिक अशी 'ब्रेकफस्ट' घेतांना तुम्हांला स्वारी दिसेल!

## फडकेगिरीचा धुव्वा उडविणारे दत्तोपंत!

दत्तोपंत म्हणजे गडबड आणि बडबड! त्यांच्या तोंडाची टकळी एकसारखी अत्यंत सफाईनें चाललेली असते! महाराष्ट्रांत त्यांच्याइतका बडबड्या (चांगल्या अर्थानें मी हा शब्द वापरतों आहे!) गृहस्थ मीं पाहिला नाहीं. एकसारखे अहर्निश आपले बोलताहेत! शब्दांच्या पलटणी हात जोडून त्यांच्यापुढें खड्या आहेत. भाषेचें वैपुल्य तर विचारूं नका. एका शब्दाला पंचवीस विशेषणें वापरतांना मीं मोजलेलीं आहेत! इतक्या लवकर कृत्रिम दात त्यांना वापरावे लागले ह्याचें कारण देखील त्यांना पडलेला अतिरिक्त व्यायाम हेंच असावें असें मला वाटतें.) इतकेंहि असून त्यांच्या बडबडीचा ऐकणाराला कंटाळा वाटत नाहीं. पुण्याच्या नव्या पुलावर उभें राहून मुठेला आलेला पूर पाहतांना जी मौज वाटते तीच मौज तासन् तास, दत्तोपंतांच्या

रसवंतीचा दुथडी भरून वाहत असलेला ओघ ऐकून श्रोत्यांना वाटतें. उफडें आणि ऐटबाज बोलावें असें दत्तोपंतांनींच! त्यांचें वक्तृत्व अगदीं जन्मसिद्ध आहे! त्यांच्या वक्तृत्वांत जो एक तेजस्वीपणा आणि जी एक धार आहे तशी महाराष्ट्रांतील फारच थोड्या वक्त्यांत आढळून येईल. कोणताहि विषय असो, त्यावरील त्यांचें म्हणणें अगदीं आत्मप्रतीतीचें आणि आत्मप्रत्ययाचें म्हणून निश्चित असावयाचें! त्यामुळें विषयाशीं ते एकदम तादात्म्य पावतात आणि त्यांच्या भाषणाला पहिल्या वाक्यापासून रंग चढतो! तासचे तास रंगत कायम ठेवून ते अस्खलितपणें बोलूं शकतात! विशेषतः एखादा वादविवाद ऐन रंगाला आला असला आणि उत्तरपक्ष करावयाला दत्तोपंत उठले म्हणजे मात्र त्यांच्या वक्तृत्वाची प्रखरता अत्यंत देदीप्यमान् असते. फड जिंकायचें आणि सभा मारायचें काम करावें दत्तोपंतांनींच! अपयश म्हणून कधीं यायचेंच नाहीं! आज गांधींना शिव्या देणारे प्रो. फडके हे १९२० च्या असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांना कॉलेजें सोडण्याविषयीं व्याख्यानबाजी करून राहिले होते. विशेषतः ज्या कॉलेजच्या संस्थापनेंत खुद्द त्यांचा भाग होता तें 'न्यू पूना कॉलेज' बंद पाडण्यासाठीं त्यांनीं स्वतःच हत्यार उचललें. प्रो. फडके हे त्या वेळीं विद्यार्थिवर्गांत अत्यंत प्रिय! ते काय म्हणतील तें ऐकायला विद्यार्थी एका पायावर तयार! त्यामुळें विद्यार्थी अगदीं हवालदिल होऊन गेले आणि कॉलेज आतां जवळ जवळ बंद पडतें आहे अशी वेळ येऊन ठेपली. अशा आणीबाणीच्या वेळीं त्या कॉलेजचें संरक्षण दत्तोपंतांनीं केवळ आपल्या प्रभावशाली वक्तृत्वामुळेंच केलें. त्यांनीं मोठ्या धाडसानें आणि चिकाटीनें विद्यार्थ्यांना एकत्रित करून त्यांच्या प्रत्येक शंकेला समाधानपूर्वक उत्तर दिलें, त्यांची खात्री पटवली आणि फडकेगिरीचा धुव्वा उडवला! १९३१ च्या कोल्हापूरच्या साहित्य-संमेलनांत दहा हजार श्रोत्यांपुढें अगदीं सुरुवातीला दत्तोपंतांनीं जें भाषण केलें तें ह्या हयातींत तरी मी विसरणें शक्य नाहीं. त्या सभेचें स्वरूपच इतकें विराट् होतें कीं, कोणताहि दुसरा वक्ता ऐन आघाडीला इतक्या दिमाखानें बोलूं शकला नसता! नगर साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं केलेलें भाषण तर त्यांच्या वक्तृत्वाचा परमोत्कर्षच होय! मराठी भाषेबद्दलच्या अभिमानानें, तळमळीनें आणि कळकळीनें त्यांतील शब्दन् शब्द ओथंबलेला आहे! विचार आणि

भाषाशैली ह्या दोन्ही दृष्टींनीं हें भाषण म्हणजे 'दत्तोपंती' वक्तृत्वाचा एक तेजस्वी नमुना होय! अत्यंत महत्त्वाचीं भाषणें दत्तोपंत जितक्या जबाबदारीनें बोलूं शकतात तितकींच अगदीं मामुली स्वरूपाचीं भाषणेंहि ते मनोरंजक करूं शकतात. आभाराचें भाषण करावें असें दत्तोपंतांनींच! मात्र दहा मिनिटांच्या आंत खुर्चीवरून अर्धवट उठलेली श्रोते मंडळी पुन्हा खालीं बसून मनापासून हसत असलेली दिसलीच पाहिजेत! भाषण करतांना दत्तोपंत जितके खेळकर होऊं शकतात तितके रागावले म्हणजे त्यांच्या संतापाला सीमा राहत नाहीं! मात्र तो संताप इतका सात्त्विक असतो, कीं कसलाही अवखळ श्रोतृवृंद असला तरी तो चपापून स्तब्ध बसल्याविना राहत नाहीं. भाषाप्रभुत्व हें दत्तोपंतांच्या अंगीं आनुवंशिक आहे. त्यांचे वडील श्री. बाबासाहेब पोतदार हेहि मोठे ओघवान् आणि बहुश्रुत वक्ते म्हणून त्यांच्या वेळीं प्रसिद्ध होते. केवळ मराठीमध्येंच नव्हे तर दत्तोपंत इंग्रजी, संस्कृत, उर्दूमध्येंहि अस्खलित बोलूं शकतात. मराठी बोलण्यांत जो ठसका आणि जी ऐट तीच इंग्रजीमध्यें! मराठी जितकें द्रुत गतीनें बोलतात तितकेंच ते संस्कृतमध्येंहि बोलूं शकतात. एखाद्या महामहोपाध्याय पाठक किंवा अभ्यंकरशास्त्र्याप्रमाणें दत्तोपंत सबंध व्याख्यानच्या व्याख्यान संस्कृतमध्यें देऊं शकतात. नागपूरचे श्री. कृष्णशास्त्री धुळे त्यांचें संस्कृत वक्तृत्व पाहून थक्कच झाले! तसेंच हैदराबादमध्यें त्यांनीं आपल्या उर्दू भाषणांनीं तेथील लोकांनाहि चकित करून सोडलें! एरवीं देखील दत्तोपंतांची मुळीं पद्धतच आहे कीं किंजवडेकर-शास्त्री भेटले तर त्यांच्याशीं संस्कृतमध्यें ते गप्पा मारतील—अन् खानबहादुर महंमद हिदायतुल्ला भेटले कीं त्यांच्याशीं उर्दूमध्यें बातचीत करतील!

## विसराळूपणाचे नमुने

दत्तोपंतांचा व्याप आणि धांदल ह्यांना कांहीं माप नाहीं. गडबड, धडपड, गोंधळ ह्या गोष्टी त्यांच्या पांचवीला पूजलेल्या आहेत. एखाद्या गांवीं साहित्य-संमेलनाला गेले असतील तर बरोबर चार-पांच अर्धवट लेखांचीं हस्तलिखितें झोळींत असतील, कांहीं प्रुफें असतील, साहित्य-संमेलनाच्या ऐन धांदलींत गांवांत चार-पांच ठिकाणीं कार्यक्रम असतील, कुठें एखाद्या मोफत वाचना-लयांत समारंभ असेल, कुठें कऱ्हाडे ब्राह्मणसंघाची एखादी बैठक असेल, कुठें

एखादा जुना ऋणानुबन्धी दाढीवाला म्हातारा आजारी असेल त्याच्या प्रकृतीची तेवढ्यांत चौकशी करून येतील. कुठें एखाद्या देशपांड्यांच्या किंवा बोकिलांच्या घराण्याचा एखादा वंशज राहत असेल आणि त्याच्या घरीं एखाद्या ऐतिहासिक कागदपत्रांचा गठ्ठा किंवा सनदा असतील तर त्याच्याकडूनहि एवढ्यांत ते चक्कर मारून येतील; आणि तेवढेंहि करून विषयनियामक मंडळीच्या बैठकीच्या वेळीं महत्त्वाच्या ठरावांवर बोलण्यासाठीं अर्धवट घामाघूम झालेल्या परिस्थितींत घाईघाईनें घेऊन उपस्थित होतील! दत्तोपंतांच्या जिवाची अन् मनाची एकसारखी धांदल चाललेली असते—नाहीं असें नाहीं—पण त्यामध्यें कोठल्याहि तऱ्हेचा धांदरटपणा चुकून देखील आढळून यावयाचा नाहीं. दत्तोपंतांचें वागणें आणि बोलणें इतक्या धकाधकीच्या मामल्यांतहि अगदीं सूतबंद असल्यामुळें, कोणत्याहि कामांत पडतें खाण्याचा, ओशाळण्याचा प्रसंग त्यांना कधींहि आला नाहीं. उलट दत्तोपंत आपलेच दोन शब्द वर ठेवून दिल्याशिवाय राहणार नाहींत! नूतन मराठी विद्यालयाचे ते व्यवस्थापक असतांना, हिशेबाच्या बाबतींत शाळेच्या एका ऑडिटरनें त्यांच्या हिशेबांत कांहीं महत्त्वाचे आक्षेप काढले. सदर ऑडिटर त्याच्या हुशारीबद्दल आणि चोखपणाबद्दल फारच प्रसिद्ध होता. पण दत्तोपंतांच्या चुका दाखवून देण्याचा उपद्व्याप त्यानें केल्याबरोबर दत्तोपंतांनीं त्याच्या पदरांत सव्याज माप घालून त्याच्या शहाणपणाची अशी भंबेरी उडविली, कीं त्याला दत्तोपंतांची सपशेल माफी मागावी लागली! एवंच, दत्तोपंत बाहेरून थोडेसे धांदरट दिसले तरी त्यांच्यासारखा हिशेबी आणि पक्का माणूस क्वचितच आढळून येईल. दत्तोपंतांच्या गडबडीचे आणि विसराळू स्वभावाचे नमुने अगदीं नाहींत असें नाहीं. आगगाडींतून प्रवास करीत असतांना, खिडकींतून बाहेर थुंकतांना त्यांनीं आपली दाताची कवळी गमावली. घरीं येऊन ती कवळी पुन्हा करावयाला दंतवैद्याला सांगितलें तर शौचकूपांत शिंक येऊन उरलेली कवळी त्यांनीं कशी गमावली त्याबद्दलची मनोरंजक गोष्ट सुप्रसिद्धच आहे. तसेंच बाहेरगांवचा एक पाहुणा दत्तोपंतांच्या घरांत एक महिनाभर जेवत होता. दत्तोपंतांना वाटे कीं हा वडिलांचा पाहुणा आहे; तर त्यांच्या वडिलांना वाटे कीं हा दत्तोपंतांचा पाहुणा आहे. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी राहतो असें म्हणतात; पण दोन माणसांचा पाहुणा एका घरांत महिनाभर पोटभर जेवूं शकतो हें त्या वेळीं

आम्हांला पाहावयास सापडलें ! दत्तोपंतांचा स्वभाव वरकरणी सैल आणि ढिला दिसत असला तरी, त्यांच्या स्वभावाची बैठक अगदीं कडक आहे ह्यांत शंका नाहीं. कोणत्याहि सभेचे किंवा कमिटीचे अध्यक्ष त्यांना करा; मग त्यांच्या स्वभावांतली मख्खी ध्यानांत येते. सभेचें काम इतकें झपाट्यानें, कडकपणानें आणि निष्ठुरतेनें ते करतात कीं अगदीं त्यांचे जवळचे मित्रदेखील त्यांच्यावर नाखूष होतील ! मुद्द्याबाहेरचा एक शब्द ते कोणाला बोलूं द्यावयाचे नाहींत— अगदीं तोडून आणि फटकळपणानें अनावश्यक बोलणाऱ्यास ते खालीं बसवतील ! एखाद्या कामाची वकिली ते जितकी आर्जवानें आणि जबाबदारीनें करतील, तितकेंच न्यायाधीशाचें काम ते निष्ठुरतेनें आणि निःपक्षपातीपणानें करतील. त्यांच्या बरोबरीचा एक प्राध्यापक मित्र, जो लहानपणापासून त्यांचा संवगडी होता आणि त्यांच्याबरोबरच ज्यानें ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केली होती (पण पुढें ती त्याला कांहीं पाळतां आली नाहीं !) असा, एका जबाबदारीच्या जागेवर त्यांच्याच संस्थेंत काम करीत होता. ह्या मित्रावर पैशाच्या आणि व्यवहाराच्या बाबतींत कांहीं आक्षेप आले आणि त्याची चौकशी करावयास नेमलेल्या कमिटीवर त्या मित्राच्या सांगण्यावरूनच दत्तोपंतांची नेमणूक झाली. दत्तोपंतांनीं त्या मित्राला त्याच वेळीं सांगितलें कीं, "तूं माझें नांव सुचवूं नकोस, तुझें चुकलें असेल तर तुझ्या वर्तनाचें समर्थन मी कालत्रयीं करणार नाहीं !" पण मित्रानें ऐकलें नाहीं. पुढें चौकशींत त्या मित्राचें वर्तन दत्तो-पंतांच्या दृष्टीनें आक्षेपार्ह ठरलें व त्यांनीं स्पष्टपणें तसें आपल्या प्रतिवृत्तांत नमूद केलें. त्या मित्राला सेवानिवृत्त व्हावें लागलें आणि इतक्या वर्षांच्या दोघांच्या मैत्रींत अंतराय उत्पन्न झाला ! 'प्रतिभासाधन' कमिटीचे दत्तोपंत अध्यक्ष होते. प्रो. फडके त्यांचे शिष्य; पुढें सहकारी. पण त्यांची भीडमुर्वत न बाळगतां दत्तोपंतांनीं फडक्यांच्या उसनवारीचें माप बरोबर त्यांच्या गळ्यांत अडकवलें. 'प्रतिभासाधन' चौकशीचा सर्व वृत्तान्त स्वतः दत्तोपंतांनीं लिहिलेला आहे. त्यांत दत्तोपंतांच्या लेखनशैलीचा उन्मेष मोठ्या तेजस्वितेनें चमकलेला दिसून येईल. दत्तोपंतांच्या ह्या कडकपणाची बैठक त्यांच्या तत्त्वनिष्ठेवरच झालेली आहे. काय वाटेल तें झालें तरी दत्तोपंत आपलें तत्त्व म्हणून कधींहि सोडणार नाहींत. दत्तोपंतांनीं राजकारणांत जर का भाग घेतला असता तर ते फारच मोठ्या दर्जाचे पुढारी झाले असते ! ते कॉंग्रेसमन नसले तरी त्यांची

राष्ट्रीय वृत्ति फारच जाज्वल्य आहे! ते हिंदुत्वाचे अभिमानी असले तरी ते हिंदुसभावाले खास नाहींत! सावरकरांची उर्दू-द्वेषावर उभारलेली मराठीकरणाची चळवळ त्यांना मुळींच पसंत नाहीं! मराठी इतिहासाचा सावरकरांनीं चालविलेला दुरुपयोग त्यांना सुतराम् मान्य नाहीं! महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या घटनेबद्दल अनेक वर्षें वाद चाललेला सुप्रसिद्धच आहे. त्यांत दत्तोपंत एका वादस्तंभाचे नेते होते. बहुमत जरी त्यांच्या विरुद्ध गेलें तरी त्यांची तात्त्विक भूमिका त्यांनीं सोडली नाहीं. ऐतिहासिक संशोधनाचे बाबतींत त्यांचा सर जदुनाथ सरकार, रा. ब. सरदेसाई, वाकसकर ह्यांच्याशीं मूलभूत मतभेद आहे. विशेषतः शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीबाबत हा वाद तर विकोपाला गेला होता. पण दत्तोपंतांनीं आपल्या प्रतिपक्षाची हड्डी नरम केल्याशिवाय सोडलें नाहीं. विश्वविद्यालयांत कोणत्याहि परीक्षकाच्या। जागेसाठीं आपण अर्ज म्हणून करणार नाहीं; आपली विद्वत्ता आणि व्यासंग विश्वविद्यालयाला मान्य असल्यास त्यानें आपणांस परीक्षक होण्याबद्दल आमंत्रण द्यावें असा दत्तोपंतांचा हट्ट होता. त्याप्रमाणें दत्तोपंत आमंत्रणानेंच परीक्षक झाले —अर्जानें नव्हे! विश्वविद्यालयाच्या एका निवडणुकीसाठीं हेड मास्तरांच्यातर्फें ते उभे राहिले. पण 'कॅन्व्हासिंग' करण्याच्या ते विरुद्ध! त्यांच्या शाळेच्यासमोर असलेल्या मुलींच्या शाळेच्या मुख्य अध्यापिकेलाहि ते स्वतःबद्दल सांगावयाला। गेले नाहींत! ते म्हणत, "माझ्याबद्दल मी अधिक तें काय सांगणार! हेडमास्तर लोक काय मूर्ख आहेत? त्यांना मी लायक वाटल्यास त्यांनीं जरूर आपापलीं मतें मलाच द्यावयास पाहिजेत!" शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं दत्तोपंत निवडून येऊं शकले नाहींत. त्यांच्या एका अत्यंत परिचित, पूर्वीं त्यांचाच विद्यार्थी असलेल्या एका हेडमास्तरानें त्यांना मत देतों असें वचन देऊन अखेर त्यांच्याच प्रतिपक्षाला जेव्हां मत दिलें तेव्हां ते अगदीं चिडून म्हणाले, "महामूर्ख आहेत हे हेडमास्तर!" फिरून अर्थातच ते कोणत्याही निवडणुकीला उभे राहिले नाहींत—आणि उभे राहिलेच तर 'कॅन्व्हासिंग'च्या अभावीं आजच्या परिस्थितींत ते निवडून येणेंहि कठीण!

## अनेक संस्थांचे चालक

महाराष्ट्र साहित्य-परिषद, साहित्य-संमेलन, भारत इतिहास संशोधक

मंडळ, महाराष्ट्र शारदा-मंदिर, शिक्षण प्रसारक मंडळी, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, गडकरी पुण्यतिथि इत्यादि संस्था आणि कार्यें अगदीं धार्मिक नियमितपणानें इतकीं वर्षें दत्तोपंत चालवीत आले आहेत. यांपैकीं कित्येक संस्थांसाठीं तर त्यांनीं आपल्या जिवाचें रान केलेलें आहे—आपलें रक्त ओतलेलें आहे—आपला पैसा खर्च केला आहे. कित्येकांना आज त्यांच्या श्रमाची किंमत वाटत नसेल, कित्येकांना दत्तोपंतांनीं आपला वेळ निष्कारण दवडला असेंहि वाटत असेल, पण दत्तोपंतांच्या निष्ठेची, कर्तृत्वाची आणि उद्योगाची जोड जर वरील कार्याला नसती, तर महाराष्ट्राचे केवढें नुकसान झालें असतें ह्याची कल्पनाच केलेली बरी!

## दत्तोपंत व लफडीं

नसत्या हजारों लफड्यांत दत्तोपंत आपला वेळ निष्कारण घालवितात असा त्यांच्यावर त्यांच्या मित्रांचा आणि हितचिंतकांचा आक्षेप आहे गोव्यापासून बडोद्यापर्यंत आणि हैदराबादपासून नागपूरपर्यंत; गणेशोत्सवांत आणि अनेक सामान्य उत्सवांत व्याख्यानें द्यावयास त्यांची नेहमीं तयारी असते. ह्या बाबतींत त्यांच्या उत्साहाला सीमा नाहीं! ऐन उन्हाळ्यांत जाकोबाबादला एखाद्या मोफत वाचनालयाच्या उद्घाटन-समारंभाला हे जातील असें मी प्रो. श्री. ना. चाफेकरांबद्दल एकदां बोललों होतों; पण मला वाटतें हें विधान दत्तोपंतांना अधिक लागू होईल. केव्हांहि जा, दत्तोपंतांच्या भोंवतालीं कुठल्या तरी अलबत्या-गलबत्यांचें कडें पडलेलें असावयाचेंच. आणि दत्तोपंत न कंटाळतां तासन् तास त्यांच्याशीं बोलत बसलेले आढळून येतील. उलट त्यांना असेंहि सांगत असतलि कीं, मला फार काम आहे—मला तुमच्याशीं बोलायला सुद्धां वेळ नाहीं—अगदीं डोकें खाजवायलाहि सवड नाहीं—"इ. इ. एकदां मॅट्रिकच्या वर्गांतील एक विद्यार्थी पूर्वपरीक्षेंत नापास होऊनहि दत्तोपंतांकडे 'फॉर्म' मागावयाला आला. दत्तोपंत तीन तासपर्यंत त्याला व्याख्यानाचे डोस पाजीत होते. "आयुष्य हें असें आहे. जगाची परिस्थिति अशी आहे इ. इ." तीन तासांनंतर दत्तोपंतांनीं त्याला विचारलें कीं "बोल, अशा परिस्थितींत तुला कसा फॉर्म देतां येणें शक्य आहे?" त्यावर तो विद्यार्थी अगदीं निढावलेल्या माणसाप्रमाणें शांतपणें

म्हणाला, 'जाऊं द्या—देऊन टाका मला फॉर्म झालं!' त्यावर दुसरा एखादा माणूस दत्तोपंतांच्या जागीं असता तर त्यानें त्या विद्यार्थ्याच्या मुस्कटांतच भडकाविली असती. पण दत्तोपंत एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें त्याला म्हणाले, "आतां फिरून पहिल्यापासून तुला मला तीन तास सांगावें लागेल!" अशा ह्या वातावरणांत दत्तोपंतांच्या हातून भरीव 'लिखाण' होऊं शकलें नाहीं असा त्यांच्या मित्रांचा आक्षेप आहे—अर्थात् दत्तोपंतांना ही गोष्ट मान्य नाहीं तें निराळें! दत्तोपंतांजवळ 'ग्रंथसंग्रहा'चा डोंगरच्या डोंगर पडलेला आहे! सर्व दुर्मिळ हस्तलिखितें, पुराणग्रंथ दत्तोपंतांजवळ हमखास सापडावयाचेच. एवढा प्रचंड ग्रंथसंग्रह एका व्यक्तीजवळ असा महाराष्ट्रांत क्वचितच आढळेल. ह्या ग्रंथसंग्रहाकडे बोट दाखवून दत्तोपंत म्हणतील, कीं "पुढील दहा वर्षांचा माझा लेखनकार्याचा कार्यक्रम तयार आहे!" आतां हा कार्यक्रम त्यांच्या हातून केंव्हां पार पडेल तो पडो! 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हा उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ त्यांनीं लिहिलेला आहेच. तथापि मराठी भाषा व इतिहास ह्या दोन विषयांवर कांहीं तरी मौलिक ग्रंथरचना त्यांच्या हातून व्हावी अशी महाराष्ट्राची त्यांच्याबद्दलची अपेक्षा आहे. दत्तोपंत ग्रंथरचना करोत वा न करोत; विद्येच्या व्यासंगांत त्यांनीं आपलें सारें आयुष्य खर्च केलेलें आहे. अध्ययन व अध्यापन ह्या दोन कार्यांमध्यें ते नेहमीं निमग्न असतांना, मराठी भाषा, संस्कृति आणि इतिहास ह्यांबद्दल त्यांच्याइतका जाज्वल्य अभिमान इतरांना क्वचितच असेल! आणि ह्या अभिमानाचा प्रसार महाराष्ट्रांत त्यांनीं अगदीं पोटतिडीक घेऊन केलेला आहे. आपल्या आदर्शभूत चारित्र्यानें, निर्मळ विचारानें आणि सामर्थ्यवान् कर्तृत्वानें दत्तोपंतांनीं महाराष्ट्रांतील हजारों तरुणांना स्फूर्ति दिलेली आहे, आणि त्यांच्या आयुष्याला योग्य तें वळण लावलें आहे. म्हणूनच आम्ही त्यांना उत्कृष्ट शिक्षक आणि अतएव 'उत्कृष्ट ब्राह्मण' समजतों! इतिहास-संशोधनांत आजपर्यंत त्यांनीं आपला सर्व काळ घालविलेला आहे म्हणून सकृद्दर्शनीं ते 'जुनाट पुरुष' आहेत असें वाटतें. तथापि भूतकाळाच्या रद्दींत जरी ते लोळत असले तरी त्या रद्दीमधून रत्नें हुडकून काढण्याची त्यांची दृष्टि व मनोभूमिका पाहिली म्हणजे त्यांचें महत्त्व लक्षांत येतें.

# बत्तीसगुणी दत्तोपंत

विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून ते मराठी भाषेचा अभिमान शिकले, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांच्यापासून त्यांनीं इतिहास-संशोधनाची आणि ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली, लोकमान्य टिळकांपासून त्यांनीं निर्भीड वृत्तीचा राष्ट्रीय बाणा पत्करला, न्यायमूर्ति रानडे ह्यांच्यापासून मराठ्यांच्या संस्कृतीविषयींचा अभिमान त्यांच्या मनावर बसला आणि विनायकरावजी आपटे ह्यांच्यापासून साधेपणा, चिकाटी, आणि प्रसिद्धिपराङ्मुखता ते शिकले. एवढ्या श्रेष्ठ महापुरुषांच्या अंगांतले गुण अंशतः एकत्र करून त्यांच्यावर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाचा 'दत्तोपंती' छाप मारावयाला त्यांनीं कमी केलें नाहीं. म्हणूनच आम्ही त्यांना पुण्यांतले एक 'तेजस्वी ब्राह्मण' समजतों. असा प्रतिभाशाली ब्राह्मण शतकांत एकदांच जन्माला येतो असें आमचें ह्या क्षणाला स्पष्ट मत आहे. त्यांतील सत्यता काळ पटवून दाखवीलच.

पुण्यांतील ह्या तपस्वी आणि तेजस्वी ब्राह्मणास आमचें वंदन असो.

---

# सत्यशोधक म्हणजे बामणेतर नव्हे २०

परवां मुंबईला सत्यशोधक समाजाची पंधरावी परिषद् बऱ्याच वर्षांनंतर भरली. ह्या परिषदेचे अध्यक्ष साताराचे एक प्रसिद्ध कार्यकर्ते श्रीयुत केशवराव विचारे हे होते; आणि स्वागताध्यक्ष श्री. भास्करराव जाधव हे होते. श्री. भास्करराव जाधव हे एक महाराष्ट्रांतले अत्यंत विद्वान् आणि व्यासंगी गृहस्थ आहेत. ब्राह्मणेतरांचे पुढारी म्हणून जरी आज ते इतकीं वर्षें प्रसिद्ध असले तरी विद्येनें, वृत्तीनें, आचरणानें आणि संस्कारानें ते 'शंभर नंबरी ब्राह्मण' आहेत. वास्तविक ब्राह्मणेतर चळवळीचा त्यांच्यामागें आधार नसता, तरी मंत्रिपदापर्यंत ते आपल्या बुद्धिबळानें खास पोंहोचूं शकले असते. तथापि, त्यांच्या बुद्धीइतकें त्यांचें मन उदार आणि खेळाडू नाहीं ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. ब्राह्मणांचे ते पक्के द्वेष्टे आहेत. ब्राह्मणेतर चळवळीचें विष त्यांच्या हाडीं-मांसीं खिळलेलें आहे. मराठा जातीचा त्यांचा अभिमान दांडगा आहे. आणि इतकें वय झालें, आयुष्यांत इतका अनुभव आला तरी ब्राह्मणांची उचलबांगडी करण्याची भाषा खेडेगांवांतल्या एखाद्या सत्यशोधकी तमासगिराइतकीच ते आवेशानें करूं शकतात. भास्कररावांच्या बुद्धिमत्तेविषयीं

मला आदर आहे. पण ब्राह्मणेतर चळवळीचा विपर्यास ते जाणूनबुजून विशिष्ट हेतूनें करतात असा माझा त्यांच्यावर दावा आहे. मला स्वतःला कांहीं माहिती नाहीं; पण मराठा ज्ञातींतील माझे कांहीं मित्र मला नेहमीं सांगतात कीं, भास्कररावजींनीं ब्राह्मणेतरांसाठीं किंवा बहुजन समाजासाठीं स्वतःच्या पदराला कवडीचाहि खार कधीं लावून घेतला नाहीं. ब्राह्मणेतरांचे पुढारी होऊन त्यांनीं मंत्रिपद मिळवलें, लाखों रुपये कमावले; पण त्यांपैकीं कितीसा भाग त्यांनीं ब्राह्मणेतर चळवळीसाठीं जाहीरपणें खर्च केला आहे? बहुजन-समाजासाठीं स्वतःच्या पदरच्या पैशानें कांहीं त्यांनीं सार्वजनिक संस्था स्थापन केलेल्या आहेत? का विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या आहेत? का वसतिगृहें उघडलीं आहेत? किंवा डोंगरीवर त्यांनीं दोन लाखांची जशी उत्पन्नासाठीं चाळ बांधली आहे तसें, दहावीस हजार रुपये खर्चून त्यांना 'महात्मा फुले-मंदिर' बांधतां आलें असतें, पण तसें त्यांनीं केल्याचें कांहीं ऐकिवांत नाहीं!

मी असें म्हणत नाहीं, कीं भास्कररावांनीं ब्राह्मणेतर चळवळीसाठीं पैसे खर्च केले नाहींत! तथापि एवढें मात्र नक्की कीं पुढारी होण्यासाठीं जो श्रेष्ठ दर्जाचा त्याग आणि सेवाबुद्धि मनुष्याच्या अंगीं लागते ती भास्कररावांजवळ सुतराम् नाहीं! ह्याहिपेक्षां माझा भास्कररावांविरुद्ध मोठा आक्षेप आहे. मी जाहीररीत्या त्यांना सांगतों कीं, भास्करराव, तुम्ही सत्यशोधक तर नाहींच नाहीं, पण सत्यशोधन म्हणजे ब्राह्मणेतरी चळवळ असें समीकरण मांडून तुम्ही महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पवित्र नांवाला डांबर फांशीत आहां! महात्मा फुले हे ब्राह्मणांविरुद्ध नव्हते–ते भटांविरुद्ध होते. आणि भटांविरुद्ध तरी यांची चळवळ असण्याचें कारण म्हणजे भट हा जन्मानें भट आहे म्हणून नव्हे, तर तो अडाणी बहुजनसमाजाचा देवभोळेपणा वाढविण्यास मदत करून त्याला धार्मिक व सामाजिक गुलामगिरींत ठेवण्याचें काम करतो म्हणून! महात्मा ज्योतिराव फुले ह्यांची चळवळ बहुजनसमाजाच्या जागृतीची होती. दलिताचा उद्धार करावयाचा आणि जातिभेदाचें स्तोम माजविणाऱ्या वर्णाश्रमी सनातनी भिक्षुकवृत्तीचा ( जातीचा नव्हे ) नायनाट करावयाचा हें महात्मा फुले ह्यांच्या सत्यशोधक चळवळीचें रहस्य होतें आणि आहे! तथापि भास्कररावांसारख्या ब्रह्मद्वेष्ट्या आणि स्वार्थसाधु पुढाऱ्यांनीं स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्या-साठीं, ह्या थोर आणि राष्ट्रीय चळवळीचा विपर्यास केला आणि ब्राह्मण-

ब्राह्मणेतर वादाचा भयंकर भडका महाराष्ट्रांत पेटवून देऊन दोन तपेंपर्यंत तरी महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान केलें हें सत्य आहे! ब्राह्मणाला अचकट विचकट शिव्या देणारा माणूस म्हणजे सत्यशोधक हा पर्याय निर्माण झालेला पाहून महात्मा फुल्यांच्या आत्म्याला अत्यंत वाईट वाटत असलें पाहिजे! पण हा पर्याय भास्कररावी वृत्तीच्या ब्राह्मणेतरांनीं हेतुपुरस्सर बनवला!

सत्यशोधक समाजाच्या ह्या परिषदेच्या वेळीं स्वागताध्यक्ष म्हणून भास्कर-रावांनीं जें भाषण केलें त्यांत त्यांनीं हेंच जुनें विष ओकलें आहे! ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा शब्दप्रयोग त्यांत छपन्न वेळां आला असेल. कॉंग्रेसमध्यें ब्राह्मणेतर सामील होत आहेत हें पाहून त्यांना अत्यंत वाईट वाटत असल्याचें दिसतें. ब्राह्मणेतरांनीं आपलें राजकारण स्वतंत्रपणें चालू ठेवलें पाहिजे असें त्यांचें मत आहे. आणि ह्या कामीं सत्यशोधक चळवळीचा जीर्णोद्धार केला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. आणि शेवटीं मूर्तिपूजा नष्ट करणेंहि सत्य-शोधकांचें कर्तव्य आहे असा त्यांनीं संदेश दिलेला आहे. भास्कररावांचें भाषण जितकें विकृत, प्रतिगामी आणि अराष्ट्रीय आहे तितकेंच परिषदेचें अध्यक्ष श्रीयुत केशवराव विचारे ह्यांचें भाषण अत्यंत मुद्देसूद, पुरोगामी आणि खऱ्या सत्यशोधकाला शोभण्यासारखें आहे. त्यांच्या भाषणांत ब्राह्मण ब्राह्मणे-तर हा शब्दप्रयोग औषधाला सुद्धां मिळावयाचा नाहीं! त्यांच्या भाषणांतील एक महत्त्वाचें वाक्य—"...तशांत बनावट सत्यशोधक निर्माण होऊन त्यांनीं आपापसांत मतभेद उत्पन्न केले आणि **मत्सरबुद्धीनें जातिभेद जागृत केला** आणि समाजकार्य करण्यापेक्षां एकादी कृत्रिम मानाची जागा मिळण्यासाठीं अहमहमिका सुरू केली." हें बहुतेक भास्कररावांना उद्देशूनच ते बोलले असावेत असें वाटतें. समता आणि बंधुभाव ह्या दोनच भावनांवर सत्यशोधक समाजाची चळवळ उभारली आहे हें श्री. केशवराव विचारे ह्यांचें वाक्य अत्यंत विचारसरणीय आहे. आम्ही भास्कररावांच्या असत्य शोधकी भाषणाचा उपहास करतों आणि श्री. केशवराव विचारे ह्यांच्या भाषणाचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. महात्मा फुलें यांनीं स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्याची परंपरा जर महाराष्ट्रांत चालू ठेवावयाची असेल तर जातिभेद न मानणारे आणि सर्वांशीं बंधुत्वानें आणि समतेनें वागणारे लोक पुढें यावयाला पाहिजेत.

ज्याला स्वतःला आपण अमुक अमुक जातीचे आहोंत अशी जाणीव आहे, ज्याला आपल्या जातीचा अभिमान आहे, जो दुसऱ्या जातीचा द्वेष करतो त्याला सत्यशोधक केव्हांहि होतां यावयाचें नाहीं. सनातनी ब्राह्मण लोक जन्मावर आधारलेल्या ब्राह्मण्याच्या आणि वर्णाश्रम पद्धतीचा पुरस्कार करतात. ह्या प्रतिगामी आणि अराष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना जसें सत्यशोधक होतां यावयाचें नाहीं त्याप्रमाणें जो स्वतःला मराठा म्हणवतो, आपण शहाण्णव कुळांपैकीं एक आहोंत असा ज्याला अभिमान आहे, जो इतर जातींबरोबर रोटी-बेटी व्यवहार करण्यास तयार नाहीं, असा सनातनी मराठा हा महात्मा फुले यांचा सच्चा सत्यशोधक केव्हांहि होऊं शकणार नाहीं! ब्राह्मणवर्गातील सनातनी वृत्तीचा नायनाट होत चालला आहे. इतर जातींबरोबर रोटी-बेटी-व्यवहार करणारे पुष्कळ ब्राह्मण आज नामनिर्देश करून दाखवतां येतील. त्या दृष्टीनें मराठा समाज अत्यंत सनातनी आहे. जातीवांचून तो एक क्षणभर देखील विचार करूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत तो "ब्राह्मणेतर समाज म्हणूनच केवळ सत्यशोधक चळवळींत सामील होऊं शकतो!" हा खोटा आणि असत्य प्रचार भास्कररावजींसारख्या मंडळींनीं जो चालू केलेला आहे तो अत्यंत निंद्य आहे. मीं वर म्हटल्याप्रमाणें भास्करराव हे सत्यशोधक होऊं शकत नाहींत. भास्करराव हे जातिभेद मानणारे सनातनी मराठे आहेत. त्यांनीं दुसऱ्या जातीशीं बेटीव्यवहार केलेला नाहीं. त्यांच्या सुना आणि जांवई मराठेच आहेत. ब्राह्मणांच्याविरुद्ध चालविलेली ब्राह्मणेतरांची चळवळ म्हणजेच सत्यशोधक समाजाची चळवळ असा त्यांनीं दुष्ट विपर्यास केलेला आहे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हीं नांवें आणि त्यामागें असलेल्या कल्पना गाडल्याशिवाय खरी सत्यशोधक चळवळ निर्माण होणारच नाहीं! ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर ह्या शब्दांच्याऐवजीं **जातिभेदे** आणि **जातिमोडे** अशीं दोन नांवें ह्यापुढें वापरलीं गेलीं पाहिजेत.

जो **जातिभेद** पाळतो मग तो कोणत्या का जातीचा असेना– तो **जातिभेदे!** असा जातिभेदे माणूस सनातनी, प्रतिगामी आणि अराष्ट्रीय म्हणून समजला जावा! आणि जो मनुष्य जात मानीत नाहीं, जातिभेदामुळें हिंदी राष्ट्राचें स्वातंत्र्य दुरावलें आहे अशी ज्याची मनोमन खात्री झाली आहे तो **जातिमोडे!** असा जातिमोडे माणूस राष्ट्रीय वृत्तीचा, प्रागतिक आणि

खरा सत्यशोधक समजला जावा. मग त्याची जन्मजात कोणती का असेना! सदर सत्यशोधक समाजाच्या परिषदेला एकहि जातिमोड्या ब्राह्मण हजर नव्हता! व्यासपीठावर बसलेलीं बहुतेक माणसें पटकेवालीं आणि शेमलेवालीं– अतएव सनातनी मराठी किंवा माळी होतीं! सत्यशोधक चळवळीकडे बघण्याचा हा दृष्टिकोन मूलतःच बदल्याशिवाय फक्त ब्राह्मणेतरांनाच सत्यशोधक परिषदेला आमंत्रण करण्याची ही परंपरा नष्ट व्हावयाची नाहीं. सध्यां जातीय आणि धार्मिक पायावर आधारलेल्या आकुंचित चळवळीला ऊत आलेला आहे! हिंदु महासभा, मुस्लिम लीग, मराठा लीग, चित्तपावन लीग हीं ह्या अराष्ट्रीय आणि घातुक चळवळींचीं विषारी फुलें आहेत. सावरकरांसारखा कडवा जातपाततोडक देखील हल्लीं सनातनी ब्राह्मणांना खूष करण्यासाठीं जातिभेद मोडण्याची किंवा सहभोजन भरविण्याची भाषाच काढीत नाहीं! जिनासाहेब पाकस्तान तोडून मागत आहेत! डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात, "ज्यांचे आईबाप मराठे नाहींत तो मनुष्य श्रेष्ठ होणें शक्य नाहीं!" आणि आतां भास्करराव गर्जना करीत आहेत कीं "ब्राह्मणेतरांची स्वतंत्र राजकीय चळवळ पाहिजे!" ह्या आकुंचित, अराष्ट्रीय आणि घातुक मनोवृत्तींचा नाश करण्यास समर्थ असा एकच जर तोडगा असेल तर तो महात्मा फुले ह्यांचा सत्यशोधक समाज होय. कॉंग्रेसनें देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं ज्या तऱ्हेचें राष्ट्रीय वृत्तीचें राजकारण चालविलेलें आहे त्याचा सामाजिक आणि धार्मिक बाबतींत पुरस्कार करण्यासाठीं, बहुजनसमाजाला अज्ञानांतून आणि दास्यांतून बाहेर काढून विचारवंत आणि स्वयंजीवी बनविण्यासाठीं म्हणून महात्मा फुले ह्यांच्या सत्यशोधक चळवळीचा उपयोग करावयाला हवा.

श्री. केशवराव विचारे ह्या विचारी सत्यशोधकाला ही विचारसरणी पटली म्हणूनच सत्यशोधक परिषदेंतील त्यांचें भाषण अत्यंत पुरोगामी आणि राष्ट्रीय वृत्तीचें झालें. भास्कररावांसारखे सनातनी जातिभेदे ब्राह्मणेतर हे सत्यशोधक चळवळ चालविण्यास अगदीं नालायक आहेत. राष्ट्रीय वृत्तीच्या जातिमोड्या सुधारकांनीं सत्यशोधक समाजाच्या कार्यांची धुरा आपल्या खांद्यावर घेतली तरच महात्मा फुले ह्यांची खरी उज्ज्वल परंपरा चालविली जाईल. महात्मा गांधी आणि महात्मा फुले ह्यांचीं जीवनकार्यें अत्यंत व्यापक अशा जनहित-

बुद्धीवर आधारलेलीं असून परस्परांना पोषक अशींच आहेत. समता, बंधुभाव दलितोद्धार हीं तत्त्वें दोघांच्याहि तत्त्वज्ञानांत आहेत. ह्या दृष्टीनें जो खरा सत्यशोधक आहे तो राजकारणांत काँग्रेसमनच असावयाला पाहिजे! ब्राह्मणेतरी आकुंचित वृत्तीचीं माणसें हीं सत्यशोधक होणें शक्य नाहीं. खऱ्या काँग्रेसमनाला महात्मा ज्योतिराव फुले किंवा सत्यशोधक समाज ह्यांच्याविषयीं जो आदर आणि जिव्हाळा वाटतो तो भास्कररावांसारख्या अंध जात्यभिमानी माणसांना वाटणें शक्य नाहीं. पुणें म्युनिसिपालिटींत काँग्रेसपक्ष अधिकारारूढ असतांनाच रे मार्केटचें नामांतर 'महात्मा फुले मार्केट' असें होऊं शकलें! महात्माजींचें एवढें प्रचंड स्मारक केवळ काँग्रेसमनच करूं शकलें! भास्कररावांनीं ब्राह्मणेतर चळवळीचें स्मारक डोंगरीवर दोन लाखांची इमारत बांधून केलेलें आहे! सदर इमारतीला निदान 'फुले-भुवन' नांव दिलें असतें तरी भास्कररावांच्या सत्यशोधकत्वाला कांहीं तरी शोभा आली असती! भास्कररावांना आमची प्रेमाची विनंति आहे कीं आतां वृद्धपणीं तरी ब्राम्हण-ब्राह्मणेतर वादाच्या विषाची वाढ करण्यासाठीं सत्यशोधक समाजाचा उपयोग करून त्यांनीं महात्मा फुले ह्यांची बदनामी करूं नये!

आमची खात्री आहे कीं श्री. केशवराव विचारे ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं सत्यशोधक समाजाची वाढ व्यापक आणि राष्ट्रीय पायावर होईल. ब्राह्मण हा कधीं 'सत्यशोधक' होऊंच शकणार नाहीं आणि ब्राह्मणेतर म्हणजेच सत्यशोधक ह्या मूर्ख आणि वेडगळ कल्पना नाहींशा झाल्या पाहिजेत. प्रस्तुत लेखक स्वतःला कट्टा सत्यशोधक समजतो आणि महात्मा फुले ह्यांच्या कार्याचा तो अनुयायी आहे. माझ्या विचाराचे जे जन्मानें अर्थात् निरुपायानें ब्राह्मण जातीचे झालेले असे अनेक जातिमोडे लोक समाजांत सामील व्हावयास तयार आहेत! आमची सत्यशोधक समाजाच्या सध्यांच्या चालकांना प्रेमाची विनंति आहे कीं त्यांना महात्मा फुले ह्यांच्या पवित्र कार्याबद्दल जर खरा आदर असेल तर त्यांनीं भास्करराव जाधवांसारख्या सनातनी जातिभेद्या मंडळींची समाजांतून हकालपट्टी करावी व समता, बंधुभाव हीं तत्त्वें ज्यांना मान्य आहेत अशा हिंदु समाजांतील सर्व जातींमधील 'जातिमोड्या' वृत्तीच्या माणसांचा समाजांत अंतर्भाव करून सत्यशोधक समाजाच्या कार्याचें क्षेत्र व्यापक व राष्ट्रीय करावें; तरच महात्मा फुले ह्यांच्या कार्याचा खरा गौरव होईल.

---

# बोलपटाच्या भरमसाट जाहिराती २१

बोलपटांच्या निर्मितीइतकेंच त्यांच्या जाहिरातीला महत्त्व असतें. कारण बोलपटनिर्मिति हा एक धंदा आहे. एक बोलपट निर्माण करण्यासाठीं लाखों रुपयांचें भांडवल गुंतवलें जातें. म्हणून निर्माण केलेल्या मालाकडे जनतेचें चित्त तात्काळ वेधलें जावें, जनतेच्या मनांत त्या मालाबद्दल आतुरता उत्पन्न व्हावी आणि माल तात्काळ खपला जावा, मूळ भांडवल सव्याज परत मिळावें, एवढेंच नव्हे तर त्याच्यावर चांगलाच फायदा मिळावा एवढ्यासाठीं विविध तऱ्हेच्या जाहिरातींचा आणि प्रसिद्धीकरणाचा चित्रपटाच्या धंद्यांत फारच मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. सामान्यत्वेंकरून बोलपटाला लागणाऱ्या खर्चाचा सहावा हिस्सा तरी ह्या जाहिरातीवर खर्च केला जातो. अर्थात् हा खर्च निर्मात्या कंपनीकडून केला जातो. त्याव्यतिरिक्त सिनेमागृहांत बोलपट दाखविला जातो त्या गृहाच्या मालकाकडून वा चालकाकडूनहि त्या बोलपटाची निराळी जाहिरात केली जातेच. एवंच, बोलपट म्हणजे जाहिरात—खूपच खूप जाहिरात--प्रचंड जाहिरात असें समीकरण होऊन बसलेलें आहे. निदान आतां आपल्या देशांत तरी सिनेमाच्या भरमसाट

जाहिरातीची लोकांना इतकी सवय होऊन बसलेली आहे, कीं डोळयांत भरेल अशी जाहिरात जर एखाद्या बोलपटाची केली नाहीं तर तो बोलपट यशस्वी होणें फारच दुरापास्त ठरेल! एवढ्यासाठीं बहुतेक मोठमोठ्या निर्मात्या कंपन्यांची स्वतंत्र प्रसिद्धीकरणाची स्वतंत्र खातीं आहेत. ह्या खात्यांत निरनिराळया भाषा जाणणारे प्रसिद्धिपटु लेखक, चित्रकार इत्यादिकांचा भरणा केलेला असतो. बोलपटाच्या जाहिरातीचे विविध प्रकार जरी असले तरी त्या जाहिरातींपैकीं सर्वांत मोठा हिस्सा वृत्तपत्रांच्या आणि नियतकालिकांच्या वाट्याला येत असल्यानें, वर्तमानपत्रांतील सिनेमाच्या जाहिरातींना आज अत्यंत अवास्तव महत्त्व येऊन बसलेलें आहे. किंबहुना पुष्कळशा वृत्तपत्रांचें अस्तित्व आणि उपजीविका, सिनेमाच्या जाहिरातीपासून होणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असल्यानें बोलपटाच्या धंद्याशीं वृत्तपत्रांच्या धंद्याचें नातें एखाद्या आश्रितासारखें ओशाळेपणाचें होऊन बसलेलें आहे. 'आम्ही वर्तमानपत्रें जगवतों' अशा तऱ्हेची घमेंडखोर जाणीवहि पुष्कळशा बोलपट निर्मात्यांच्या मनांत आजकाल तीव्रतेनें वास करीत असल्यानें, एकाद्या बोलपटावर निर्भीडपणें टीका करून त्यांतील गुणदोष निःपक्षपातबुद्धीनें जनतेच्या निदर्शनास आणणें सामान्यत्वेंकरून वृत्तपत्रांना अशक्य झालें आहे. कदाचित् एखाद्या तत्त्वनिष्ठ वृत्तपत्रानें असें धाडस केलेंच तर त्याची जाहिरातीची चंदी ताबडतोब तोडली जाते व त्याचें नांव 'काळया यादीं'त समाविष्ट केलें जातें. अशा तऱ्हेचीं उदाहरणें अलीकडे घडल्याचें पुष्कळांना माहीत आहे. म्हणून वृत्तपत्रांतील सिनेमाच्या भडक जाहिरातींना वृत्तपत्रीय स्तंभांतील ठराविक ठशाच्या आंधळया स्तुतीची आणि खुशामतीची जोड मिळत गेल्यानें त्या जाहिरातींच्या खरेखोटेपणाबद्दल स्वतःचें मत बनवणें जनतेला अशक्य होऊन बसतें. निर्मात्यांची जाहिरात आणि वर्तमानपत्रांची स्तुति ह्यांना सिद्धसाधकत्वाचें स्वरूप येतें आणि त्यामुळें लोक फसले गेले म्हणजे त्यांचा जाहिरातीवरील विश्वास अजीबात उडून जातो; आणि अशा तऱ्हेनें जाहिरातीवरील लोकांचा विश्वास उडून गेला तर कालांतरानें बोलपटांच्या धंद्याचें फारच मोठें नुकसान झाल्याविना राहणार नाहीं.

जाहिरात ही एक कला आहे—हें एक शास्त्र आहे. पाश्चात्य देशांत हें शास्त्र पूर्णावस्थेला पोंहोचलेले आहे. ह्या शास्त्राच्या अध्ययनाची आणि

अध्यापनाची सोय करणारीं विद्यालयें तिकडे आहेत, त्यांच्या परीक्षा आहेत, आणि पदव्याहि आहेत. उत्तम जाहिरातीवर धंद्याचें यश अवलंबून असतें ह्या गोष्टीवर तिकडच्या व्यापाऱ्यांचा विश्वास आहे. जाहिरातीची कला आणि तंत्र अगदीं स्वतंत्र असल्यानें जाहिरात हा साहित्याचा एक प्रकार म्हणून समजला जाण्याइतकी त्याची आज प्रगति झाली आहे. सामान्यत्वेंकरून वाङ्मयांत भाषालंकृति, त्रोटकपणा आणि सूचकता हे गुण जसे आढळतात, तसेच ते उत्तम जाहिरातींतहि आढळले पाहिजेत. लंडनमध्यें जमिनीखालून जाणाऱ्या विद्युत्गाडींतून मी एकदां जात असतां ज्या डब्यांत धूम्रपानाला बंदी असते अशा एका डब्यांत अबदुल्ला सिगारेटची पुढील जाहिरात वाचून मी सर्दच झालों. “Smoking not allowed; not even Abdullas!” सदर जाहिरात ही उत्तम वाङ्मयाचा नमुना नाहीं असें कोण म्हणेल? अशा तऱ्हेच्या सुंदर कलात्मक जाहिराती आपल्या येथें कितीशा आढळून येतील! पूर्वींच्या काळीं मालाचें नुसतें वर्णन देणें एवढीच जाहिरात केली जात असे. उदाहरणार्थ, एखाद्या नाटक मंडळीच्या नाटकाची जाहिरात पुढीलप्रमाणें येत असेः— “राजापूरकर नाटक मंडळी; बुधवार दामाजी, शनिवारीं पुंडलीकः नट आणि तबलजी पाहिजेत. विजयानंद नाटकगृह, पुणें.” एवढ्याशा मजकुरांत किती तरी गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला जात असे. त्या वेळीं जाहिरातशास्त्र हें वास्तवावस्थेंत होतें असें वाटतें. सध्यां तें अद्भुतरम्यावस्थेंत गेलें आहे किंवा काय असा मनाला भ्रम पडतो. विशेषतः बोलपटांच्या ज्या भरमसाट, अस्पष्ट, आणि पोरकट जाहिराती ठळक अक्षरांत आपणांला वर्तमानपत्रांत वाचावयाला मिळतात, त्या पाहून आपण ‘अरबी भाषेंतील सुरस चमत्कार’च वाचतों आहों किंवा काय असाच मनाला भास होतो. “प्रेमासाठीं प्रियकर पहाड चढून गेला—तुफान समुद्रांत त्यानें उडी मारली—दुष्ट प्रधानानें आपल्या काळ्या कारवाईचा कहर केला—तथापि शेवटीं प्रेमाचा विजयच झाला.—कसा तो रुपेरी पडद्यावर पाहा—इ. इ.” ही जाहिरात वाचून वाचकांच्या मनांत काय उजेड पडतो? प्रियकर कोण, पहाड काय, प्रेमाचा विजय काय? कशाचा कशाला पत्ता नाहीं! बहुतेक जाहिरातींच्या आरंभीं अशीं कांहीं तरी सूत्रमय चार-पांच वाक्यें असतात, कीं त्या वाक्यांचा परस्परांतील संबंध उकलावयाला स्वर्गांतून प्रत्यक्ष पाणिनीलाच पाचारण करावयाला हवें. आणि ह्या वाक्यांचा

अर्थ कळण्यासाठीं करा काय, तर 'काळा पहाड' अन् 'फौलादी मुक्का' म्हणे रुपेरी पडद्यावर जाऊन पाहा! ज्यांना 'स्टंट बोलपट' म्हणतात अशा प्राकृत बोलपटांच्या जाहिराती वरील स्वरूपाच्या असतात असें नसून, सभ्य आणि आणि सुसंस्कृत प्रेक्षकांसाठीं जे बोलपट तयार केले जातात त्यांच्या जाहिरातीहि अत्यंत पोरकट आणि मूर्खपणाच्या लिहिल्या जातात ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

उदाहरणार्थ: सिर्कोच्या 'गीता' या बोलपटाची जाहिरात! बोलपटांच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या इतिहासांत इतक्या बेवकूब जाहिराती कोणी खरडल्या नसतील! सदर बोलपटाच्या जाहिराती ज्या कोणा इसमांनीं लिहिल्या असतील त्यांना जाहिरातशास्त्राचा तर श्रीगणेशासुद्धां माहीत नाहींच नाहीं—पण सामान्य व्यवहारज्ञान, अक्कल इत्यादि गोष्टींशीं त्यांची संपूर्ण फारकत झाली असली पाहिजे असें समजावयास हरकत नाहीं! गीतेचा आणि ह्या बोलपटाचा वस्तुतः कांहीं एक संबंध नाहीं! वेदांचा आणि तव्या भिल्लाचा जेवढा संबंध, बायबलचा आणि हिटलरचा जेवढा संबंध, महाभारताचा आणि उमाजी नाइकाचा जेवढा संबंध, ताजमहाल आणि बाबू चष्मेवाला ह्यांचा जेवढा संबंध, तितकाच गीतेचा आणि ह्या 'गीता' नामक बोलपटाचा संबंध! तथापि ह्या बोलपटाची जाहिरात करतांना, भगवान् श्रीकृष्ण, भगवान् बुद्ध, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विवेकानंद, अॅनी बेझंट—हरे राम राम! हिंदुस्थानांतला असा एकहि श्रेष्ठ विचारवंत वा तत्त्वज्ञानी मनुष्य राहिला नाहीं, कीं ज्याच्या नांवाची सार्वजनिक बदनामी ह्या बोलपटाच्या जाहिरातींत केली गेली नाहीं! आणि हा बोलपट म्हणे 'चैतन्य-पट', ज्ञानपट, मोक्षपट, ब्रह्मांडपट आणि विश्वपट! ह्या बोलपटाचा पहिला प्रयोग झाला त्याचें वर्णन 'अखिल जगतांतील पहिला प्रयोग' असें करण्यांत आलें! नशीब वाचकांचें कीं, 'परमेश्वरानें सृष्टि निर्माण केल्यानंतरचा हा पहिला प्रयोग' अशी त्या प्रयोगाची जाहिरात केली गेली नाहीं! ह्या अखंड विश्वांतील प्रथम-प्रयोगासाठीं अमेरिकेंतील रेड इंडियन लोक, आइसलंडमधून एस्किमो लोक, आफ्रिकेमधून हॉटेन्टॉट् लोक, रशियामधून किरगीझ् लोक आलेले होते व मॅजेस्टिक सिनेमासमोर विमानांची प्रचंड गर्दी झाली होती असें त्याचें विडंबन एका लेखकानें त्या वेळीं केलेलें होतें. एवढीं

प्रचंड जाहिरात करून आणि निर्मात्याचा पैसा पाण्यासारखा खर्च करून 'गीता' बोलपटाचें काय झालें, तर आठ आठवड्यांनंतर हा महान् विश्वपट भगवान् श्रीकृष्णाला भेटावयाला वैकुंठाला गेला !

गीता ह्या बोलपटाइतकीच मूर्खपणाची नसली तरी भरमसाट आणि अवास्तव जाहिरात 'बहुराणी' ह्या बोलपटाची करण्यांत आली आणि त्याचा परिणाम व्हावा तसाच झाला. खोट्या जाहिरातीनें लोक तात्कालिक फसले जातात; पण अवाढव्य जाहिरातीच्या जोरावर भिकार बोलपट यशस्वी होतात ही समजूत अजीबात चुकीची आहे. आम्ही जाहिरातीच्या जोरावर वाटेल तो बोलपट चालवून दाखवूं अशी घमेंड मारणाऱ्या ज्या प्रसिद्धीकरण संस्था आहेत त्यांच्या जाहिरातींचा आतांपर्यंत चांगलाच बोजवारा वाजलेला आहे. ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, जाहिरात हें साध्य नसून साधन आहे. ह्या साधनाचा अत्यंत कलात्मक दृष्टीनेंच उपयोग केला पाहिजे. भिंतीवर जाहि-राती डकविणें किंवा रस्त्यांतून जाहिरातींची गाडी ढकलीत नेणें हीच ज्यांची योग्यता आहे अशी मंडळी जोंपर्यंत जाहिरातपटु म्हणून सिनेमासृष्टींत वावरत आहेत तोंपर्यंत सिनेमांच्या भरमसाट जाहिरातींवर जनतेचा विश्वास बसणें शक्य नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे !

# विनोदी बोलपटांचा प्रवर्तक कोण ?    २२

'नवयुग चित्रपट'चा दुसरा बोलपट 'लग्न पहावं करून' हा गेल्या आठवड्यापासून पुणें आणि मुंबई येथें सुरू झालेला आहे. सदर बोलपटाचें दिग्दर्शन विनायक ह्यांनीं केलेलें असून, त्यांत मध्यवर्ती भूमिका दामूअण्णा मालवणकर ह्यांची आहे—किंबहुना एकमेव दामुअण्णांच्या कर्तृत्वावरच ह्या बोलपटाचा एकखांबी तंबू उभारलेला आहे. सदर बोलपट मीं अद्यापि पाहिलेला नाहीं. तथापि, पुणें आणि मुंबई येथें ह्या बोलपटाचें प्रेक्षकांनीं जें स्वागत केलें आहे त्यावरून, सदर बोलपट यशस्वी निघालेला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि असा यशस्वी बोलपट काढल्याबद्दल त्या बोलपटाच्या निर्मात्याचें अभिनंदन करावयास पाहिजे. सदरहू बोलपटाची कथा, घटना, आणि संवाद बुद्धिप्रधान आणि चतुर विनोदाच्या कसोटीला सर्वस्वीं उतरणारे नाहींत असें मला सांगण्यांत आलेलें आहे. त्यामुळें 'ब्रह्मचारी', 'ब्रँडीची बाटली' आणि 'अर्धांगी' ह्या बोलपटांत ज्या दर्जाच्या विनोदाची परंपरा निर्माण झालेली आहे, त्या परंपरेच्या पातळीवर सदर बोलपटांतील विनोद जाऊन बसणारा नाहीं असा पुष्कळांचा अभिप्राय आहे. कसेंहि असो,

तो मतभेदाचा आणि प्रेक्षकांचा अभिरुचीच्या प्रश्न आहे. चिं. वि. जोशी, खांडेकर किंवा मी ह्यांच्या विनोदी लेखनाची तुलना आणि तफावत करण्यास जनता समर्थ आहे. त्याबद्दल बोलण्याचा निदान मला तरी अधिकार नाहीं; म्हणून सदर बोलपट हा यशस्वी आहे असें गृहीत धरून, त्यांतील विषयाबद्दल व विनोदाबद्दल मौन पत्करून मी एका निराळयाच मुद्द्याकडे वळतों.

सदर बोलपटाची जाहिरात करतांना, जाहिरातीच्या मथळयावर 'मराठी विनोदी बोलपटाचें युग सुरू करणाऱ्या दिग्दर्शक विनायकांची सर्वोत्तम विनोदी कलाकृति' असा जो मजकूर टळक टाकामध्यें छापला जात आहे तो मजकूर माझ्या दृष्टीनें आक्षेपार्ह आहे; निदान विवाद्य तरी खास आहे. हा वाद दुसऱ्या कोणी सुरू करण्यापूर्वीं त्या वादाशीं प्रत्यक्ष संबंध असलेला जो मीं, त्या 'मी'नेंच त्या वादाला तोंड फोडावें हें अधिक बरें, ह्या दृष्टीनेंच मी हें लिहीत आहे. स्वतःसंबंधीं माणसानें लिहूं नये असा जुना शिष्टाचार आहे. तथापि स्वतः ढोंगीपणाचें मौन स्वीकारावें आणि भगतगणाकडून स्वतःच्या गौरवाचें ढोलकें पिटवून घ्यावें ह्या अशिष्ट शिरस्त्यापेक्षां स्वतःबद्दल काय वाटतें हें निःसंदिग्धपणें रोखठोकपणें जनतेपुढें स्वतःच मांडणें हें अधिक प्रामाणिकपणाचें आणि आधुनिकी वृत्तीचें द्योतक आहे असें मला वाटतें.

बोलपटांच्या जाहिराती ह्या भरमसाट अतिशयोक्ति आणि दिशाभूल करणाऱ्या असतात असें मीं ह्याच स्तंभांमध्यें मागें लिहिलेलें आहे. पुष्कळदां त्या असत्य विधानानें भरलेल्या असतात अशीहि पुस्ती त्यामध्यें आतां केली तर तें चुकीचें होणार नाहीं. असत्य विधानांनीं परिपूर्ण अशा जाहिरातीपेक्षां एक वेळ अतिशयोक्त आणि आत्मस्तुतिपूर्ण विशेषणांनीं कांठोकांठ भरलेल्या जाहिराती पत्करल्या ! 'गीता' बोलपटाच्या जाहिरातींत 'विश्वपट', 'मोक्षपट', 'चित्रपट' 'आजपर्यंत जगांत झाला नाहीं असा पट' अशा तऱ्हेचीं विशेषणें नव्हतीं का ? अशा विशेषणांनीं लोक फारसे फसत नाहींत, कारण ह्या विशेषणांच्या आड दडलेला पोकळ मूर्खपणा जनतेच्या सहजच लक्षांत येतो. म्हणून 'सदर बोलपट तुम्हांला वेड लावील' ! 'सदर बोलपट तुम्हांला चारीमुंडे चीत करील !' किंवा 'कित्येक शतकांत तुम्हांला असा बोलपट पाहावयाला मिळावयाचा नाहीं.' अशा घोषणा बोलपटाच्या जाहिरातींत जर केलेल्या आढळल्या तर त्या एक वेळ क्षम्य ठरतील. कारण ह्या वल्गना तुलनात्मक नाहींत, किंवा कोणत्याहि

विशेष बोलपटाचा किंवा पटादिग्दर्शकाचा वा लेखकाचा त्यांत संबंध येत नाहीं! पण उद्यां एखाद्या 'हळदीकुंकू' नामक बोलपटाच्या जाहिरातीमध्यें " 'कुंकू' बोलपटाचें कंबरडें मोडणारा महान् सौभाग्यपट" अशी जर त्याची जाहिरात कोणी केली किंवा " 'प्रेसिडेंट' बोलपटाच्या थोबाडींत मारील असा नवीन बोलपट 'चेअरमन' " असें कोणी छापलें," शांताराम, देवकी बोस, ह्यांना मुठींत नाकें धरावयाला लावील असा नवीन दिग्दर्शक 'बापूराव भोपळे' " अशी कोणी घोषणा केली तर ती एखादे वेळीं सत्य असूनहि गर्ह्य आणि अशिष्ट ठरेल. पण ज्या जाहिरातींत सत्याचा अंशमात्रहि नाहीं अशा जाहिराती छापण्याचा जर कोणी प्रयत्न केला, तर त्या जाहिराती छापण्याचे हेतु अप्रामाणिक आणि अधम आहेत हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. जाहिरातीचा आत्मा पुष्कळ वेळीं अतिशयोक्ति हा असला तरी, अतिशयोक्ति म्हणजे कांहीं असत्य नव्हे. 'मराठी विनोदी बोलपटाचें युग दिग्दर्शक विनायक ह्यांनीं सुरू केलें' हें विधान नुसतें अतिशयोक्त आहे एवढेंच नव्हे, तर तें निर्भेळ सत्य नव्हे ही गोष्ट खुद्द दिग्दर्शक विनायकहि कबूल करतील. आणि म्हणून ही असत्य जाहिरात जाणून बुजून करण्याच्या मुळाशीं अप्रामाणिक हेतु तर नसावा, असा मला साहजिकच संशय आल्यास तो माझा दोष नाहीं; कारण पुष्कळशा वृत्त-पत्रांतून 'ब्रॅण्डीची बाटली', 'ब्रह्मचारी' ह्यांना मागें टाकणारा 'लग्न पहावं करून' हा बोलपट आहे असें मला चिडवण्यासाठीं मुद्दाम लिहिलेलें आहे असें माझ्या आढळांत आलेलें आहे. ज्या शिडीवरून मनुष्य भिंतीवर चढलेला आहे त्या शिडीला भिंतीवर चढल्यानंतर लाथ मारणें हा कांहीं शहाणपणा नाहीं! 'ब्रह्मचारी', 'ब्रॅण्डीची बाटली' किंवा 'अर्धांगी' ह्यांतील विनोद एक वेळ उच्च दर्जाचा नाहीं असें कोणी म्हटलें तर तो वादाचा प्रश्न म्हणून क्षम्य म्हणतां येईल. पण ज्या बोलपटांनीं दिग्दर्शक विनायक, दामुअण्णा किंवा हंस कंपनी ह्यांना सिनेमासृष्टींत स्थान दिलें, जगविलें आणि वांचविलें त्या बोलपटांना काम साधल्यानंतर आतां कमीपणानें किंवा उणेपणानें लेखणें हें कृतघ्नतेपेक्षां जास्त हलकट मनाचें लक्षण आहे! 'ज्वाला' ह्या बोलपटाच्या निखाऱ्यांत 'हंस' कंपनी भाजून—होरपळून तिची मुरगी झालेली होती.

त्या मेलेल्या मुरगीला फिरून जीवन देऊन तिला पिसें आणि पंखें आणवून तिचा हंस बनविण्यास 'ब्रह्मचारी' बोलपटानें मदत केलेली आहे

एवढेंच नव्हे, तर विनोदी बोलपटाच्या क्षेत्रांत 'न भूतो नं भविष्यति' असा विक्रम 'ब्रह्मचारी' बोलपटानें करून दाखविलेला आहे. 'तुकाराम' आणि 'तुलसीदास' असे संतपट चाळीस अन् पन्नास आठवडेपर्यंत चालूं शकतात, त्याप्रमाणें विनोदी बोलपटहि संतपटाएवढी पांच-पन्नास आठवड्यांची दौड मारूं शकतात हें 'ब्रह्मचारी'नें सिद्ध केलेलें आहे ! 'लग्न पहावं करून' हा बोलपट कितीहि यशस्वी झाला म्हणून त्याचा हात 'ब्रह्मचारी'च्या लंगोटाच्या नाडीपर्यंत तरी पोंहोचूं शकेल काय ? 'यमुना जळीं'सारखें गाणें पुन्हा आपण देऊं शकूं असें म्हणण्याची दिग्दर्शक विनायक ह्यांची छाती आहे काय ? 'अर्धांगी' ह्या बोलपटानें दोन अडीच लाख कर्जाच्या गाळांत रुतून बसलेल्या 'हंसा'ला सपशेल बाहेर काढून हवेंत उडायला लावलें; आणि 'नवयुग'च्या आरामशीर, सुसंपन्न आणि सोनेरी पिंजऱ्यांत आणून सोडलें आहे; हा पराक्रम 'लग्न पहावं करून' हा बोलपट करूं शकेल काय ? पण मूळ वादाशीं ह्या गोष्टींचा कांहीं एक संबंध नाहीं. आम्ही असेंहि म्हणतों कीं, दिग्दर्शक विनायक ह्यांना ह्या जाहिराती-मधील सदरील खोटीं आणि कृत्रिम विधानें मान्यहि नसतील. मी स्वतः 'नवयुग' कंपनींत आज असतों तर अर्थात्च हीं विधानें करण्याची कोणाची छातीच झाली नसती. तथापि मी गेल्यानंतर माझ्यामागें माझी निंदा करून 'विनायका'चा तोंडपुजेपणा करणारीं जीं कोणी हांजीहांजीखोर कुलुंगी कुत्रीं 'नवयुग' कंपनीच्या दरवाजांत अद्यापि लांगूलचालन करीत आहेत, त्यांचा हा उपद्व्याप असेल अशी माझी समजूत आहे. मी त्यांची उपेक्षा करतों. एवढेंच नव्हे पण 'ब्रह्मचारी' आणि 'अर्धांगी' हे अगदीं भिकार बोलपट होते अशी जरी आतां 'नवयुग' नें जाहिरात कर-ण्यास सुरुवात केली, तरी त्यामुळें (प्रो. माटे ह्यांचा ऐतिहासिक शब्दप्रयोग करून म्हणावयाचें झाल्यास) माझेंच काय पण कोणाचेंहि कूस वांकडें व्हाव-याचें नाहीं ! मूळ वादाचा मुद्दा असा आहे कीं, मराठींत विनोदी बोलपटाच्या युगास दिग्दर्शक विनायक ह्यांनीं सुरुवात केली किंवा काय ? माझें स्वतःचें म्हणणें असें आहे कीं, सदर विधान चूक आहे. याउलट माझें स्वतःचें असें म्हणणें आहे कीं, मराठींत विनोदी बोलपटाचें युग जरी नसलें, (कारण

तसें म्हणणें फाजील आत्मविश्वासाचें आहे) तरी ती प्रथा मीं स्वतः सुरू केलेली आहे.

मराठी भाषेंत रुपेरी पडद्यावर विनोदी बोलपटांची परंपरा जी सुरू झालेली आहे त्या परंपरेचा जनक मी आहे, विनायक नाहीं! तसें ऐतिहासिक दृष्ट्याच पाहिलें तर मराठींत पहिला विनोदी बोलपट निर्माण करण्याचें श्रेय दिग्दर्शक विश्राम बेडेकर ह्यांनाच द्यावयास पाहिजे—मराठी भाषेंतील पहिले दीर्घ विनोदी बोलपट, कै. गडकरीकृत 'ठकीचें लग्न'—ज्याचे संवाद मीं लिहिलेलें होतें तो—आणि चिं. वि. जोशी ह्यांचे 'सत्याचा प्रयोग' हे होते. हे बोलपट श्री. हरिभाऊ मोटे ह्यांच्या भट-बेडेकर प्रॉडक्शननें सांगली येथें काढले होते. तत्पूर्वी अगदीं छोटे छोटे चित्रपट श्री. दादासाहेब फाळके ह्यांनींच मुक्या जमान्यांत काढलेले होते. तथापि एकामागून एक प्रदीर्घ सामाजिक विनोदी बोलपट मींच हंस कंपनीला लिहून दिले; आणि विनोदी बोटपटाचा प्रचंड रसिक प्रेक्षकवर्ग महाराष्ट्रांत निर्माण केला. विनायक हे माझ्या विनोदी बोलपटांचें यशस्वी दिग्दर्शक होते ही गोष्ट मला मान्य आहे. पण तो केवळ यदृच्छया जुळून आलेला योगायोग होता. मी कोणत्याहि बोलपट कंपनींत लेखक म्हणून प्रविष्ट झालों असतों तरी तेथें विनोदी बोलपट लिहून त्या कंपनीकडून विनोदी बोलपटांची परंपरा सुरू करवून घेतलीच असती. पण मी जर 'हंस पिक्चर्स'चा लेखक झालों नसतों तर दिग्दर्शक विनायक ह्यांनीं विनोदी चित्रपटांचें दिग्दर्शन यावज्जन्म केलें नसतें. हा ह्या वादाचा मुख्य भाग आहे. कारण दिग्दर्शक विनायक आणि विनोद ह्यांचा सुतराम् संबंध नाहीं. विनायक हे एक उत्तम नट आहेत; कोणत्याहि तऱ्हेचा अभिनय ते यशस्वी तऱ्हेनें करूं शकतात. ते एक उत्तम दिग्दर्शक आहेत ह्या सर्व गोष्टी मला मान्य आहेत. तथापि विनोद हा विनायकांचा स्वभावधर्मच नाहीं. विनायकांच्या मनाची ठेवण गंभीर भावनाप्रवण, आणि करुणरसास जास्त अनुकूल अशी आहे. तो जितका वेळ हसतो त्यापेक्षां जास्त वेळ तो रडतो. हें सत्य आहे! विनायकाशीं ज्यांचें प्रत्यक्ष संघटन झालें असेल त्याला हें सांगावयाला नको कीं, विनायकाला आपल्या डोळ्यांत अश्रु जितक्या चटकन् आणतां येतात तितकें हास्य त्याला ओठावर आणतां येत नाहीं.

'छाया' ह्या बोलपटापर्यंत विनायकाचें विनोदी काम कोठें आलें आहे

हें कोणीहि दाखवून द्यावें असें माझें उघड आव्हान आहे! मी असें मुळींच म्हणत नाहीं कीं तोंपर्यंत विनोदी काम त्याला मुळींच करतां आलें नसतें! पण तोंपर्यंत विनोदी बोलपटाकडे तो वळला नाहीं हें ऐतिहासिक सत्य आहे! माझ्या 'धर्मवीर' बोलपटांत 'जगदीश' ही विनोदप्रधान भूमिका यशस्वी रीतीनें विनायकानें केल्यानंतर विनोदी अभिनयाचें नवीन दालन त्याच्यापुढें उघडलें! आणि संपूर्ण विनोदी बोलपट यशस्वी करून दाखवतां येतील ही कल्पनाहि त्याचमुळें आम्हांला शक्य वाटली. त्याबरोबर मी 'प्रेमवीर' हा संपूर्ण विनोदी बोलपट लिहिला. 'प्रेमवीर'चें ध्वनिमुद्रण जर भिकार झालें नसतें तर तो बोलपट विलक्षण यशस्वी झाला असता. तथापि ह्या आहे परिस्थितींत त्या बोलपटानें यश मिळवलें व त्याच्या मागोमाग 'ब्रह्मचारी' व त्याचे भाऊबंद परिणामकारक तऱ्हेनें येऊं शकले, हा खरा इतिहास आहे. विनोदाच्या प्रवाहांत मीं विनायकाला हात धरून ओढीत आणलें. मी विनायकाच्या वाटेंत आलों नसतों व 'छाया', 'ज्वाला', 'देवता', 'अमृत', अशाच तऱ्हेच्या बोपलटांचें दिग्दर्शन आणि अभिनय तो करीत गेला असता, तर विनोदी नट किंवा विनोदी पटांचा दिग्दर्शक म्हणून त्याचा उल्लेख करण्याची आज पाळीहि आली नसती. विनायकानें मला विनोदी बोलपटांचा लेखक बनविला नसून मीं विनायकाला विनोदी बोलपटाचा दिग्दर्शक बनविलें आहे हें एखादें पोरदेखील कबूल करील. आतां कदाचित् कोणी असा कोटिक्रम करील कीं 'अत्रे, तुम्ही विनोदी बोलपटांचें युग निर्माण करणारे लेखक असाल, तुमचें श्रेय हिरावून कोणी घेत नाहीं; पण विनोदी बोलपटांचें युग निर्माण करणारे दिग्दर्शक तर विनायकच ना?' हा कोटिक्रम दिशाभूल करणारा आहे. सामान्यत्वें दिग्दर्शक आणि लेखक ह्यांमध्यें महत्त्वाचा अवयव कोणता असा वाद निघाला तर बोलपटाच्या कथेचें महत्त्व अतिशय आहे ही गोष्ट मान्य करूनहि मी असें म्हणेन कीं, लेखकापेक्षां दिग्दर्शकाचें महत्त्व जास्त आहे. नुसती गोष्ट लिहून भागत नाहीं. ती पडद्यावर उत्तम वठविण्याचें कार्य दिग्दर्शकाचें आहे. दिग्दर्शक हा लेखकाचा पडद्यावरचा भाष्यकार आहे. अगदीं सामान्य गोष्ट उत्तम दिग्दर्शकाच्या हातांत गेली तर ती पडद्यावरच पुष्कळच यशस्वी होऊं शकते. उदाहरणार्थ 'माणूस' हा बोलपट. ह्या बोलपटाचे दिग्दर्शक शांताराम नसते तर निम्म्या दरांत देखील ती गोष्ट पडद्यावर कोणीहि पाहावयाला तयार

झालें नसतें. म्हणून सर्वसामान्यत्वेंकरून सिनेमासृष्टींत लेखकापेक्षां दिग्दर्शकाचें महत्त्व जास्त असतें. तथापि विनोदी बोलपटांच्या बाबतींत मात्र हें त्रैराशिक व्यस्त आहे. विनोदी बोलपटाच्या दिग्दर्शकापेक्षां त्याच्या लेखकाचें महत्त्व जास्त आहे. कारण, कथा, प्रसंग आणि संवाद जर खरोखरच विनोदी असले तर दिग्दर्शक सामान्य असला तरी तो बोलपट यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि बोलपटांतील विनोद जर सामान्य, मामुली आणि कृत्रिम असला तर मात्र कसलाहि दिग्दर्शक आणला तरी त्या विनोदाचा दर्जा वाढूं शकणार नाहीं. म्हणून विनोदी बोलपटाचें युग सुरू करण्याचें श्रेय दिग्दर्शकापेक्षां लेखकाकडेच अधिक सार्थकतेनें जाऊं शकतें! बाकी, 'मराठी विनोदी बोलपटाचें युग सुरू करण्यांतले अर्धवट भागीदार विनायक' असें त्यांचें जाहिरातींत वर्णन केलें गेलें असतें तर तें सत्याला अधिक धरून झालें असतें! म्हणजे प्राप्तीचा अर्धा वाटा माझ्याबरोबर त्यांनाहि मिळाला असता. 'लग्न पहावं करून' हा बोलपट पुष्कळ आठवडे चालावा, नवयुग कंपनीला पुष्कळ पैसा मिळावा, एवढ्याचसाठीं दिग्दर्शक विनायक ह्यांची वाटेल ती स्तुति त्या बोलपटाच्या जाहिरातींत केली तरी आमचें कांहीं म्हणणें नाहीं! मराठी विनोदी बोलपटाचें युग सुरू करणारा दिग्दर्शक एवढेंच काय, पण मराठी बोलपटांचा बाप आणि हिंदी बोलपटांचा 'चाचा' म्हणून जरी विनायकांची जाहिरात करण्यांत आली तरी त्यामुळें आमचें कवडीचेंहि नुकसान होणार नाहीं! तथापि, ऐतिहासिक सत्य म्हणून कांहीं एक गोष्ट असते आणि तिची चाड समंजस आणि सुशिक्षित माणसानें व्यवहारांत धरावयाला पाहिजे. तिचा विपर्यास करणें ही सभ्य गोष्ट नव्हे एवढी जाणीव ज्यांना असेल त्यांच्या हातून असल्या जाहिराती लिहिल्या जाणार नाहींत असें आम्हांला वाटतें!

# महाराष्ट्राचे रिप् व्हॅन विंकल

## तात्याराव सावरकर २३

सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक वॉशिंग्टन आयार्व्हिंग ह्यांनीं रिप् व्हॅन विंकल नांवाच्या एका झोपाळू माणसाची फारच अद्भुत पण अर्थपूर्ण गोष्ट लिहिलेली आहे, ती सुप्रसिद्धच आहे. रिप् व्हॅन विंकल हा तरुणपणीं एका डोंगराच्या कडेला भटकत असतां तेथें त्याला झोप लागली. ही त्याची झोप चाळीस वर्षेपर्यंत टिकली. झोपेंतून जागा झाला तेव्हां तो साठ-पासष्ट वर्षांचा बुड्ढा होऊन उठला आणि परत आपल्या गांवीं आणि घरीं जातो तों चाळीस वर्षांत केवढें तरी स्थित्यंतर झालेलें होतें! पूर्वींची राजसत्ता जाऊन तिच्या जागीं प्रजासत्ताक शासनपद्धति चालू झाली होती. लोकांच्या विचारांत आणि आचारांत केवढी तरी क्रांति झाली होती! चाळीस वर्षांपूर्वींच्या जुन्या जगांतून आलेल्या ह्या बुड्ढयाची त्या नवीन वातावरणांत जी हास्यास्पद आणि केविलवाणी स्थिति झाली त्याचें अत्यंत हृदयस्पर्शी चित्र आयार्व्हिंगनें त्या गोष्टींत रेखाटलेलें आहे. रिप् व्हॅन विंकलप्रमाणेंच चाळीस वर्षें—पण मानसिक

निद्रेंत घोरत पडलेलीं आणि जागृत झाल्यानंतर आमूलाग्र बदललेल्या परिस्थितीशीं समरस होऊं न शकल्यामुळें हास्यास्पद ठरलेलीं झोपाळू माणसें प्रत्येक समाजांत आणि प्रत्येक कालीं असूं शकतात. आजच्या घटकेस महाराष्ट्राचे रिप् व्हॅन विंकल श्री. तात्याराव सावरकर हे आहेत असें आम्हांस मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

श्री. तात्याराव सावरकर हे एक अलौकिक बुद्धीचे, गुणांचे आणि कर्तृत्वाचे पुरुष आहेत याविषयीं कोणाचेंहि दुमत नाहीं. त्यांच्या त्यागाला, सहनशीलतेला आणि धैर्याला सीमा नाहीं आणि तुलना नाहीं! देशाच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं आपल्या सर्वस्वाचें बलिदान केलें! त्यांच्या वाणीचे आणि लेखणीचे स्वातंत्र्यप्रीतीचे प्रतिभाशाली उन्मेष बघून महाराष्ट्र आणि भारत दिपलेला आहे—हें अगदीं—अगदीं अक्षरशः खरें आहे! पण हा निधड्या छातीचा स्वातंत्र्यवीर सावरकर १९०६ सालीं अंदमानांत दीर्घ आणि खडतर अशी काळ्यापाण्याची शिक्षा भोगावयास गेल्यानंतर पुन्हा त्या देदीप्यमान् स्वरूपांत महाराष्ट्राला पाहावयाला मिळालेला नाहीं. १९२४ सालीं सावरकर अंशतः मुक्त होऊन रत्नागिरीस आले आणि त्यानंतर जवळ जवळ आणखी एका तपानें ते पूर्ण निर्बंधमुक्त झाले. आज सावरकर अप्रतिहतपणें जरी हिंदुस्थानांत संचार करीत आहेत, तथापि १९०६ मधील स्वातंत्र्याचें तें कडकडीत आणि जागृत स्वरूप आज त्यांच्यामध्यें उरलेलें नाहीं. दीर्घ शिक्षेच्या आणि निर्बंधाच्या काळझोपेंतून बदललेल्या जगांत जागृत झालेले ते रिप् व्हॅन विंकल आहेत! अरेरे, ब्रिटिश सरकारनें ही आमची केवढी हानि केली! त्यांनीं आमच्या स्वातंत्र्यवीराचा रिप् व्हॅन विंकल करून टाकला! १९०६ सालीं काळ्यापाण्याच्या पिंजऱ्यांत जेव्हां हा सिंहाचा बच्चा सरकारनें जबरदस्तीनें लोटला, तेव्हां त्याचें स्वरूप बघून आणि गर्जना ऐकून मी मी म्हणणाऱ्या वीरांच्या छातींत धडकी भरली असती! पण दोन तपांनीं त्या गुहेंतून बाहेर आलेला तो सिंह आज एखाद्या सर्कशींतल्या सिंहाप्रमाणें किंवा 'केसरी' पत्रावरील छापील 'सिंहा'प्रमाणें गलित-नखदंत झालेला आहे. त्याची आयाळ झडून गेलेली आहे, गाल लोंबूं लागले आहेत, आणि शेपूट सैल पडलेलें आहे! हा त्या सिंहाचा दोष नव्हे— दीर्घकालीन झोपेंतून उठलेल्या रिप् व्हॅन विंकलचा हा दोष नव्हे!

हा दोष सर्वस्वीं सरकारचा आणि काळाचा आहे. अरेरे! सरकारनें ही आमची केवढी जबरदस्त हानि केली, कीं त्यानें स्वातंत्र्यवीराचा रिप् व्हॅन विंकल करून टाकला!

ज्या परिस्थितीनें स्वातंत्र्यवीर सावरकरांना जन्म दिला ती परिस्थिति दोन तपांत किती तरी बदलून गेलेली होती! त्यांतल्या त्यांत मध्यंतरीं उद्भवलेल्या महायुद्धानें तर इकडचें जग तिकडे करून टाकलेलें होतें! पूर्वीचीं ध्येयें, आकांक्षा, साधनें पार— पार बदलून गेलेलीं होतीं! पाश्चात्य देशांत साम्राज्यसत्तावादासारखी प्रचंड शक्ति जन्मास आली होती; तर हिंदुस्थानांत महात्मा गांधींच्या अहिंसात्मक सत्याग्रहानें हिंदी राजकारणाला एका विराट् बलाची जोड दिलेली होती. हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचा मंत्र आणि तंत्र अजीबात बदलून गेलेलें होतें. अशा परिस्थितींत सावरकरांचा हा रिप व्हॅन विंकल पुन्हा आपल्या देशांत आणि गांवांत परत आला. १९३६ च्या जगांत १९०६ चा माणूस हिंडूं लागला!

जग बदललेलें होतें पण तो होता तेथेंच होता. म्हणून त्याची भाषा जगाला कळेना आणि जगाची भाषा त्याला कळेना! त्यामुळें त्याच्या डोक्यांत जुन्या आणि नव्या गोष्टींचा सावळागोंधळ उडून गेला. ब्रिटिश सिंहाच्या दाढीला गदगदा हलवणारा हा पूर्वीचा वीर आतां मुसलमानांची दाढी हलवण्याच्या गोष्टी करूं लागला! हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून विलायतेंत आणि जगभर चळवळ करणारा एक वेळचा आंतरराष्ट्रीय वृत्तीचा हा माणूस आतां फक्त हिंदु स्वातंत्र्याच्या आणि हिंदु राज्याच्या गोष्टी बोलूं लागला. तरुण पिढी मार्क्स, लेनिन आणि ट्रॉट्स्कीच्या तत्त्वज्ञानाची भाषा बोलत होती, तर ही स्वारी नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, गुरु गोविंदसिंग, उमाजी नाईक आणि वासुदेव बळवंत फडके, ह्यांच्या गुणगौरवांतच गुंग झालेली होती! राजकीय पुढारी अहिंसेवर आणि सत्यावर आधारलेल्या चळवळीची भाषा करीत होते, तर ही स्वारी हवाई बंदुकीच्या, नेमबाजीच्या, तरवारीच्या आणि तिरकमठ्याच्या जोरावर स्वातंत्र्य मिळण्याची चळवळ करा म्हणून व्याख्यानें देत होती. अशा रीतीनें बदललेल्या परिस्थितीशीं आणि समाजाच्या नव्या आकांक्षांशीं सावरकर समरस होऊं शकले नाहींत, म्हणूनच त्यांचा असा हा हास्यास्पद आणि केविलवाणा रिप् व्हॅन विंकल झाला! आजच्या

हिंदुस्थानांत पृथ्वीराज चव्हाण, राणा प्रताप, किंवा शिवाजीमहाराज फिरून अवतरले तरी, त्यांचा देखील असाच रिप् व्हॅन विंकल होईल! १९४० च्या जगाला वाघनखें बोटांत घालून शत्रूचा कोथळा फोडण्याची, पेटाऱ्यांत बसून पळून जाण्याची किंवा घोरपडीच्या पाठीवर किल्ला चढून जाण्याची भाषा जर शिवाजीमहाराज सांगू लागले तर त्यांचे देखील हसूंच होईल! सावरकरांचें आज जें हसूं होत आहे तें देखील ह्याच कारणामुळें! विमानें, टँक्स, विषारी धूर, ब्लिट्झ्-क्राइग इत्यादि युद्धाच्या नवीन तंत्रांशीं परिचित झालेल्या जगाला ते हातांत तरवारी आणि बंदुका घ्या, क्षात्रतेज वाढवा, आणि स्वातंत्र्य मिळवा असें सांगत आहेत! आतां अशा माणसाला रिप् व्हॅन विंकल म्हणावयाचें नाहीं तर काय म्हणावयाचें?

नाशिक येथें परवां सार्वजनिक वाचनालयाचा जो शतसांवत्सरिक महोत्सव झाला, त्या वेळीं तात्यारावांनीं त्या समारंभास अनुसरून साहित्यविषयक जें भाषण केलें त्यामध्यें त्यांनीं हेच उद्गार काढले! ते म्हणाले, "जिवंत साहित्य निर्माण करावयाचें असेल तर लेखण्या टाका आणि हातांत बंदुका घ्या! पारतंत्र्यांतील लेखकांची कुचंबणा होते; म्हणून आधीं क्षात्रबळ निर्माण करा. सैनिक झाल्याशिवाय तुम्हांला काव्य निर्माण करतां यावयाचें नाहीं. आज देशासाठीं सैनिक पाहिजेत, लेखण्या पुष्कळ झाल्या आहेत. हिंदुस्थानांत प्रथितयश लेखक गल्लोगल्लीं लोळत आहेत. शेक्सपिअरच्या तोडीचेहि कवि आहेत. त्यांच्या साहित्याचें संरक्षण करण्यास सैनिक हवे आहेत. म्हणून हातांत तरवारी आणि बंदुका घ्या, क्षात्रबळ संपादन करा आणि मग साहित्य निर्माण करा!" तात्यारावांनीं हे विचार मागें साहित्यसंमेलनाच्या वेळीं अध्यक्षपदावरूनहि व्यक्त केलेले आहेत. सदर उद्गारांत ग्रथित झालेल्या विचारांत रिप् व्हॅन विंकल छापाच्या विचारसरणीची आणि तर्काची गल्लत झालेली आढळून आल्यामुळेंच, आम्हांला तिकडे लक्ष देणें भाग पडलें. तात्यारावांच्या ह्या हेमाडपंती भाषणांत पुढील मुद्दे निघूं शकतातः—(१) तात्यारावांच्या मतें आधीं स्वातंत्र्य आणि मग साहित्य! (२) स्वातंत्र्य हें क्षात्रबलानेंच मिळूं शकेल! (३) क्षात्रबल अंगीं आणण्यासाठीं हातांत तरवार आणि बंदुका घेऊन सैनिक व्हावयाला पाहिजे! (४) आज राष्ट्राला साहित्यिकापेक्षां सैनिकांची जास्त जरूरी आहे. (५) राष्ट्रांत सैनिक निर्माण झाले

म्हणजे साहित्यनिर्मिति आणि साहित्यसंरक्षण होऊं शकेल. तात्यारावांच्या वरील पांच मुद्द्यांपैकीं एकहि मुद्दा तर्काच्या व सत्याच्या कसोटीला उतरेल असें आम्हांला वाटत नाहीं. 'लेखण्या नकोत, बंदुका पाहिजेत!' हें ध्रुवपद असलेलें तात्यारावांचें हें भाषण खाडीलकर-युगांतील एखाद्या ऐतिहासिक नाटकामधील नायकाच्या तोंडीं फार झालें तर शोभेल, इतकीं त्यांतील भावना आणि आवेश कृत्रिम आणि नाटकी आहेत!

देश स्वतंत्र असो वा परतंत्र असो, देशाच्या किंवा समाजाच्या कोणत्याहि अवस्थेंत साहित्याचें महत्त्व आणि सामर्थ्य हें अबाधित आहे. साहित्य म्हणजे उत्कृष्ट भाषेंत सांगितलेले उत्कृष्ट विचार! मग ते तोंडी असोत वा लेखी असोत. गुलामगिरींत खितपत पडलेल्या राष्ट्राला जागृत करण्याचें सामर्थ्य साहित्यांतच आहे! स्वातंत्र्याच्या युद्धासाठीं रणांगणावर जाणाऱ्या लढाऊ सैनिकाच्या अंगांत वीरश्री आणि आवेश उत्पन्न करण्याचें सामर्थ्य साहित्यांतच आहे! आणि राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतरहि स्वातंत्र्याच्या फळाचा मधुर आस्वाद चिरकाल टिकवण्याचें सामर्थ्यहि साहित्यांतच आहे! अमुकच वेळीं साहित्य पाहिजे आणि तमुकच वेळीं साहित्य नको असें म्हणणाऱ्या माणसाला प्रो. माटे ह्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'साहित्याचें कूस'हि कळलेलें नाहीं. 'राष्ट्राला आग लागलेली आहे, तुम्ही आम्ही सारे गुलाम आहोंत, ह्या वेळीं लग्नें कसलीं करतां?—संसार कसला थाटतां?—पोरेंबाळें ह्यांना कशाला जन्म देतां?--पोटांत तुमच्या अन्न कसें जातें?--नाटकें, सिनेमा कसले पाहतां!" असें म्हणणारा जो ढोंगी आणि सोंगाड्या देशभक्तांचा वर्ग आहे, त्यांच्याच ठराविक विचारसरणीची पुढची पायरी तात्यारावांनीं गाठलेली आहे—"राष्ट्र परतंत्र आहे, आम्हांला सैनिक हवेत--कवि आणि लेखक नकोत!" शिवाजीमहाराजांच्या काळीं देखील राष्ट्रांत नवचैतन्य निर्माण करण्याचें कार्य तुकाराम, रामदास या साहित्यिक संतांनीं आणि तुळसीदास, आगनदास ह्या शाहीरांनींच केलें नाहीं का? शिवाजीमहाराज रामदासांना असें म्हणाल्याचा कोठेंहि दाखला नाहीं कीं, "समर्थ, हा तुमचा दासबोध राहूं द्या दप्तरांत--हातांत बंदूक आणि तरवार घ्या! आधीं तुम्ही आम्ही मिळून स्वराज्य मिळवूं या--मग तुम्ही छप्पन्न दासबोध लिहा. आणि कविता करा!" लोकमान्य टिळकांनीं आगरकरांनीं, महात्मा फुले ह्यांनीं देखील राजकीय आणि सामाजिक गुलाम

गिरींतून राष्ट्राला जागृत करण्यासाठीं साहित्याचाच उपयोग केला नाहीं काय? आणि स्वतः सावरकर ह्यांनींहि सिंहगडाचे स्फूर्तिदायक पोवाडे लिहूनच १९०५-६च्या काळांतील तरुणांना जिवंत केलें नाहीं का? स्वातंत्र्यकवि गोविंद ह्यांचें आज नाशिक येथें जें स्मारक होत आहे त्याचें कारण देखील पारतंत्र्याच्या पहाटेला स्वातंत्र्याच्या गोड गोड भूपाळ्या त्यांनीं गाऊन तरुण पिढीला उठविलें म्हणूनच ना? मग लेखण्या टाकून द्या आणि हातीं बंदुका धरा हें सावरकरांचें म्हणणें हास्यास्पद ठरत नाहीं काय? राष्ट्रांत खरें क्षात्रबळ निर्माण करावयाचें असेल तर तें तरवारी-बंदुकांनीं निर्माण होऊं शकणार नाहीं--तें महात्मा गांधींच्या 'हरिजन'मधील लेखांनीं, जवाहरलाल नेहरू ह्यांच्या व्याख्यानांनीं आणि सरोजिनी नायडू ह्यांच्या मधुर कोकिळकूजितांनींच निर्माण होऊं शकेल! पारतंत्र्यांत उत्तम तऱ्हेचें वाङ्मय निर्माण होऊं शकणार नाहीं हें तात्यारावांचें म्हणणें खोटें आहे! उत्तम वाङ्मय हें कांहीं कायम ठशाचें ठरलेलें वज्रलेप वाङ्मय नव्हे! काळाला आणि परिस्थितीला अनुसरूनच त्या त्या तऱ्हेचें वाङ्मय निर्माण होऊं शकतें. पारतंत्र्याच्या काळांत निर्माण होणाऱ्या वाङ्मयाची तुलना स्वातंत्र्याच्या काळांतील वाङ्मयाशीं होऊं शकणार नाहीं; म्हणून कांहीं तें वाङ्मय तुच्छ आणि हिणकस ठरत नाहीं. परकी राजसत्तेच्या कायद्यामुळें कित्येक वेळीं लेखकांची कुचंबणा होते. बंड करा, संप करा, बॉंब तयार करा, असा उपदेश करणारें लिखाण कायद्याच्या कचाट्यांत आलें तरी त्याव्यतिरिक्त किती तरी मोलाचें आणि सामर्थ्याचें वाङ्मय निर्माण करणें जातिवंत लेखकांना पारतंत्र्यांतहि शक्य आहे!

सावरकर आज ज्या क्षात्रबलाची राष्ट्राला आवश्यकता आहे असें प्रतिपादीत आहेत त्याहून अधिक प्रभावशाली आणि व्यापक अशा राष्ट्रीय बलाची देशाला जरूरी आहे. हातांत तरवार आणि बंदूक घेऊन क्षात्रबल निर्माण होतें हा युक्तिवाद मानसशास्त्राच्या अज्ञानावर उभारलेला आहे. दाढी राखली म्हणजे मनुष्य साधु होतो, लंगोट नेसला म्हणजे मनुष्याचें ब्रह्मचर्य टिकतें, हातांत लठ्ठ ग्रंथ घेतला म्हणजे मनुष्य विद्वान् होतो, हातांत कुबडी घेतली कीं रामदासी होतां येतें, ह्याच दर्जाचें हें तर्कशास्त्र आहे. बाह्य साधनांनीं आणि उपचारांनीं जगाला फसवितां येतें; पण स्वतःला फसवितां येत नाहीं! सैन्यांत शिरलें आणि सैनिक झालें म्हणजे प्रत्येक माणूस क्षात्रबलान्वित होतो

हा युक्तिवादहि भ्रममूलक आहे. असल्या क्षात्रबलाची आज राष्ट्राला जरूरहि नाहीं आणि त्याचा उपयोगहि नाहीं! एवढें मोठें लढाऊ फ्रेंच राष्ट्र त्याचें आज काय झालें? पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, अबिसीनिया येथील लोक स्वतंत्रच होते; त्यांच्या हातांत तरवारी-बंदुकाच होत्या! मग त्यांना आपलें स्वातंत्र्य कां टिकवतां आलें नाहीं? तेव्हां तरवारी-बंदुकांच्या योगानें क्षात्र-बलहि अंगांत निर्माण होत नाहीं आणि स्वातंत्र्यहि मिळवतां येत नाहीं;—आणि मिळविलें तर आजच्या काळांत टिकवितां येणार नाहीं! स्वार्थत्याग, धैर्य, सहनशीलता, समता आणि ऐक्य इत्यादि गुण जर स्वातंत्र्यसैनिकाच्या अंगीं आज नसतील, तर नुसत्या बंदुकींच्या फुंकण्या आणि तरवारींचे कोयते हातांत घेऊन कोणालाहि सैनिक होतां यावयाचें नाहीं. आज तरवारी-बंदुकांचा उपयोग जर कोठें असेल तर तो ऐतिहासिक नाट्यप्रयोगामध्यें आहे. स्वातंत्र्याच्या युद्धांत नाहीं. एवंच, स्वातंत्र्य आणि साहित्य ह्यावरील तात्या-रावांचे विचार नॉर्वे देशांतील भाकरीप्रमाणें अत्यंत बुरसलेले आणि आधुनिक कालाला न शोभणारे आहेत. म्हणूनच आम्ही तात्यारावांना दोन तपाच्या झोपेंतून उठलेले महाराष्ट्राचे रिप व्हॅन विंकल अशी पदवी देतों!

---

# महाराष्ट्राचे श्रेष्ठ गद्य-कवि खांडेकर २४

## [ खांडेकरांच्या प्रतिभेचे नऊ पैलू ]

नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ कधीं शोधूं नये म्हणतात. ह्या संशोधनाचें पर्यवसान नसत्या भानगडी बाहेर येण्यांत होतें असा जो सामान्य प्रवाद आहे तो माझ्या मतें खोटा असून हें संशोधन अत्यंत बिकट आहे म्हणून त्या भानगडींत पडूं नये असा त्या वचनाचा अर्थ असावा असें मला वाटतें. ह्याची प्रचीति मी खांडेकरांचें मूळ शोधण्याचा प्रयत्न करूं लागलो तेव्हां मला आली. खांडेकरांचें बालपण आणि शिक्षण सांगली येथें झालें. त्यांचा पुष्कळसा काळ कोंकणामध्यें कोठल्याशा गांवीं गेला. ह्या गोष्टी मला स्वतःला प्रत्यक्ष माहीत नाहींत. माझी खांडेकरांबद्दलची पहिली आठवण १९१४ च्या सुमाराची आहे. मी त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमधें पहिल्या वर्षांत होतों. खांडेकर माझ्या वर्गांत होते कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. कदाचित् एखादें वर्ष ते माझ्यापुढें देखील असतील. पण ते फर्ग्युसन कॉलेजमधें पहिल्या वर्षाच्या वर्गांत होते एवढें मला अंधुकपणें आठवतें.

खांडेकरांचे एक थोरले बंधु त्यांच्याच अंगकाठीचे आणि त्यांच्यापेक्षां वयानें फार मोठे नसलेले माझ्या चुलत्यांकडे कांहीं निमित्तानें येत. ते डोक्याला

एक बारीक पांढरा रुमाल बांधीत. त्यांच्या आणि खांडेकरांच्या आकृतीबद्दल माझ्या मनांत पुष्कळ दिवस संभ्रम होता. पुष्कळ वर्षेंपर्यंत माझी अशी कल्पना होती कीं, खांडेकर कॉलेजमध्यें असतांना रुमाल बांधीत असत. हा माझा भ्रम खुद्द खांडेकरांनीं दूर केला, आणि त्या वेळीं मला कळलें कीं, खांडेकरांना एक वडील भाऊ असूं शकतो म्हणून! खांडेकरांचें नांव प्रथम गडकऱ्यांच्या बोलण्यांत आलें. मी, कमतनूरकर आणि इतर कांहीं थोडी उमेदवार लेखकमंडळी गडकऱ्यांच्यापेक्षां वयानें किती तरी लहान असतां त्यांच्याशीं शिष्यत्वापेक्षां मैत्रीच्या सलगीनें वागत असूं. गडकरी देखील आमच्याशीं इतक्या मोकळेपणानें वागत असत, कीं इतरांना त्यांच्या सडेतोड स्वभावाचें भय वाटत असलें तरी आम्हांला तसें कधींच वाटलें नाहीं. गडकरी एके दिवशीं खांडेकरांबद्दल सहज बोलतां बोलतां म्हणाले, "महा हुशार आहे पोरगें! हें नांव काढणार पुढें!" मीं विचारलें, "कशावरून?" तेव्हां गडकरी आपले आधींच मोठे असलेले डोळे जास्त बटबटीत करून म्हणाले, "अहो, माझें प्रेमसंन्यास मीं फ्रेंच भाषेमधून चोरलें असा धडधडीत आरोप केला ह्या पोरानें माझ्यावर! आणि माझें 'राजसंन्यास' मीं ह्याला वाचून दाखवलें तेव्हां आपण तें पुरें करून दाखवणार म्हणून त्यानें आश्वासन द्यायला मला कमी केलें नाहीं! आतां ह्या पोराला काय म्हणावें! जो पोरगा गडकऱ्यावर असले आरोप करायला भीत नाहीं, तो कांहीं तरी आयुष्यांत भयंकर करून दाखवणार!" गडकरी आपल्या विशिष्ट विनोदी तऱ्हेनें म्हणाले. ते उद्गार आज अनेक वर्षांनीं आणि अनेक अर्थांनीं खरे ठरले आहेत. गडकऱ्यांवर वाङ्मयचौर्याचा आरोप करणारा तो हुशार मुलगा आज मराठी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष झालेला आहे! वास्तविक पाहतां खांडेकर हे गडकऱ्यांचे शिष्य! आज खांडेकर हे कोल्हटकर ह्यांना आपल्या गुरुस्थानीं मानीत असले, आणि माडखोलकर देखील त्यांच्याबरोबर सामील असले, तरी खांडेकर, माडखोलकर ह्यांच्या लिखाणावर गडकऱ्यांच्या लेखनाचा जितका परिणाम झालेला आहे तितका कोल्हटकरांचा झालेला नाहीं. खांडेकर-माडखोलकर ह्यांच्या पिढीला कोल्हटकर हे दूरचे डोंगर होते! त्यांच्या समोरचा तेजस्वी आदर्श म्हटला म्हणजे गडकरी हाच होय. पुढें उतारवयांत खांडेकर-माडखोलकर ह्यांची वृद्ध कोल्हटकरांशीं परिचय-मैत्री झाली आणि त्या वेळीं

हीं नवीं नातीं जाहीर करण्यांत आलीं–हें सर्व खरें ! पण खरें सांगायचें म्हणजे ही मागून सुचलेली सबब आहे ! खांडेकरांनीं कांहीं म्हटलें तरी त्यांचे गुरु गडकरी हेच होत ! गडकऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकूनच खांडेकरांनीं मराठी साहित्यांत पदार्पण केलें हें निर्मळ सत्य आहे. १९१५ ते १९१८ पर्यंत खांडेकर हे काय करीत होते हें मला माहीत नाहीं. पण कॉलेजचा अभ्यासक्रम सोडून ते एका श्रीमंत वडिलांचे दत्तक पुत्र झाले आहेत असें मीं त्या वेळीं ऐकलें होतें. त्यानंतर त्यांची प्रकृति बिघडली. त्यांच्यावर चेटकें करण्यांत आलीं, त्यांना भूतबाधा झाली इत्यादि अनेक बातम्याहि मी मधून मधून ऐकत होतों. तथापि खांडेकरांचें लेखन त्या सुमारास माझ्या वाचनांत आलें नाहीं. त्या सुमारास 'मनोरंजन', 'उद्यान' इत्यादि मासिकांत माझ्या कविता प्रसिद्ध होत होत्या. कमतनूरकर ह्यांच्या नवीन पद्धतीच्या गोष्टीहि 'मनोरंजन' आणि 'नवयुग' मासिकांत त्या वेळीं प्रसिद्ध होऊं लागल्या होत्या. तथापि खांडेकरांचें लिखाण त्या वेळीं प्रसिद्ध होते नवावेंसें वाटतें. एके दिवशीं 'उद्यान' मासिकाचे संपादक गणपतराव कुळकर्णी गडकऱ्यांच्याकडे आले होते. 'उद्यान' मासिकांत त्या वेळीं 'आदर्श' ह्या सहीनें कांहीं विनोदी लेख प्रसिद्ध होत होते. मला स्वतःला 'आदर्श' हा लेखक अतिशय बुद्धिमान वाटत होता. त्याच्या सदरील विनोदी लेखामध्यें गडकरी-कोल्हटकरपद्धतीच्या कोट्यांचा पाऊस पडलेला होता. हा लेखक कोण म्हणून मीं विचारणा केल्यावर मग मला कळलें कीं, 'आदर्श' म्हणजे खांडेकर ! माझी आठवण जर बरोबर असेल तर मला असें वाटतें कीं, त्या वेळीं खांडेकर विनोदी लेखक बनण्याच्या अवस्थेंत होते. आणि ज्या तऱ्हेचे विनोदी लेख त्यांच्या लेखणींतून त्या वेळीं बाहेर पडत होते त्यांवरून, विनोदी लेखक होण्याचा ते अत्यंत कसून प्रयत्न करीत असावेत असेंच त्या वेळीं मला वाटलें. तथापि पुढें खांडेकर निर्मळ विनोदी लेखक कां झाले नाहींत ह्याचें कारण माझ्या मतें हेंच असावें कीं, त्या वेळीं त्यांनीं आपल्या एका हेडमास्तरांना उद्देशून कांहीं तरी तिखट विनोदी लेख लिहिला आणि त्यामुळें आपली बदनामी झाली असें त्या हेडमास्तरांना वाटून त्यांनीं उद्यान मासिकाच्या संपादकांना वकिलामार्फत नोटीस दिली. हें प्रकरण पुढें फारसें चिघळलें नाहीं, पण त्यामुळें खांडेकरांच्या विनोदी प्रतिभेला कांहीं काळ चांगलीच दडस बसलेली असावी असें वाटतें !

त्यानंतर फिरून कांहीं वर्षें म्हणजे जवळ जवळ १९२५ पर्यंत खांडेकरांचें लिखाण माझ्या वाचण्यांत आलें नाहीं. मध्यंतरीं ते कविता करीत असावेत असें वाटतें. मी स्वतः 'केशवकुमार' ह्या टोपणनांवानें कविता प्रसिद्ध करीत असे. केव्हां तरी मीं 'कुमार' ह्या नांवानें कांहीं कविता प्रसिद्ध झालेल्या वाचल्या. तेव्हां माझ्या नांवाशीं अर्धवट स्पर्धा करणारा हा नवीन कवि कोण म्हणून मी रागारागानें चौकशी करूं लागलों तेव्हां मला कळलें कीं, 'कुमार' म्हणजे खांडेकर! ही खांडेकरांची दुसरी अवस्था म्हणजे कवि बनण्याची! लघुकथाकार ही खांडेकरांची तिसरी अवस्था माझ्या आठवणीप्रमाणें 'रत्नाकर' मासिक निघाल्यापासून सुरू झाली. 'रत्नाकर' मासिकांत खांडेकरांच्या एकाहिपेक्षां एक तेजस्वी लघुकथा जेव्हां प्रसिद्ध होऊं लागल्या, तेव्हां अखिल महाराष्ट्राचें लक्ष ह्या तरुण प्रतिभावान् लेखकाकडे प्रथम वळलें. खांडेकरांच्या गोष्टींमध्यें काव्यमय वाक्यें, विनोदी कोट्या, साहित्यविषयक संदर्भ पुष्कळ विखुरलेले असत. तथापि, ह्या वैशिष्ट्यापेक्षां गोष्टीच्या विषयाचा ताजेपणा, विषय रंगवण्याचा त्यांचा जिव्हाळा आणि लेखनशैलींतील चटकदारपणा ह्यामुळें खांडेकरांच्या गोष्टी त्या वेळीं एकदम लोकप्रिय झाल्या. खांडेकर आपल्या गोष्टींशीं पूर्ण तादात्म्य पावले असावेत असें चटकन् कोणाच्याहि ध्यानांत येत असे. फडके ह्यांच्या गोष्टींमध्यें लेखकाचा प्रामाणिक जिव्हाळा आढळून येत नसे. लेखक आपल्या कलेचें आणि प्रतिभेचें हेतुपूर्वक प्रदर्शन करीत आहे असाच त्यांच्या गोष्टी वाचीत असतांना वाचकांचा ग्रह होई. त्यामुळें खांडेकरांच्या आधींपासून फडके लघुकथा लिहीत असूनहि, खांडेकर लघुकथेच्या क्षेत्रांत आल्याबरोबर ते फडक्यांना सहज बगल मारूं शकले! ह्याच सुमारास मला वाटतें खांडेकरांनीं 'रंकाचें राज्य' नांवाचें म्युनिसिपालिटी विषयावर एक नाटकहि लिहून टाकलें. ही खांडेकरांची चवथी अवस्था. हें नाटक रंगभूमीवरहि अवतीर्ण झालें; तथापि तें आलें केव्हां अन् गेलें केव्हां ह्याचा कोणाला फारसा पत्ता लागला नाहीं. लघुकथालेखन हा खांडेकरांच्या प्रतिभेचा एकच तेजस्वी उन्मेष महाराष्ट्राच्या डोळ्यांत भरला; आणि त्याबाबत महाराष्ट्रानें त्यांच्याकडून ज्या ज्या अपेक्षा केल्या त्या त्या खांडेकरांनीं भरगच्चपणें पुरवल्या ह्यांत कांहीं संशय नाहीं! लघुकथाकार म्हणून खांडेकर लोकप्रिय झाले. त्यामुळें त्यांचा लेखनांतील आत्मविश्वास वाढला, त्यांच्या

शिक्षकाची वृत्ति पत्करून खांडेकरांनीं एकनिष्ठतेनें आणि त्यागवृत्तीनें मराठी भाषेची जी थोर आणि तेजस्वी सेवा केलेली आहे तिला मराठी साहित्यांत दुसरी तोड नाहीं. हरि नारायण आपटे आणि विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांच्या इतकेंच विपुल आणि चपल लेखन जर कोणी केलें असेल तर तें खांडेकरांनींच! मराठी साहित्यांतील खांडेकरांचें स्थान अढळ आहे. त्यांनीं विनोदी लेख लिहिले, टीका लिहिल्या, नाटकें लिहिलीं, कादंबऱ्या लिहिल्या, काव्यें लिहिलीं किंवा पटकथा लिहिल्या तरी खांडेकरांच्या प्रतिभेची बैठक ही निःसंशय कवीची आहे. खांडेकरांची बुद्धि आणि भावना हीं केवळ कवीमधेंच वैशिष्ट्यानें आढळून येणारी अशी आहे. खांडेकर हे उत्तम लघुकथाकार किंवा कादंबरीकार असले तरी, कथेपेक्षां काव्यामधेंच त्यांचें मन जास्त तन्मयतेनें रमतें. खांडेकर पद्यात्मक काव्य करीत असले तरी त्यांच्या 'उल्के'त जेवढें काव्य आहे तेवढें त्यांच्या 'कुमार' कृत प्रासबद्ध काव्यांत आढळून येणार नाहीं. म्हणूनच मी खांडेकरांना मराठी भाषेंतील एक श्रेष्ठ गद्य-कवि म्हणून संबोधतों. खांडेकरांच्या लेखनांत अलंकार, उत्प्रेक्षा, कोट्या ह्यांची गर्दी फार असते असें जें म्हटलें जातें त्याचीहि मीमांसा तरी हीच आहे कीं ते एक श्रेष्ठ दर्जाचे गद्य-कवि आहेत! वाचकांनीं पाहिजे तर फिरून खांडेकर-वाङ्मय एकदां ह्या दृष्टीनें वाचून पाहावें म्हणजे त्यांची देखील खात्री होईल, कीं खांडेकर हे केवळ लघुकथाकार किंवा कादंबरीकार नसून, ते प्रामुख्यानें एक प्रतिभाशाली गद्य-कवि आहेत. अशा ह्या कविश्रेष्ठाचा गौरव आज महाराष्ट्रांतल्या साहित्यिकांनीं केलेला आहे ह्याबद्दल आम्हांला हर्ष होत आहे. खांडेकरांच्या हातून ह्याहीपेक्षां उज्ज्वल साहित्यसेवा घडो आणि त्यांच्यावर संपत्ति आणि आरोग्य ह्यांची पूर्ण कृपा राहो हीच आमची प्रार्थना आहे!

# एक म्हातारा अन् दुसरा आजारी २५

## [ खांडेकरांचें सोलापूरचें भाषण ]

सोलापूर साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून खांडेकरांनीं केलेलें भाषण सर्वस्वीं आमच्या अपेक्षेप्रमाणें झालेलें नसलें तरी, फडके ह्यांच्या गेल्या वर्षीच्या भिकार आणि रद्दी भाषणापेक्षां तें सहस्र पटींनीं श्रेष्ठ आहे यांत शंका नाहीं. उत्तम कादंबरीकार आणि कर्तृत्ववान् साहित्यिक म्हणून फडके ह्यांची अध्यक्षस्थानीं निवड झालेली होती आणि म्हणून फडके ह्यांच्याकडून साहित्य-विषयक विद्वत्ताप्रचुर आणि विचारपरिप्लुत भाषणाची महाराष्ट्राला अपेक्षा होती. पण केवळ अध्यक्ष होण्यापलीकडे फडके ह्यांना साहित्यसंमेलनाची किंमत वाटत नव्हती. कॉलेजांतील वाङ्मयमंडळाचें एखादें संमेलन हें मराठी साहित्य-संमेलनापेक्षां जास्त मोलाचें आहे असें त्यांचें मत होतें. अध्यक्ष होईन तरच साहित्यसंमेलनाला जाईन असा त्यांचा पण होता. म्हणून साहित्यसंमेलनाचें महत्त्व त्यांना सुतराम् कळलें नव्हतें—आणि त्यांना तें मान्यहि नव्हतें. साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनीं ओळखली नव्हती. म्हणून मधुचंद्र साजरा करावयास जाणाऱ्या एखाद्या तरुण नवऱ्याच्या रंगेल नाचरेपणानें ते रत्नागिरीला गेले. दोन-चार दिवस पाहुणचार घेऊन आणि हवापालट करून

त्यांनीं मौज केली आणि मराठी साहित्यसंमेलनाची आतां कॉंग्रेस करून टाकतों अशा पोरकट वल्गना मारीत ते माघारी परत आले! मराठी साहित्य-संमेलनाचें पवित्र व्यासपीठ व्यासंगशून्य आणि गैरलागू भाषण करून आणि आपल्या वैयक्तिक विलासाचें सार्वजनिक प्रदर्शन करून त्यांनीं विटाळून टाकलें! साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठाचें वैचारिक आणि भौगोलिक पावित्र्य राखण्याविषयीं यंदा संमेलनाचे प्रतिनिधि किती जागरूक होते हें पाहिलें म्हणजे गेल्या वर्षीं फडक्यांनीं विटाळलेल्या व्यासपीठाबद्दल त्यांच्या मनांतली चीड अद्यापिहि किती जागी आहे हें दिसून येतें. त्याचप्रमाणें वसईपासून वेंगुर्ल्यापर्यंत सशिष्या प्रवास करणारे फडके सोलापूरला सडे गेले हें पाहिलें म्हणजे साहित्यसंमेलनांत आपल्या रंगेल बुवाबाजीचें प्रदर्शन केल्यानें आतां आपली कशी संभावना होईल ह्याचें चित्र त्यांच्या कल्पनेनें चितारून त्यांना पुष्कळच शहाणपणा शिकवलेला दिसतो. असो.

मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचें महत्त्व, पावित्र्य आणि जबाब-दारी ओळखून खांडेकरांनीं आपलें भाषण केलें ह्याबद्दल आम्ही त्यांचें अंतः-करणपूर्वक अभिनंदन करतों. खांडेकरांच्या भाषणामध्यें त्यांचा साहित्यविषयक व्यासंग, अभ्यास, मार्मिक अवलोकन, त्यांचा लेखनविषयक दीर्घ अनुभव, सूक्ष्म विश्लेषण करण्याची त्यांची टीकापद्धति इत्यादि त्यांच्या अनेक गुणांचा पूर्ण पडताळा पटण्यासारखा आहे. खांडेकरांच्या भाषणांतील मुख्य सूर मला मान्य नसला, किंवा त्यांचे पुष्कळसे विचार आणि मुद्दे मला पूर्वग्रहदूषित वाटत असले, तरी खांडेकरांच्या भाषणामध्यें त्यांचा एक विशिष्ट दृष्टिकोण आहे; आणि हा दृष्टिकोण निःसंशय साहित्यिकाचा आहे. त्यांचें भाषण चिंतनीय आहे, मननीय आहे ह्यांत मला मुळींच शंका वाटत नाहीं. आतां, व्यक्तिशः खांडेकरांकडून मी ह्यापेक्षांहि जास्त समतोल आणि मार्मिक भाषणाची अपेक्षा करीत होतों. पुणें येथें भरलेल्या शारदोपासक-संमेलनाच्या वेळीं किंवा पूर्वीं सोलापूरच्या प्रांतिक साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं केलेलीं भाषणें मला ह्या भाषणापेक्षां जास्त मोलाचीं वाटतात. खांडेकरांच्या या भाषणांत विचारापेक्षां काव्यच अधिक भरलेलें आहे. खांडेकर हे एक उत्कृष्ट गद्य-कवि आहेत हें त्यांच्या प्रतिभेचें मागील अंकांत मीं केलेलें निदान किती अचूक आहे हें ह्या भाषणावरून कळून येण्यासारखें आहे. ‘सैनिकाच्या

हातांत तरवारी नाहींत अलगुजें आहेत !', 'ललित वाङ्मयाचें सौंदर्य अद्यावत् वेषभूषा आणि केशभूषा केलेल्या फिक्कट तरुणीसारखें आहे !', 'तळ्यांत नुसता चिखल राहिला तर कमळेंहि कमी फुलतात हा सृष्टीचा नियम वाङ्मयालाहि लागू आहे', 'सध्यां काव्याच्या सतारीचे कोमल स्वर नगाऱ्याच्या धांगडधिंग्यांत बुडून जात आहेत', 'मुंबईच्या जीवनाच्या उकाड्यांत विनोदाच्या शीतळ वायुलहरी हव्याच असतात', 'करवंदें द्राक्षें म्हणून खपतात तिथें द्राक्षांना कोण विचारणार ?', 'चिवड्याला काजूची लज्जत तशी शृंगाराची कादंबरीला लज्जत' इत्यादि अनेक काव्यमय सुभाषितांची, उत्प्रेक्षांची, उपमांची आणि भाषालंकारांची खांडेकरांच्या भाषणांत नुसती गर्दी उडून राहिलेली आहे. तथापि आलंकारिक भाषणानें विषयाचें स्पष्टीकरण सुलभ होत असलें, तरी सिद्ध कांहीं एक होऊं शकत नाहीं ही गोष्ट खांडेकरांना माहीत असेलच ! 'Illustration is no proof' हा शिक्षणशास्त्रांतला नियम खांडेकरांनीं एस्. टी. सी.च्या परीक्षेचा अभ्यास करतांना पाठ केला नाहीं असें मीं कसें समजूं ? साहित्याच्या शरीरप्रकृतीचें निदान नुसत्या काव्यानें कसें होईल ? वैद्यकशास्त्राचे ग्रंथ जरी काव्यांत लिहिलेले असले, तरी रोग्याची नाडीपरीक्षा करतांना पढीक वैद्य नुसतेंच काव्य गाऊं लागला तर त्यानें रोगाचें निदान कसें होणार ? खांडेकरांच्या ललितकृतीमधें जो प्रधान दोष आहे तोच त्यांच्या सर्व भाषणांमध्येंहि आहे– आणि ह्या भाषणामध्यें तर वैपुल्यानें आहे. सुंदर विचार सुंदर भाषेंत उत्तम खुलतात हें खरें असलें, तरी भाषालंकाराच्या अतिरिक्ततेनें विचारांची गळचेपी झाल्याविना राहत नाहीं. म्हणून खांडेकरांच्या दृष्टीनें आजच्या ललितवाङ्मयाचें सौंदर्य एखाद्या रोगट आणि फिक्कट तरुणीप्रमाणें असलें तर माझ्या दृष्टीनें खांडेकरांचें हें सदर भाषण एखाद्या रोगट आणि फिक्कट बाईनें सर्वांगावर जडजवाहिराचें प्रदर्शन केल्याप्रमाणें मला दिसत आहे.

१९२० च्या एप्रिलमध्यें एक विशी उलटलेला उंच आणि हडकुळा मुलगा जाड भिंगांचा चष्मा डोळ्यांवर घालून शिरोड्याला शिक्षक होण्यासाठीं चाललेला होता. हा मुलगा १९४१ च्या एप्रिलमध्यें सोलापूरला मराठी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष झाला. या वीस-एकवीस वर्षांत मराठी भाषेंत जें ललितवाङ्मय निर्माण झालें त्या ललित-वाङ्मयांतील वैगुण्याची चर्चा हा ह्या

हडकुळया आणि उंच मुलाच्या अध्यक्षीय भाषणाचा . विषय होता. ह्या वीस-एकवीस वर्षांत मराठी दुनियेंत आणि साहित्यांत प्रचंड घडामोडी झाल्या, इकडचें जग तिकडे झालें, पण १९२० मध्यें शिरोड्याला शिक्षक झालेला हा मुलगा १९४१ मध्यें देखील तसाच उंच आणि हडकुळा राहिला आणि त्याच्या नाकावर वीस वर्षांपूर्वी चढलेला जाड भिंगांचा चष्मा तसाच कायम राहिला—कदाचित् त्याच्या चष्म्याचा नंबर अधिक वाढलाहि असेल! म्हणून आम्ही म्हणतों कीं खांडेकरांचें हें भाषण म्हणजे एका उंच आणि हडकुळया माणसानें हातांत 'केशवसुतांची कविता' घेऊन जाड भिंगांच्या चष्म्यांतून वाङ्मयाचें केलेलें निरीक्षण होय! कारण त्या भाषणांत काव्य भरपूर आहे, पण त्यांतील आशावाद हा एका हडकुळया आणि व्याधिग्रस्त माणसाचा आहे, त्यांतील समालोचन हें जाड भिंगांच्या चष्म्यांमधून केलेलें अधु दृष्टीचें आहे! म्हणून मीं सुरुवातीला म्हटलेलें आहे कीं खांडेकरांच्या भाषणातलें काव्य सुंदर आहे पण त्यांत प्रकट झालेला सूर निराशेचा आहे; आणि वाङ्मयाचें त्यांनीं केलेलें निदान हें पूर्वग्रह दूषित आहे.

फडके जसे अंतर्बाह्य म्हातारे झालेले आहेत—सध्यां नुसता ओठांचा म्हणजे शब्दांचा शृंगार त्यांच्याजवळ राहिलेला आहे—तसें खांडेकर हे कांहीं म्हातारे झालेले नाहींत. पण खांडेकर हे व्याधिजर्जर झालेले आहेत. त्यामुळें त्यांचा स्वभाव चिरचिरा, पिरपिरा आणि तऱ्हेवाईक झालेला आहे. त्यांना कशांत कांहीं चव राहिलेली नाहीं. पित्त झालेल्या माणसाला ज्याप्रमाणें कशांत गोडी वाटत नाहीं, पक्वान्नाचा वास तर दूरच राहो पण दर्शन देखील त्याला असह्य होतें; कोणी बोललें किंवा हसलें तर त्याचें मस्तक उसळतें. जो कोणी समोर दिसेल त्याच्या अंगावर तो भडकून धावतो, आपण स्वतः आजारी आहोंत ही गोष्ट तो चुकून देखील कबूल करायला तयार नसतो, तसें सध्यां खांडेकरांचें झालेलें आहे. ललित-वाङ्मयाचा आपल्या भाषणांत आढावा घ्यावयाचा ही खांडेकरांची कल्पना उत्तम आहे, पण ललितवाङ्मयाच्या गुणाचा गौरव न करतां केवळ त्यांतील वैगुण्याचीच चर्चा करावयाची ही कोठली पद्धति? निःपक्षपात बुद्धीनेंच पाहावयाचें तर गेल्या वीस वर्षांत मराठी साहित्यांतील ललितवाङ्मय किती तरी समृद्ध झालेलें आहे! इतर प्रांतांतील वाङ्मयाशीं जर मराठी साहित्याची तुलना केली तर केवढा आभिमान वाटण्यासारखी परिस्थिति आहे!

मराठी ललितवाङ्मयांतल्या प्रत्येक क्षेत्रांत नवीन नवीन अशा किती तरी गोष्टी साध्य झालेल्या आहेत! शास्त्र, संशोधन, निबंध, नाट्य, कादंबरी, काव्य, लघुकथा, पटकथा, वृत्तपत्रें इत्यादि प्रत्येक शाखेंत नामवंत लेखकांनीं थोर थोर कर्तृत्व करून दाखवलेलें आहे. श्री. तात्यासाहेब केळकरांसारखे साहित्यभीष्म अद्यापिहि आपल्या प्रतिभेच्या तेजानें महाराष्ट्राला थक्क करून टाकीत आहेत. रावसाहेब सरदेसाई, प्रो. माटे, प्रो. बाबूराव फाटक, प्रो. दत्तोपंत पोतदार, प्रो. नाना कुलकर्णी, आचार्य जावडेकर, प्रो. शेजवलकर, प्रो. बनहट्टी, प्रो. आळतेकर यांच्यासारखे रथी-महारथी महाराष्ट्राच्या संशोधक आणि विचारी बुद्धीला अजूनहि चालना देत आहेत! त्यांच्या मागोमाग श्री. क्षीरसागर, श्री. सरवटे, श्री. अनंत काणेकर, प्रो. वि. पां. दांडेकर, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. पां. वा. गाडगीळ, श्री. अंबेकर, श्री. तळवलकर आणि निरंतर ही ताज्या दमाची तरुण मंडळी रस्ता कापीत चाललेली आहेत. खुद्द खांडेकरांनादेखील ही गोष्ट मान्य आहे. कादंबरी आणि लघुकथांच्या क्षेत्रांत प्रो. वामनराव जोशी, प्रो. फडके, खांडेकर, पु. य. देशपांडे, माडखोलकर, मामा वरेरकर, ना. वि. कुलकर्णी, य. गो. जोशी, तळवलकर, बेडेकर, दिवाकर कृष्ण, बोकील, विभावरी शिरूरकर, कृष्णाबाई, शांता नाशिककर ह्यांनीं केवढी प्रचंड कामागिरी करून ठेवलेली आहे. नाट्यक्षेत्रांत मामा वरेरकर, शं. प. जोशी, माधवराव जोशी आणि मी ह्यांनीं मिळविलेलें यश कांहीं सामान्य दर्जाचें नाहीं. विनोदाच्या दालनांत प्रो. चिं. वि. जोशी, प्र. श्री. कोल्हटकर, रांगणेकर, बांदेकर, शामराव ओक ह्यांनीं काय कमी चमत्कार करून दाखविले आहेत? काव्याच्या वाटिकेंत गिरीश आणि यशवंत ह्यांच्या प्रतिभेला पूर्वीप्रमाणेंच बहर येत आहे! त्याचप्रमाणें ठोकळ, ना. घ. देशपांडे, काणेकर, काळे, भवानीशंकर पंडित, शांताराम आठवले हे कवि गेल्या वीस वर्षांतच उदयास आले ना? वृत्तपत्रांमध्यें देखील ज्ञानप्रकाश, नवाकाळ, लोकमान्य, सकाळ, लोकशक्ति, विविधवृत्त, चित्रा, प्रतिभा, मौज, नवयुग ह्यांनीं किती तरी नवीन नवीन टीकापद्धति आणि वाङ्मयप्रकार महाराष्ट्रास उपलब्ध करून वृत्तपत्रवाचकांची संख्या हजारोंनीं वाढवून ठेवलेली आहे. गेल्या वीस वर्षांत मराठी भाषा अत्यंत सुलभ आणि ठसठशीत झालेली आहे, त्यामुळें ती बहुजनसमाजाच्या जास्त आटोक्यांत आलेली आहे. लेखनपद्धति जास्त कलात्मक, तंत्रबद्ध आणि म्हणून अधिक आटोपशीर, आकर्षक आणि सुटसुटीत

झालेली आहे. भावगीतें, त्रुटित काव्यें, मुक्तछंदी काव्यें, एकांकी नाटिका, दीर्घ लघुकथा, लघुतम लघुकथा, लघुनिबंध, विडम्बन, व्यंगटीका असे किती तरी नवे वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयांत रूढ झालेले आहेत. लेखकवर्ग जास्त व्यासंगी आणि विचारी झालेला आहे आणि नवनवीन विचार निर्भीडपणें, व्यक्त करण्याइतकें धाडस त्याच्या अंगीं आलें आहे. वाचकवर्ग जास्त वाङ्मय-प्रेमी, जास्त रसिक पण अतिशय चोखंदळ झालेला आहे! सगळयांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे वाचकवर्ग आतां जास्त जिवंत, आणि प्रामाणिक झालेला आहे! तो पोट भरून मनसोक्तपणें हसूं शकतो, ही गेल्या २० वर्षांत केवढी तरी मोठी सिद्धि प्राप्त झालेली आहे! त्यामुळें लेखनांत आणि भाषणांत लेखकांना आणि वक्त्यांना हास्यविनोद, चटकदारपणा आणि लालित्य ह्यांचें संगोपन करणें आज अपरिहार्य, झालेलें आहे. वीस वर्षांपूर्वींच्या सामान्य साहित्यांतील शब्दांची आणि विचारांची क्लिष्टता, रूक्षता नि नीरसता आतां पार नाहींशी झाली आहे. वृत्तपत्रांमधेंहि 'पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना', 'लि.आ.म.' इत्यादि भानगडी नाहींशा होऊन त्यांतील मजकूर आणि मथळे जास्त खमंग आणि चटकदार झालेले आहेत. गेल्या वीस वर्षांत मराठी साहित्याची एवढी सर्वांगीण प्रगति झालेली असतांना, खांडेकरांना ती जाड भिंगांच्या चष्म्यांतून दिसूं शकत नाहीं हा केवळ त्यांच्याच अधू डोळयांचा दोष म्हटला पाहिजे. शिक्षणाचा, संस्कृतीचा आणि ज्ञानाचा वर्षानुवर्षे स्वतःकडे मक्ता घेणाऱ्या पांढरपेशा वर्गाच्या उद्‌बोधनासाठीं निर्माण होणारें आकुंचित विचाराचें आणि वर्गीय दृष्टीचें वाङ्मय, आतां जास्त व्यापक सुलभ व सुगम झाल्यानें त्याचा फायदा बहुजनसमाज आज अधिक प्रमाणांत घेऊं लागलेला आहे, हा काय त्या वाङ्मयाचा अधःपात म्हणायचा? ललितवाङ्मय बहुजनसमाजामध्यें साक्षर-तेचा केवढा प्रचंड प्रसार करीत आहे हें त्या वाङ्मयाचें राष्ट्रीय स्वरूप विसरून कसें चालेल? वाचकवर्ग आज वाङ्मयांतील सर्व रसांचा आस्वाद घेण्यास शिकलेला आहे. त्याला हास्य आणि शृंगार हे रस अत्यंत आवडतात. आणि त्यामुळें सामान्य वाचकवर्गाचा जीवनाबद्दलचा उत्साह आणि आशावाद जास्त जास्त वाढत चाललेला आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यांत काय अर्थ आहे! लेखकांनीं वाचकवर्गामध्यें ही जी जागृति केलेली आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयाचें कीं त्यांची निर्भर्त्सना करावयाची? मी म्हणतों लेखकांचें

थोडेंफार चुकलेलें असेल! शृंगार आणि हास्य हे दोन असे चमत्कारिक रस आहेत, कीं त्यांची भट्टी जर नीट साधली नाहीं तर त्यांचें अश्लीलता आणि ग्राम्यता ह्यामध्यें सहजच पर्यवसान होतें. वीररस, वत्सलरस आणि करुणरस हे रस जीवनांत आणि साहित्यांत महत्त्वाचे असले तरी लेखकांच्या दृष्टीनें त्यांच्यामुळें फारशी पंचाईत उत्पन्न होत नाहीं. म्हणजे वत्सल आणि करुण रसांचा जर अतिरेक झाला तर त्याचा शेवट अश्लीलतेमध्यें किंवा ग्राम्यतेमध्यें तरी होत नाहीं. शृंगार व हास्य ह्यांचा वाङ्मयांत योग्य उठाव करतां येणें ही अतिशय कौशल्याची गोष्ट आहे. हें कौशल्य हळूहळू हस्तगत करण्यास मराठी लेखक शिकत आहेत. वाङ्मयांत ह्या नवीनच गोष्टी शिरलेल्या आहेत. हास्यरस हा तर कोल्हटकरांपासूनच मराठी साहित्यांत आलेला आहे. त्या मानानें आपली केवढी तरी प्रगति झालेली आहे! गुजराथी, हिंदी वा इतर देशी भाषांतील विनोद लक्षांत घेतला म्हणजे मराठी साहित्यांतील आधुनिक विनोदाचा दर्जा किती थोर आहे हें कळून येतें.

ह्या गुणग्राहक दृष्टीनें खांडेकरांनीं 'ललितवाङ्मयाकडे पाहिलेलें' नाहीं. स्वतःच्या व्याधीनें त्यांची मनःस्थिति जर्जर झालेली असल्यानें, जीवनाकडे आणि वाङ्मयाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीवर निराशेची आणि असमाधानाची छाया पसरलेली आहे. मराठी वाङ्मयांतील एकहि गोष्ट त्यांना पसंत नाहीं. मराठी साहित्यिक त्यांना घोडेस्वाराप्रमाणें घोडदौड करतांना दिसतात पण त्यांच्या हातांत त्यांना तरवारी दिसत नाहींत, फक्त अलगुजेंच दिसतात. (ह्याचा अर्थ काय तें खांडेकर जाणोत!) ललितवाङ्मय त्यांना फिक्कट तरुणीसारखें म्हणजे जवळ जवळ कमल दीक्षितप्रमाणेंच दिसतें! वर्तमानपत्रें, सिनेमा आणि ज्योतिष ह्यांच्याकडे जास्त लक्ष देतात म्हणून त्यांना वाईट वाटतें. पण वर्तमानपत्रांनीं आज बहुजन समाजांत प्रचंड राजकीय जागृति केलेली आहे इकडे त्यांनीं दुर्लक्ष केलेलें आहे. बहुतेक मराठी बोलपट त्यांना भडक पांचट वाटतात! 'लग्न पहावं करून'मध्यें दहा वर्षांची मुलगी आपल्या थोरल्या बहिणीला नवऱ्याच्या खोलींत लोटण्यासाठीं अनेक युक्त्याप्रयुक्त्या लढवते आहे हें दाखविण्यासाठीं त्यांनीं स्वतः जो गर्भाधानी विनोद केलेला आहे त्यामुळें त्यांना कदाचित् तसें वाटत असल्यास नवल नाहीं. पण खरें पाहावयाचें म्हणजे मराठी बोलपटांनीं धंद्याच्या आणि तंत्राच्या दृष्टीनें केवढी मजल

हडकुळया आणि उंच मुलाच्या अध्यक्षीय भाषणाचा . विषय होता. ह्या वीस-एकवीस वर्षांत मराठी दुनियेंत आणि साहित्यांत प्रचंड घडामोडी झाल्या, इकडचें जग तिकडे झालें, पण १९२० मध्यें शिरोड्याला शिक्षक झालेला हा मुलगा १९४१ मध्यें देखील तसाच उंच आणि हडकुळा राहिला आणि त्याच्या नाकावर वीस वर्षांपूर्वीं चढलेला जाड भिंगांचा चष्मा तसाच कायम राहिला—कदाचित् त्याच्या चष्म्याचा नंबर अधिक वाढलाहि असेल! म्हणून आम्ही म्हणतों कीं खांडेकरांचें हें भाषण म्हणजे एका उंच आणि हडकुळया माणसानें हातांत 'केशवसुतांची कविता' घेऊन जाड भिंगांच्या चष्म्यांतून वाङ्मयाचें केलेलें निरीक्षण होय! कारण त्या भाषणांत काव्य भरपूर आहे, पण त्यांतील आशावाद हा एका हडकुळया आणि व्याधिग्रस्त माणसाचा आहे, त्यांतील समालोचन हें जाड भिंगांच्या चष्म्यांमधून केलेलें अधु दृष्टीचें आहे! म्हणून मीं सुरुवातीला म्हटलेलें आहे कीं खांडेकरांच्या भाषणातलें काव्य सुंदर आहे पण त्यांत प्रकट झालेला सूर निराशेचा आहे; आणि वाङ्मयाचें त्यांनीं केलेलें निदान हें पूर्वग्रह दूषित आहे.

फडके जसे अंतर्बाह्य म्हातारे झालेले आहेत—सध्यां नुसता ओठांचा म्हणजे शब्दांचा शृंगार त्यांच्याजवळ राहिलेला आहे—तसें खांडेकर हे कांहीं म्हातारे झालेले नाहींत. पण खांडेकर हे व्याधिजर्जर झालेले आहेत. त्यामुळें त्यांचा स्वभाव चिरचिरा, पिरपिरा आणि तऱ्हेवाईक झालेला आहे. त्यांना कशांत कांहीं चव राहिलेली नाहीं. पित्त झालेल्या माणसाला ज्याप्रमाणें कशांत गोडी वाटत नाहीं, पक्वान्नाचा वास तर दूरच राहो पण दर्शन देखील त्याला असह्य होतें; कोणी बोललें किंवा हसलें तर त्याचें मस्तक उसळतें. जो कोणी समोर दिसेल त्याच्या अंगावर तो भडकून धावतो, आपण स्वतः आजारी आहोंत ही गोष्ट तो चुकून देखील कबूल करायला तयार नसतो, तसें सध्यां खांडेकरांचें झालेलें आहे. ललित-वाङ्मयाचा आपल्या भाषणांत आढावा घ्यावयाचा ही खांडेकरांची कल्पना उत्तम आहे, पण ललितवाङ्मयाच्या गुणाचा गौरव न करतां केवळ त्यांतील वैगुण्याचीच चर्चा करावयाची ही कोठली पद्धति? निःपक्षपात बुद्धीनेंच पाहावयाचें तर गेल्या वीस वर्षांत मराठी साहित्यांतील ललितवाङ्मय किती तरी समृद्ध झालेलें आहे! इतर प्रांतांतील वाङ्मयाशीं जर मराठी साहित्याची तुलना केली तर केवढा अभिमान वाटण्यासारखी परिस्थिति आहे!

मराठी ललितवाङ्मयांतल्या प्रत्येक क्षेत्रांत नवीन नवीन अशा किती तरी गोष्टी साध्य झालेल्या आहेत! शास्त्र, संशोधन, निबंध, नाट्य, कादंबरी, काव्य, लघुकथा, पटकथा, वृत्तपत्रें इत्यादि प्रत्येक शाखेंत नामवंत लेखकांनीं थोर थोर कर्तृत्व करून दाखवलेलें आहे. श्री. तात्यासाहेब केळकरांसारखें साहित्यभीष्म अद्यापिहि आपल्या प्रतिभेच्या तेजानें महाराष्ट्राला थक्क करून टाकीत आहेत. रावसाहेब सरदेसाई, प्रो. माटे, प्रो. बाबूराव फाटक, प्रो. दत्तोपंत पोतदार, प्रो. नाना कुलकर्णी, आचार्य जावडेकर, प्रो. शेजवलकर, प्रो. बनहट्टी, प्रो. आळतेकर यांच्यासारखे रथी-महारथी महाराष्ट्राच्या संशोधक आणि विचारी बुद्धीला अजूनहि चालना देत आहेत! त्यांच्या मागोमाग श्री. क्षीरसागर, श्री. सरवटे, श्री. अनंत काणेकर, प्रो. वि. पां. दांडेकर, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. पां. वा. गाडगीळ, श्री. अंबेकर, श्री. तळवलकर आणि निरंतर ही ताज्या दमाची तरुण मंडळी रस्ता कापीत चाललेली आहेत. खुद्द खांडेकरांनादेखील ही गोष्ट मान्य आहे. कादंबरी आणि लघुकथांच्या क्षेत्रांत प्रो. वामनराव जोशी, प्रो. फडके, खांडेकर, पु. य. देशपांडे, माडखोलकर, मामा वरेरकर, ना. वि. कुलकर्णी, य. गो. जोशी, तळवलकर, बेडेकर, दिवाकर कृष्ण, बोकील, विभावरी शिरूरकर, कृष्णाबाई, शांता नाशिककर ह्यांनीं केवढी प्रचंड कामागिरी करून ठेवलेली आहे. नाट्यक्षेत्रांत मामा वरेरकर, शं. प. जोशी, माधवराव जोशी आणि मी ह्यांनीं मिळविलेलें यश कांहीं सामान्य दर्जाचें नाहीं. विनोदाच्या दालनांत प्रो. चिं. वि. जोशी, प्र. श्री. कोल्हटकर, रांगणेकर, बांदेकर, शामराव ओक ह्यांनीं काय कमी चमत्कार करून दाखविले आहेत? काव्याच्या वाटिकेंत गिरीश आणि यशवंत ह्यांच्या प्रतिभेला पूर्वींप्रमाणेंच बहर येत आहे! त्याचप्रमाणें ठोकळ, ना. घ. देशपांडे, काणेकर, काळे, भवानीशंकर पंडित, शांताराम आठवले हे कवि गेल्या वीस वर्षांतच उदयास आले ना? वृत्तपत्रांमध्यें देखील ज्ञानप्रकाश, नवाकाळ, लोकमान्य, सकाळ, लोकशक्ति, विविधवृत्त, चित्रा, प्रतिभा, मौज, नवयुग ह्यांनीं किती तरी नवीन नवीन टीकापद्धति आणि वाङ्मयप्रकार महाराष्ट्रास उपलब्ध करून वृत्तपत्रवाचकांची संख्या हजारोंनीं वाढवून ठेवलेली आहे. गेल्या वीस वर्षांत मराठी भाषा अत्यंत सुलभ आणि ठसठशीत झालेली आहे, त्यामुळें ती बहुजनसमाजाच्या जास्त आटोक्यांत आलेली आहे. लेखनपद्धति जास्त कलात्मक, तंत्रबद्ध आणि म्हणून अधिक आटोपशीर, आकर्षक आणि सुटसुटीत

झालेली आहे. भावगीतें, त्रुटित काव्यें, मुक्तछंदी काव्यें, एकांकी नाटिका, दीर्घ लघुकथा, लघुतम लघुकथा, लघुनिबंध, विडम्बन, व्यंगटीका असे किती तरी नवे वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयांत रूढ झालेले आहेत. लेखकवर्ग जास्त व्यासंगी आणि विचारी झालेला आहे आणि नवनवीन विचार निर्भीडपणें व्यक्त करण्याइतकें धाडस त्याच्या अंगीं आलें आहे. वाचकवर्ग जास्त वाङ्मय-प्रेमी, जास्त रसिक पण अतिशय चोखंदळ झालेला आहे! सगळयांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे वाचकवर्ग आतां जास्त जिवंत, आणि प्रामाणिक झालेला आहे! तो पोट भरून मनसोक्तपणें हसूं शकतो, ही गेल्या २० वर्षांत केवढी तरी मोठी सिद्धि प्राप्त झालेली आहे! त्यामुळें लेखनांत आणि भाषणांत लेखकांना आणि वक्त्यांना हास्यविनोद, चटकदारपणा आणि लालित्य ह्यांचें संगोपन करणें आज अपरिहार्य झालेलें आहे. वीस वर्षांपूर्वींच्या सामान्य साहित्यांतील शब्दांची आणि विचारांची क्लिष्टता, रूक्षता नि नीरसता आतां पार नाहींशी झाली आहे. वृत्तपत्रांमधेंहि 'पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना', 'लि.आ.म.' इत्यादि भानगडी नाहींशा होऊन त्यांतील मजकूर आणि मथळे जास्त खमंग आणि चटकदार झालेले आहेत. गेल्या वीस वर्षांत मराठी साहित्याची एवढी सर्वांगीण प्रगति झालेली असतांना, खांडेकरांना ती जाड भिंगांच्या चष्म्यांतून दिसूं शकत नाहीं हा केवळ त्यांच्याच अधू डोळयांचा दोष म्हटला पाहिजे. शिक्षणाचा, संस्कृतीचा आणि ज्ञानाचा वर्षानुवर्षें स्वतःकडे मक्ता घेणाऱ्या पांढरपेशा वर्गाच्या उद्बोधनासाठीं निर्माण होणारें आकुंचित विचाराचें आणि वर्गीय दृष्टीचें वाङ्मय, आतां जास्त व्यापक सुलभ व सुगम झाल्यानें त्याचा फायदा बहुजनसमाज आज अधिक प्रमाणांत घेऊं लागलेला आहे, हा काय त्या वाङ्मयाचा अधःपात म्हणायचा? ललितवाङ्मय बहुजनसमाजामध्यें साक्षर-तेचा केवढा प्रचंड प्रसार करीत आहे हें त्या वाङ्मयाचें राष्ट्रीय स्वरूप विसरून कसें चालेल? वाचकवर्ग आज वाङ्मयांतील सर्व रसांचा आस्वाद घेण्यास शिकलेला आहे. त्याला हास्य आणि शृंगार हे रस अत्यंत आवडतात. आणि त्यामुळें सामान्य वाचकवर्गाचा जीवनाबद्दलचा उत्साह आणि आशावाद जास्त जास्त वाढत चाललेला आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यांत काय अर्थ आहे! लेखकांनीं वाचकवर्गामध्यें ही जी जागृति केलेली आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयाचें कीं त्यांची निर्भर्त्सना करावयाची? मी म्हणतों लेखकांचें

थोडेंफार चुकलेलें असेल! शृंगार आणि हास्य हे दोन असे चमत्कारिक रस आहेत, कीं त्यांची भट्टी जर नीट साधली नाहीं तर त्यांचें अश्लीलता आणि ग्राम्यता ह्यामध्यें सहजच पर्यवसान होतें. वीररस, वत्सलरस आणि करुणरस हे रस जीवनांत आणि साहित्यांत महत्त्वाचे असले तरी लेखकांच्या दृष्टीनें त्यांच्यामुळें फारशी पंचाईत उत्पन्न होत नाहीं. म्हणजे वत्सल आणि करुण रसांचा जर अतिरेक झाला तर त्याचा शेवट अश्लीलतेमध्यें किंवा ग्राम्यतेमध्यें तरी होत नाहीं. शृंगार व हास्य ह्यांचा वाङ्मयांत योग्य उठाव करतां येणें ही अतिशय कौशल्याची गोष्ट आहे. हें कौशल्य हळूहळू हस्तगत करण्यास मराठी लेखक शिकत आहेत. वाङ्मयांत ह्या नवीनच गोष्टी शिरलेल्या आहेत. हास्यरस हा तर कोल्हटकरांपासूनच मराठी साहित्यांत आलेला आहे. त्या मानानें आपली केवढी तरी प्रगति झालेली आहे! गुजराथी, हिंदी वा इतर देशी भाषांतील विनोद लक्षांत घेतला म्हणजे मराठी साहित्यांतील आधुनिक विनोदाचा दर्जा किती थोर आहे हें कळून येतें.

ह्या गुणग्राहक दृष्टीनें खांडेकरांनीं 'ललितवाङ्मयाकडे पाहिलेलें' नाहीं. स्वतःच्या व्याधीनें त्यांची मनःस्थिति जर्जर झालेली असल्यानें, जीवनाकडे आणि वाङ्मयाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीवर निराशेची आणि असमाधानाची छाया पसरलेली आहे. मराठी वाङ्मयांतील एकहि गोष्ट त्यांना पसंत नाहीं. मराठी साहित्यिक त्यांना घोडेस्वाराप्रमाणें घोडदौड करतांना दिसतात पण त्यांच्या हातांत त्यांना तरवारी दिसत नाहींत, फक्त अलगुजेंच दिसतात. (ह्याचा अर्थ काय तें खांडेकर जाणोत!) ललितवाङ्मय त्यांना फिक्कट तरुणीसारखें म्हणजे जवळ जवळ कमल दीक्षितप्रमाणेंच दिसतें! वर्तमानपत्रें, सिनेमा आणि ज्योतिष ह्यांच्याकडे जास्त लक्ष देतात म्हणून त्यांना वाईट वाटतें. पण वर्तमानपत्रांनीं आज बहुजन समाजांत प्रचंड राजकीय जागृति केलेली आहे इकडे त्यांनीं दुर्लक्ष केलेलें आहे. बहुतेक मराठी बोलपट त्यांना भडक पांचट वाटतात! 'लग्न पहावं करून'मध्यें दहा वर्षांची मुलगी आपल्या थोरल्या बहिणीला नवऱ्याच्या खोलींत लोटण्यासाठीं अनेक युक्त्याप्रयुक्त्या लढवते आहे हें दाखविण्यासाठीं त्यांनीं स्वतः जो गर्भाधानी विनोद केलेला आहे त्यामुळें त्यांना कदाचित् तसें वाटत असल्यास नवल नाहीं. पण खरें पाहावयाचें म्हणजे मराठी बोलपटांनीं धंद्याच्या आणि तंत्राच्या दृष्टीनें केवढी मजल

मारलेली आहे हें त्या धंद्यांतलें मर्म समजणारांना सांगावयास नको. हल्लींच्या काव्यांत 'डुलवित' 'खुलवित' हे लुसलुसीत शब्द फार येतात म्हणून त्यांना वाईट वाटतें, पण हीं काव्यें आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत आबालवृद्धांना, अशिक्षित अडाण्यांना गुणगुणतां येतात ह्याबद्दल त्यांना हर्ष वाटत नाहीं. फडके-माडखोलकर ह्यांच्या कादंबरींतील शृंगाररस त्यांना विकृत कामविकार वाटतो! (शृंगारावर योग्य अभिप्राय देण्याइतकी आरोग्यपूर्ण प्रकृति खांडेकरांना कधींच लाभलेली नाहीं ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे.) तथापि फडके-माडखोलकर ह्यांच्या शृंगारी कादंबऱ्यांनीं महाराष्ट्रांतील अनेक सांसारिकांना आणि ब्रह्मचाऱ्यांना किती तरी आल्हाद दिलेला आहे हें कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं.

एवंच, खांडेकरांना आजच्या ललितवाङ्मयांत उदात्तता दिसत नाहीं, पावित्र्य दिसत नाहीं, उच्च ध्येयें दिसत नाहींत, लेखकांमध्यें जीवनाचा अनुभव आणि व्यापक जाणीव असलेली दिसून येत नाहीं! जिकडे तिकडे पांचटपणा, पोरकटपणा वैयक्तिक टवाळी, कामविकृति माजलेली फक्त त्यांना दिसत आहे! मराठी भाषेंतील ललितवाङ्मय हें किडलेलें आणि सडलेलें आहे असें त्यांचें अखेरचें निदान आहे! सदर निष्कर्ष काढण्याची खांडेकरांची दृष्टि आणि मार्ग निराळे असले तरी अखेरशेवटीं ते प्रो. फडके आणि कृष्णराव मराठे ह्यांच्याच मुक्कामाला येऊन पोंहोचलेले आहेत! आणि एवढेंहि करून आपली भूमिका वकीलाची नसून न्यायाधीशाची आहे असें खांडेकर बजावीत आहेत. न्यायासनावर अधिष्ठित झालेली न्यायदेवता ही कितीहि आंधळी असली, आणि जाड भिंगांचा चष्मा ती घालीत नसली, तरी ती हातांत तराजू घेत असते, कुऱ्हाड घेत नाहीं हें खांडेकर विसरल्यासारखें दिसतात. फडके म्हातारे झाले म्हणून त्यांना वाङ्मयांत दोष दिसतात, तर खांडेकर आजारी असल्यानें त्यांना वाङ्मयाची प्रकृति सपशेल बिघडल्यासारखें दिसतें! वाङ्मयाच्या प्रगतीच्या दृष्टीनें दोघांच्याहि निर्णयाची किंमत सारखीच आहे!

# अरेरे! बोलपट बघून मुलगा बिघडला! २६

सोलापूरचें साहित्यसंमेलन साहित्यविषयक विचाराच्या दृष्टीनें अत्यंत प्रतिगामी झालें यांत संशय नाहीं. हुकूमशाहीचें युरोपांत जें सध्यां आसुरी नृत्य चाललेलें आहे त्याचा तीव्र निषेध ह्या संमेलनांत जो प्रामुख्यानें व्हावयाला पाहिजे होता तो झाला नाहीं एवढेंच नाहीं, तर साहित्याचा आणि राजकारणाचा कांहीं एक संबंध नाहीं, महायुद्धाच्या वणव्यानें सारें जग पेटून भस्मसात् झालें तरी हरकत नाहीं, आम्ही साहित्यिक केवळ पुस्तकी साहित्यांतील शाब्दिक गोष्टींचीच चर्चा करणार, अशी अत्यंत प्रतिगामी घोषणा ह्या साहित्यसंमेलनानें केलेली आहे. खांडेकर, फडके प्रभृतींना सध्यांच्याच किंवा कोणत्याच राजकारणाचा श्रीगणेशा देखील कळण्याची पात्रता नाहीं. तथापि सामान्य जनतेला राजकारण आवडतें, म्हणून, आपल्या कादंबऱ्या लोकप्रिय करण्याच्या स्वार्थी हिकमतीनें, त्यांच्यांतून संबंध असो वा नसो—राजकारण घुसडून देण्यास जे मागेंपुढें पाहत नाहींत, त्याच फडके-खांडेकरांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या संमेलनांत राजकारण आणि साहित्य ह्यांचा कांहीं एक संबंध नाहीं असें जाहीर झालें हें एका अर्थीं बरें झालें. ह्यापुढें

तरी ह्या दोघांच्या कादंबऱ्यांतील राजकारणाची बेवकूब भेसळ वाचण्याच्या आपत्तीपासून वाचकांची सुटका होईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. ( सगळ्यांत मौजेची गोष्ट म्हणजे फडके आपल्या कादंबऱ्यांत राजकारणाची उगाच सरमिसळ करतात म्हणून खांडेकरांनीं आपल्या भाषणांत त्यांच्यावर टीका केलेली आहे. ते म्हणतात, " फडक्यांच्या सारख्या चतुर कलावंतानें प्रेम, गांधीवाद आणि मजुरांचा संप ह्या सर्वांचें संमिश्रण करण्याचा अट्टाहास कां करावा ? कुठें शृंगाराचा रंग उधळ, कुठें राजकारणाचा मुलामा दे असें केल्याशिवाय कथा मोहक होतच नाहीं अशी त्यांची समजूत कां व्हावी ?" वास्तविक ह्या बाबतींत फडक्यांना नांवें ठेवण्याचा खांडेकरांना मुळींच अधिकार नाहीं. त्यांनींहि आपल्या कादंबऱ्यांतून कारखाने, मंजूर, भांडवलवाले, सत्याग्रह असल्या समाजसत्तावादीय आणि राजकीय कल्पनांचा पोकळ आवाज कांहीं कमी काढलेला नाहीं ! दोघेहि ह्या बाबतींत सारखेच दोषी आणि म्हणून ढोंगी आहेत. )

संमेलनांतील ठराव जितके प्रतिगामी, तितकें खांडेकरांचें भाषणाहि बहुतांशीं प्रतिगामी झालें असेंच मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. खांडेकरांचा मुख्य सूरच मुळीं निराशेचा आहे. पुरोगामी मनुष्य हा निराशावादी असूंच शकत नाहीं. ज्याला सभोंवतीं निराशेचेंच वातावरण दिसतें, त्याच्या अंगीं प्रगतीचा उत्साह कोठून येणार ? आणि तो दुसऱ्याला प्रोत्साहन तरी काय देणार ? गेल्या वीस वर्षांच्या ललितवाङ्मयांत खांडेकरांना गुणापेक्षां दोषच जास्त दिसतात. आम्ही असें मुळींच म्हणत नाहीं, कीं प्रगमनशील मनुष्यानें घडलेल्या किंवा घडत असलेल्या चुकांकडे दुर्लक्ष करावें. दुरुस्त करण्याच्या दृष्टीनें चुकांची पाहणी करणें हाच पुरोगामी माणसाचा दृष्टिकोण असूं शकतो. खांडेकरांनीं आधुनिक ललितवाङ्मयांतील गुणांचें प्रोत्साहनपूर्ण समालोचन करून मग त्यांतील निरनिराळ्या दोषांचें विश्लेषण केलें असतें, तर त्यांच्या भाषणामुळें ललित-लेखकांना केवढी तरी स्फूर्ति मिळाली असती ? पण जन्मभर मास्तरकी केलेला एखादा माणूस नशिबानें शेवटीं डिपोटी झाल्यावर शाळातपासणीच्या वेळीं शिक्षकांच्या कामांतील बारीकसारीक दोष हुडकण्यांत जसा आनंद मानतो, तद्वत् स्वतः इतकी वर्षें ललित-लेखनाचा धंदा करून शेवटीं संमेलनाध्यक्ष होतांच, इतर ललित-

लेखकांच्यावर मिटक्या मारीत मरीत खांडेकरांनीं शेणसडा फेकलेला आहे. आणि गमंतीची गोष्ट अशी कीं, जे जे म्हणून दोष त्यांना इतर ललित-लेखकांत आढळून येतात ते ते सर्व दोष अत्यंत प्रामुख्यानें खांडेकरीय साहित्यांत आढळून येतात. खांडेकर म्हणतात काव्याला ओहोटी लागली आहे. पण खुद्द खांडेकरांच्या काव्याला एकदां देखील कधीं भरती आल्याचें माहिती नाहीं. त्यांच्या प्रतिभेची एकुलती एक पणती अद्यापिहि पिचापिचे डोळे करून मिणमिणत बसलेली आहे. 'खुलवित' 'डुलवित' 'थयथय' 'राया' इत्यादि नाजुक नाजुक शब्द कवींच्या काव्यांत फार वेळां येतात, आणि त्यामुळें आधुनिक काव्य निर्जीव आणि यांत्रिक झालेलें आहे, हा त्यांचा आक्षेप खुद्द त्यांच्याच काव्याच्या बाबतींत घेतां घेण्यासारखा आहे. त्यांनीं ह्याच शब्दांची कोशिंबीर वेळीं-अवेळीं आपल्याहि काव्याच्या वाचकांना भरपूर चारलेली आहे. प्रासयुक्त काव्याबद्दल खांडेकरांची ही तक्रार आहे. तथापि गद्य-काव्याबद्दल बोलावयाचें झाल्यास खुद्द खांडेकरांच्या लिखाणा-बद्दल सर्रहा असें म्हणतां येईल कीं, काव्यालंकाराच्या अमर्याद वेडानें खांडेकरांनीं मराठी वाचकांना सळो का पळो करून सोडलेलें आहे. काव्यात्मक शब्दांचा वेडावाकडा उपयोग केल्यावांचून खांडेकरांना एकहि मराठी वाक्य धड लिहितां येत नाहीं असा त्यांचा लौकिक सर्वविश्रुत आहे. जीवन ही खिडकी आहे, हृदय हें फडताळ आहे, संसार हा खटारा आहे, प्रेम हें वंगण आहे, असें खांडेकरी लेखनपद्धतीचे अगदीं थोडक्यांत विडंबन करतां येईल. सध्यांचा विनोद हा हास्यास्पद आणि बाष्कळ असल्याची त्यांची तक्रार आहे. तथापि शब्दाशब्दावर हास्यास्पद कोट्या करण्यांत खांडेकरांचा हात निदान महाराष्ट्रांत तरी कोणी धरणार नाहीं. 'लग्न पहावं करून'मध्यें त्यांनीं आपल्या पाणचट गर्भाधानी विनोदाचा भरपूर पुरावा देऊन ठेवलेला नाहीं का? दहा वर्षांची लहान मुलगी आपल्या वडील बहिणीला नवऱ्याच्या खोलींत ढकल-ण्याचा प्रयत्न करीत आहे हें कोणत्या समाजांतले वास्तवादी दृश्य; आणि हा कोठल्या उच्चं आणि पवित्र विनोदाचा नमुना? फडक्यांचा आणि माडखोल-करांचा शृंगार विकृत आणि वैषयिक आहे असें म्हणणारा हा बहाद्दर तर, दहा वर्षांची पोरगी 'कोकशास्त्रां'त तरबेज आहे असें भयंकर दृश्य स्वतः निर्माण करतो ह्याला काय म्हणावें! लावणीकार शाहीर ज्याप्रमाणें 'वय बारा तेरांत

आली बहरांत!' असें बारा-तेरा वर्षांची मुलगी तारुण्याच्या ऐन भरांत आल्याचें वर्णन करतात, त्यांच्याच पंक्तीला खांडेकरांची ही दशवर्षीय मानसकन्या बसूं शकते. खांडेकर म्हणतात, "लेखकांनीं काळाशीं समरस व्हावयाला पाहिजे. समुद्राच्या अफाट विस्ताराला भिऊन नदी कधीं मागें फिरली आहे का?" कल्पना फारच भव्य आहे, पण ती खांडेकरांच्या बाबतींत खरी आहे का? त्यांच्या प्रतिभेचा शिरोडे गांवांत उगम पावलेला ओढा त्या गांवच्या पंचक्रोशीभोंवतींच रेंगण घालीत असलेला दिसून येतो. त्यांच्या कोणत्या लिखाणांत काळाशीं समरस झाल्याच्या खुणा आहेत? जीवनाबद्दल व्यापक जाणीव धरा म्हणून ते स्वतः हंबरडा फोडतात. पण जीवन काय आहे ह्याचा खांडेकरांना ओझरतासुद्धां वास नाहीं! वाचनालयांत बसून वाङ्मय निर्माण करणें हेंच खांडेकरांच्या साहित्यसेवेचें बरोबर वर्णन होऊं शकेल. 'सजीव प्रेमकथा लिहावयाला लागणारे अनुभव आमच्या समाजांत दुर्मिळ आहेत!' असें ते म्हणतात. जीवन जगणाऱ्या माणसाला कोणतेंहि अनुभव दुर्मिळ नाहींत. खांडेकरांच्या विशिष्ट स्वभावामुळें आणि प्रकृतीमुळें आरोग्यपूर्ण जीवनांतले कोणतेहि अनुभव त्यांच्यासारख्या पुस्तकांतील कीटकाला दुर्मिळच म्हणावयाला पाहिजेत! म्हणूनच खांडेकरांच्या कादंबऱ्यांत आढळून येणारी समाजजीवनाचीं चित्रें आणि पात्रें एकंदरींत नेभळीं, दुबळीं आणि तकलादी वाटतात. 'अरबी भाषेंतील सुरस चमत्कार' वाचून खांडेकर कादंबऱ्या लिहावयास शिकलेले असावेत असा माझा समज आहे. आयुष्यांत कधींहि न आढळून येणारे अद्भुतरम्य प्रसंग आणि घटना, एका प्रसंगाशीं दुसऱ्या प्रसंगाचा कधींहि न जुळणारा अनुक्रम आणि अधूनमधून निरर्थक काव्यमय सुभाषितें, गरीबी, माणुसकी इत्यादि विषयांवरील प्रवचनात्मक चर्वित चर्वणें एवढें सारें लटांबर अडीचशें-तीनशें पानांत छापून काढलें म्हणजे झाली खांडेकरांची कादंबरी! एवंच, स्वतःच्या दिव्याखालीं खंडीभर अंधार असतांना दुसऱ्याच्या दिव्यांतील वातीवरील काजळी झाडण्यासाठीं अस्तन्या सारून पुढें येणें यापरतें हास्यास्पद धाष्टर्य कोणताहि दुसरा लेखक करूं शकणार नाहीं. आम्ही असें मुळींच म्हणत नाहीं, कीं कोणत्याहि ललितलेखकांत वरील दोष असूं शकत नाहींत. खांडेकरांच्या वाङ्मयांत जे जे दोष आहेत त्याहीपेक्षां ढोबळ दोष खुद्द माझ्याहि वाङ्मयांत असूं शकतील. पण केवळ मिळालेल्या

अधिकाराचा फायदा घेऊन उगीच दुसऱ्याच्या नाकांत काड्या घालीत बसावयाचें हें कांहीं शहाणपणाचें आणि चांगुलपणाचें लक्षण नव्हे. सर्व ललितलेखकांत सामान्यत्वेंकरून आढळून येणाऱ्या दोषांचा खांडेकरांनीं तरी जास्त सहानुभूतीनें विचार करावयाला हवा. स्वतःच्या तोंडावरले डाग साऱ्या जगाला दिसत असतांना, दुसऱ्याच्या चेहऱ्यावर पडलेल्या डागावर डागण्या देत बसणें हें कांहीं माणुसकीचें लक्षण नव्हे. निदान ज्या ललितलेखनावर आपण जगत आहोंत त्या ललितलेखनाशीं तरी खांडेकरांनीं कृतज्ञ राहावयाला पाहिजे. बोलपटलेखनावर आज खांडेकर पोट भरीत आहेत; पण त्या वाङ्मयाकडे पाहण्याची देखील खांडेकरांची तीच कृतघ्नतेची वृत्ति आहे. म्हणे बोलपट पाहून मनावर अनिष्ट परिणाम होतात! निदान खांडेकरांनीं तरी असें बोलावयास नको होतें! त्यामुळें कृष्णराव मराठ्यांची शेंडी ताठ होऊन आतां कल्पवृक्षाच्या पारंब्यांपर्यंत पोंहोचली असावी! बोलपटाच्या अनिष्ट परिणामाबद्दल खांडेकरांनीं आपल्या मुलाचें उदाहरण दिलें. 'गीता' बोलपट पाहून म्हणे त्यांचा पोऱ्या चोऱ्या आणि मारामाऱ्या करूं लागला! खांडेकरांच्या 'ध्येयात्मक' कादंबऱ्यांच्या आणि लघुकथांच्या वातावरणांत जन्माला आलेला त्यांचा मुलगा, एक बोलपट पाहून जर इतका बिघडूं शकतो, त्या अर्थीं तो बोलपट वाईट असण्यापेक्षां खांडेकरांच्या कादंबऱ्या आणि लघुकथा निर्जीव असल्या पाहिजेत हा देखील तर्क निघूं शकतो! किंवा खांडेकरांचें लिखाण चांगलें असेल, 'गीता' बोलपटहि चांगला असेल, पण खांडेकरांचा मुलगा उडाणटप्पू असेल असाहि तर्क निघूं शकेल! खांडेकरांना आपला मुलगा बृहस्पति आहे असें वाटत असेल म्हणूनच त्यांनीं तो बिघडल्याचें खापर बोलपटाच्या डोक्यावर फोडलें असावें! कोणत्याहि वाङ्मयानें मनावर चांगला किंवा वाईट परिणाम होऊं शकतो ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सिद्ध आहे. ह्या गोष्टीवर आम्हां लेखकांचा विश्वास आहे म्हणून तर आम्ही ह्या भानगडींत पडून हाडाची काडें करतों. 'तुकाराम' बोलपट पाहून आपला मुलगा मोक्षाला जाण्याच्या गोष्टी करूं लागला असे खांडेकरांनीं कां सांगितलें नाहीं? 'गीते'चें तेवढें उदाहरण त्यांनीं कां दिलें! उद्यां 'लग्न पहावं करून' हा पट पाहून त्यांची मुलगी एखाद्या गर्भाधानप्रसंगीं 'अश्लील पुढाकार' घ्यावयाला लागली तर तें उदाहरण कोणी सांगावयाचें? एवंच, आधुनिक

ललितवाङ्मयाचें खांडेकरकृत विश्लेषण अत्यंत विकृत दृष्टीचें म्हणजे जाड भिंगांच्या चष्म्यांतून झालेलें आहे. ललितवाङ्मय हें आजचें खरेंखुरें राष्ट्रीय लोकवाङ्मय आहे. बहुजनसमाजांत ह्या वाङ्मयानें वाचनाची अभिरुचि निर्माण करून वाचनाचा केवढा तरी प्रसार केलेला आहे. ज्या कल्पनांचें आणि विचारांचें लोण इतर कोणत्याहि साधनानें जनतेपर्यंत पोंहोचलें जाणें शक्य नव्हतें तें ललितवाङ्मयानें पोंहोचवलेलें आहे. ललितवाङ्मयाच्या ह्या राष्ट्रीय स्वरूपाकडे खांडेकरांनीं डोळेझाक केली म्हणूनच आम्ही त्यांचे भाषण प्रतिगामी स्वरूपाचें आहे असें म्हणतों.

# मराठी वृत्तपत्राचे काका २७

काकासाहेबांची आणि माझी पहिल्यानें कधीं ओळख झाली हें आज मला आठवत नाहीं. त्यांची माझी पहिली भेट केव्हां झाली, कुठें झाली, कां झाली किंवा कोणी करून दिली, ह्यांपैकीं एकहि गोष्ट मला आतां स्मरत नाहीं. मला माझी स्मरणशक्ति अत्यंत तीक्ष्ण आहे असें वाटतें. तथापि काकासाहेबांच्या आणि माझ्या मैत्रीच्या आरंभाचें चित्र रेखाटण्याच्या कामीं तिनें एवढें कां रुसून बसावें हें मला कळत नाहीं! आज मला असेंच वाटतें कीं, काकासाहेबांची आणि माझी अनेक वर्षांची मैत्री आहे. जणूं कांहीं आम्ही एकाच गांवचे, एकाच आळींतले किंवा एकाच कुटुंबांतले आहोंत. इतका जिव्हाळा, इतका आपलेपणा मला काकासाहेबांबद्दल वाटतो.

मी इंग्लंडहून १९२८ सालीं परत आल्यानंतर माझ्या विशिष्ट पद्धतीनें जाहीर व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. इंग्लंडमध्यें डॉ. बॅलार्ड ह्या नांवाचे एक विख्यात शिक्षणशास्त्रज्ञ आहेत. त्यांचीं शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र ह्यांजवरचीं व्याख्यानें ऐकण्याची मला संधि मिळाली. डॉ. बॅलार्ड हे कोणत्याहि विषयावर बोलोत त्यांचीं व्याख्यानें विनोदी उदाहरणांनीं

आमूलाग्र भरलेलीं असावयाचीं. त्यामुळें श्रोत्यांच्या हसून हसून मुरकुंड्या वळत. त्या व्याख्यानपद्धतीनें माझ्या मनाची पकड घेतली. श्रोत्यांच्या गळीं आपले विचार आणि कल्पना उतरविण्यास विनोदासारखें रामबाण शस्त्र नाहीं याची मला खात्री पटली, आणि परत इकडे आल्यानंतर मीं त्या पद्धतीनें व्याख्यान देण्यास सुरुवात केली. माझ्या व्याख्यानांबद्दल काकांनीं कुठें ऐकलें कोणास ठाऊक. पण त्यानंतर माझ्या व्याख्यानांचीं प्रतिवृत्तें 'ज्ञानप्रकाश'मध्यें 'हशा आणि टाळ्या' ह्या कंसांतल्या सुप्रसिद्ध जोडगोळी-सह प्रसिद्ध होऊं लागलीं. माझीं व्याख्यानें जितकीं लोकप्रिय होऊं लागलीं, त्यापेक्षांहि मुद्रित स्वरूपांत तीं जास्त लोकप्रिय झालीं. व्याख्याता म्हणून माझा लौकिक महाराष्ट्रांत पसरविण्यास काकासाहेबच कारणीभूत झाले. आणि हाच लौकिक माझ्या पुढील वाङ्मयीन यशाला साहाय्यक ठरला. माझी आणि काकांची तोंपर्यंत प्रत्यक्ष अशी मुळींच ओळख नव्हती. तेव्हां दोस्तीच्या पोटीं माझी जाहिरात करण्यास काका प्रवृत्त झाले असें जर कोणी म्हणेल तर तें खोटें आहे. पण काकांची जी विशिष्ट संपादकीय शैली आहे तिचा हा 'उद्योग' आहे. समाजांत जें जें कांहीं नवीन, चटकदार, आकर्षक असें निर्माण होईल, त्याची सर्वांच्या आधीं दखलगिरी घेण्यांत काका जागरूक असत. माझी व्याख्यानपद्धति ही अभिनव असून ती समाजांत लोकप्रिय होण्यासारखी आहे, एक निराळीच 'गंमत' समाजापुढें यामुळें येण्यासारखी आहे, महाराष्ट्राच्या एऱ्हवींच्या गंभीर जीवनाला कलाटणी देण्यास हा एक चांगलाच उतारा आहे, ह्या भावनेनें काकांनीं माझीं शेंकडों भाषणें सविस्तरपणें 'ज्ञानप्रकाशां'त छापलीं. अर्थात् प्रश्न माझ्या भाषणांचा नाहीं. ती एक निमित्तमात्र गोष्ट होती. पण त्यामुळें व्याख्यानांचीं प्रतिवृत्तें वृत्तपत्रांत छापण्याची एक अभिनव पद्धति काकांनीं महाराष्ट्रांत सुरू केली ह्यांत शंका नाहीं. काकांच्या 'ज्ञानप्रकाश'च्या ह्या वैशिष्ट्याचें यशस्वी अनुकरण अद्यापि एकाहि वृत्तपत्राला करतां आलें नाहीं, ह्यांतच काकांच्या प्रतिभेचें मर्म आहे. भालाकार भोपटकर, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. मोरे, कै. बागडे, अशा अनेक वक्त्यांचीं भाषणें, पुणें म्युनिसिपालिटीच्या आणि इतर अनेक जाहीर सभांचे अहवाल, ह्याच पद्धतीनें छापून 'मुद्रित व्याख्यान' हा एक अभिनव वाङ्मयप्रकार काकांनीं मराठी साहित्यांत रूढ केलेला आहे.

काकांनीं व्यक्तिशः माझ्यावर उपकार केले—आणि म्हणून त्यांच्याबद्दल माझ्या मनांत आपलेपणा आहे हें मला जसें तसेंच महाराष्ट्रांतल्या अनेक लोकांना वाटतें. गेल्या बारापंधरा वर्षांत सार्वजनिक जीवनामध्यें कोणत्या ना कोणत्या तऱ्हेनें ज्या ज्या प्रसिद्ध वा अप्रसिद्ध व्यक्ति डोकावल्या असतील, त्यांची दलखगिरी काकांनीं घेतली नाहीं असें कधींच झालें नाहीं. कोणतीहि पुण्यांतली सभा असो हजर राहणाऱ्या लोकांची 'मे. बापूसाहेब जठार ते श्री. (किंवा प्रो.) बापूराव पोंक्षे' येथपर्यंत यादी ही यावयाचीच. कोणताहि समारंभ असो, नाटक असो, खाजगी ट्रायल असो, 'बाबूराव श्रोत्री किंवा श्री. ओक ह्यांनीं निमंत्रितांची व्यवस्था उत्कृष्टपणें ठेवली होती' हा मजकूर असावयाच. बडोद्याचे प्रो. चिं. वि. जोशी, प्रो. दांडेकर, नागपूरचे डॉ. पेंडसे किंवा प्रो. बेहेरे हे पुण्यांत आले कीं, 'थोरामोठ्यांच्या हालचालीं'त त्यांची वर्दी लागावयाचीच. डॉ. अण्णा नवले असो, प्रज्ञानेश्वर यति असो, राजभोज असो वा तात्याचा गायकवाड असो, जो जो माणूस आपापल्या मतीनें आणि शक्तीनें कांहीं ना कांहीं करीत असेल, त्यानें लिहून पाठविलेला मजकूर 'ज्ञानप्रकाश'मध्यें हा यावयाचाच. कोणी नाटककार असो, कवि असो, लघुकथाकार असो, त्याच्या कृतीचा सत्कार काकांनीं सहानुभूतीनें केला नाहीं असें कधींहि व्हावयाचें नाहीं. कित्येक प्रसंगीं तर ह्या कामीं त्यांनीं अग्रलेखहि खर्चे केलेले आहेत. काकांचें पत्र एका विशिष्ट राजकीय पक्षाचें असलें तरी, उत्तेजनाचें आणि सहानुभूतीचें जें अन्नछत्र काकांनीं उघडलें होतें त्यामध्यें त्यांनीं कधींहि पक्षभेद वा पंक्तिप्रपंच केला नाहीं. राजकीय निवडणुकीच्या अगदीं प्राणघातक धामधुमींतहि प्रत्येक पक्षाचे उमेदवार प्रसिद्धीसाठीं आणि मदतीसाठीं काकांच्याकडेच धाव घेत. स्वतःच्या पक्षाच्या वर्तमानपत्रापेक्षां काकांचा 'ज्ञानप्रकाश'च त्यांना जवळचा वाटत असे. त्यामुळें कॉंग्रेस, हिंदुमहासभावाले, आंबेडकर पंथीय, समाजसत्तावादी, सत्यशोधक, सनातनी, नवमतवादी अशा निरनिराळ्या पक्षांतील लोकांना काकांची संपादकीय कचेरी म्हणजे स्वतःच्या घरासारखी वाटे. आणि मौजेची गोष्ट अशी कीं, काका अमुक एका पक्षांतील माणसाला मदत करीत आहेत म्हणून दुसऱ्या पक्षांतलि माणसाला काकाबद्दल बिलकुल राग येत नसे. उलट त्यामुळें त्यांचा काकांबद्दलचा आदर दुणावतच जाई.

गेल्या दीड तपांतल्या सर्व राजकीय, सामाजिक, वाङ्मयात्मक वा शैक्षणिक चळवळी आणि त्या चळवळींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व्यक्ति ह्यांचा सहानुभूतिपूर्वक आणि उत्तेजनपूर्वक समाचार घेऊन काकांनीं महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला फारच मोठें साहाय्य केलें आहे. ह्या कामीं त्यांनीं कधींहि गय केली नाहीं किंवा आळस दाखवला नाहीं कीं दिरंगाई केली नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या त्या व्यक्तींना त्या त्या वेळीं खाजगी पत्रें देखील न चुकतां लिहून त्यांचें त्यांनीं अभिनंदन केलेलें आहे. म्हणून आजच्या घटकेला काका हे **'महाराष्ट्राचे सार्वजनिक काका'** झालेले आहेत. आणि 'जगन्मित्र काका' म्हणून त्यांचा चोहोंकडे गौरव होत आहे. ह्या सर्व गोष्टीला एकच कारण म्हणजे काकांचा अत्यंत गोड स्वभाव होय. काकांच्या इतका गोड आणि मजेदार माणूस उभ्या महाराष्ट्रांत आढळणार नाहीं. केव्हांहि काकांच्याकडे जा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य हें चमकत असावयाचेंच. कांहींहि विचारा, त्याला त्यांचें उत्तर 'होय!' हें ठरलेलें. दुसऱ्याच्या मनाला लागेल असा शब्द त्यांच्या तोंडून कधीं निघावयाचा नाहीं, अशी कृति त्यांच्या हातून कधीं व्हावयाची नाहीं. कोणी घरीं येवो, त्याच्याशीं मनमोकळेपणानें बोलल्याशिवाय काका राहावयाचे नाहींत. कसलीहि अडचण त्यांच्यापुढें मांडा—त्यांनीं त्यामधून वाट कशी काढावी हें चटकन् सुचविलें नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा काकांना कधीं आळस नाहीं कीं कंटाळा नाहीं. प्रत्येक गोष्टीबद्दल काकासाहेबांना जबरदस्त हौस! किंबहुना दुसऱ्याच्या हौसेपेक्षां काकासाहेबांचीच हौस जास्त आणि त्यांनाच त्या कामाची जास्त जरूरी! त्यामुळें प्रत्येकाला काका आपले खाजगी मित्र आहेत असे वाटे. प्रत्येकाला ते हवेसे असत. नुसता शाब्दिक सल्ला देऊन काका थांबत नसत, तर अनेक प्रसंगीं स्वतःचा कोणत्याहि तऱ्हेचा फायदा नसतांना स्वतःच्या पदराला खार लावून, स्वतःचा वेळ गमावून आणि पुष्कळशीं पायपीट करून त्यांनीं अनेक व्यक्तींना मदत केलेली आहे. वृत्तीची ही लोकसंग्रहात्मकता, भाषणाचा हा गोडवेपणा आणि स्वभावाचें हें सौजन्य ह्या गुणांमुळें 'संपादक—काकासाहेब' ह्यांच्यापेक्षां 'काकासाहेब–व्यक्ति' हीच पुष्कळांना अतिशय थोर वाटेल! आणि काकासाहेबांचें व्यक्तिमत्व आणि चारित्र्य इतकें श्रेष्ठ नसतें, तर त्यांचें संपादकत्व इतकें यशस्वी कधींहि होऊं शकलें नसतें.

मात्र लोकसंग्रह करतांना लोकाराधनेसाठीं काकांनीं आपलें विचारस्वातंत्र्य कधींहि गमावलें नाहीं. प्रत्येकाचें समाधान व्हावें म्हणून जो भेटेल त्याला खूष करण्यासाठीं काकासाहेबांनीं तोंडदेखली भाषा कधींच केली नाहीं. दुसऱ्याला न दुखवतां आपलीं स्वतःचीं मतें त्याच्या गळीं उतरवण्यांत आणि आपली छाप त्याच्यावर टाकण्यांत काकासाहेब फार कुशल आहेत. काकांचा स्वभाव आग्रही नसल्यानें त्यांच्या सूचनांचा स्वीकार करण्यास कोणाला यत्किंचितहि संकोच वाटत नाहीं. उलट कांहीं वेळानें त्या काकांच्या सूचना नसून आपल्याच डोक्यांतून निघालेल्या कल्पना आहेत असेंच प्रत्येकाला वाटूं लागतें. काकासाहेबांची टीका करण्याची पद्धत फार बारकाव्याची आणि मर्मभेदी आहे हें त्यांचे अग्रलेख ज्यांनीं बारकाईनें वाचले असतील त्यांना सांगायला नको. दुसऱ्याच्या जिव्हारीं लागेल असा एकच शब्द किंवा शब्दसांप्रदाय अवतरण चिन्हांत ते वापरतील, पण त्यामुळें प्रतिपक्षी चीत झाल्याशिवाय राहणार नाहीं. नुसत्या मथळ्यानेंच विरोधी माणसांना गारद करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या अग्रलेखाचे मथळे वाचा किंवा सभेच्या वृत्तांताला त्यांनीं दिलेले मथळे पाहा! मथळ्यावरून स्वतः काकांचें त्या त्या बाबतींत काय मत असावें हें जाणणाराला चटकन् कळून येतें. काकांची वाणी जरी गोड असली, तरी त्यांच्या लेखणीची धार फार तिखट आहे ह्यांत शंका नाहीं. काका आज 'नेमस्त पक्षां'त असले आणि राजकीयदृष्ट्या ते घटनावादी असले तरी, त्यांची विचारसरणी कॉंग्रेसच्या राष्ट्रीय विचारसरणीशीं जास्त जुळणारी आहे. अर्थात् कॉंग्रेसचें धोरण एखाद वेळीं चुकत असलें तर त्यावर कडकपणें टीका करावयास ते कधींहि मागेंपुढें पाहणारे नाहींत. समाजसत्तावादाचें व्यावहारिक स्वरूप जरी सर्वस्वीं त्यांना मान्य नसलें तरी वैचारिकदृष्ट्या ते साम्यवादी असून भांडवलवाले आणि मजूर ह्यांच्या झगड्यांत मजुरांची बाजू उचलण्यास ते कधींहि मागें राहणार नाहींत. म्हणूनच श्री. ना.म.जोशी किंवा श्री.शामराव परुळेकर ह्यांच्याबद्दल त्यांची सहानुभूतिहि पुष्कळशी वैचारिक आहे. सावरकरांची 'हिंदुमहासभा' त्यांना मान्य नसली तरी समतेच्या भूमिकेवर घडवून आणलेलें 'हिंदुसंघटन' त्यांना मान्य आहे. सावरकरांच्या 'मराठी शुद्धीकरणा'च्या चळवळीला त्यांच्याइतकें सक्रिय साहाय्य कोणीच केलें नसेल. सामाजिक आणि वाङ्मयीन बाबतींत तर ते कट्टे पुरोगामी आहेत. पुरोगामी

विचारांचा त्यांच्याइतका पुरस्कार दुसऱ्या कोणत्याहि संपादकानें केलेला नसेल. फडके-खांडेकर ह्यांच्या प्रतिगामी विचारसरणीवर एवढ्याचसाठीं त्यांना प्रहार करावे लागले. नाहीं तर त्यांच्या वाङ्मयाबद्दल काकांना किती तरी आदर आहे.

काकासाहेबांचें वाचन आणि अवलोकन फारच मार्मिक असलें पाहिजे. ते केव्हां वाचतात आणि विचार करतात हें कळण्यास मार्ग नाहीं. कारण चोवीस तास त्यांच्याभोंवतीं माणसांचा गराडा पडलेला असतो. असा कोणताहि विषय नाहीं कीं दोन-तीन तासांचे अवधींत त्यांनीं त्यावर एखादा उत्कृष्ट अग्रलेख तयार केलेला नाहीं! प्रत्येक लेखांत त्यांचा अभ्यास आणि व्यासंग दर्शविणारे भरपूर संदर्भ आणि उतारे भरलेले असावयाचेच. काकासाहेबांची लेखनशैली अत्यंत ओघवती, प्रसादपूर्ण आणि प्रभावी आहे. त्यांचें सर्व स्फुट लेखन एकत्र झालें म्हणजे मग त्यांच्या शैलीचें सामर्थ्य प्रत्यक्षपणें पाहावयास मिळेल. त्यांच्या लिहिण्यांत एक प्रकारचा जिवंतपणा आणि जिव्हाळा आहे; ह्याचें कारण आपल्या कचेरींतल्या खुर्चीवर बसून लेख लिहिणारे ते संपादक नाहींत तर आपल्याभोंवतीं चाललेल्या सामाजिक जीवनांत प्रत्यक्षपणें भाग घेऊन; तें जीवन जगून—अभ्यासून मग लेखन करणारे ते संपादक आहेत. गेल्या दीड तपांत महाराष्ट्रांतली अशी एकहि चळवळ झालेली नसेल, कीं जिच्यांत काकासाहेबांनीं प्रामुख्यानें नसला तरी अंशतः भाग घेतलेला नसेल! अनेक चळवळींचीं तर मागें राहून त्यांनीं सूत्रें हलविलेलीं आहेत. अनेक भानगडींची चर्चा आणि निकाल खुद्द त्यांच्या घरीं व कचेरींत लागलेला असेल! जीवनाकडे पाहण्याची त्यांची वृत्ति फारच व्यापक आहे! बोलपट असो, नाटक असो, सहभोजन असो, मिश्रविवाह असो, हरिजन चळवळ असो वा सर्वपक्षीय परिषद् असो, काकासाहेबांना ज्यांत गति नाहीं असा एकहि विषय नाहीं! काकासाहेबांना ज्याबद्दल जिज्ञासा नाहीं अशी एकहि बाब नाहीं! काकासाहेब सर्वांत आहेत आणि कशांतहि नाहींत! एखाद्या माणसाची एखादी गोष्ट काकांना आवडत नसली तर तेवढ्यामुळें ते त्या माणसाचा तिरस्कार करीत नसत. ज्याच्यामध्यें जें आवडण्यासारखें आहे त्याचाच आस्वाद घेण्याची आणि त्याचा गौरव करण्याची त्यांची प्रवृत्ति! त्यामुळें प्रत्येक माणसालाहि असेंच वाटे कीं, काकांना आपली अमुक एक गोष्ट माहीत नाहीं, एवढेंच फक्त त्यांना

माहीत आहे! औदार्य व समजूतदारपणा हा काकांच्या रसिकतेचा आत्मा आहे. काकासाहेब कृतीनें किंवा आकृतीनें जरी फारसे रसिक नसले, तरी त्यांच्या वृत्तींत आणि स्वभावांत रसिकपणा नुसता ओतप्रोत भरलेला आहे. ते फारसें बोलत नसले तरी त्यांना सगळें ठाऊक आहे; त्यांना सगळें कळतें आणि तें सगळें ओळखून आहेत! जीवनाबद्दलची त्यांची ही जाणीव असल्यानें त्यांच्या लेखनशैलींत जिवंतपणा आला आहे! आणि त्यामुळेंच गेल्या दीड तपांत 'ज्ञानप्रकाश' हा महाराष्ट्रीय जीवनाचें एक प्रभावी व्यासपीठ होऊन बसलेला आहे. ह्या काळांतील महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक वा वाङ्मयात्मक इतिहास जर कोणाला लिहावयाचा असेल तर त्याला काकासाहेबांच्या 'ज्ञानप्रकाश'च्याच फायली चाळाव्या लागतील! पुरोगामी महाराष्ट्रीय जीवनाशीं काका समरस होऊं शकले म्हणूनच 'ज्ञानप्रकाश' हें तरुणांचें पत्र झालें, आणि ब्रह्मवृंदाच्या 'सर्वारिष्टशांत्यर्थ चाललेल्या जपजाप्याच्या' बातम्या छापण्याच्या धोरणामुळेंच 'केसरी' हें कुचकामी म्हाताऱ्यांचें पत्र होऊन बसलें!

काकासाहेबांना स्वतःची स्तुति आवडत नाहीं—त्यांना स्वतःची प्रसिद्धि आवडत नाहीं—स्वतः अंधारांत राहून दुसऱ्यावर प्रकाश टाकणें हें त्यांच्या जीविताचें ध्येय आहे. त्यांची राहणी अगदीं साधी आणि वागणें अगदीं सरळ आहे. केंव्हांहि त्यांच्या घरीं जा. बाहेरून फाटकांतून हाक मारा- 'काकासाहेब आहेत काय?' त्यांच्या खोलीचें दार लोटलेलें असेल. त्यांची मुलगी किंवा मुलगा धावत येईल, आणि क्षणानें काकासाहेबांची मूर्ति हसत हसत दरवाजांत प्रकट होईल. खोलींत गेलें तर सभोंवार पुस्तकांचे, वृत्तपत्रांचे ढीग अस्ताव्यस्त पडलेले आहेत—निळे सरकारी रिपोर्ट आहेत, ताज्या वर्तमानपत्रांचे गठ्ठे पडलेले आहेत, एक आरामखुर्ची आहे आणि एक सतरंजी आहे. काकासाहेब आरामखुर्चीवर किंवा सतरंजीवर बसून मांडीवर चतकोर कागदावर मिळेल त्या लेखणीनें किंवा फाउन्टन पेननें अग्रलेख लिहीत आहेत व मधून मधून प्रुफें तपाशीत आहेत;–वर्षानुवर्षें हा आपला काकासाहेबांचा खाक्या चाललेला आहे. दुपारीं तास दीड तासांत त्यांचें लेखन पुरें झालें म्हणजे मग त्यांचा लेखणीला हात कधींहि लागावयाचा नाहीं. त्यानंतर मग ते फिरून आपल्या मित्रमंडळींच्या गराड्यांत सामील झालेच म्हणून समजा. आज श्री. रामभाऊ तटणीस आले, त्यांच्याबरोबर

जा. उद्यां भाऊसाहेब गडकरी म्हणताहेत शिकारीला दौंडच्या रानांत चला, काकासाहेब चालले त्यांच्या बरोबर! परवां अत्रे म्हणाले चला मुंबईच्या चित्रमंदिराच्या उद्‌घाटनाला, काका चालले मुंबईला! संध्याकाळीं मात्र काकांचा मुक्काम श्री. शामराव भोळे ह्यांच्या मिनर्व्हा थिएटरवर. त्या ठिकाणीं पुण्यांतील निरनिराळ्या व्यक्ति येऊन काकासाहेबांना हजेरी देऊन गेल्या नाहींत असें कधीं व्हावयाचें नाहीं. साऱ्या दिवसांतल्या घडामोडींची आणि राजकारणाची चर्चा तेथें चालावयाची. इंग्लंडमध्यें जॉन्सनच्या वेळीं प्रसिद्धीस आलेल्या 'कॉफी–हाउस'प्रमाणें 'मिनर्व्हा'ला काकांच्यामुळें वाङ्‌मयात्मक स्वरूप आलेलें होतें. रात्रौ ११॥ वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालावयाचा. नंतर फिरून मध्यरात्रीच्या सुमारास 'ज्ञानप्रकाश'च्या छापखान्यांत चक्कर मारून एखादी बातमी असेल तर शेवटच्या घटकेला ती अंकांत घालावयाची, आणि मग घरीं जाऊन झोपावयाचें. काकांची प्रकृति जाग्रणामुळें मध्यंतरीं पुष्कळच खालावलेली होती. सामान्यतः ते संध्याकाळीं जेवत नाहींत. चिकणी सुपारी एवढें एकच त्यांना व्यसन! जेवण अगदीं साधें. त्यामुळें त्यांना जेवावयाला बोलावल्यानें कोणालाहि अडचण पडत नाहीं किंवा संकोच वाटत नाहीं.

दीड तपाच्या दीर्घ कालांत महाराष्ट्राचीं जीवनसूत्रें अंधारांत राहून हलवणारी, पुण्यामधील अनेक संस्थांच्या, चळवळींच्या आणि व्यक्तींच्या जीवनामधील महत्त्वाच्या घटना घडवून आणणारी ही प्रभावशाली मूर्ति म्हणजे डोक्यावर काळी टोपी, अंगांत पिवळसर लांब कोट, धोतर, पायांत वहाणा आणि हातांत छत्री घेऊन न बोलतां गंभीरपणें चालणारी एक व्यक्ति आहे असें सांगितलें तर पुष्कळांना खरेंहि वाटणार नाहीं. [काकासाहेबांच्या ह्या नम्र व विनयशील स्वभावामुळें 'काकासाहेब लिमये' हें नांव 'काकासाहेब लिमये' ह्या व्यक्तीपेक्षां महाराष्ट्राला जास्त माहिती आहे.] 'वृत्तपत्र हें व्यापक सामाजिक जीवनाशीं जितकें समरस होईल तितकें तें जास्त लोकप्रिय आणि प्रभावी होईल' हें काकासाहेबांच्या संपादनाचें रहस्य आहे. ह्या त्यांच्या धोरणामुळें त्यांनीं गेलीं पंधरा वर्षें 'ज्ञानप्रकाश' हें पत्र अत्यंत लोकप्रिय करून वृत्तपत्रव्यवसायाला त्यांनीं नवीन दिशा दाखवलेली आहे. महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाला प्रिय असलेल्या वृत्तपत्रपरंपरेचे कै. अच्युतराव कोल्हटकर हे जनक असले तर श्री. काका लिमये हे त्या परंपरेचे पितृतुल्य प्रेमानें संगोपन आणि संवर्धन करणारे 'काका' आहेत हें कोणीहि मान्य करील!

---

# मूठभर ब्राह्मणांचे पुढारी सावरकर २८

ता. ८ ऑगस्टच्या 'केसरी'त श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं एक पंचस्तंभी अग्रलेख लिहून सावरकरांची भरमसाट स्तुति आणि गांधी नि काँग्रेस ह्यांची पोटभर निंदा करून घेतलेली आहे. सर्व चळवळींतून सन्मानानें निवृत्त झाल्यानंतर वास्तविक आतां तात्या केळकरांना राजकारणांत फिरून तोंड घालण्याचें कांहीं कारण नाहीं. फार झालें तर त्यांनीं एखादी कादंबरी लिहावी, एखाद्या घोलपटाचें उद्घाटन करावें, किंवा 'वाज, वाज घंटिके' असली कविता जुळवीत घरीं बसावें. तात्यासाहेबांनीं आयुष्यांत पुष्कळ केलें, पुष्कळ साधलें. त्यांच्या एवढा बुद्धिमान् नि कर्तृत्ववान् लेखक महाराष्ट्रांत अद्यापि होऊन गेलेला नाहीं हें त्यांचा शत्रु देखील मान्य करील. तात्यांनीं आयुष्यांत एवढें स्थान नि एवढा मान मिळवलेला आहे कीं, त्यांच्या एवढी तृप्ति आणि तुष्टि क्वचितच एखाद्या व्यक्तीला आपल्या जीवनांत लाभलेली असेल. मागें आशा ठेवण्यासारखें तात्यांना आतां कांहीं उरलें नाहीं. त्यांच्या टाइपरायटरची घंटा वाजून किती वर्षें तरी झालीं! त्यांच्या कर्तृत्ववान् जीवनाची ओल संपून गेली! आतां 'रूळ' अगतिक झाला! तरी तात्या अजून मनांत उरलेले

तेच तेच टंक (–आणि तेच तेच डंख) बडवीत कां बसले आहेत हें आम्हांला कळत नाहीं! साहित्यांत, वृत्तपत्रांत, विद्वत्तेत, जीवनांत तात्या हे अत्यंत थोर आहेत हें आम्हांस संपूर्णतया मान्य आहे. पण राजकारणांत तात्या हे एक 'पराभूत' आणि 'पडेल पुढारी' आहेत हें सत्य आहे, त्याला कोण काय करणार? १९२० च्या असहकारितेच्या चळवळींत लोकमताच्या सामर्थ्या-मुळें तात्यांना गांधींच्या राजकारणांत पडावें लागलें. गांधींची चळवळ ही कांहीं मूठभर सुशिक्षितांची किंवा ब्राह्मणांची चळवळ नव्हती. हजारों वर्षे निद्रितावस्थेंत पडलेल्या बहुजन समाजाच्या जागृतीची ती चळवळ होती. महाराष्ट्रांतल्या पांढरपेशा नि वजनदार पुढाऱ्यांच्या बौद्धिक श्रेष्ठतेच्या आत्म-विश्वासाला ही चळवळ मानवण्यासारखी नव्हती. त्यामुळें तात्यांची ह्या चळ-वळींत खूप तिरपीट उडाली. पांढऱ्या खादीच्या टोपीऐवजीं, त्यांनीं काळी टोपी घातली, नंतर तिला भगवा रंग दिला–अन् शेवटीं फिरून किरमिजी पगडीवरच आले! असहकारितेच्या नाकावर टिच्चून त्यांनीं 'प्रतियोगी सहकारिता' काढली, 'अहिंसे'ला उत्तर देण्यासाठीं 'ठोशाला ठोसा' लगा-वण्याचें राजकारण निर्माण केलें, अन् अखेरीस 'हिंदुमहासभे'च्या छावणींत येऊन ते दाखल झाले. राष्ट्रीय चळवळीच्या झगड्यांत बंगाल, गुजरात, संयुक्तप्रांत वा मद्रास ह्यांच्या बरोबरीनें महाराष्ट्राला स्थान मिळूं शकलें नाहीं याचें कारण तात्या-अण्णा छापाचे घमेंडखोर आणि लटपटे पुढारी त्या वेळीं महाराष्ट्राला मिळाले! राजकीय पुढारीपण म्हणजे कांहीं बौद्धिक कोट्या करून लोकांना चकित करावयाचें नाहीं किंवा ह्या बोटावरची थुंकी त्या बोटावर हातचलाखीनें उडवून दाखवावयाची नाहीं! आजची राजकीय चळवळ ही राष्ट्राच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं स्वत्वावर त्यागपूर्वक तिलांजलि देण्याची आहे! ह्या कसोटीला उतरण्याइतका त्याग आणि निःस्वार्थीपणा तात्यांमध्यें नव्हता. त्यामुळें तरुण महाराष्ट्राचा तेजोभंग झाला आणि महाराष्ट्राचें सामर्थ्य खंडित होऊन महाराष्ट्रांत बुद्धिभेद उत्पन्न झाला!

तथापि महाराष्ट्रांतील बहुजन समाज कॉंग्रेसच्या चळवळीनें अधिकाअधिक जागृत होत गेला आणि महाराष्ट्रांतील राष्ट्रीय चळवळीची लाट इतकी पुढें गेली आहे कीं थकलेल्या तात्यांच्या ती आटोक्यांत येणें शक्य नाहीं. हा पराभवाचा डंख तात्यांच्या मनांत अद्यापि सलतो आहे! अजून त्यांचें मानी मन मग्रून

मधून उचल खातें ! रत्नागिरीच्या तुरुंगांत एका काळीं असलेला ब्रह्मदेशाचा पदच्युत राजा थिबा हा जसा समुद्रकांठीं बसून, फिरून राज्य मिळविण्याचा विचार करीत असे, तशा प्रकारचें 'मनोराज्य' चितारण्याची हुक्की तात्यासाहेबांना मधून मधून येत असल्यास नवल नाहीं ! गांधींच्या राजकारणामुळें केळकरांच्या कपाळीं हा वनवास आला त्या गांधींबद्दल व कॉंग्रेसबद्दल त्यांच्या मनांत अद्यापिहि डाचत असलेलें विष सावरकराच्या स्तुतीचें निमित्त करून बाहेर ओकण्याची संधि म्हणूनच तात्यासाहेब गमावीत नसावेत.

इतिहासाच्या प्रश्नपत्रिकेंत 'औरंगजेब आणि शिवाजी' ह्यांची तुलना करा, असा प्रश्न विचारण्यांत येतो. ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना शिवाजीला दाढी होती, औरंगजेबाला दाढी होती, दोघेहि पायघोळ अंगरखे घालीत होते. एक हिंदु होता. एक मुसलमान होता.' अशा थाटाचा पोरकट साम्यभेद ज्याप्रमाणें मुलें करतात तशाच तऱ्हेची हास्यास्पद तुलना तात्यासाहेबांनीं सावरकर-गांधी ह्यांच्यामध्यें केलेली आहे.

वास्तविक दोघांमध्यें एका तरी गोष्टीचें साम्य आहे काय ? कुठें गांधी—कुठें सावरकर ! दोघांची तुलना करण्याचा नुसता प्रयत्न करणें म्हणजे हास्यास्पद मूर्खपणा आहे ! मग हा मोठा तो छोटा, हा श्रेष्ठ हा कनिष्ठ, हा निर्णय देणें हा निखालस बेवकूबपणा आहे ? गांधी काय आहेत हें सारें जग जाणतें ! आजचें हिंदुस्थान ही गांधीजींची निर्मिति आहे ! गांधीजींच्या तत्त्वज्ञानाबद्दल वाटेल तेवढे मतभेद असले तरी जगाच्या जीवनावर परिणाम करणारें असें गांधीजींचें स्वतंत्र, विशिष्ट असें प्रभावशाली तत्त्वज्ञान आहे ! आणि सावरकर ? एक वेळ ह्यांच्या जीवनांत किंवा विचारांत कांहीं तरी ध्येय होतें ! त्या ध्येयासाठीं ते सर्वस्वाचा त्याग करावयाला सिद्ध होते. पण आज त्यांना तें देखील ध्येय उरलेलें नाहीं ! आज सावरकर हा एक विझलेला निखारा आहे, मालवलेली ज्योत आहे, झडलेल्या आयाळीचा तो एक सिंह आहे ! ब्रिटिश सिंहाची मानगूट गदगदा हलवणारे सावरकर, आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं फासावर जाण्यास सिद्ध असणारे सावरकर, दोन काळ्या पाण्याची शिक्षा डोक्यावर घेऊन अंदमानच्या नरकवासांत जीवन कंठणारे सावरकर आज संपूर्ण सरकारजमा सावरकर झालेले आहेत. ते व्हाइसरॉयापासून रूझवेल्टपर्यंत 'तंत्री संदेश' पाठवणारे, मुलाखती घेणारे निर्जीव सावरकर झालेले आहेत !

गांधी आणि सावरकर ह्यांची तेव्हांच तुलना करणें शक्य होतें कीं जेव्हां सावरकर हे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वाचा होम करायला सिद्ध होतें! आजच्या सावरकरांना हिंदुस्थान स्वतंत्र करावयाचा नसून हिंदुस्थानांत फक्त हिंदूचेंच साम्राज्य स्थापन करावयाचें आहे. जीनांना जसें पाकिस्तान हवें तसेंच सावरकरांना हिंदुस्थान पाहिजे आहे! त्यामुळें हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना स्वातंत्र्य देण्यासाठीं झगडणारी जी कॉंग्रेस संस्था ती सावरकरांना शत्रुवत् वाटते. सावरकर मागें एकदां म्हणाले होते कीं, तीन पावलांनीं विश्व व्यापणाऱ्या वामनाचा जर मीं अवतार घेतला, तर पहिलें पाऊल कॉंग्रेसच्या डोक्यावर टाकीन, दुसरें पाऊल मुसलमानांच्या डोक्यावर व तिसरें पाऊल ब्रिटिशांच्या डोक्यावर टाकीन! म्हणजे ब्रिटिश सिंहाला एक वेळ गदगदा हलवणारे हे सावरकर आज ब्रिटिशांना बाजूला ठेवून कॉंग्रेसचा नाश करण्यासाठीं सिद्ध झालेले आहेत! आणि हा माणूस म्हणे 'स्वातंत्र्यवीर'! तात्यासाहेब केळकर म्हणतात कीं, सावरकर हे महाराष्ट्राच्या नशिबानें लाभलेले एक अद्वितीय पुढारी आहेत! सावरकर कोणाचे पुढारी आहेत? सावरकरांच्या मागें कामकरी नाहींत, मजूर नाहींत, हरिजन नाहींत, ब्राह्मणेतर नाहींत वा बहुजनसमाज नाहीं! सावरकरांच्या मागें कोणी असलेच तर भिक्षुकी वृत्तीचे मूठभर ब्राह्मण अन् ब्रिटिश राज्य टिकवण्यास उत्सुक असलेले सरकारजमा पेन्शनर आणि लाठी घेऊन लांड्या विजारीमध्यें गांवांत हिंडणारीं त्यांचीं पोरें! म्हणूनच आम्ही म्हणतों, कीं सावरकर हे महाराष्ट्राचे पुढारी नसून मूठभर ब्राह्मणांचे पुढारी आहेत! तात्यासाहेब केळकर म्हणतात, सावरकरांच्या व्याख्यानाला गांधींच्या व्याख्यानापेक्षां जास्त गर्दी जमते!' नुसती गर्दीचीच बाब घेतली तर केडगांवच्या नारायणमहाराजांना पाहण्यासाठीं लाखों लोकांची गर्दी जमू शकते! 'हिंदुत्वा'च्या नांवावर लाखों देवभोळे आणि दुबळे लोक ह्या देशाच्या दुर्दैवानें एकत्र जमूं शकतात! पण ती कांहीं अभिमान बाळगण्यासारखी बाब नाहीं. सगळयांत चीड आणण्यासारखी अत्यंत खोटी गोष्ट केळकरांनीं सावरकरांच्या माथ्यावर मारली ती ही कीं, सावरकर म्हणे टिळकांचे अनुयायी आहेत! जे लोकमान्य हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यासाठीं मुसलमानांना 'कोरी हुंडी' द्यावयापर्यंत सिद्ध झाले, ज्या लोकमान्यांनीं कॉंग्रेसचें संवर्धन आणि संगोपन करून ती हिंदुस्थानांतील एकमेव बलिष्ठ राजकीय संस्था

करण्याचा प्रयत्न केला त्या लोकमान्यांची राष्ट्रीय चळवळ आज सावरकर पुढें चालवितात असें म्हणणें म्हणजे लोकमान्यांची निवळ बदनामी आहे! कॉंग्रेसची बदनामी केळकरांना काय करावयाची असेल ती त्यांनीं खुशाल करावी, पण निदान त्यांनीं लोकमान्यांच्या पवित्र परंपरेला डांबर फासण्याचा तरी प्रयत्न करूं नये!

---

# स्वातंत्र्यवीर का स्वातंत्र्याचे शत्रु    २९

## [ केळकरप्रणीत गांधी-सावरकर तुलना ]

गांधीजी आणि सावरकर ह्यांची तुलना करण्याचा हास्यास्पद पोरकटपणा श्री. तात्यासाहेब केळकरांनीं 'केसरी'मध्यें केला ह्याची माहिती गेल्या अंकांत मीं माझ्या वाचकांना दिलेलीच आहे.

तात्यासाहेब म्हणतात कीं, कॉंग्रेसवाल्यांनीं शिव्या देण्यासारखें असें सावरकर कांहींच बोलत नाहींत. सावरकर आणि कॉंग्रेस ह्यांचा दृष्टिकोण मूलतःच कसा भिन्न आहे हें आपण पाहूं. हिंदु समाजाचें संरक्षण करणें हें हिंदूनें आपलें कर्तव्य समजावें. ह्या सावरकरांच्या म्हणण्याशीं कोणत्याहि कॉंग्रेसजनाचा मतभेद असण्याचें कारण नाहीं. पण हिंदु आणि मुसलमान ही ह्या देशांतील दोन राष्ट्रें आहेत, आणि हीं दोन राष्ट्रें मिळून ह्या देशांत एक राज्य (स्टेट) झालें पाहिजे, ही 'सावरकरी' कल्पना हिंदुस्थानच्या राष्ट्रीय ऐक्यास नि स्वातंत्र्यप्राप्तीस अत्यंत विघातक आहे. हिंदु लोक हिंदुस्थानांत जरी बहुसंख्याक असले तरी ह्या देशांत त्यांचें स्वतंत्र राष्ट्र आहे असें मानणें चुकीचें आहे. ह्या अवाढव्य देशांत सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांची इतकी सरमिसळ

झालेली आहे, कीं धर्मवाचक गटांच्या नांवाखालीं त्यांना वेगळे निवडून काढणें हें अशक्य आहे; आणि ही गोष्ट अराष्ट्रीय पण आहे. हिंदु आणि मुसलमान लोक ह्या देशांत निरनिराळ्या गटांनीं राहत नाहींत, दोघांचे आर्थिक, सामाजिक, व्यावसायिक हितसंबंध एकमेकांशीं शेंकडों वर्षें निगडित झालेले आहेत. दोघांचीहि संस्कृति जिनासाहेब म्हणतात तितकी भिन्न नाहीं. दोघांच्याहि भाषा, दोघांचेहि इतिहास, दोघांचेंहि भवितव्य परस्परावलंबी आहे. अशी परिस्थिति असतांना ह्या दोन जमातींमध्यें अधिकाधिक ऐक्य साधणें ह्यांतच राष्ट्राचें अंतिम कल्याण आहे. हिंदु आणि मुसलमान ह्यांचे वैयक्तिक धर्म कांहींहि असले तरी त्यांचा 'राष्ट्रधर्म' एकच आहे. दोघांच्या भूतकालीन वैमनस्यामुळें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य गमावलें, आणि आजहि दोघांमधील गैरसमजामुळें देशाचें स्वातंत्र्य दुरावत आहे. ज्या मार्गानें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य गेलें, त्या मार्गानेंच तें परत येणार आहे आणि तो मार्ग म्हणजे हिंदु-मुसलमानांचें ऐक्य ( अर्थातच यांत इतर सर्व धर्मांच्या ऐक्याचा आम्ही समावेश करतों ) हा एकच होय. मुसलमानांचें स्वतंत्र पाकिस्तान कल्पिणारे जीना किंवा हिंदु-मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत असें मानणारे सावरकर, हे दोघेहि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे शत्रु आहेत! दोघेहि अप्रत्यक्षपणें ब्रिटिशांची ह्या देशावरील सत्ता व राज्य कायम ठेवण्यास साहाय्य करीत आहेत. हिंदु नि मुसलमान ह्यांचें ऐक्य झालें तर परकी सत्ता ह्या देशांत एक क्षणभरहि राहणार नाहीं हा कॉंग्रेसचा दृष्टिकोण आहे. परकी सत्ता जर ह्या देशांतून गेली तर हिंदु लोक आपल्यावर राज्य करतील असें जीनांना भय वाटतें; आणि मुसलमान लोक आपल्यावर अत्याचार करतील असें सावरकरांना भय वाटतें. त्यापेक्षां आपण आधींपासूनच स्वतंत्र झालेले बरे, असा आत्मसंरक्षणाचा अत्यंत आकुंचित आणि स्वार्थी दृष्टिकोण ह्या दोघांचाहि आहे, दोघांनाहि आपापल्या धर्मीयांसाठीं 'स्वातंत्र्य' पाहिजे आहे. पण मुसलमानांचें वेगळें पाकिस्तान झालें किंवा हिंदूंचें निराळें 'राष्ट्र' जर स्थापन झालें तर ह्या 'पाकिस्ताना'ला वा ह्या 'हिंदुस्थाना'ला मिळणार असणारें स्वातंत्र्य हें हिंदुमुसलमानांच्या ऐक्यामुळें अखिल भारताला प्राप्त होणाऱ्या खऱ्याखुऱ्या नि निर्भेळ स्वातंत्र्यापेक्षां किती तरी हिणकस ठरेल ह्याची ह्या दोघांहि पुढाऱ्यांना कल्पना नसावी ही दुःखाची

गोष्ट आहे! ब्रिटिशांची साम्राज्यशाही ह्या देशांतून जाऊन आपला देश संपूर्णतया स्वतंत्र झाला पाहिजे हें कॉंग्रेसचें ध्येय आहे, हिंदूंचें राष्ट्र (वा राज्य) ह्या देशांत स्थापन करण्याचें जें सावरकरांचें ध्येय आहे तें ह्या देशांतील ब्रिटिशांची सत्ता पर्यायानें दृढमूल करण्यास कारणीभूत होणारें असल्यानें ब्रिटिशांना कॉंग्रेसचें जेवढें आज भय वाटतें तेवढें सावरकरांचें भय ह्या क्षणाला त्यांना वाटत नाहीं. १९०८ च्या सावरकरांची खरोखरच भीति ब्रिटिशांना वाटत होती. कारण त्या वेळीं ते ब्रिटिश साम्राज्यशाहीचे शत्रु होते. निव्वळ हिंदूंसाठीं स्वातंत्र्य पाहिजे असल्याची भाषा त्या वेळीं ते बोलत नव्हते. 'माझा सबंध देश स्वतंत्र झाला पाहिजे, माझी मातृभूमि स्वतंत्र झाली पाहिजे, माझा अखिल भारतवर्ष स्वतंत्र झाला पाहिजे, अशा तेजस्वी घोषणा त्या वेळीं सावरकरांच्या तोंडून निनादत होत्या. त्या वेळीं सावरकर हे खरोखरच 'स्वातंत्र्यवीर' सावरकर होते. १९०८ चे सावरकर जर देशाला पुन्हा दिसतील तर 'स्वातंत्र्य वीर सावरकरां'च्या जयजयकारानें हा देश आसेतुहिमाचल दुमदुमून जाईल! पण आजचे सावरकर हे आतां 'स्वातंत्र्यवीर' राहिलेले नाहींत. त्यांना कॉंग्रेसचा जितका मनापासून द्वेष वाटतो, कॉंग्रेस हें नांव निघाल्याबरोबर त्यांच्या तळपायाची आग जितकी झपाट्यानें त्यांच्या मस्तकांत जाऊन पोंहोचते, तितका द्वेष, तितका संताप, त्यांना परकीय साम्राज्यशाही सत्तेबद्दल आज वाटत नाहीं. सरकारशीं सहकार्य करण्याची भाषा आज ते उघड उघड बोलतात, आणि सरकार देशांत अनंत काळ राहील असलें राजकारण लढविण्यांत आज ते गुंतले आहेत; **म्हणून आम्हांला ते आज 'स्वातंत्र्यवीर' वाटत नाहींत, किंबहुना आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे शत्रु आहेत असेंच मोठ्या दुःखानें आम्हांला म्हणावें लागतें.**

तात्यासाहेब म्हणतात कीं, 'नेमस्त वा कॉंग्रेसवाले ह्यांच्या तोंडून मुसलमानांना जे शब्द कधीं ऐकूं आले नाहींत ते सावरकर उच्चारतात!' हा तात्यांचा मुद्दा अजब आहे! मुसलमानांना शिव्या देण्यांत अभिमानाची गोष्ट काय आहे? आज शेंकडों वर्षें आम्ही हिंदुमुसलमान एकमेकांना अर्वाच्य शिव्या देत आलों नाहीं काय? एकमेकांना शिव्या देत आलोंत म्हणूनच आम्हांला ही परकीयांची गुलामगिरी पत्करावी लागली! मुसलमानांना जितक्या 'इरेसरी'नें सावरकर आज शिव्या देत आहेत, तितक्या त्वेषानें

शिव्या ते आज दास्याला वा गुलामगिरीला देत नाहींत हेंच देशाचें दुर्भाग्य आहे! १९०८ सालचे सावरकर 'शेणामाजी बांधुनि वाडे नांदति शेणाकिडे!' असे जळजळीत शाप सरकारी नोकरींत रमलेल्या स्वातंत्र्यशत्रूंना देत असत, ही आमची आठवण अद्यापि बुजलेली नाहीं! मुसलमानांबद्दल वाटेल तें बोलण्याचें आम्हांला कारण काय? आमचें स्वातंत्र्य मुसलमानांनीं हिरावून नेलेलें नाहीं! दोघेहि आज एका देशामध्यें, एका घरामध्यें 'दुसऱ्याचे गुलाम' आहोंत! ज्यांनीं आमचें स्वातंत्र्य आमच्यापासून हिसकून घेतलें त्यांच्याशीं आम्हांला लढावयाचें आहे, त्यांना पाहिजे तर आम्ही शिव्या देऊं! दोन गुलामांनीं वा दोन भिकाऱ्यांनीं एकमेकांना शिव्या देण्यांत हशील काय? सावरकर म्हणतात, "वेळ पडली तर आम्ही हिंदु, इंग्रजांशीं आणि मुसलमानांशीं लढून स्वातंत्र्य मिळवूं!" सावरकरांच्या ह्या निव्वळ राणा भीमदेवी छापाच्या नाटकी वल्गना आहेत! ज्याला गेल्या हजार वर्षांचा हिंदूंचा इतिहास माहिती आहे, बाहेरून आलेल्या प्रत्येक परकीय सत्तेनें एतद्देशीय हिंदूवर राज्य केलें आहे ही गोष्ट ज्यांना अवगत आहे, त्यांना सावरकरांच्या वल्गना हास्यास्पद वाटल्याखेरीज राहणार नाहींत. आम्ही निःशस्त्र झाल्यामुळें तेजोहीन, दुर्बल झालों ह्याबद्दल सावरकरांइतकाच आम्हांलाहि त्वेष वाटतो. पण त्या दुबळेपणाचा वचपा नुसत्या कोरड्या वल्गना करून कसा निघणार? आपल्या सामर्थ्याच्या आणि साधनाच्या मर्यादा ओळखणें ह्यांतच खरा मोठेपणा आहे. सशस्त्र युद्धाच्या मार्गानें कोणत्याहि राष्ट्राला ह्यापुढें स्वातंत्र्य मिळवितां यावयाचें नाहीं. थोडा वेळ मिळालें असें वाटलें तर तें फार वेळ टिकूं शकणार नाहीं, हा धडा चालू महायुद्धानें आपल्याला शिकविलेला आहे. "उद्यां स्वराज्यप्राप्तीसाठीं सशस्त्र युद्ध सुरू झालें तर त्यांतला पहिला पाइक मी होईन." ही सावरकरी घोषणाहि अगदीं नाटकी आणि म्हणून हास्यास्पद आहे.

'उद्यां स्वराज्यप्राप्तीसाठीं सशस्त्र युद्ध सुरू झालें तर–' अशी 'जर-तारी' भाषा एखाद्या ज्योतिषाप्रमाणें सावरकर कां बोलतात हें आम्हांला कळत नाहीं. 'सशस्त्र युद्धा'चा मार्ग सावरकरांना जर मनापासून खरोखरच पसंत असेल तर त्या मार्गाचा त्यांनीं जाहीरपणें असंदिग्ध शब्दामध्यें पुरस्कार करावा किंवा त्या कल्पनांचा देशांत उघडपणें प्रचार करीत हिंडावें! "सैन्यांत जेथें

जागा सापडेल तेथें शिरा !" हा सध्यां ते करीत असलेला उपदेश तर उपर्युक्त स्वराज्याप्रीत्यर्थ सशस्त्र युद्धाचा त्यांचा प्रचार नसेल ना ? सैन्यांत शिरून स्वराज्य मिळविण्याचा सावरकरांचा शेखमहंमदी कट पाहिला म्हणजे त्यांच्या राजकारणविषयक अज्ञानाची कींव करावीशी वाटते ! मग आजपर्यंत 'पेन्शनर' लोक तरी काय, हेंच म्हणत होते ! 'सरकारी नोकरींत शिरा, सर्व सरकारी जागा पटकावा, म्हणजे आपलें राज्य झालें, स्वराज्य-स्वराज्य तें ह्यापेक्षां काय निराळें !' ह्या पेन्शनरी भावनेपेक्षां सैन्यांत शिरून स्वराज्य जिंकण्याची सावरकरी कल्पना ती कितीशी निराळी आहे ? 'सशस्त्र युद्ध सुरू झालें तर मी पहिला पाइक होईन !' हें सावरकरांचें म्हणणें आज बोलायला ठीक आहे ! १९०८ चे सावरकर असें छातीठोकपणें खास म्हणूं शकले असते, पण चोवीस तास एक शीख शरीरसंरक्षक घेऊन मगच बाहेर पडणाऱ्या १९४०-४१ च्या भेकड सावरकरांच्या तोंडीं मात्र ही भाषा कशीशीच दिसते !

'गांधी आणि सावरकर ह्या दोघांनीं बॅरिस्टरीचा काळा झगा अंगावर घेतला. पण गांधींनीं तो झगा घालून पैसे मिळवले आणि सावरकरांचा काळा झगा त्यांच्या प्रेताला गुंडाळावयाला उपयोगी पडतो कीं काय अशी परिस्थिति उत्पन्न झाली' अशी जी तात्यासाहेबांनीं दोघांमध्यें तुलना केली आहे ती अत्यंत कुत्सित आणि अधमवृत्तीची द्योतक आहे ! गांधींनीं बॅरिस्टरी करून पैसे मिळविले असले तरी ते सर्व राष्ट्रकार्याला अर्पण केलेले आहेत ! साउथ आफ्रिकेमध्यें ते बॅरिस्टरी करीत असतां हिंदी लोकांच्या हक्काचा प्रश्न हातांत घेऊन त्यांनीं आपणा स्वतःवर किती प्राणघातक संकटें ओढवून घेतलीं हा इतिहास तात्यासाहेबांना सांगावयाला पाहिजे असें नाहीं. आणि गेल्या वीस वर्षांत महात्माजींनीं राष्ट्रासाठीं आपले प्राण अनेक वेळां पणाला लावले आहेत ही गोष्ट जगजाहीर आहे ! फाशीं जाण्याचें संकट सावरकरांनीं फार झालें तर एक वेळा ओढवून घेतलें असेल, पण महात्माजींनीं आपल्या प्राणांवर अनेक वेळां पाणी सोडलेलें आहे ! (अर्थात् तात्यांनीं आपल्या प्राणाला अपाय होईल अशी एकहि गोष्ट अद्यापपर्यंत केलेली नाहीं ही गोष्ट निराळी !) तेव्हां कोण आपल्या प्राणावर किती उदार आहे हें एखाद्या तिऱ्हाईत उपऱ्यानें बोलण्याचें कारण नाहीं !

सावरकर नि गांधी ह्यांच्यामध्यें **एकच महत्त्वाचा फरक** आहे असें तात्या म्हणतात, तो फरक म्हणजे गांधीजींच्या मागें अनेक लखपति गुर्जर-मारवाडी अनुयायांचा परिवार आहे आणि सावरकरांच्या मागें कोरड्या सहानुभूतीनें पाहणारा फक्त दरिद्री महाराष्ट्रीय समाज आहे. तात्यांच्या मतें 'पैसा हाच चळवळीचा आधार आहे!' हें मत आम्हांलाहि सर्वस्वीं मान्य आहे. गायकवाडवाड्यामधील ज्या कांहीं चळवळी आज इतकीं वर्षे चालल्या आहेत त्यांना पैशाचा आधार आहे ही गोष्ट उघड आहे. गांधीजींना पैसे देण्यास क्रोडोपति सिद्ध आहेत ही गोष्ट खरी असली तरी, गांधीजींनीं आजपर्यंत जें जें केलें, जें जें साधलें, जें जें घडविलें आणि जें जें लढवलें तें केवळ पैशाच्या साहाय्यामुळें असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखें आहे. गांधीजींचें विलक्षण लोकोत्तर तत्त्वज्ञान, त्यांचें आत्मिक बल, त्यांचें तेजस्वी चारित्र्य, त्यांच्या विचासरणींतील आणि त्यांनीं उपयोगांत आणलेल्या साधनांमधील प्रभावी सामर्थ्य ह्यामुळें त्यांनीं देशाच्या स्वातंत्र्याचा लढा ह्या टप्प्यापर्यंत आणून सोडला! सावरकरांचें राजकारण जर खरेंखुरें राष्ट्रीय होईल, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा एखादा प्रभावशाली कार्यक्रम जर जनतेपुढें ते मांडू शकतील तर त्यांच्या गळ्यांत ह्याहीपेक्षां जास्त हार पडतील (इतकें कीं ते त्यांना मोजतांहि येणार नाहींत!) आणि त्यांच्यापुढें कोट्यवधि रुपयांचा ढीग पडेल! मग 'सावरकरांना पैसे द्या!' असा केविलवाणा हंबरडा 'केसरी'च्या स्तंभांतून फोडण्याची आपत्ति आमच्या थकलेल्या तात्या केळकरांच्यावर कधींहि येणार नाहीं! निव्वळ पैशानें राजकारण चालवितां येत नाहीं! गायकवाडवाड्यांतील माणसांना लो. टिळक एवढे 'फंड' ठेवून गेलेले आहेत, पण त्यामुळें देशाचें कोणतें प्रभावी राजकारण त्यांनीं चालवून दाखविलें? सावरकरांना दोन लक्षच रुपये पाहिजे असतील तर ते त्यांना एकट्या गायकवाडवाड्यांत मिळूं शकतील अशी आमची खात्री आहे!

सर्वांत शेवटची एक विनोदी गोष्ट सांगावयाची राहिली. श्री. तात्यासाहेब केळकर हे एक उत्कृष्ट विनोदी लेखक आहेत. पण त्यांनीं आजपर्यंत केला नसेल असा एक विनोद ह्या लेखामध्यें साधला आहे. ते म्हणतात, "हिंदु महासभे-प्रमाणें लोकशाही स्वराज्य पक्षहि सावरकर ह्यांच्यामुळें बळकटीला आलेला आहे!" लोकशाही स्वराज्य पक्षाचें सोवळेंभांडें तात्या उगाच एखाद्या लोचट

भिक्षुकाप्रमाणें सावरकरांच्या गळ्यांत अडकवीत आहेत ! खुद्द सावरकर देखील हा तात्यांचा विनोद ऐकून पोट धरधरून हसतील! जवाहरलाल नेहरूंनीं ज्या स्वरांत "लोकशाही स्वराज्य पक्ष ए क्या चीज है?" असें म्हणून पुण्यांत प्रचंड हशा पिकवला होता त्याच स्वरांत आम्हीं म्हणतों कीं, "कुठला लोकशाही स्वराज्य पक्ष अन् कुठली सावरकरामुळें त्याला आलेली बळकटी!"

---

# नारायणमहाराज बेटांतून पळाले ३०

कांहीं दिवसांपूर्वीं केडगांवचे सुप्रसिद्ध नारायणमहाराज हे एके दिवशीं त्यांच्या बेटांतून एकाएकीं अदृश्य झाले! जे नारायणमहाराज सांजसकाळ, तिन्ही त्रिकाळ, आपल्या असंख्य भक्तजनांच्या वर्तुळांत, आपल्या नैमित्तिक कृत्यांमध्यें गुंग असावयाचे—ते महाराज एकाएकीं नाहींसे झाले, कोणाला कांहीं एक न कळवितां नाहींसे झाले. कोठें गेले, कसे गेले, कशामध्यें गेले, कुणाबरोबर गेले, कोणत्या दिशेनें गेले—बहिर्दिशेला गेले का ऊर्ध्व दिशेला गेले— केव्हां परत येणार ह्यांपैकीं एकाहि गोष्टीची वाच्यता आपल्या एखाद्या निकटवर्ती कल्याण शिष्यापाशीं न करतां महाराज पसार झाले! ही बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतांच सर्व महाराष्ट्रभर पसरलेल्या महाराजांच्या असंख्य शिष्याशिष्यिणींना एखाद्या धरणीकंपाप्रमाणें जबरदस्त धक्का बसला! एवढेंच काय, पण नारायणमहाराजांचें सुतकसोयर ज्यांना नाहीं अशा तुमच्याआमच्यासारख्या शेंकडों पाखंडी लोकांनाहि मोठा अचंबा वाटला! नारायणमहाराजांच्या अस्तित्वाबद्दल जे आजपर्यंत उदासीन होते ते देखील कावराबावरा चेहरा करून एकमेकांच्या कानांत सांगूं लागले कीं,

"अहो, नारायणमहाराज नाहींसे झाले!" रस्त्यांत, घरांत, कचेरींत, आगगाडींत, नाटकगृहांत प्रत्येकजण भेटेल त्याला किंवा शेजारच्या माणसाला चिंतातुर मुद्रा करून सांगूं लागला, "अहो, नारायणमहाराज पळाले!" खुद्द नारायणमहाराजांच्या भक्तजनांमध्यें तर हाहाःकार उडाला! जेवतां जेवतां कोणी मूर्च्छित होऊन पडले! बसल्या जागेवरच कोणाचे डोळे पांढरे पडले! कोणी त्याच क्षणाला अन्नपाणी ग्रहण न करण्याच्या राणा भीमदेवी प्रतिज्ञा केल्या! नारायणमहाराजांच्या दर्शनाला निघालेले आगगाडींतील भाविक उतारू जेथें त्यांना बातमी कळली तेथपासून आपल्या कमनशिबावर हात मारून घेऊं लागले! शिष्यत्वापासून सावकारीपर्यंत म्हणून ज्यांचा ज्यांचा नारायणमहाराजांशीं आजपर्यंत संबंध आला असेल ती ती सारी मंडळी एकदम हवालदिल होऊन बसली! रामदासस्वामी लग्नसमारंभांतून एकदम पसार झाले त्या वेळीं इतका हाहाःकार झाला नसेल, दुसरे बाजीराव पेशवे अचानक पळून बेपत्ता होत त्या वेळीं देखील एवढें आश्चर्य लोकांना वाटत नसेल, किंवा अगदीं अलीकडचीं उदाहरणें घ्यावयाचीं झाल्यास हिटलरचा जानीदोस्त हर हेस ज्या वेळीं इंग्लंडमध्यें 'उडत' गेला तेव्हां जर्मन जनतेला जितका धक्का बसला नसेल, किंवा 'पुरोगामी ठोकळ्या'चे पुढारी सुभाषचंद्र बोस एकाएकीं अंतर्धान पावले त्या वेळीं अलम हिंदुस्थानांत जेवढी खळबळ उडाली नसेल तेवढा हाहाःकार, तेवढा धक्का आणि तेवढी खळबळ नारायणमहाराजांच्या ह्या अनपेक्षित पलायनामुळें उडाला, बसला आणि झाली!

नारायणमहाराज म्हणजे अवतारी साधुपुरुष! खुद्द परमेश्वराचे प्रेषित! अवधूत दिगंबर दत्तात्रेयाची पृथ्वीतलावरील साक्षात् प्रतिमाच! नारायण-महाराजांच्या अद्‌भुत सामर्थ्याच्या आणि दैवी चमत्काराच्या गोष्टी आम्ही काय सांगाव्यात! असा लोकोत्तर पुरुष मनांत आणील तेव्हां अदृश्य होऊं शकतो! तिन्ही लोकांत तो केव्हांहि अनिरुद्धपणें संचार करूं शकतो. म्हणून नारायणमहाराज जेव्हां अदृश्य झाले तेव्हां त्यांच्या भक्तजनांच्या मनामध्यें साहाजिकच असे विचार आले असतील कीं, भगवान् दत्तात्रेयाशीं कांहीं तरी आध्यात्मिक विषयावर चर्चा करावयाला तर महाराज परलोकामध्यें गेले नस-तील! का हिंदुस्थानावर सध्यां महागाई, दुष्काळ आणि अवर्षण हीं संकटें

आलेलीं आहेत, तीं तावडतोब नाहींशीं झालीं पाहिजेत, हिंदुस्थान हा आपल्या पूर्वींच्या नांवाप्रमाणें धनधान्यसंपन्न देश झाला पाहिजे असें आग्रहानें इंद्राला बजावण्यासाठीं ते इंद्रलोकीं तर गेले नसावेत! का युरोपमध्यें चाललेला राक्षसी मानवीसंहार पाहणें महाराजांच्या कोमळ मनाला असह्य झाल्यामुळें, रूझवेल्ट-चर्चिल त्यांची गुप्त मुलाखत जशी मध्य अटलांटिक महासागरांत कोठें तरी झाली, तशी कुठल्या तरी अज्ञात समुद्रांत हिटलरची मुलाखत घेऊन, 'आतां तावडतोब युद्ध थांबवतोस, का तुझ्यावर सुदर्शन चक्र सोडावयास भगवान् श्रीकृष्णाला सांगूं?' अशी धमकी त्याला देण्यासाठीं महाराज गेले असावेत? असे एक ना दोन, अनेक तर्क निरनिराळया भक्तांच्या मनांत येऊन, नारायण-महाराजांबद्दल त्यांना वाटणारा आदर सहस्रगुणित झाला असेल, तोंच कांहीं पाखंडी वृत्तपत्रांनीं बातमी छापून टाकली कीं, "महाराज कांहीं देण्या-घेण्याच्या भानगडींत आहेत. पैशाच्या कसल्या तरी व्यवहारांत सापडले आहेत, म्हणून एका मारवाड्याबरोबर ते आपल्या लहानशा मोटार गाडींत बसून मुंबईला पळाले आहेत. आणि सध्यां कोठें तरी बोरिवली-कांदिवलीच्या भागांत राहत आहेत!" अरेरे, काय ही भयंकर बातमी! नारायणमहाराजांचे सारे भक्तगण गिरसप्पाच्या धबधब्याप्रमाणें एकदम नऊशें फुटांवरून खालीं आदळले आणि त्यांच्या भाविकतेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या!

नारायणमहाराज आणि देण्यादेण्याच्या भानगडींत? नारायणमहाराजांना पैशाच्या व्यवहाराची चिंता! महाराज आणि अडचण; काळजी—काय हें? हें कालत्रयीं तरी शक्य असेल काय? ह्या ऐहिक व संसारांतील जीवनांतील सर्व चिंता आणि काळज्या नाहींशा करण्यासाठीं जेथें अखिल जगांतील मानवप्राणी महाराजांच्या चरणकमलांजवळ येतात, अनाथअपंग, दीनदुबळे, नाना तऱ्हेच्या आधींव्याधींनीं ग्रस्त असलेले शेंकडों लोक महाराजांच्या नुसत्या क्षणैक दर्शनानें मानसिक शांतीचा आस्वाद घेऊन समाधानानें परत जातात, जन्मोजन्मीचीं अनेक पातकें महाराजांच्या पदरजस्पर्शानें खाक होऊन जातात, एवढेंच नव्हे तर जन्ममरणाच्या दुःखमय फेऱ्यांतून आत्म्याची कायमची मुक्तता होण्याची 'गॅरंटी' ज्यांच्या गुरुमंत्रामुळें माणसाला लाभते, त्या नारायणमहाराजांना पैशाची काळजी?—छे, छे, हें शक्य नाहीं! हें कसें असूं शकेल! अगदीं म्हाताऱ्या भाविकालाहि मूल पाहिजे असेल तर तें महाराज देऊं शकतात!

कोणाला नोकरी पाहिजे असेल, कोणाला बढती पाहिजे असेल, कोणाला व्यापारांत एखादा सट्टा जिंकावयाचा असेल, कोणाला कौन्सिलच्या वा असेंब्लीच्या निवडणुकींत यश मिळवावयाचें असेल, तर ह्या साऱ्या इच्छा नारायणमहाराज पूर्ण करूं शकतात! असें जर आहे, तर खुद्द नारायणमहाराजांच्या स्वतःच्या अडचणी मिटवण्याइतकें दैवी सामर्थ्य त्यांच्याजवळ नाहीं ह्यावर कोणाचा विश्वास बसेल! झाकली मूठ उघडून जे महाराज तीर्थप्रसाद आणि फुलें एका निमिषार्धांत काढूं शकतात, त्या महाराजांना त्याच मुठींतून हजारों रुपयांच्या 'करन्सी नोटा' काढतां येणार नाहींत काय? महाराज पैशाच्या अडचणींत आहेत ही गोष्ट स्वर्गांत भगवान् विष्णूंना कळली, तर कुबेराच्या स्वर्गांमधील बँकेवरील एक 'ब्लँक चेक' ते ताबडतोब महाराजांना पाठवून दिल्याशिवाय कसे राहतील? महाराज पैशाच्या व्यवहाराच्या भानगडींत सापडले आहेत ही गोष्ट जगन्माता लक्ष्मीला कळली तर, आपल्या गळयांतील एखादी पृथ्वीमोलाची रत्नमाला ती अचानक केडगांव बेटावर फेकून दिल्याविना कशी राहिली असती? अरेरे, महाराज पैशाच्या भानगडीमुळें एका मारवाड्यावरोबर मुंबईला पसार झाले ही ह्या पृथ्वीतलावरच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेली बातमी अद्यापि स्वर्गांमधील देवादिकांनीं वाचलेली दिसत नाहीं! का पुण्याचीं वृत्तपत्रें जशीं मुंबईला मिळत नाहींत, किंवा मुंबईचीं वृत्तपत्रें जशीं पुण्याला दिसत नाहींत, तशीं स्वर्गीय वृत्तपत्रें आमच्याकडे येत नसावींत किंवा आमचीं स्वर्गांमध्यें जात नसावींत! सगळया जगाच्या इत्थंभूत बातमीचें 'रेकॉर्ड' स्वर्गांत ठेवणारा तो परमेश्वराचा सी. आय. डी. खात्याचा डायरेक्टर चित्रगुप्त ह्या वेळीं अमृताचे डोस चढविल्यामुळें धुंद झाला आहे काय? कांहींहि असो, पृथ्वीवरील परमेश्वराची एजन्सी चालविणाऱ्या नारायणमहाराजांना स्वतःच्या संकटकालीं मात्र परमेश्वराऐवजीं एक मारवाडीच उपयोगी पडला असें दिसतें! बरोबर आहे, संकटकालीं कोणकोणाचें असतें! परमेश्वरानें तरी काय दुसऱ्याला साहाय्य करण्याचा मक्ता घेतला आहे? ज्याचें नशीब त्याच्याबरोबरच असतें! शेवटीं नारायणमहाराजांच्या मदतीसाठीं एक मारवाडीच धावून आला! धन्य तो मारवाडी, धन्य ते पैशाचे व्यवहार, कीं लाखों भक्तांनाहि दुर्भिळ असणारे नारायणमहाराज, ज्या पैशाच्या व्यवहारामुळें एका मारवाड्याच्या गळयांत हात घालून मुंबईला गुपचिपपणें पसार होऊं शकतात!

बाकी, एवढें मात्र खरें, नारायणमहाराजांचे इतर भक्त स्वर्गाला जावोत वा न जावोत, त्यांना मोक्ष लाभो वा न लाभो, पण महाराजांच्या संगतीचें पुण्य मिळवणारा तो महाभाग महात्मा मारवाडी मात्र आतां स्वर्गांत बालाजीच्या मांडीला मांडी लावून बसणार!

महाराज अद्यापि केडगांवला परत आले नाहींत! महाराजांचे बेटामधील व्यवहार पूर्वींच्याच यांत्रिक नियमितपणानें चाललेले आहेत. बेटामधील त्यांचा भक्तगण त्यांची प्रतिमा समोर ठेवून व्याकुळ अंतःकरणांनीं त्यांचें चिंतन करीत बसलेला आहे! महाराजांच्या बेटांत तीन दिवस राहून पंचपक्वान्नांवर ताव मारणारे भुकेबंगाल भाविकजन त्यांची आठवण करीत, आणि डोळ्यांतून आंसवें ढाळीत अन्नावर ताव मारतातच आहेत! हिंदुस्थानच्या निरनिराळ्या विभागांतील महाराजांच्या धनिक नि व्यापारी भक्तांकडून नियमितपणें मनिऑर्डरी आणि धान्याच्या गोण्या येतच आहेत! तथापि खुद्द महाराज हजर नसल्यामुळें भक्तगणाची फारच पंचाईत झालेली आहे असें म्हणतात! दागिने किंवा जमिनी, वा घरें महाराजांकडे गहाण ठेवून कर्ज काढण्यासाठीं येणारे शेंकडों भक्त महाराज नसल्यामुळें हवालदिल होऊन कपाळाला हात लावून बसलेले आहेत! स्वतःचे दागदागिने आणि पैसे घेऊन महाराजांच्या सेवेला येऊन बसलेल्या श्रीमंत कुळांतील कांहीं विधवा, खुनाच्या खटल्यांत झालेली शिक्षा भोगून परत आल्यानंतर उरलेलें आयुष्य महाराजांच्या सान्निध्यांत व्याजबट्टा करीत कंठणारे कांहीं आत्मे, राजकुलांत जन्म होऊनहि 'मोक्ष'प्राप्तीसाठीं जे आपल्या वैभवावर नि संपत्तीवर लाथ मारून महाराजांच्या पायांपाशीं येऊन बसलेले कांहीं भाऊसाहेब महाराजांच्या गैरहजेरीमुळें अत्यंत व्याकुळ झालेले आहेत! आठवड्याच्या इतर दिवशीं इराण्याच्या हॉटेलांत मुरगी-पुलाव्यावर ताव मारणारे आणि 'वीक एंड'ला केडगांवला जाऊन जानवें-सोवळें घालून महाराजांच्या पुढें डोळे मिटून बसणारे पुण्यांतील कांहीं डॉक्टर आणि वकील, आतां यापुढें 'वीक-एंड'ला कोठें जावें ह्या चिंतेंत पडले आहेत? अरेरे, काय ही विधिघटना! तिकडे केडगांव बेटांत श्रीदत्तात्रेयाच्या नांवाचा प्रचंड गजर चालला असतां, इकडे मुंबईला एका मारवाड्याजवळ महाराज हिशेबाच्या वह्या चाळीत बसलेले असावेत! तिकडे हजारों भाविक महाराजांच्या नांवानें आक्रोश करीत बसले असतांना, इकडे खुद्द महाराजांना एका मारवाड्याच्या समोर

पैपैसाठीं आक्रोश करीत बसण्याची पाळी यावी! ह्याला म्हणतात पूर्वजन्मीचें संचित! आमची अशी खात्री आहे, कीं ज्या देण्याघेण्याचे हिशेब मिटवण्यासाठीं महाराज मुंबईला त्या मारवाड्याबरोबर आलेले आहेत, हें महाराजांचें देणेंघेणें ह्या जन्मीचें नसलें पाहिजे! कोठल्या तरी मागील जन्मांत महाराज हे ऋणको नि तो मारवाडी धनको असला पाहिजे खास! तें मागील जन्मीचें देणें सव्याज मिटविण्यासाठींच महाराजांनीं एवढा त्रास घेतला असावा! खरोखर, धन्य ते महाराज, कीं जे पूर्वजन्मीचें देणें सव्याज देण्याइतकें औदार्य दाखवूं शकतात! नाहीं तर आमच्यासारखे पापी लोक--! अहो, कालचें देणें आज कबूल करण्याइतका देखील भलेपणा आमच्यांत नाहीं—!

---

# नारायणमहाराज बुवा का सावकार? ३१

गेल्या अंकांतील नारायणबुवा केडगांवकर ह्यांच्यावरील मजकूर आम्हीं लिहिल्यानंतर श्री. पंडित नांवाच्या पुण्यांतील एका सेवानिवृत्त न्यायाधीशानीं आपण पूर्वीं कर्जाऊ दिलेले पांच हजार रुपये ठरलेल्या मुदतीनें सव्याज परत दिले नाहींत, म्हणून नारायणबुवावर पुण्याच्या कोर्टांत मुकादमा दाखल केल्याची बातमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेली वाचावयाला मिळाली. नारायणबुवाच्या दैवी कीर्तीवर हा भयंकर आघात आहे असें म्हणावयाला पाहिजे. आमची बहुतेक अशी निश्चिति आहे कीं श्री. पंडित हे नारायणबुवाचे पूर्वींचे भक्त असले पाहिजेत. श्री. पंडित ह्यांनीं पूर्वीं केडगांवच्या नित्यनियमानें वाऱ्या केल्या असल्या पाहिजेत. नारायणबुवांनीं कांहीं वर्षांपूर्वीं जे प्रचंड सत्यनारायण साजरे केले त्या सत्यनारायणाचा शिऱ्याचा प्रसाद श्री. पंडित ह्यांनीं बहुतेक खाल्लेला असावा. एवंच, नारायणबुवा आणि पंडित ह्यांचा गुरु-शिष्य ह्या नात्यानेंच संबंध आलेला असावा. असें असतां श्री. पंडित ह्यांनीं आपण गुरूंना ५००० रु. कर्ज द्यावें आणि स्वतःला धनको बनवून आपल्या गुरूला ऋणको बनवावें आणि अखेर गुरुमहाराजांनीं पैसे दिले नाहींत म्हणून त्यांना

कोर्टांत खेचावें हें गुरु-शिष्य भक्तीच्या पारमार्थिक स्वरूपाचें अत्यंत व्यापारी अर्थात् व्यवहारी विडंबन आहे असें म्हणावयाला पाहिजे. आपल्या एक वेळच्या गुरूवर आतां फिर्याद करण्यास सिद्ध झालेल्या श्री. पंडित ह्यांच्या मनांत आतां आपल्या गुरूंच्या तथाकथित दैवी सामर्थ्याबद्दल कितपत आदर-भाव असला पाहिजे हें उघड आहे. नारायणबुवा हे जर कोणी खरोखरच अत्यंत लोकोत्तर व अद्भुत पुरुष असते, नारायणबुवा हे जर खरोखरच श्रीदत्तात्रेयाचे पृथ्वीवरील अवतार असते, नारायणबुवा हे जर खरोखरच परमेश्वराचे ह्या जगामधील 'अधिकृत एजंट' असते, तर त्यांना पांच हजार रुपयांची गरज कदापिहि लागली नसती, आणि जरी लागली असती अशी आपण क्षणभर कल्पना केली, तरी श्री. पंडित ह्यांनीं हे पांच हजार रुपये नारायणबुवांना कर्ज म्हणून न देतां दक्षिणा म्हणून दिले असते, म्हणजे आज कोर्टांत नारायणबुवावर जाहीरपणें फिर्याद करण्यास ते कधींहि पुढें आले नसते.

ह्यावरून ही गोष्ट उघड आहे कीं, अगदीं आरंभापासून जरी श्री. पंडित हे नारायणमहाराजांचे शिष्य म्हणून केडगांवला वाऱ्या करीत असले, आणि बाह्यात्कारी जरी त्यांनीं नारायणबुवाच्या शिष्यत्वाचीं बिरुदें मिरविलीं असलीं तरी नारायणबुवाच्या माहात्म्याबद्दल त्यांचा गैरसमज केव्हांहि झालेला नव्हता. नारायणबुवाच्या सत्यस्वरूपाची त्यांना आरंभापासून अगदीं पुरेपूर कल्पना आलेली होती. मोक्षाची वाट पुसण्यासाठीं श्री. पंडित हे नारायणमहाराजाकडे गेलेले नसून सरकारी नोकरींत मिळविलेला पैसा अत्यंत सुरक्षितपणें आणि परमेश्वरभक्ति करतां करतां व्याजानें गुंतवण्यासाठीं त्यांना केडगांवची पेढी फारच सोईस्कर वाटली असावी; म्हणूनच ते तेथें 'गुरुमाउली'च्या चरणांपाशीं गेलेले असावेत. श्री. पंडित ह्यांचें उदाहरण वैयक्तिक म्हणून आम्ही देत नाहीं. केडगांवला नारायणबुवाकडे जाणारे बहुतेक सर्व भक्त श्री. पंडित यांच्याच मालिकेंत बसण्यासारखे आहेत. महाराष्ट्रांत आजपर्यंत नाना तऱ्हेचे जे बुवा होऊन गेले आणि अद्यापि आहेत, त्यांच्या त्यांच्यापैकीं प्रत्येकाचें कांहीं तरी वैशिष्ट्य ठरून बसलेलें आहे. 'ब्रह्म तेथें माया ! झाड तेथें छाया ! आणि बुवा तेथें बाया !' ह्या नियमाप्रमाणें कांहीं बुवांचा डोळा आपल्या-भोंवतीं जमलेल्या भक्तिणींवर आणि शिष्यिणींवर असतो. बायाबाजी करणारे

महाराष्ट्रांतील बुवा कोणकोणते आहेत ह्याची माहिती 'किर्लोस्कर' मासिकानें आणि 'विविधवृत्ता'नें ह्यापूर्वी महाराष्ट्रीय जनतेला दिलेलीच आहे. नारायण-बुवाचा अवतार ह्यापेक्षां निराळा आहे. बायाबाजीबद्दल त्यांची विशेष ख्याति असलेली ऐकिवांत नाहीं. तथापि आपल्या बुवाबाजीच्या बुरख्याआड दडून आपल्या भक्तभक्तिणींशीं व्याजबट्टा मिळवण्यासाठीं सावकारी करण्याचा त्यांना विलक्षण नाद आहे ही गोष्ट आम्हांला पुष्कळ वर्षे माहीत आहे. नारायणमहाराजांच्या परमेश्वरी सामर्थ्याच्या मसालेदार गोष्टी ऐकून शेंकडों मूर्ख लोक केडगांवला जमा होतात. कोणाला मूल पाहिजे असतें, कोणाला नोकरी पाहिजे असते, कोणाला आरोग्य पाहिजे असतें, कोणाला सांसारिक समाधान पाहिजें असतें, अशा अनेक कारणांसाठीं गरजू भाविकांची गर्दी केडगांवास एकसारखी जमत असते. कांहीं कांहीं एक ना दोन भाविक तीन दिवसांचे 'टेंपरवारी' रहिवासी असतात. तर कांहीं कांहीं दर महिन्याला, दर आठ-वड्याला नियमानें येणारे भाविक असतात. ह्या भाविकांमधील डबोलेवाले, पैसेवाले, जमीनजुम्लावाले भक्त कोणते हे नारायणबुवा आणि त्यांची साथी-दार मंडळी ह्यांना हेरून ठेवण्यास फारसा वेळ लागत नाहीं. आणि अशी मंडळी एकदां टेहळून ठेवली कीं, त्यांच्याशीं विशेष सलगी करणें, त्यांना 'सेवे'-साठीं आपल्या 'चरणां'पाशीं वारंवार बोलावणें, त्यांना आपल्या 'खास' शिष्य-वर्तुळांत समाविष्ट करणें, आणि अशा तऱ्हेनें त्या त्या लोकांशीं उत्तम तऱ्हेनें 'घसट' जमल्यानंतर मग त्यांच्याबरोबर हलके हलके आर्थिक व्यवहार सुरू करणें ही नारायणबुवाच्या बुवाबाजीमधील 'ग्यानबाची मेख' आहे.

केडगांवला प्रत्यहीं जमणाऱ्या शेंकडों देवभोळ्या अडाणी भाविकांना नारायणमहाराजांच्या बुवाबाजीचें हें भांडवलशाही स्वरूप सहजासहजीं लक्षांत येत नाहीं. श्रीदत्तात्रेयाच्या मंदिराचें तें श्रीमंती वैभव, तो भव्य मंडप, त्या आजूबाजूच्या सुंदर इमारती, राहण्याची आणि भोजनाची उत्तम व्यवस्था, ह्या थाटामाटानें भाबडे भाविक लोक भांबावून जातात. नारायणमहाराजांच्या ईश्वरी (!!) अलौकिकत्वावर त्यांचा खरोखरच विश्वास बसतो. हिऱ्याच्या गुंड्या असलेला रेशमी शर्ट घालून 'परमेश्वरा'च्या नांवाचा जय करीत असलेल्या नारायणबुवाचें तें राजविलासी सोंग पाहून नाटकांतील 'राजा' पाहिल्यावर प्रेक्षकांचे डोळे जसे दिपतात, तशा भाविकांच्या वृत्ति विस्मयानें दिपून जात

असतील ह्यांत नवल काय? तथापि नारायणमहाराज जय करतां करतां मनांतल्या मनांत गेल्या महिन्यांत मिळालेल्या व्याजाचा हिशेब करीत असतील किंवा पुढील महिन्यांत कोणाकडून किती येणें आहे ह्याची बेरीज स्वतः-च्या मनामध्यें ते घेत असतील, असा चुकून देखील संशय एखाद्या भक्ताच्या मनांत येत असेल काय? एवंच, नारायणबुवाचें केडगांवचें पीठ ही भाव-भक्तांची पेठ नसून ती एक व्याजबट्ट्याची सावकारी पेढी आहे! ह्या पेठेंत वैकुंठीला जाण्याचें पारमार्थिक व्यवहार होत नसून, घराच्या किंवा दागिन्याच्या तारणावर घेतलेल्या कर्जाच्या देण्याघेण्याचे ऐहिक व्यवहार होत असतात! म्हणून श्रीनारायणबुवा हे महाराज नाहींत किंवा 'बुवा' नाहींत. ते सर्व-सामान्य सावकाराप्रमाणें, मारवाड्याप्रमाणें किंवा पठाणाप्रमाणें सावकारी करणारे एक इसम आहेत. वास्तविक त्यांनीं आपल्या दत्तमंदिरावर 'नारायण-बुवा बँकर्स, केडगांव', अशी पाटी लावावयाला पाहिजे. मारवाड्याच्या दुकानांत ज्याप्रमाणें बालाजीची तसबीर असते, किंवा सावकाराच्या पेढीवर जसें एखादें रामपंचायतनाचें चित्र लावलेलें असतें, त्याप्रमाणें नारायणबुवांनीं आपल्या पेढीवर दत्तात्रेयाचें चित्र न लावतां दत्तात्रेयाच्या मंदिरांत आपली सावकारी पेढी उघडलेली आहे. त्यामध्यें अर्थात् दुहेरी फायदा आहे. दत्तात्रेयाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविक लोकांकडून दक्षिणाहि मिळते, आणि त्यांना दिलेल्या कर्जावर व्याजहि मिळतें. शिवाय आपल्या दैवी सामर्थ्याची पकड भाविक ऋणकोंच्या मनावर घट्टपणें बसली असल्यामुळें त्यांच्याकडून कर्ज बुडण्याचेंहि भय नसतें. त्यामुळें नारायणमहाराजांच्या सावकारीचें बस्तान इतर सावकारां-पेक्षां उत्तम तऱ्हेनें बसलेलें आहे आणि ह्या धंद्यांतली त्यांची किफायत ही फार मोठ्या प्रमाणावर होत असली पाहिजे. माहितीप्रमाणें बँकेमध्यें नारायण-बुवाची दोन-दोन तीन-तीन लाख रुपयांची रक्कम नेहमीं पडून असते. नारायणमहाराज हे प्रातीवरील कर देत आहेत कीं नाहीं हें आम्हांला माहीत नाहीं. बहुतेक देत असावे. पण जर देत नसले तर सरकारच्या इन्कमटॅक्स खात्यांतील अधिकाऱ्यांचें लक्ष आम्ही ह्या गोष्टीकडे मुद्दाम वेधू इच्छितों. नारायणबुवांनीं आजपर्यंत मिळविलेल्या उत्पन्नावर जर सरकारनें कर वसूल केला तर ही रक्कम सामान्यतः अंकगणिताच्या उदाहरणांमध्यें आढळून येणाऱ्या रकमेपेक्षां किती तरी पटींनीं जबर होईल ह्याविषयीं आम्हांला शंका वाटत

नाहीं. मजुरांच्या कष्टावर ऐदीपणानें जगणाऱ्या भांडवलदार मालकचाजीपेक्षां अडाणी जनतेच्या भोळया मूर्खपणावर सावकारी करणाऱ्या या भांडवलदार बुवाबाजीचें स्वरूप अत्यंत हिडीस आहे ह्यांत शंका नाहीं. म्हणून शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या व कामकऱ्यांच्या वतीनें सावकारांच्या आणि भांडवलदारांच्या विरुद्ध आज जो समाजांत लढा चाललेला आहे त्यांत अडाणी जनतेच्या बाजूनें असल्या व्याजपिपासू बुवांच्या विरुद्ध लढा चालविला पाहिजे. ह्या गोष्टीचाहि अंतर्भाव अवश्यमेव व्हावयाला पाहिजे असें आमचें मत आहे. वास्तविक पाहतां नारायणमहाराजांची सांपत्तिक स्थिति अतिशय उत्तम असतां ते पैशाच्या कांहीं व्यवहारामुळें अडचणींत येऊन मुंबईला पळून कां जातात किंवा त्यांचा एखादा भक्त पैशासाठीं त्यांच्यावर फिर्याद करण्यास कां सिद्ध होतो, ह्याचें कारण आम्हांला कळत नाहीं. यावरून अलीकडे नारायणबुवांना आंकड्याचें किंवा सट्टयाचें तर व्यसन लागलें नाहीं ना? असा संशय आमच्या मनामध्यें येतो! असेंच कांहीं तरी जबरदस्त कारण असल्याशिवाय नारायणबुवा एकाएकीं पैशाच्या अडचणींत आले आहेत ह्या गोष्टीवर आमचा विश्वास बसत नाहीं.

नारायणबुवावर गेल्या अंकांत आम्हीं पहिला लेख लिहिल्यावर मशारनिल्हे बुवांच्या किराणा व्यापार करणाऱ्या एका सत्‌शिष्याकडून आम्हांला अचकट विचकट शिव्यांनीं भरलेलें एक पत्र आलेलें आहे. नारायणबुवाच्या गुरुमंत्रामुळें म्हणा किंवा शिकवणुकीमुळें म्हणा, इरसाल शिव्या देण्याच्या कामांत बुवांचे शिष्य किती पटाईत झालेले आहेत ह्याचा आमच्याजवळ आतां लेखी पुरावा आहे. सदर शिष्योत्तमाच्या पत्रांतील शिव्यांचा भाग वजा केला तर त्याचें असें म्हणणें आहे कीं, नारायणमहाराज हे एक तुमच्या-आमच्यासारखेच प्रापंचिक मनुष्यप्राणी आहेत. तेव्हां सर्वसामान्य माणसांतले दोष बुवामहाराजांच्या अंगांत असल्यास नवल नाहीं! तेव्हां त्यांनीं कांहीं पैशाचे व्यवहार केलेले असले किंवा कांहीं पैशाच्या अडचणींत ते आले असले तर त्याबद्दल त्यांच्यावर आम्हीं तुटून पडण्याचें कांहींच कारण नाहीं! 'नारायणमहाराज तुमच्या-आमच्यासारखे सामान्य मनुष्यप्राणी आहेत' हें महाराजांचें शिष्यप्रणीत समर्थन म्हणजे निव्वळ ढोंगीपणाचें आहे! आज हजारों मूर्ख अडाणी लोक नारायणमहाराजांच्या पायांवर टाळकीं आपटण्यासाठीं केडगांवला जातात आणि महाराजहि आपले पाय भरपूर लांब

पसरून हे भक्तांचे आघात आपल्या चरणकमलावर सहन करतात ते कांहीं सामान्य प्रापंचिक मनुष्यप्राणी म्हणून नव्हत! नारायण नांवाचा हा इसम स्वतःच्या नांवामागें 'महाराज' ही उपाधि लावून आज इतकीं वर्षे भोळ्या अज्ञानी लोकांचा पै-पैसा नागवीत, केडगांवीं मुक्काम मांडून जो बसलेला आहे तो कांहीं 'सामान्य माणूस' म्हणून नव्हे! आपल्यांत कांहीं तरी दैवी सामर्थ्य आहे असें जगाला डांगोरा पिटून सांगावयाचें आणि हें दैवी सामर्थ्य जगाला पटवतां आलें नाहीं किंवा आपलें कांहीं तरी बेंड बाहेर फुटलें म्हणजे आम्ही काय, आम्ही अगदीं सामान्य मनुष्यप्राणी आहोंत, आम्हीं कधीं तुम्हांला सांगितलें होतें कीं, आमच्याजवळ दैवी सामर्थ्य आहे म्हणून! अशी वर साळसूद बतावणी करावयाची ही ह्या ढोंगी बुवांची आणि त्याच्या भोंदू शिष्यांची नेहमींचीच युक्ति आहे. कावळा बसणें आणि डहाळी मोडणें ह्या न्यायानें हातून कांहीं चमत्कार घडला तर हें पहा आमचें दैवी सामर्थ्य म्हणून जगापुढें पांचजन्य फुंकावयाचा, नाहींच कांहीं साधलें तर म्हणायचें कीं, आम्ही काय आपलीं सामान्य माणसें, तुम्हीच विनाकारण आमच्या मागें लागतां! असें हें बुवाबाजीच्या फसवणुकीचें दुतोंडी स्वरूप आहे. नारायणबुवांनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं आतां कितीहि लटपटपंची केली तरी, केडगांवचा हा नारायणबुवा हा केवळ बुवाबाजीचें ढोंग करून व्याजबट्टा करणारा एक सामान्य धनलोभी सावकार आहे ही गोष्ट आतां जगजाहीर झालेली आहे.

नारायणबुवांनीं जनतेच्या डोळ्यांत आजपर्यंत धूळ टाकून जनतेला फसविलेलें आहे, हजारों गरीब बायाबापड्यांना नागवून अन्नान्न करावयाला लाविलेलें आहे, शेंकडों विचारी आणि कर्तृत्ववान् माणसांना प्रज्ञाहत करून त्यांना आयुष्यांतून अजीबात उठविलेलें आहे, समाजांतील दुष्ट, घातकी, आणि लबाड लोकांना साळसूदपणें एकत्र जमवून समाजाला फसवायला ढोंगाचें ऐसपैस पांघरूण पुरविलेलें आहे! म्हणून नारायणबुवा हा एक समाजाचा भयंकर शत्रु आहे असें आम्ही समजतों! सदर नारायणबुवा हा महाराज नाहींच नाहीं, पण सामान्य माणुसकी देखील त्याच्या अंगांत नाहीं! आजपर्यंत त्यानें लाखों रुपये लोकांकडून लुबाडले पण त्यांतील एक पैदेखील त्यानें एखाद्या राष्ट्रीय, शैक्षणिक किंवा सामाजिक संस्थेला दिलेली

नाहीं. मेहेरबानांनीं ज्याप्रमाणें वेड्या लोकांसाठीं इस्पितळ उघडलें आहे त्याप्रमाणें ह्या नारायणबुवानें गरीबांसाठीं एखादें टोलेजंग इस्पितळ उघडलें असतें, तरी त्याच्या सार्वजनिक पापाचें कांहीं तरी परिमार्जन झालें असतें! पण तेवढें देखील सत्कृत्य त्याच्या हातून घडलें नाहीं. एखाद्या व्यक्तीला दुसऱ्यानें फसवलें तर तो इंडिअन पीनल कोडखालीं गुन्हा होतो. पण एखादा बुवा समाजांतील शेंकडों लोकांना राजरोसपणें वर्षानुवर्षे जरी फसवीत असला तरी, त्याला ठेचून काढणारा एखादा 'इंडिअन पीनल कोड' समाजाजवळ नसावा हें निव्वळ आमचें दुर्दैव होय! सुदैवानें नारायणबुवाचें सावकारी बिंग त्याच्याच कर्मानें आज बाहेर आलेलें आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन त्याच्या आतांपर्यंतच्या चरित्रांतली एकूण एक बेंडें फोडून बाहेर काढायला सध्यांची वेळ अतिशय उत्तम आहे. समाजाच्या हातावर काळपुरुष प्रगतीच्या उदकाची धार ओतीत असतांना, त्या झारीच्या तोंडींत येऊन बसणाऱ्या ह्या समाजघातक बुवाचे डोळे शुक्राचार्याप्रमाणें फोडून काढणें हीच आजच्या घटकेची सर्वांत मोठी समाजसुधारणा ठरणार आहे!

# ज्यांनीं मारलें ते मेले; मी अजून जिवंत आहे ३२

## मी पुण्यास कां गेलों ?

रविवार ता. २८ सप्टेंबर रोजीं सकाळीं पुणें येथें कै. माधवराव पटवर्धन ह्यांच्या स्मारकाच्या साहाय्यासाठीं कांहीं कविकवियत्रींचें काव्यगायन होण्याचें ठरलें होतें. त्या मंडळींत मी एक होतों. तेवढ्याचसाठीं मी पुण्यास जाणार होतों. एकदोन दिवस आधीं पुण्याहून सर परशुरामभाऊ कॉलेजमधील एक विद्यार्थी, श्री. रामदासी नांवाचे, मजकडे आले. 'कॉलेजच्या नियतकालिकाला नुकतीच पंचवीस वर्षें झालेलीं आहेत, त्याचा 'सिल्व्हर ज्युबिली' अंक-प्रकाशनाचा नि निबंधलेखकांना बक्षिसें देण्याचा समारंभ माझ्या अध्यक्षतेखालीं भरविण्याची संपादक मंडळाची इच्छा आहे, म्हणून मीं एखादा सोइस्कर दिवस त्यांना कळवावा' असें श्री. रामदासी ह्यांनीं मला सांगितलें. ही गोष्ट कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या परवानगीनें होत आहे ना? असें स्पष्टपणें श्री. रामदासी ह्यांना विचारलें. त्यांनीं सांगितलें, "अर्थातच!"

तेव्हां मी त्यांना म्हणालों, "मी रविवारीं सकाळच्या कार्यक्रमासाठीं पुण्याला येणारच आहे, तेव्हां दुपारींच हाहि कार्यक्रम उरकून घेऊं, म्हणजे मला पुण्याला येण्याची दगदग नको." रामदासी म्हणाले, 'फार उत्तम! मी आतां तारेनेंच कळवितों.' नंतर ते गेले. शनिवारीं दुपारीं माझें रामनारायण रुइया कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांपुढें व्याख्यान होतें. तें संपवून मी सायंकाळच्या गाडीनें पुण्यास गेलों. रात्रीं मला कांहीं मंडळी भेटली व त्यांनीं मला सांगितलें, "उद्यां सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें कांहीं तरी दंगल होणार आहे असें कळतें तरी तुम्हीं तेथें न गेलेलें बरें!" माझी प्रकृति बरी नव्हती. ताप येण्याचीं चिन्हें दिसत होतीं, तशा स्थितींत मीं त्या सर्वांना सांगितलें, "मग मला तेथें गेलेंच पाहिजे!" सकाळीं मी जास्तच आजारी झालों. ताप चांगलाच अंगांत वाढला. म्हणून मी सभेच्या चालकांना निरोप कळविला कीं, "मला कांहीं काव्यगायन करतां यावयाचें नाहीं. त्यानंतर मे. विठ्ठलराव घाटे आणि श्री. काकासाहेब लिमये हे मजकडे आले व निदान मीं सभागृहांत यावें आणि लोकांना स्वतः सांगावें असा त्यांनीं आग्रह धरला.

## कटाचा प्रारंभ प्रभात टॉकीजमध्यें

मी प्रभात 'टॉकीज'मध्यें गेलों. दोन कविता कशाबशा म्हटल्या आणि पडद्यामागें मित्रमंडळीमध्यें विश्रांति घेत बसलों तशी, बाह्यतः तरी माझ्याशीं मैत्री दाखवणारे, पण राजकारणांत माझ्याविरुद्ध असणारे एक-दोन लोक मजकडे आले नि मी दुपारीं कॉलेजमध्यें जाणार किंवा नाहीं म्हणून 'चिंतातुर चेहऱ्यानें' त्यांनीं चौकशी केली. त्याशिवाय दहा-पंधरा लोकांनीं मला तेथेंच सांगितलें कीं, आज दुपारीं कॉलेजमध्यें गडबड करण्याचा कांहीं मंडळींचा विचार आहे, म्हणून मीं सावध असावें. माझी त्या वेळची प्रकृति लक्षांत घेतां वास्तविक एरवीं मी दुपारीं सभेला जाण्याचें टाळलें असतें. पण सर्व मंडळींची ती 'चिंतातुरता' बघून मी चिडलों. "असें असेल तर काय वाटेल तें होवो, मी जाणारच जाणार!" असें मीं सर्वांना सांगितलें. श्री. रामदासी ह्यांना श्रोतृवृंदांतून बोलावून घेतलें. त्यांनीं मला कॉलेजच्या मासिका-च्या 'सिल्व्हर जुबिली'चा अंक दिला व जरूर येण्याबद्दल पुन्हा सांगितलें.

घरीं गेलों व आंघोळ, जेवण झाल्यानंतर साडेतीन वाजेपर्यंत मी विसांवा

घेत पडलों. त्यानंतर रा. चंद्रकुमार डांगे आले. त्यांनीं टॅक्सी बोलावली. ते आणि मी पावणे चारच्या सुमारास कॉलेजांत गेलों.

## प्रो. सत्तेगिरी आणि गडबडबाजी

कॉलेजच्या आवारांत शेंदोनशें मंडळी येत जात होती. गाडी पोर्चमधून एका दरवाजाकडे गेली. वर जाऊन प्रोफेसरांच्या कॉमनरूममध्यें मीं थोडा वेळ बसावें म्हणून मला वर नेण्यांत आलें. तेथें 'कॉमनरूम'ला कुलूप होतें. तेव्हां मी खालीं येऊन पोर्चच्या दारांत उभा राहिलों. तितक्यांत प्रो. सत्तेगिरी आले. त्यांना मीं सहज हसून विचारलें, "काय हो, आज कांहीं गडबड बिडबड आहे म्हणे!" प्रो. सत्तेगिरी म्हणाले, "त्यांत काय अर्थ आहे, शिवाय मी आहेच!" त्यावर मी म्हणालों, "चला, आतां वेळ कशाला घालवतां? मला बरं वाटत नाहीं. व्याख्यान उरकून टाकूं!" तेथेंच पाणी मागवून मी प्यालों व आम्ही दोघे लेडी रमाबाई हॉलमध्यें गेलों. मी जातांच नेहमीं-प्रमाणें टाळ्यांचा कडकडाट झाला. मी व सत्तेगिरी मध्यभागीं शेजारीं शेजारीं बसलों. सभागृहाचा तळमजला विद्यार्थ्यांनीं भरलेला होता. वरचा मजला बहुतेक मोकळा होता. डाव्या बाजूला पंचवीस-तीस विद्यार्थिनी होत्या. प्रो. सत्तेगिरींनीं मला विचारलें, 'कार्यक्रम कसा करावयाचा?' मीं 'तुमचें आधीं काय व्हावयाचें असेल तें होऊं द्या, माझें व्याख्यान शेवटीं ठेवा, असें सांगितलें. सुरुवातीला चार बक्षिसें द्यावयाचीं होतीं तीं मीं दोन विद्यार्थ्यांना दिलीं. दोन विद्यार्थिनी– कु. जोगळेकर नि. कु. देवधर ह्या आल्या नाहींत. नंतर श्री. रामदासी ह्यांनीं मला बोलण्यास विनंति केली. मी उठून उभा राहतांच सभागृहांतील सर्व श्रोत्यांनीं टाळ्या वाजवल्या. मात्र डाव्या बाजूच्या दोनतीनशें विद्यार्थ्यांनीं 'सावरकर की जय!' 'शेम–शेम' असा आरडा जोरांत सुरू केला. मी दीडएक मिनिट तसाच उभा राहिलों; व 'तुमचें होऊं द्या काय व्हायचें असेल तें! असें म्हणून खालीं बसलों. सत्तेगिरी उभे राहून कांहीं रागानें बोलले. पण पूर्वीची ओरड चालूंच होती. इतक्यांत आठ-दहा विद्यार्थी डाव्या बाजूच्या दरवाजानें व्यासपीठावर आले. त्यांपैकीं एकजण माझ्यासमोर येऊन म्हणाला, "तुम्ही सावरकरांबद्दल हें लिहितां तें काय म्हणून?" मी म्हणालों, "तूं मला विचारणारा कोण? तुझ्या

दरडावणीला मी काय भिणार आहे?" एवढ्या वेळांत पांचसहा कांदे व टोमॅटो उजव्या बाजूकडून जोरानें माझ्या रोखानें आले. त्यांपैकीं एक मीं झेलला देखील. इतक्यांत एक विद्यार्थी उजव्या बाजूनें पुढें येऊन ढोंगी आवाजांत मुलांना बजावून म्हणाला, "अरे ह्यांचें व्याख्यान शांतपणें ऐकून घ्या!" अर्थात् तें खुणेचें वाक्य होतें.

## कटाचा इशारा देण्यांत आला

एवढें होतें न होतें तोंच समोरून शेंदोनशें विद्यार्थ्यांची झुंड 'सावरकर की जय' अशी गर्जना करीत समोरून, मागून, सर्व बाजूंनीं माझ्या अंगावर चालून आली. सत्तेगिरी तेवढ्यांत कोणाला तरी शिव्या देत व्यासपीठावरून उतरून उजव्या बाजूनें कोठें नाहींसे झाले. ह्या सर्व गोष्टी एका क्षणार्धांत झाल्या. मी खुर्चीवर तसाच बसलों. तसें 'हाणा-मारा-बघतां काय?' अगदीं कौरव-पांडव युद्धांतील गर्जना करीत पन्नास विद्यार्थी एकदम माझ्यावर तुटून पडले. दहावीस मुलांनीं मला मागाहून खुर्चीवर आवळून धरलें आणि खुर्ची लवंडून मला खालीं पाडण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर मी एकदम उठलों, खालीं पडूं शकलों नाहीं. ह्या सुमारास हल्ला करणारे सर्व विद्यार्थी व्यासपीठावर चढले. त्यामुळें तें अरुंद व लांबलचक व्यासपीठ पार भरून गेलें. मला कोणत्याहि बाजूनें मागें-पुढें सरकण्यास जागा नव्हती. दीडशें एक विद्यार्थी माझ्यावर गुद्दे, बुक्या, चापट्या इत्यादि साधनांनीं निकराचा मारा करूं लागले. कांहीं मुलें खालीं सरपटून त्यांनीं माझे पाय दोन्ही बाजूंनीं ओढण्याचा प्रयत्न केला. तथापि, मीं कांहीं एक न करतां शांतपणें उभा होतों. कुणी मला पुढें ढकलत होते, कोणी मागें ओढीत होते. ह्यानंतर काठ्या, जोडे इत्यादि आयुधांचा माझ्यावर मारा होऊं लागला. कमरेवर, पाठीवर, खांद्यावर, गळ्यावर, पोटावर आणि बरगड्यांवर एकसारखे प्रहार होत होते. तथापि हल्ल्याचा सारा रोख माझ्या डोक्यावर होता. मला खालीं पाडून सर्वांनीं माझ्या अंगावर पडावयाचें आणि माझा निकाल लावायचा असा सर्वांचा 'खुनी हेतु' स्पष्टपणें मला कळला. श्रोतृवृंद शांत बसला असावा असें वाटतें. कोणी ओरडलें नाहीं—कोणीहि माझ्या मदतीला धावून आले नाहीं. दरवाजाच्या समोर क्षणैक मला प्रो. सोनोपंत दांडेकर ह्यांची मूर्ति

दिसली, पण त्यांनीं कोणत्याहि तऱ्हेची आरडाओरड केली नाहीं. पुढें ते मला दिसले नाहींत. ह्यानंतर त्या गर्दींतून माझ्या रोखानें पांचसहा इसम मजवर विशेष जोरानें प्रहार करूं लागले. ते कॉलेजबाहेरील गुंड असावेत असें मीं तात्काळ ओळखलें.

## प्रो. ओतूरकरांची साहाय्यी गर्जना

अशा मारामारीच्या गर्दींत मी कसाबसा व्यासपीठाच्या दरवाजापर्यंत पोंहोचलों. तेवढ्या सुमारांत प्रो. ओतुरकर गर्जना करीत विद्यार्थ्यांवर चालून आले! तथापि, त्यांच्यावरहि कांहींनीं हात टाकला आणि त्यांचा चष्मा उडतांना मला दिसला. माझ्या मदतीसाठीं तीनचार मंडळी आली, पण त्यांचा त्या गर्दींत टिकाव लागेना. नंतर मी दरवाजाच्या पायऱ्या उतरूं लागलों, तोंच एकानें माझा खादीचा कोट मागून अर्धा फाडला व डाव्या अंगाचा अर्धाभाग मागच्या मागेंच खेचून त्याचे तुकडे केले. उजव्या कोटार्धा-सह मी खालीं तिसऱ्या पायरीवर जसा आलों तसे मागल्या बाजूनें कोणी तरी सोड्याच्या बाटलीनें माझ्या डोक्यावर तीन चार तडाखे जोरानें मारले. एकानें ठेचलेला कांदा माझ्या उजव्या डोळ्यांत खुपसला. एकानें मागाहून तिखट फेकलें. तरीहि मी माझें बळ एकवटून पुढें चाललों व कॉलेजच्या पटांगणांत आलों. येथून कॉलेजच्या पोर्चमध्यें २०० पावलांचें अंतर असेल. कोणी मला 'तिकडे चला' म्हणाले. तेव्हां मी त्या दिशेनें जाऊं लागलों. इतक्यांत एका 'पहिलवानानें' मला टांग घालून खालीं पाडण्याचा प्रयत्न केला. मी खालीं धडपडलों. पण पुन्हा सावरून वर उठलों. येथून पोर्चपर्यंत जाईपर्यंत पुन्हा त्या 'मारेकरी मंडळींनीं' माझ्यावर निकराचे प्रहार केले. पोर्चमध्यें गेल्यानंतर लोखंडी गजांचा सरकता दरवाजा कुणी तरी अर्धवट उघडला. मी आंतमध्यें गेलों व डाव्या बाजूच्या जिन्यानें वर पहिल्या मजल्यावरील दक्षिणेकडच्या रुंद व्हरांड्यांत गेलों, तेथें एक बाक होता. तेथें मी जाऊन बसलों. अंगातला अर्धा कोट आणि हातांतली खादीची टोपी मीं बाजूला काढून ठेवली व निःश्वास टाकतों आहे तों, खालून पुन्हा त्या शेंदीडशें विद्यार्थ्यांची झुंड निरनिराळ्या गांवठी पुढाऱ्यांच्या नांवांच्या गर्जना

करीत आणि 'सावरकर की जय' म्हणत, वर माझ्यावर चालून आली. ह्या सुमारास माझ्या मदतीस पांच-सहा विद्यार्थी आले व ते ह्या झुंडीला अडवण्याचा प्रयत्न करूं लागले. मी व्हरांड्यांतून कॉमनरूमच्या दिशेकडे वळलों. रविवार असल्यानें प्रत्येक वर्ग आणि कॉमनरूम कुलूपबंद होती. कॉमनरूमच्या कोपऱ्यांत आलों आणि तेथें माझा मार्ग खुंटला. तेथून परतहि फिरतां येईना व पुढेंहि जातां येईना. तेव्हां मीं तेथें तसाच उभा राहिलों. तेथें उजेड अपुराच होता. एवढ्या वेळांत माझे हल्लेकरी येऊन पोंहोचले आणि फिरून त्यांनीं पूर्वींचाच 'उद्योग' अधिक जोरानें सुरू केला.

## हल्ल्याचें भीषण स्वरूप

येथें हल्ल्याचें स्वरूप अत्यंत भीषण झालें. बाहेर उघड्यावर हल्ला होत होता तो ह्यापेक्षां बरा असें मला आढळलें. एकानें कांहीं तरी तीक्ष्ण 'पदार्थ' खुपसून मला जखम केली. तथापि ती फार जिव्हारीं बसली नाहीं. पूर्वींचे ते पांचसहा बाहेरील गुंड येथें होतेच. "सावरकरांची माफी मागा, लिहून द्या! नाहीं तर आम्ही खून करूं!" अशा गर्जना गुंड करीत होते. अशा तऱ्हेनें व्हरांड्यांत तीस मिनिटें एकसारखा प्रहार सहन करीत मी शांतपणें उभा होतों. इतक्यांत कॉलेजमधील एक डेमॉन्स्ट्रेटर तेथें आले. त्यांनीं अस्तन्या सावरून साऱ्यांना मार्गे पिटाळलें. तत्क्षणीं मारेकरी विद्यार्थी वितळूं लागले. एवढ्यांत माझ्या वतीनें आणखी दहा बारा विद्यार्थी धावून आले. एकानें कॉमनरूमची किल्ली आणली व दार उघडलें. मी आंत जाऊन खुर्चीवर बसलों. इतक्यांत व्हाइस प्रिन्सिपल केरकर, प्रो. ज. नी. कर्वे, प्रि. करमरकर, प्रो. वाटवे, लायब्ररीयन कोल्हटकर, प्रो. हेर्लेकर इत्यादि मंडळी आली. मग अर्थातच वातावरण बदललें. प्रि. करमरकरांना मीं म्हणालों, "चला, सभा झाली पाहिजे! मी तयार आहे!" नंतर सोडा घेतला व सोबतच्या मंडळींशीं बोलून पांच-सहा मिनिटांनीं तसाच उघड्या डोक्यानें व नुसत्या शर्टनें मी लेडी रमाबाई हॉलमध्यें गेलों.

## खुनाच्या प्रयत्नानंतर

खुनाच्या प्रयत्नानंतर ह्या वेळीं सभागृहांत भयंकर गर्दी झाली होती. प्रि. करमरकरांनीं झाल्या प्रकाराची कडक शब्दांत निर्भर्त्सना केली. त्यानंतर

मीं एक तासभर माझ्या नेहमींच्या पद्धतीनें खेळकर वातावरण निर्माण करून व्याख्यान दिलें. झालेल्या प्रकाराबद्दल मी एवढेंच म्हणालों, " माझ्यावर हल्ला केल्याबद्दल मी विद्यार्थ्यांना दोष देत नाहीं. आपल्या अंगांतलें चैतन्य त्यांनीं दाखविलें. तथापि मला तें दाखवण्यापेक्षां आपल्या शत्रूला दाखविलेलें बरें. मी कांहीं तुमचा शत्रु नाहीं. माझ्याशीं लढण्याची ज्यांना हौस आहे त्यांनीं एकेकट्यानें येऊन पटांगणांत माझ्याशीं लढण्याचा प्रयत्न करून पाहावा. तुमचे माझे कांहींहि मतभेद असले तर ते मिटवण्याचें हें स्थळ नव्हे आणि हे मार्गहि नव्हेत. मूठभर पोरांच्या दमदाटीनें मी माझीं राजकीय मतें बदलीन असें वाटतें कीं काय? तुम्हांला माझी सभा मोडावयाचीच असेल तर बाहेर शनिवारवाड्यासमोर चला! तेथें पुण्यांतील जनता कोणाच्या मागें आहे हें मीं अनेक वेळां दाखविलें आहे. आज आपल्या कॉलेजमधील मासिकाच्या 'सिल्हर ज्युबिली'समारंभाला अध्यक्ष म्हणून तुम्हीं मला बोलावलेंत. माझ्या-बद्दल तुम्हांला आदर नसला तरी, निदान कॉलेजबद्दल, कॉलेजच्या कार्या-बद्दल तरी आदर आहे कीं नाहीं? आज आपल्या कॉलेजच्या आवारांत मला मरण आलें असतें तर मी अमर झालों असतों! पण तेवढें भाग्य तुम्हीं मला मिळवून दिलें नाहींत! पुण्यांतील कोणत्या तरी शिक्षणसंस्थेच्या भूमीवर मृत्यु येवो हीच माझी इच्छा आहे!"

## खुनी हल्ल्यापासून मी कसा वांचलों?

कॉलेजमध्यें चार वाजतां मी व्याख्यान देण्यास उभा राहिलों. तेथून मारा-मारीस सुरुवात झाली. रमाबाई हॉलमध्यें पंधरा मिनिटें, पटांगणांत दहा मिनिटें व कॉमनरूमच्या व्हरांड्यांत तीस मिनिटें, अशीं जवळ जवळ पंचावन मिनिटें दीडशें विद्यार्थी माझ्यावर प्रहार करीत होते आणि ह्यांच्या साहाय्याला बाहेर जवळ जवळ शंभर एक विद्यार्थी होते. केवळ मीच, माझ्या सामर्थ्यानें, शक्तीनें आणि सुदैवानें म्हणून ह्या 'खूनी हल्ल्यांतून' वांचूं शकलों. माझ्यावरील ह्या दीर्घ हल्ल्याचें स्वरूप अधिक घातक अशा स्वरूपाचें होतें—इतकें कीं, भर दिवसा माझा 'खून' करण्याचा तो प्रयत्न होता ह्याविषयीं माझी मनोमन खात्री झालेली आहे. कांहीं वर्तमानपत्रांत 'पंधरा वीस मुलांनीं हल्ला केला, विशेष कांहीं त्यांत नव्हतें' अशा तऱ्हेनें ह्या हल्ल्याच्या घातुक स्वरूपाबद्दल

दिशाभूल करणारा मजकूर छापला आहे, तो सर्वथैव खोटा आहे. माझ्यावर प्राणघातक हल्ला होऊनहि मी त्यांतून वांचलों हें माझें सुदैव म्हणा, किंवा माझें सामर्थ्य म्हणा! मारेकऱ्यांचे हेतु पराभूत झाले म्हणून त्यांच्या उद्देशांतील घातुकपणा त्यामुळें सुतराम् कमी होत नाहीं! डोक्याला टेंगळें आलीं; कपाळ दोन्ही बाजूला सुजलें, पाठीला खरचटलें, एक जखम झाली, मुका मार तर जेथें बसलेला नाहीं असा शरीराचा एकहि भाग नाहीं—तथापि एवढेंहि असून मी जाहीरपणें सांगूं शकतों कीं, अजूनहि मी जिवंत आहे आणि उत्तम तऱ्हेनें जिवंत आहे. माझी प्रकृति अत्युत्तम आहे, मनःस्थिति तर जास्त प्रफुल्ल आणि आशावादी झालेली आहे! माझ्या नेहमींच्या कार्यक्रमांत ह्या अपघातानें एक क्षणाचाहि खंड पडला नाहीं! नुकसान माझें झालें तें हें–माझा खादीचा कोट फाटला, कोटाचा जो भाग पळवला गेला त्यांत एक चष्मा, कांहीं कागदपत्र, आणि पांचशें रुपयांच्या नोटा व चिल्लर होती ती नाहींशी झाली. उरलेल्या भागांत कांहीं 'चेक्स' होते, ते मला मिळाले.

## हे खुनेकरी कोण?

मंडळींमध्यें प्रामुख्यानें भरणा अर्थात् सर परशुरामभाऊ कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा होता ह्याविषयीं तर मला मुळींच संशय नाहीं. तथापि श्रोत्यांपैकीं बहुसंख्याक कॉलेजचे विद्यार्थि ह्या गुंड विद्यार्थ्यांच्या विरुद्ध होते हें मला मागाहून प्रत्यक्षपणें दिसून आलें. माझ्यावर हल्ला करणाऱ्या मंडळींत बाहेरचे पांचदहा इसम होते. सदर इसम हिंदुत्वनिष्ठ सावरकरपंथी होते. 'सावरकर की जय!' अशी गर्जना करीत सदर मंडळींत माझ्यावर हल्ला केला, त्या अर्थीं मीं 'नवयुग'मध्यें सावरकरांवर जी टीका केली त्याचा हा सूड असावा हें उघड आहे. सदर व्याख्यानाचे वेळीं माझ्यावर हल्ला करण्याचा हा कट पुष्कळ दिवसांपासून आधीं ठरलेला असावा! विद्यार्थ्यांना चिथावणी देण्याच्या कामीं गांवांतील कांहीं हिंदुसभेचे गुंड, कांहीं रा. स्व. संघाचे बेजबाबदार सभासद आणि इतर माझे वैयक्तिक शत्रु आहेत ह्याबद्दलचे मजजवळ पुरावे आहेत, ते योग्य प्रसंगीं आणि योग्य वेळीं मी प्रसिद्ध करीनच.

## समारंभास तीनच प्रोफेसर कां?

कॉलेजच्या मासिकाच्या 'सिल्व्हर ज्युबिली' अंकाचा तो प्रासिद्धीसमारंभ

असल्यानें साहजिकच कॉलेजचा प्राध्यापकवर्ग आणि इतर आमंत्रित मंडळी त्या ठिकाणीं हजर असतील अशी माझी अपेक्षा होती. तथापि, इन मीन तीन प्रोफेसर आणि मी, एवढ्याखेरीज व्यासपीठावर कोणीहि नव्हतें. कॉलेजचे बहुसंख्याक प्रोफेसर एवढ्या महत्त्वाच्या प्रसंगीं गैरहजर वा उदासीन कां ह्याचा विचार केला तर भलतेंच निष्कर्ष निघूं शकतील म्हणून मी त्या भानगडींत पडत नाहीं.

## हें कॉलेज नव्हे– सदाशिवपेठी गुंडांचा आखाडा आहे

प्रो. विनायकराव आपटे ह्यांच्या संस्थेमध्यें पूर्वीं राष्ट्रीय बाण्याचे प्राध्यापक होऊन गेलेले आहेत हें सर्वांना माहीत आहे. सध्यां ह्या संस्थेच्या विद्यालयांत जातीय राजकारणाचा बुजबुजाट झालेला आहे. कॉलेजमध्यें रा. स्व. संघाच्या चळवळीला ऊत आलेला आहे. कॉलेजचे पुष्कळसे प्राध्यापक 'भिक्षुकी वृत्तीचे हिंदुसभावाले' आणि रा. स्व. संघाचे अधिकारी आहेत. सावरकरांच्या क्षुद्र, आकुंचित आणि प्रतिगामी राजकारणाचा ह्या लोकांच्या मनावर जास्त पगडा बसलेला आहे. ह्यामुळें कोणत्याहि स्वातंत्र्यवादी, राष्ट्रीय स्वाभिमानी माणसानें ह्या संस्थेमध्यें पाऊल टाकणें यापुढें किती धोक्याचें झालेलें आहे हें माझ्या अनुभवानें स्पष्ट झालेलें आहे. ज्या कॉलेजच्या प्राकारांत दोनशें विद्यार्थि एक तासभर दिवसाढवळ्या माझा प्राण घेण्याचा प्रयत्न' करतात, त्या कॉलेजमधील शिस्त, सभ्यता, ज्ञानाचें पावित्र्य इत्यादि. गोष्टी काय दर्जाच्या असाव्यात ह्याचा जनतेनें शांत मनानें विचार करावा! 'बाहेरचे गुंड आमच्या कॉलेजमध्यें आले आणि त्यांनीं हा दंगा केला' असें जर ह्या कॉलेजच्या चालकांचें झालेल्या प्रकाराबद्दल समर्थन असेल तर, त्यांच्या शहाणपणाची नि कर्तृत्वाची कींवच केलेली बरी. सदर संस्थेचीं विद्यालयें 'सदाशिवपेठी' मनोवृत्तीच्या सावरकरी गुंडांचे आखाडे झालेले आहेत हें सत्य ह्या प्रसंगीं मोठ्या खेदानें मला जग-जाहीर करावें लागत आहे. **अशा ह्या एक वेळच्या श्रेष्ठ संस्थेचें सध्यांचें विकृत नि प्रतिगामी स्वरूप बदलून तें पूर्वींप्रमाणेंच पवित्र नि राष्ट्रीय होईपर्यंत ह्या संस्थेला महाराष्ट्रांतल्या जनतेनें कितपत आर्थिक मदत करावी, किंवा ह्या संस्थेमध्यें गुंडगिरीचें शिक्षण घेण्यासाठीं आपलीं मुलें पाठवावींत किंवा नाहीं, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.**

संस्थेचे सध्यांचे चालक ह्यांनीं ह्याबद्दल जनतेला तावडतोब जाहीर आश्वासन दिलें तरच जनतेचा ह्या संस्थेवर विश्वास बसेल.

## गुंड गारद्यांना माझा संदेश

माझ्यावर हल्ला करणाऱ्या 'सावरकरी गारद्यांना' माझा पुढील संदेश आहे— " तुम्हीं दीडदोनशें लोकांनीं एकट्या माझ्यावर हल्ला करून जो एवढा पराक्रम गाजवला आहे, त्याबद्दल महाराष्ट्राच्या इतिहासांत तुमचीं नांवें सुवर्णाक्षरांनीं लिहिलीं जातील! शिवरायाचा महाराष्ट्र तुम्हां दीडशें मारेकऱ्यांचीं स्तुतिस्तोत्रें गात बसेल ह्यांत शंका नाहीं! केवढा तुमचा पराक्रम! दीडशें मर्दांनीं एकट्या असहाय माणसावर एक तासभर हल्ला केला! दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, तुम्हांला तुमच्या पराक्रमाचा हा इतिहास मान वर करून उघडपणें कोणाला सांगतां येणार नाहीं! तुम्हांला अगदीं जवळच्या मित्राला वा आप्ताला दारें बंद करून हा तुमचा पराक्रम कानांत कुजबजून सांगावा लागेल! मी मात्र साऱ्या जगाला ओरडून सांगतों आहे कीं, मी भ्याड आहे, दीडशें लोकांनीं मला इतकें मारलें, पण मीं तें शांतपणें सहन केलें! सावरकर हे इतिहासांत पारंगत आहेत. त्यांनाच तुम्ही जाऊन विचारा कीं, ह्यापैकीं भ्याड कोण आणि मर्द कोण!

## गुंडगिरी म्हणजे पराक्रम नव्हे!

गुंडागिरी म्हणजे पराक्रम नव्हे! मारेकरी हा वीर नव्हे! खरे वीर आपल्या प्रतिपक्षाशीं कांदे, बटाटे, जोडे आणि सोड्याच्या बाटल्या घेऊन लढत नसतात! तुम्ही आपल्या खोलींत आरशासमोर हातांत वहाण, सोड्याची बाटली घेऊन तुमचें 'पराक्रमी स्वरूप' कसें दिसतें तें क्षणभर पाहा! किंवा तशा तऱ्हेचा एखादा फोटो काढून घ्या! तुमच्या आवडत्या माणसांना पत्रें लिहून तुम्हीं कळवा, " आम्ही सावरकरी पंथाचे वीर आहोंत! आम्ही जोडे, कांदे, बटाटे घेऊन शत्रूवर हल्ला करतों!" जोडे, कांदे, टमाटो घेऊन लढणें ही आमच्या हिंदु धर्माची आज्ञा आहे!"

तुम्हीं मला मारण्याचा 'प्रयत्न' केलात, पण तुम्ही त्याच क्षणीं मेलांत! तुमचें नांवहि मागें शिल्लक राहणार नाहीं! मी अजून जिवंत आहे आणि माझ्या-

वरील हजारों आघातांनीं माझें सामर्थ्य पूर्वीपेक्षांहि शतपटींनीं वाढलेलें आहे हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा! सावरकर ह्यांचें माझें वैयक्तिक असें कांहींहि वाकडें नाहीं. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं त्यांनीं पूर्वीं जो कमालीचा त्याग केला आहे, त्याला तुलना नाहीं! तें त्या वेळीं खरोखरच 'स्वातंत्र्यवीर' होते. **आजच्या सावरकरांचें राजकारण अत्यंत प्रतिगामी, आकुंचित आणि राष्ट्रघातकी आहे—किंबहुना देशांतील तरुणांची ते दिशाभूल करीत आहेत हें माझें ठाम आहे.**

## स्वातंत्र्य नुसतें हिंदूंना नको– तें सर्वांना हवें!

हिंदुस्थानला स्वातंत्र्य पाहिजे आहे आणि तें स्वातंत्र्य हिंदुस्थानांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, मग ती हिंदु असो, मुसलमान असो, खिस्ती वा कोणत्याहि धर्माची असो–मिळालें पाहिजे. आणि अशा तऱ्हेचें खरेखुरें राष्ट्रीय स्वातंत्र्य देशाला मिळवून देणारी कॉंग्रेस ही एकमेव संस्था आहे ह्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. सावरकर हे तोंडानें मुसलमानांना शिव्या देतात, पण माझ्यावर ज्याप्रमाणें त्यांच्या गुंडांनीं हल्ला केला, तसा एका मुसलमान वक्त्यावर हल्ला करण्याचें त्यांचें सामर्थ्य नाहीं. सावरकर हे इंग्रजांपेक्षां किंवा मुसलमानांपेक्षां कॉंग्रेसचा जास्त द्वेष करतात. कारण त्यांना ह्या देशांत 'राष्ट्रीय राज्य' नको आहे; भिक्षुकांचें हिंदु राज्य हवें आहे! सावरकरांचें राजकारण जोंपर्यंत असें प्रतिगामी आहे, तोंपर्यंत त्याचा प्रतिकार करणें हें प्रत्येक राष्ट्रीय वृत्तीच्या माणसाचें कर्तव्य आहे.

## मी स्वातंत्र्यवीर नाहीं, पण स्वातंत्र्यपाईक आहे.

मी राष्ट्रीय वृत्तीचा एक स्वातंत्र्यवादी देशसेवक आहे हाच सावकारी गुंडांच्या दृष्टीनें माझा भयंकर गुन्हा आहे. हा गुन्हा असेल तर ह्या गुन्ह्यासाठीं वाटेल तो देहदंड भोगावयाला मी तयार आहे! ज्या सामर्थ्याच्या वा शक्तीच्या जोरावर मी ह्या संकटांतून वांचलों ती शक्ति मला हजार वेळा वांचवील! पण ज्या क्षणीं तें माझें सामर्थ्य नाहींसें होईल, त्या वेळीं मला कोणी मारण्याच्या आधीं मरून गेलेला आढळेन. लो. टिळकांची प्रभावी वाणी नेहमीं माझ्या कानांत घुमत असते!

" My cause will prosper more by my suffering ! " आपलें कार्य आपल्या त्यागानें आणि हालअपेष्टांनींच जास्त यशस्वी होतें आणि तें कार्य सत्यावर अधिष्ठित आहे असा जर आपला विश्वास असेल, तर त्यासाठीं वाटेल तो त्याग करण्यांतच मनाला एक प्रकारचा आनंद वाटतो, तो आनंद ह्या क्षणीं मला होत आहे. असा आनंद मला वाटतो म्हणून **मला मारलें असें जाहीरपणें जगाला सांगण्यांत मला केव्हांहि अभिमान वाटेल ! आणि अत्रे ह्यांना आम्हीं मारलें असें उघडपणें कबूल करण्यांत ह्या ' भ्याड गुंडांना ' मरेपर्यंत शरम वाटेल !**

---

## 'मुमुक्षु' साहित्यिकाचा वैकुंठवास ३३

जुन्या पिढींतील एक श्रेष्ठ वाङ्मयमहर्षि, संतकाव्याचे नि चरित्राचे एक आमरण व्यासंगी आणि संशोधक, पंडित, भक्तिसंप्रदायांत रंगलेले एक प्रासादिक आणि रसाळ वक्ते ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे गेल्या सोमवारीं वर्धा येथें वैकुंठवासी झाले. पांगारकर ही मागील पिढीच्या साहित्य-क्षेत्रांत वावरणारी एक अमितप्रभावी आणि आकर्षक अशी विभूति होती. गेलीं तीन तपें महाराष्ट्रांत त्यांचें नांव ज्यांना माहीत नसेल असें बाळबोध वळणाचें एकहि कुटुंब नसेल. त्यांच्या 'भक्तिमार्गप्रदीपा'नें त्यांचें नांव प्रत्येक घराघरांत अगदीं मुलाबाळापर्यंत नेऊन पोंहोचवलें होतें. भक्तिमार्ग-प्रदीप ह्या त्यांच्या काव्यसंग्रहांत त्यांनीं निवडलेलीं संतवाङ्मयांतील रसाळ आणि भाविक गीतें महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या तोंडीं गेलीं चाळीस वर्षें खेळत आहेत. ह्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या आणि प्रती निघाल्या; तथापि त्याची लोकप्रियता अद्यापिहि कमी झालेली नाहीं. महाराष्ट्रीय कुटुंबामध्यें सोज्ज्वळ आणि भाविक वातावरण निर्माण करण्याचें श्रेय आम्ही पांगारकरांच्या 'भक्ति-मार्गप्रदीपा'लाच देतों. लहानपणीं माझ्या मनावर ह्या पुस्तकानें जो परिणाम

केला तो अद्यापिहि तसाच आहे. माझ्या 'पायाची दासी' ह्या बोलपटामध्यें 'भक्तिमार्गप्रदीप' जो मीं आणलेला आहे त्याचें कारण हेंच आहे. 'भक्तिमार्गप्रदीपा'बरोबरच महाराष्ट्रांतील त्यांची लोकप्रियता वाढविण्यास कारणीभूत होणारें त्यांचें दुसरें कर्तृत्व म्हणजे त्यांनीं अनेक वर्षें चालविलेलें 'मुमुक्षु' हें पत्र! 'मुमुक्षु' ह्या शब्दाचा अर्थ मला कळत नव्हता तेव्हांपासून मी त्या पत्राचा एकनिष्ठ वाचक होतों. संतवाङ्मयाचा आणि भक्तिसंप्रदायाचा ह्या पत्रामधून पांगारकरांनीं एवढा प्रचंड पुरस्कार केलेला आहे कीं, त्याला मर्यादा नाहीं. अनेक संतकवींच्या काव्याचे उतारे, संतांचीं चरित्रें, त्यांच्या काव्यांतील आणि चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांची रसाळ चर्चा ह्यांचीं पेवेंच्या पेवें त्यांनीं आपल्या 'मुमुक्षु'मधून भाविकांना मोकळीं करून दिलेलीं आहेत. पांगारकर हे संतकाव्याचे नुसते व्यासंगी विद्यार्थीच नव्हे, तर ते कै. राजवाडे ह्यांच्या वृत्तीचे अत्यंत कष्टाळू आणि निरलस असे एक संशोधक होते. संतकाव्याचें संशोधन करण्यासाठीं महाराष्ट्र, वऱ्हाड, मोगलाई इत्यादि विभागांत त्यांचा एकसारखा संचार चालू असे. त्यामुळें महाराष्ट्रांत अनेक ठिकाणच्या लोकांना त्यांच्या प्रासादिक निरूपणाचा, व्याख्यानांचा आणि प्रवचनांचा वेळोवेळीं लाभ मिळून त्यांची लोकप्रियता एकसारखी वाढत गेली. पांगारकरांच्या लोकप्रियतेला एक दुसरी बाजू होती. टिळक-आगरकरांच्या विद्यार्थ्यांपैकीं ते होते. ते शाळेंत असतांना आगरकरांचा आणि त्यांचा मतविरोध असूनहि आगरकरांचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम होतें. पुढें टिळकांच्या जहाल राजकारणाच्या प्रभावी काळांत त्यांचें टिळकांच्याकडे येणें-जाणें असे. प्रत्यक्ष राजकारणांत त्यांनीं भाग घेतला नसला तरी, सामान्यतः टिळकांच्या प्रभावळींतले म्हणून समजले जात असल्यानें पुष्कळ दिवसपर्यंत गुप्त पोलिसांचा त्यांच्यामागें ससेमिरा लागलेला असे. 'रामदासीबुवा' नांवाचें त्यांनीं लिहिलेलें एक चोपडें त्याच काळांत सरकारजमा झाल्याचें ऐकिवांत आहे. एवढ्या साऱ्या कार्यव्यातीमधून ग्रंथलेखन आणि निर्मिति करण्याचे कामीं त्यांनीं केव्हांहि आळस केलेला नाहीं. ह्यावरून त्यांची बुद्धिमत्ता आणि कार्यनिष्ठा केवढी प्रखर होती हें दिसून येतें. 'मोरोपंतांचें चरित्र, आणि काव्य-विवेचन', 'तुकाराम चरित्र', 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे तीन खंड' असे एकापेक्षां एक तेजस्वी आणि प्रदीर्घ मौलिक ग्रंथ लिहून मराठी सारस्वताची त्यांनीं

थोर सेवा केलेली आहे. मोरोपंतांच्या काव्याबद्दलचें त्यांचें वेड सुप्रसिद्ध आहे. 'मयूरभक्त पांगारकर' असें ते स्वतःला संबोधीत असत. 'तुकारामा'-वरील त्यांचा ग्रंथ अधिक चिकित्सक आणि मार्मिक आहे असें तज्ज्ञ मानतात. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे त्यांचे सर्व खंड प्रकाशित होऊं शकले नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ आणि रामदास असे त्यांचे तीनच खंड प्रसिद्ध आहेत. हे ग्रंथ संतकवींच्या अभ्यासकांना मार्गदर्शक होणारे असे आहेत. त्या त्या कवींच्या काळांतील निरनिराळया कवींची नि काव्याची जंत्री ह्या खंडांत बिनचूक देण्यांत आलेली आहे. ह्या ग्रंथांशिवाय लहानमोठीं अशीं त्यांनीं लिहिलेलीं किंवा संपादलेलीं किती तरी पुस्तकें प्रसिद्ध आहेत. पांगारकरांएवढा विस्तीर्ण लेखनसंसार निर्माण करणारे फारच थोडे लेखक महाराष्ट्रांत होऊन गेले असतील. अलीकडे त्यांनीं आत्मचारित्रात्मक असा 'चरित्रचंद्र' नामक ग्रंथ लिहिलेला होता. तोहि बराचसा मौजेचा आणि वाचनीय झालेला आहे. पांगारकरांचें लिखाण आधुनिक टीकाकारांच्या दृष्टीनें पाहिलें तर फारसें चिकित्सक आणि विश्लेषणात्मक नसे. चिकित्सापद्धतीपेक्षां श्रद्धाळू रहस्योद्ग्राही पद्धति त्यांना अधिक अभिप्रेत असे. बुद्धिवादी दृष्टिकोण असणें त्यांना शक्य नव्हतें. तथापि त्यांनीं जें जें म्हणून लिहिलें तें अत्यंत गोड भाषेंत लिहिलेलें असल्यामुळें वाचनीय झालेलें आहे. त्यांची लेखनशैली स्वतंत्र वळणाची, ठळक, बालबोध आणि प्रासादपूर्ण अशी आहे. संतवाङ्मयाच्या सतत अभ्यासानें त्यांच्या भाषेला एक प्रकारचें ओज प्राप्त झालेलें होतें. जुन्या पिढीमध्यें इतकी लालित्यपूर्ण नि पाणीदार लेखनशैली असलेला लेखक आमच्या डोळयांपुढें दुसरा नाहीं. त्यांच्या लेखणीप्रमाणेंच त्यांची वाणी अत्यंत रसाळ, ओजस्वी आणि प्रासादिक असे. किंबहुना पांगारकरांची महाराष्ट्रांतील लोकप्रियता वाढविण्यास त्यांचें प्रभावी वक्तृत्वच कारणीभूत होतें. "अमृतातेंही पैजा जिंके!" अशी त्यांची गोड आणि मधुर वाणी होती. व्याख्यान देत असतां 'ब्रह्मानंदीं लागली टाळी। कोण देहातें संभाळी' अशी स्थिति होण्याइतके ते विषयामध्यें रंगून जात असत. बाह्य जगाची त्यांना सुतराम् शुद्ध राहत नसे. कांहीं तरी दैवी शक्तीचा संचार त्यांच्या अंगांत झालेला आहे किंवा काय असा भास होत असे. डोळयांतून अश्रूंच्या धारा वाहत आहेत, मुखांतून एकामागून एक

अभंग, ओव्या, कटाव ह्यांचा रसाळ धबधबा वाहतो आहे, खांदे एकसारखे उडत आहेत, धोतर अगदीं फिटण्याच्या बेतांत आलें आहे तरी बुवांना त्याचा पत्ता नाहीं असा तो पांगारकरी वक्तृत्वाचा भोळाभाबडा पण प्रासादिक थाट ऐकणाराच्या विस्मरणांतून कदापिहि न जाणारा असा आहे. तासन् तास हजारों श्रोते त्यांच्या व्याख्यानामध्यें तल्लीन होऊन जात, हें दृश्य मीं स्वतः डोळयांनीं पाहिलेलें आहे. पाठांतर ही त्यांच्या वक्तृत्वामधील यशाची किल्ली आहे. एवढें प्रचंड आणि जिवंत पाठांतर असलेला एकहि वक्ता आम्हीं आमच्या आयुष्यांत पाहिलेला नाहीं. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि भारूड, दासबोध, अनंतफंदी, रामजोशी नुसते जिभेच्या टोकावर थयथय नाचत असत. भोजनाच्या पंक्तीमधून देहभान विसरून गाणीं म्हणत फिरण्याचा बुवांना फार नाद असे. पुण्याच्या शारदोपासक संमेलनाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं भोजनप्रसंगीं 'दार उघड बया दार उघड' किंवा 'बोबड्या गवळया'चें 'कुत्ना, थमाल ले थमाल अपुल्या गाई' हीं गाणीं म्हणून तेथें जमलेल्या सर्व साहित्यिकांना डोलावयाला लावलें होतें. तें दृश्य अजूनहि आमच्या डोळयांसमोर आहे. पांगारकर हे साहित्यिक असूनहि लक्ष्मीची त्यांच्यावर भरपूर कृपा होती. पैशाची वाण त्यांना आयुष्याच्या उत्तरार्धांत तरी निदान कधींच भासलेली नाहीं. इंदूरचे माजी महाराज सर तुकोजीराव होळकर त्यांवर बेहद्द खूष होते. 'ज्ञानेश्वरी' सांगण्यासाठीं कांहीं वर्षें त्यांनीं बुवांना इंदूर येथें आपल्या राजवाड्यांत मोठ्या पगारावर ठेवून घेतलें आणि पंचवीस हजार रुपयांची बिदागी त्यांनीं जातांना बहाल केली. भक्तिमार्ग-प्रदीपावरहि त्यांनीं पुष्कळ पैसा मिळविला. त्यामुळें पांगारकरांनीं आपला संसार आजपर्यंत मोठ्या सुखासमाधानानें केला. अलीकडे कित्येक वर्षांपासून ते नाशिक येथें स्थायिक झाले होते. त्यामुळें त्यांचा कै. लक्ष्मीबाई टिळक, दत्तोपंत टिळक, सोपानदेव चौधरी आणि इतर आधुनिक कवींशीं संबंध आला होता आणि आधुनिक काव्याबद्दल व साहित्याबद्दल त्यांना थोडीशी दृष्टि आलेली होती. तथापि, एकंदरींत ते आधुनिक काव्याच्या विरुद्धच होते. संतकाव्य हेंच खरें पुरोगामी काव्य आहे आणि संतांच्या मुखांतून निघालेलें अक्षर अन् अक्षर हें खरें, जिवंत आणि पुरोगामी साहित्य होय असें त्यांनीं शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून सांगितलें होतें. आधुनिक साहित्य 'धष्टपुष्ट'

नाहीं आणि भोजनप्रसंगीं श्लोक म्हणून म्हणण्याजोगें एकहि आधुनिक काव्य नाहीं अशी त्यांची आधुनिक वाङ्मयाविरुद्ध तक्रार होती. गोविंदाग्रजांचें 'गुलाबी कोडें' वाचून माझ्या बायकोनें जर त्या कवितेमधील पत्नीप्रमाणें फाजील प्रश्न केला असता, तर मीं तिच्या थोबाडींत मारून तिचें श्रीमुख गुलाबी केलें असतें असें ते म्हणाले होते. त्यांनीं स्वतः भक्तिपर अशी थोडीशी कविता केलेली आहे. जुन्या संतकवींमध्यें कधीं कधीं आढळून येणारा आडमुठा आणि गांवढळ विनोद आपल्या काव्यांत करतांना त्यांना संकोच वाटत नसे. पाऊस कसा पडतो असें एका मुलानें आपल्या वडिलांना विचारिलें, तेव्हां परमेश्वर स्वर्गात 'लघुशंका' करीत आहे ती पावसाच्या रूपानें जमिनीवर पडते असें वडिलांनीं उत्तर दिलें. अशी 'विनोदी' कविता पांगारकरांनीं लिहिलेली आहे. आधुनिक सुधारकी तऱ्हेच्या, पोषाखाच्या आणि शिक्षणाच्या विरुद्ध ते होते. भोर येथें 'शंकराजी नारायणा'च्या पुण्यतिथीच्या वेळीं विकच्छ लुगडें नेसून आलेल्या एका विदुषीवर भर सभेंत त्यांनीं ताशेरा झाडला. "आम्ही लिहिणें शिकलों सद्गुरुपाशीं" ही ओळ घेऊन पूर्वीच्या विदुषी संतस्त्रिया बिनकासोट्याचीं लुगडीं नेसत नव्हत्या अशा अर्थाचें प्रवचन करून त्यांनीं त्या वेळीं सभेंत खूपच गंमत केली. बडोद्याचे वांकसकर ह्यांच्या घरीं दूधभात खाऊन नंतर बुवांनीं प्रायश्चित्त घेतलें आणि त्यामुळें खूपच वाद निर्माण झाला, हें प्रकरण प्रसिद्धच आहे. बुवांचें हें गमतीदार स्वभाववैशिष्ट्य आणि पुराणमतवादित्व आतां केवळ त्यांची आठवण म्हणून आम्ही उल्लेखित आहोंत. मराठी साहित्यांत त्यांचें नांव आणि कर्तृत्व अमर आहे. संतकाव्याचा त्यांच्याएवढा ऊर्जस्वल उद्गाता आणि भक्तिसंप्रदायाचा प्रभावी प्रवक्ता आजपर्यंत दुसरा कोणी होऊन गेला नाहीं. लेखणी प्रासादिक, वाणी रसाळ, वागणें प्रेमळ, राहणी साधी आणि भोळीभाबडी असें बुवासाहेबांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. बुवांच्या मृत्यूमुळें मराठी सारस्वताची जी मोठी हानि झाली आहे तिचें यथार्थ स्वरूप सध्यांच्या काळांतील जनतेला आकलन होणें कठीण आहे. मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यांत आलेला नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. विशेषतः नाशिक येथें बुवांच्या गांवीं आगामी साहित्यसंमेलन भरण्याचें ठरलें असतां बुवा हयात नसावेत हा योग हृदय

व्याकुल करणारा असा आहे. बडोदें सरकारनीं त्यांचा सन्मान करावयाचें ठरविलें होतें; पण सयाजीरावमहाराजांच्या मृत्यूमुळें तो प्रसंग तहकूब झाला. बुवांचें व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखनकर्तृत्वाइतकेंच आकर्षक होतें. त्यांची ती उंच आणि स्थूल शरीरयष्टि, डोक्याला कसाबसा गुंडाळलेला बावळट रुमाल, बंदाचा सैल आणि लांब आंगरखा, करवतकांठी उपरणें, अर्ध्या गुडघ्यापर्यंत उचललेलें धोतर आणि पायांत जाड पुणेरी जोडा ही त्यांची मूर्ति अद्यापि डोळ्यांसमोर उभी राहते! पांगारकरांचा निरलस व्यासंग, कार्यनिष्ठा, त्यांचा प्रेमळपणा, त्यांची श्रद्धा हे गुण आधुनिक साहित्यिकांत तितक्या प्रभावानें आढळून येत नाहींत म्हणूनच पांगारकरांची आठवण महाराष्ट्राला पुष्कळ काळपर्यंत झाल्यावांचून राहणार नाहीं!

REFBK-0006266

## वाचनीय पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | जीवनाचा पाया, बा. कृ. गलगली | किं. १॥ रु. |
| २ | मंगळागौरीच्या रात्रीं, वि. वि. बोकील | किं. १॥ रु. |
| ३ | जलधारा, वि. वि. बोकील | किं. १ रु. |
| ४ | समाधीवरलीं फुलें, वि. स. खांडेकर | किं. १ रु. |
| ५ | स्त्री-जीवन, भाग १ व २, साने गुरुजी | किं. २ रु. |
| ६ | पुनर्भेट, भाग ६ वा, य. गो. जोशी | किं. १। रु. |

**प्रकाश मंडळ, ५२९ सदाशिव, पुणें २.**

आचार्य अत्रे यांचें नवीन नाटक

# मी उभा आहें

यांत स्थानिक स्वराज्यांतील सभासदांच्या निवडणुका कशा किळसवाण्या पद्धतीनें लढवल्या जातात, त्याचें हास्यकारक चित्र रेखाटलें आहे.

किंमत १ रुपया

**नवीन किताबखाना, पुणें सिटी.**

मुंबई शाखा — गिरगांव, मुंबई.

# सत्यशोधक म्हणजे बामणेतर नव्हे २०

परवां मुंबईला सत्यशोधक समाजाची पंधरावी परिषद् बऱ्याच वर्षांनंतर भरली. ह्या परिषदेचे अध्यक्ष सातारचे एक प्रसिद्ध कार्यकर्ते श्रीयुत केशवराव विचारे हे होते; आणि स्वागताध्यक्ष श्री. भास्करराव जाधव हे होते. श्री. भास्करराव जाधव हे एक महाराष्ट्रांतले अत्यंत विद्वान् आणि व्यासंगी गृहस्थ आहेत. ब्राह्मणेतरांचे पुढारी म्हणून जरी आज ते इतकीं वर्षे प्रसिद्ध असले तरी विद्येनें, वृत्तीनें, आचरणानें आणि संस्कारानें ते 'शंभर नंबरी ब्राह्मण' आहेत. वास्तविक ब्राह्मणेतर चळवळीचा त्यांच्यामागें आधार नसता, तरी मंत्रिपदापर्यंत ते आपल्या बुद्धिबळानें खास पोंहोचूं शकले असते. तथापि, त्यांच्या बुद्धीइतकें त्यांचें मन उदार आणि खेळाडू नाहीं ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. ब्राह्मणांचे ते पक्के द्वेष्टे आहेत. ब्राह्मणेतर चळवळीचें विष त्यांच्या हाडीं-मांसीं खिळलेलें आहे. मराठा जातीचा त्यांचा अभिमान दांडगा आहे. आणि इतकें वय झालें, आयुष्यांत इतका अनुभव आला तरी ब्राह्मणांची उचलबांगडी करण्याची भाषा खेडेगांवांतल्या एखाद्या सत्यशोधकी तमासगिराइतकीच ते आवेशानें करूं शकतात. भास्कररावांच्या बुद्धिमत्तेविषयीं